# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

(सत्र ४ : अभ्यासपत्रिका क्र. २)

# आटपाटनगरीच्या कथा (कथासंग्रह)

बी. ए. भाग-२

मराठी : आयडीएस

(शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून)

घटक १

# आटपाटनगरीच्या कथा – आशयसूत्रे

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

- १.२.१ शेतकऱ्यांचे महत्त्व पटवून देणाऱ्या कथा
- १.२.२ कल्पकता आणि रंजकता यांचे दर्शन घडविणारी कथा
- १.२.३ वासना आणि प्रेम यातील संघर्ष टिपणारी कथा
- १.२.४ राजाला अनुभवायला येणारी विक्षिप्त मनोवृत्तीची प्रजा
- १.२.५ आदिवासींचा प्रामाणिकपणा सांगणाऱ्या कथा
- १.२.६ माणसाचे स्वार्थी जगण्यावर बोट ठेवणारी कथा
- १.२.७ परोपकारी वृत्तीचे महत्त्व सांगणाऱ्या कथा
- १.२.८ आटपाट नगरीच्या कथांमधील काही कथांचे सारांश

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्दार्थ

१.५ स्वाध्याय

१.६ संदर्भ ग्रंथ सूची

१.७ अधिक वाचन

१.८ उपक्रम

## १.० उद्दिष्ट्ये :

१) साहित्यकृतीचे आशयसूत्र म्हणजे काय? हे समजून घेणे.

२) द. ता. भोसले यांच्या वाङ्मयीन योगदानाचा परिचय करून देणे.

३) 'आटपाटनगरीच्या कथा' या कथासंग्रहाचे स्वरूप समजावून घेणे.

४) 'आटपाटनगरीच्या कथां'मधील विविध कथांची आणि एकूण कथासंग्रहाची आशयसूत्रे समजावून घेणे.

## १.१ प्रास्ताविक :

लोकसाहित्यातील विविध शब्दाविष्कारांमध्ये लोककथा हा अत्यंत लोकप्रिय असा शब्दाविष्कार म्हणून ओळखला जातो. हा शब्दाविष्कार त्याच्या निर्मितीपासून आजतागायत भारतीय लोकमानसास भुरळ घालणारा ठरला आहे. त्याला मराठी माणूस आणि मराठी साहित्यही अपवाद नाही! मराठी गद्यसाहित्याचा इतिहास पाहता 'लीळाचरित्र' हा आद्य गद्यग्रंथ म्हणून ओळखला जातो. त्यातील लीळा पाहता चक्रधर स्वामींची प्रत्येक स्मृती म्हाईंभट्टाने लोककथेच्या रूपबंधामध्ये शब्दांकित केलेली आहे. याचा अर्थ यादवकालीन समाजमनावर आणि साहित्यिकांवरही या वाङ्मयप्रकाराची भुरळ पडली होती. त्याही पूर्वीपासून लोककथा हा कथाप्रकार लोकमानसात रूढ असलेला दिसतो.

लोकमानसातील या लोककथेचे विविध प्रकार कल्पिले गेलेले दिसून येतात. उदाहरणार्थ, दैवतकथा, दंतकथा, परीकथा, पुराणकथा, प्राणिकथा, जात्युत्पत्तिकथा, जीवोत्पत्तिकथा, कहाणी, व्रतकथा, इत्यादी. वेद, पुराणग्रंथ, जातककथा, जैनचुर्णी इत्यादींनी आपापल्या पातळीवर या कथांचे आकृतिबंध किंवा रूपबंध जोपासलेले दिसतात. दैवतकथा आणि कहाणी या लोककथाप्रकारांची भुरळ ही पौराणिक कथासाहित्याच्या अनुषंगाने काही प्रमाणात जास्त असलेली दिसून येते. अन्य लोककथांच्या प्रकारांमध्ये नीतिकथा, बोधकथा यांचा समावेश होतो. विविध कालखंडामध्ये लिहिल्या गेलेल्या या कथांनी हे रचनातंत्र जनमानसात रूढ आणि लोकप्रिय केलेले दिसते. या सर्वच कथांच्या आशयात धर्मशास्त्रातील नीतिशास्त्राचे प्रतिबिंब पडलेले दिसते. त्यामुळे त्या आजही लोकप्रिय आहेत. त्यात नियती, धर्मव्यवहार, कायदा, न्याय, चातुर्वर्ण्य, पाप-पुण्य, आध्यात्म, पूजा-अर्चा, देवभक्ती, इत्यादी बाबी आढळतात.

म. द. हातकणंगलेकर लिहितात, ''कथेचा विचार करता प्राचीन काळी लिहिलेल्या पुराणकथा अगर कहाण्या यांचा विचार केला तर त्यांची काही वैशिष्ट्ये ध्यानात येतात. या कथा उद्‌बोधनाच्या आणि मनोरंजनाच्या हेतूने लिहिल्या होत्या. त्यांच्या रचनेत कल्पकतेचा, चमत्कृतीचा उपयोग केला होता. कक्षेतील पात्रांच्या संदर्भात घडणाऱ्या घटनांमुळे कुतूहल निर्माण होत आणि वाढत होते. या पात्रांचा आणि घटनांचा मानवी परिस्थितीशी संबंध होता. त्यानंतरच्या कहाण्यात सांकेतिक व्यक्तिचित्रणे समाजस्थितीच्या दिग्दर्शनाचा अभाव आणि रूपकाचे आकर्षण ही वैशिष्ट्ये दिली.'' (हातकणंगलेकर, १९८६:६) याचा अर्थ लोककथांनी कथालेखनाचे पारंपरिक रचनातंत्र विकसित केले होते; परंतु कालांतराने ललित साहित्यात जेव्हा स्वतंत्र

कथालेखनप्रकार रूढ झाला. तेंव्हा कथालेखन प्रकाराला विशिष्टता प्राप्त झाली. प्रातिनिधिक पातळीवर ह.ना. आपटे, ना. ह. आपटे, गंगाधर गाडगीळ, व्यंकटेश माडगूळकर, पु. भा. भावे, श्री. दा. पानवलकर, जी. ए. कुलकर्णी, चि. त्र्यं. खानोलकर, चारूता सागर, भास्कर चंदनशिव, राजन गवस या लेखकांनी आपापल्या काळात कथालेखनाचे विशिष्ट रचनातंत्र निर्माण केलेले दिसते. उदाहरणार्थ, जी.ए. कुलकर्णी यांनी गूढकथा लिहिल्या. त्यांच्या कथांत 'नियती' ही पात्र म्हणून वावरते. त्यांच्या कथांत लोककथांचे अनेक कल्पनाबंध विखुरलेले आहेत. द.ता. भोसले यांनीही 'आटपाटनगरीच्या कथा' मधून लोककथांचे पारंपरिक लेखनतंत्र पुनरुज्जीवीत केले आहे. ज्या पद्धतीने आजतागायत मराठी लोकसाहित्यात लोककथा आढळतात. त्याच लेखनतंत्राचा वापर करून त्यांनी आपला 'आटपाटनगरीच्या कथा' हा कथासंग्रह सिद्ध केलेला आहे. या लेखनतंत्राचा त्यांना मोह पडलेला दिसतो. याची प्रचीती कथासंग्रहातील सगळ्या कथांमधून येते.

**द. ता. भोसले यांचा परिचय :**

द. ता. भोसले यांचे पूर्ण नाव दशरथ तायाप्पा भोसले. त्यांचा जन्म ८ मे १९३५ सालचा. शिक्षण एम. ए., पीएच.डी. बी.ए.च्या परीक्षेत मराठी विषयात पुणे विद्यापीठात सर्वप्रथम एक सुवर्णपदक आणि चार पारितोषिके प्राप्त. रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयांतून मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून ३२ वर्षे सेवा पूर्ण. ग्रामीण साहित्य परिषद, महाराष्ट्र साहित्य परिषद, साहित्य अकादमी, राज्य मराठी विकास संस्था आणि मराठवाडा साहित्य परिषद या संस्थांनी आयोजित केलेल्या अनेक चर्चासत्रांत त्यांनी सहभाग नोंदवला आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती समितीत सदस्य म्हणून सक्रीय सहभाग व शासनातर्फे प्रसिद्ध झालेल्या क्रमिक पाठ्यपुस्तकांचे संपादनही केले आहे. अखिल भारतीय साहित्य संमेलन आणि ग्रामीण साहित्य संमेलनामध्ये परिसंवादात वक्ता तसेच अध्यक्ष म्हणून सुमारे २२ वेळा सहभाग नोंदवला आहे. याशिवाय विविध वृत्तपत्रांच्या रविवार आवृत्तीत दहा वेळा सदर लेखन केलेले आहे.

त्यांच्या प्रकाशित साहित्यात दोन कादंबऱ्या, आठ कथासंग्रह, सात ललितलेख, चार वैचारिक ग्रंथ, पाच लोकसंस्कृतीवरील ग्रंथ, समीक्षा, चरित्रपर सहा ग्रंथ, सोळा संपादित ग्रंथ आणि दोन ग्रामीण बोलींचे शब्दकोश, अनोख्या म्हणींचा एक शब्दकोश, अनेक नवोदितांना मार्गदर्शन, सहकार्य व उत्तेजन. पुणे, मराठवाडा, बडोदा, धारवाड, नांदेड विद्यापीठांत पाठ्यपुस्तक म्हणून काही ग्रंथांचा समावेश केला आहे. एकूण साहित्यसंपदेपैकी 'इथे फुलांना मरण जन्मता', 'मी आणि माझा बाप' या दोन कादंबऱ्या, 'लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा', 'लोकजीवन आणि लोकसंस्कृती', 'चावडीवरचा दिवा', 'लोकसंस्कृती – स्वरूप आणि विशेष', 'लोकसंस्कृती : बंध आणि अनुबंध', 'ग्रामीण साहित्य आणि वास्तव', 'लोपलेल्या सुवर्णमुद्रा' या ग्रंथांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागतो. लोकसंस्कृती आणि लोकजीवन हा त्यांचा विशेष आस्थेचा आणि अभ्यासाचा विषय राहिलेला आहे. त्यांच्या 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' या नऊ पुरस्कार लाभलेल्या पुस्तकाचा मॅकमिलन प्रकाशनातर्फे इंग्रजीत अनुवाद करण्यात आलेला आहे. एक अभ्यासू वक्ता म्हणून त्यांना समाजमान्यता लाभलेली आहे.

त्यांना आजतागायत विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यात महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, दमाणी पुरस्कार, राजर्षी शाहू शिक्षण परिषद पुरस्कार, महर्षी वि.रा. शिंदे पुरस्कार अशा नामांकित संस्थांच्या पुरस्कारासह एकूण ५६ पुरस्कारांचा समावेश होतो.

**'आटपाटनगरीच्या कथा': अर्पणपत्रिका व लेखकाचे मनोगत :**

'आटपाटनगरीच्या कथा' हा कथासंग्रह ग्रंथाली प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केलेला असून कथासंग्रहाची प्रथम आवृत्ती २१ मार्च, २०१५ रोजी प्रकाशित करण्यात आलेली आहे. द. ता. भोसले यांनी ''लोककथेसारख्या सशक्त आणि प्रभावी साहित्यप्रकाराचे जतन आणि संवर्धन करणाऱ्या माता-भगिनींना'' हा कथासंग्रह आदरपूर्वक अर्पण केलेला आहे. या कथासंग्रहाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी रेखाटलेले आहे. या कथासंग्रहात एकूण अकरा कथांचा समावेश करण्यात आलेला आहे.

कथासंग्रहाच्या सुरुवातीलाच मनोगतात द.ता.भोसले लिहितात, ''लोकसाहित्यातील नाना प्रकार आणि आविष्कार सर्वभक्षक काळाच्या आणि चंचल अभिरुचीच्या माथ्यावर पाय देऊन आजही वाचकांना अमृताचे रसपान देण्यास यशस्वी झाले आहेत. ज्ञान, भक्ती, मनोरंजन, प्रबोधन, नीति-उपदेश आणि जीवनदर्शन यांच्या सशक्त दर्शनामुळे ते सर्जनाला अपुरे पडत नाहीत. भावाविष्काराला आणि जीवनदर्शनाला थिटे वाटत नाहीत. या सर्व साहित्यप्रकारांची मूळ प्रकृतीही कमालीची लवचिक असते. कालोचित बदल स्वीकारणारी असते. त्यामुळे सजग प्रतिभा व प्रयोगशील दृष्टी असणाऱ्या लेखकाला आणि कलावंतांना या लोकसाहित्य आणि लोककलांचा कलात्मक वापर करण्याचा मोह होणे स्वाभाविक म्हणावे लागेल. म्हणूनच आपल्या चित्रकार, नाटककार, कवी आणि नृत्यकारांनी या लोककला आणि लोकसाहित्यातील 'श्रीमंती'चा आपल्या निर्मितीत यशस्वीपणे वापर केलेला आढळतो. लोकसाहित्यातील ऊर्जेमुळे त्यांची निर्मिती प्रयोगशील आणि सशक्त झालेली आपण पाहतो.

मराठी लोकसाहित्यामधील कलाप्रकार आणि काव्यप्रकारांचा बऱ्यापैकी वापर झालेला असला, तरी लोककथांचा 'फॉर्म' वापरून आपले कथालेखन प्रयोगशील व सशक्त करणारी उदाहरणे खूपच कमी आहेत. लोककथेतील काही रचनाविशेष काही कथाकारांच्या कथानिर्मितीमध्ये अल्पस्वल्प प्रमाणात आपणास दिसतात हे मात्र खरे. पण आजही ती आविष्कारपद्धती-तो फॉर्म- उत्तम प्रकारे राबवता येतो-वापरता येतो, याचे कलात्मक भान फारसे जाणवले नाही. माझ्या या कथा म्हणजे लोककथांचे तंत्र वापरून, ती आविष्कार पद्धती स्वीकारून, आजचे प्रश्न, आजचे समाजमन, समाजाची आजची स्थितिगती, जीवनमूल्यांचा त्यांचा अग्रक्रम आणि मानवी स्वभावाची गूढ आणि व्यामिश्र गती-विकृती साकार करणारी निर्मिती आहे. वर्तमानकाळाची स्पंदने भूतकालीन साहित्यरूपातून व्यक्त करण्याचा हा पहिला प्रयोग आहे, असे वाटते. या आटपाटनगरीच्या कथेतून आणि राजा, राणी, प्रधानांच्या माध्यमातून एकविसाव्या शतकातील माणसाचे 'आतले आणि बाहेरचे' जग कलात्मक रीतीने साकार करण्याचा हा एक प्रयोग आहे. त्यातून कथात्म प्रकाराला आलेला नि येऊ

लागलेला साचेबंदपणा थोडाफार कमी होऊ शकेल, असे मला वाटते.''

## १.२ विषय विवेचन :

या कथासंग्रहात एकूण अकरा कथांचा समावेश आहे. त्यांची शीर्षके खालील प्रमाणे आहेत.'आटपाटनगरची गोष्ट', 'एका सोमवारची कहाणी', 'प्रजेच्या सुखासाठी', 'एका राजकन्येचा विवाह', 'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी', 'राजा प्रेमरंजन अणि नर्तिका', 'इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका', 'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार', 'राजे वीरसेनास झालेले नवे दर्शन', 'कुणा एकाचे मरण' आणि 'अन्नदान'.

प्रस्तुत कथासंग्रहातील सर्वच कथा या लोककथेचा रूपबंध घेऊन अवतरतांना दिसतात. कथेची सुरुवात आणि शेवट हा लोककथेसारखाच आहे. विशेषतः शेवट हा लोककथेसारखाच सुखद स्वरूपाचा आणि अंतर्मुख करणारा आहे. अनेकदा या कथा कहाणीचं किंवा व्रतकथेचं रूप घेतात की काय? असं सहज वाटून जातं. परंतु ते तसं होत नाही. त्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत लोककथांच राहतात. पिढ्याानपिढ्या समूहाने जपलेल्या आणि  मौखिक पातळीवर हस्तांतरित केलेल्या लोककथांसारखचं या कथांचं रूपडं आहे.

मुळात या आटपाट नगरातल्या कथा आहेत. म्हणजे प्राचीनकाळी किंवा पुराणकाळी लिहिलेल्या पंचतंत्र, वेताळपंचविशी, कथासरित्सागर, बृहत्कथा या कथासाहित्याला आलेलं बोधकथेचं स्वरूप या कथांनाही आलेले दिसून येते. या कथा  गावव्यवहारातल्या, गावगाड्यातल्या सामान्य माणसाशी संबंधित अशा स्वरूपाच्या आहेत. त्यामुळे अनेकदा या कथांमध्ये वाचक स्वतःला शोधतानाही दिसतो. कथा वाचताना पुढे काय होईल? याची जिज्ञासा वाचकाला सुरुवातीपासून लागून राहते. त्यामुळे या कथा वाचकांना गुंतवून ठेवतात. वाचकाच्या मनाची पकड घेतात. कथेच्या सुरुवातीला निर्माण झालेला पेच हा कथेच्या शेवटी कशा पद्धतीने सुटलेला आहे, हे वाचण्याची उत्सुकता शिगेला पोहोचते. त्यामुळे या कथा ललितकथा असल्यातरी शेवटी बोधकथेप्रमाणेच त्यांचा शेवट सुखद आहे. या संग्रहातील सुरुवातीच्या कथांचा वाचकवर्ग आणि श्रोतावर्ग हा मुळात किशोर वयोगटातील मुले आहेत. हे ध्यानात घेऊनच या कथांची रचना केली आहे की काय? असे वाटते; परंतु नंतरच्या कथा मात्र प्रौढ मनालाही भुरळ घालतात. या ललितकथांच्या केंद्रस्थानी सामान्य माणसं आहेत. त्यांचे प्रश्न आहेत. त्यांचं दैनंदिन जगणं आहे, गावव्यवहार आहे, नीतिव्यवहार आहे, फसवणूक आहे, स्वार्थ-लोभमूलक संबंध आहे, अनेकदा जगण्यासाठीचा दैनंदिन संघर्ष आहे, सामान्य माणसाची नियतीशरणता आहे, हे ध्यानात घ्यावे लागते. अनेकदा या कथा तत्त्वचिंतन आणि जीवनचिंतनाचं रूप धारण करतात. नैतिक-अनैतिकतेमधला संघर्ष शिगेला नेतात; परंतु शेवटी मात्र जीवनावर सात्विक निष्ठा असणारा सामान्य माणूसच वाचकाचं आकर्षण ठरतो. त्याची जगण्यावरील निष्ठा, चिवटपणा त्याला कोणतेही दुष्कर्म करू देत नाही. हा सामाजिक पर्यावरणाचा संस्कारच म्हणावा लागतो.

अनेकदा कथा सांगितल्याने आणि कथा ऐकल्याने पुण्य लाभते, या गृहीतकातून या ललितकथांतील

आजी नावाची पात्रं कथा-कहाणी सांगतांना दिसतात. त्यातूनच या कथा तोंडातोंडी पांगत जातील. आणि सरतेशेवटी प्रत्येकाच्या पदरी पुण्य पडेल, असे त्यातून सूचित करायचे असावे.

त्यांच्या कथांतील आटपाटनगरांतील राजा हा सुखवस्तू आयुष्य जगणारा आहे. त्याला आपल्या राज्याची कोणतीही काळजी नाही. किंबहुना तो अनेकदा चुकीचेच निर्णय देताना दिसतो. अनेकदा 'सावाला फाशी आन् चोराला बक्षिसी' देणारा राजाचं दिसतो. तर अनेक कथांमधून येणारा राजा हा आपल्या प्रजेची सुख-दुःखे पाहण्यासाठी वेषांतर करून राजधानीत, ग्रामीण भागात जातांना दिसतो. त्यामुळे तो जीवनातील मूलभूत प्रश्नांनाही सामोरे जातो. आणि अनेकदा तर अंतर्मुखही होतो. तर कधी हा राजा इंद्रियांच्या आहारीही गेलेला दिसतो; परंतु प्रसंगी आपलं माणूसपण शाबूत ठेवून आपल्या प्रजेचा प्रतिपाळही करतो.

'एका सोमवारची कहाणी' या कथेत आटपाट नगरातील लोकजीवनाचे चित्रण करताना लेखक लिहितो, ''एक होतं आटपाट नगर. लई मोटं हुतं हे नगर. ती एका राजाची राजधानी हुती. राजाचा राजवाडा हुता. राण्यांचे महाल होते. दरबार होता. आन् शिपाई, सैनिक, कारभारी, अधिकारी, दास, दासी सगळं या राजधानीत होतं. राजाचा खजिना भरलेला होता. लढाया-युद्धं होत नव्हती. नगरात आन् राज्यात सगळी आबादी-आबाद होती. त्यामुळे सगळे मोठ्याा विलासात दंग होते. व्यसनात रमले होते. त्यात राजाच स्वतः विलासी असल्यानं, नोकरा-चाकरांना मोकळं रानच सापडलं हुतं. या राजाला तसं काहीच काम नसल्यानं तो राण्यांच्या घोळक्यात तरी असायचा किंवा गाण्या-बिण्यात तरी रमलेला असायचा. त्यामुळं त्याच्या कारभारात ढिलाई होती. न्यायदानात गोंधळ होता. 'सावाला फाशी आन् चोराला बक्षिसी' असला राजाचा कारभार. नगरातली माणसंसुदिक राजासारकीच. रातभर गाणं ऐकायची. नाच बघायची. पीत बसायची. आन् दिवसभर लोळत पडायची. आन् घोरत पडायची. कोण कुणाला भीत नव्हतं. कोण कुणाला मानत नव्हतं. कोण कुणाला पुसत नव्हतं. त्यामुळं नगरात गुंडगिरी वाढली. चोऱ्या, माऱ्या, खून, दरोडे वाढत चालले.'' असे आटपाट नगराचे वर्णन येते.

अनेकदा प्रत्यक्ष कथेला सुरुवात करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या घटना-प्रसंगाची तजवीजही लेखकाने केलेली दिसून येते. 'एका सोमवारी कहाणी' या कथेच्या सुरुवातीला हा अनुभव वाचकाला येतो. मुळात मुक्तपणे जगणारा माणूस हा मानवी सभ्यतेच्या विकासामुळे किती बंदिस्त जीवन जगू लागला याचा अनुभव ही कथा देऊन जाते. जगण्याच्या मुक्ततेत आणि जीवनाच्या अखंडतेतंच सर्वस्व सामावलेलं आहे, हेच जणू सांगणारी ही कथा आहे. साधं, सोपं, निरागसं आयुष्य जगायचं असेल तर निसर्गाला आपलंसं केलं पाहिजे, हे सांगणारी ही कथा आहे. परंतु माणसांचे स्वार्थलोलूप संबंध हे सर्व नाकारतांना दिसतात. आणि माणूस कृत्रिम विश्वात स्वतःला बंदिस्त करून घेतांना दिसतो.

डॉ. महेंद्र कदम यांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या जुलै-सप्टेंबर २०१७ च्या अंकामध्ये 'आटपाटनगरीची सामान्य तत्त्वे' या नावाचा लेख लिहिलेला आहे. त्यात ते लिहितात, द.ता.भोसले या लोककथेचा रूपबंध

आपल्या कथेसाठी निवडतात. त्या रूपबंधाचा अत्यंत चपखल असा वापरही करतात; परंतु त्या रूपबंधाची प्रभावापीणे मोडतोडही करतात. रूपबंधाची मोडतोड करतांना प्रथमच ते पारंपरिक कथाआशयाला धक्का देतात. म्हणजे भोसल्यांच्या कथेत दैव, दैवशरणता, प्राक्तन कुठेही येत नाही. या कथेतली पात्रे तशा अर्थाने सुष्ट अथवा दुष्ट नसतात. त्यामुळे पारंपरिक कथेतील धर्म आणि श्रद्धा या दोन अत्यंत महत्त्वाच्या लोकबंधाला ते पूर्णपणे नाकारतात. त्यामुळे मग आपोआपच 'शोषणाला नकार' हे सूत्र त्यांच्या कथांच्या केंद्रस्थानी येते. आणि त्यामुळे या कथांमधील सामान्य माणसे मुक्तपणे व्यक्त होतांना दिसतात.(पृ.४०-४३) त्यांच्या कथा या अधिकाधिक वास्तवदर्शी झालेल्या आहेत. 'संघर्ष' या त्यांच्या कथेतील सामान्य माणसाचा स्थायिभाव आहे. निसर्ग हा माणसाला भरभरून देतो हा सांगणारा शेतकरी आणि आदिवासी त्यांच्या कथांतून डोकावतो. असे एक ना अनेक जनसमूह हे त्यांच्या कथांचे विषय आणि आशय बनलेले दिसतात.

अशा या अकरा कथांची आशयसूत्रे खालील प्रमाणे पाहता येतील.

### १.२.१ शेतकऱ्याचं महत्त्व पटवून देणाऱ्या कथा :

'प्रजेच्या सुखासाठी' ही कथा आटपाट नगरात घडलेली कथा आहे. परंतु यावेळी हे नगर देवभूषण राजाची राजधानी आहे. ही कथा गावगाड्यातील शेतकऱ्याचं महत्त्व निश्चित करणारी कथा आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा असतो. त्याला वेळीच सुख-सुविधा मिळाल्या नाहीत तर जगातील सर्व व्यवहार हे कसे ठप्प होतात. खाण्या-पिण्याच्या वस्तूंची टंचाई कशी निर्माण होते. देवांचे उपासक ब्राह्मण पुजारी, शिवाचे उपासक गुरव किंवा अन्य कोणत्याही समाजघटकांपेक्षा शेतकरी हा कसा महत्त्वाचा घटक आहे, हे सूचित करणारी ही कथा आहे. श्रमाचे महत्त्व सुचविणारी ही कथा आहे.

'एका राजकन्येचा विवाह' सारखी कथा ही श्रमाची महती सांगणारी कथा आहे. निमित्त राजकन्येच्या विवाहाचं आहे. या कथेत राजकन्येच्या विवाहाचे नियोजन करण्यात येते. त्याला देशोदेशीच्या राजकुमारांना, प्रसिद्ध व्यक्तींना बोलावण्यात येते. आणि आपापल्या विद्येचं प्रदर्शन करण्यास सांगण्यात येते. यात युद्धात निष्णात असणारा राजकुमार, श्रीमंतीचं प्रदर्शन भरवणारा राजकुमार, धर्मपीठाची अधिपती असणारी व्यक्ती, एका विद्यापीठाचा कुलपती अशा विविध व्यक्ती आपापल्या विद्येचं प्रदर्शन करतांना दिसून येतात. त्यात त्यांची सामाजिकता आणि समाजाभिमुखता आढळून येत नाही. राज्यविस्तारासाठी निरापराध लोकांचा बळी घेणारा राजकुमार, वडिलांच्या कर्तृत्वाचा बडेजाव माजवणारा राजकुमार, तंत्रविद्येत पारंगत असणारा आणि लोकांना चमत्कारातून फसवणारा धर्मपीठाधिकारी, पुस्तकी ज्ञानात आणि अलौकिक ज्ञानात पारंगत असणारा कुलपती या सर्वांचा समावेश होतो. परंतु या सर्वांहून भारी पडतो तो एक गरीब शेतकरी. साधा, सामान्य आणि आपल्या श्रमावर निष्ठा असणारा शेतकरी. जो रोज काबाडकष्ट करून जगाचे पोट भरतो. आपल्या लौकिक जीवनात जगाला पोसण्याचे कर्तृत्व गाजवतो; तरीही वर्तनात कोणत्याही प्रकारचा बडेजाव नसणारा हा शेतकरी! राजकुमारीही याच व्यक्तीची आपला जोडीदार म्हणून निवड करते. यातच कथेचं सारं दडलेलं दिसून येतं. कष्टानं जगणारा माणूस हा कोणत्याही परिस्थितीत आपल्या कुटुंबाला जगवू शकतो. हे यातून सिद्ध करायचे आहे.

ही कथा बोधकथेचं रूप धारणं करतांना दिसते. यात राजकुमारीचा स्वभाव आणि प्रौढ वर्तनाचाही परिचय होतांना दिसतो.

'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी' सारखी कथासुद्धा राज्याच्या सर्व व्यवहारामध्ये शेतकऱ्याचे महत्त्व स्पष्ट करणारी कथा आहे. शेतकरी हा जगाचा पोशिंदा असतो. तो जेव्हा पिकवतो; तेव्हांच जग खात असतं. अशावेळी राजधानातील राहणारे राजा आणि प्रधान राज्याच्या ग्रामीण भागाची गुप्त पाहणी करण्यासाठी वेशांतर करून निघतात. तेव्हा ते एका कलिंगडाच्या शेताशेजारी येतात. आणि त्यांची भेट एका शेतकरी मुलाबरोबर होते. त्या शेतकरी मुलाकडे असणारी माहिती, अनुभव, परंपरेने मिळणारे ज्ञान, त्याचा वापर या सर्वांमुळे राजा आणि प्रधान हे अत्यंत खूश होतात. शेतकरी हा किती हुशार असू शकतो; किती व्यवहारी, चिवट आणि कष्टाळू असू शकतो, याचे प्रातिनिधिक उदाहरण म्हणजेच ही कथा होय.

### १.२.२ कल्पकता आणि रंजकता याचं वैविध्यपूर्ण दर्शन घडवणारी कथा :

'एका सोमवारची कहाणी' ही कथा वाचत असतांना राजाने दिलेली विचित्र शिक्षा आणि त्यातून आलेला निसर्गातील वैविध्यपूर्ण अनुभव याचे दर्शन या कथेमधून आलेले पाहावयास मिळते. ही कथा वाचत असतांना आदिमानवांच्या विविध संघर्षकथांची आठवण येते. या कथेत कमालीची कल्पनारंजकता आहे. शिवाय नगरातला माणूस शिक्षेपोटी जंगलात सोडल्यानंतर त्याला आपल्या प्राथमिक गरजांसाठी संघर्ष करण्यास दाखवणे ही लहान मुलांच्या दृष्टीने कमालीची रंजक आणि बोधप्रत बाब मानावी लागते. निसर्गाशी संघर्ष करत असताना आपल्या उपजीविकेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्वच बाबींचा शोध घेतांना पहिल्याप्रथम त्या जेव्हा मिळाल्या तेव्हा असाच आनंद व्यक्त केला असेल, याचा जणू सचित्र अनुभवच लेखन वाचकांना आणि श्रोत्यांना देताना जाणवतो. त्यातच पशु-पक्ष्यांशी झालेली मैत्री ही देखील जिव्हाळा प्रकट करणारी आहे. रंगाची वैविध्यपूर्ण उधळण करणारा निसर्गच लेखकाने चित्रित केलेला दिसतो.

### १.२.३ वासना आणि प्रेम यातील संघर्ष टिपणारी कथा :

'राजा प्रेमरंजन आणि नर्तिका' या कथेमधील राजा आणि इतर कथांमधील राजा यांमध्ये कमालीचा फरक असलेला जाणवतो. इतर कथांमधील राजा हे समाजहितदक्ष अथवा निर्बुद्ध असलेले जाणवतात. इथे मात्र तसे घडत नाही. येथील राजा हा एकीकडे कलासक्त तर दुसरीकडे वडिलांसारखाच वासनेच्या आहारी गेलेला जाणवतो. अजाणतेपणी घडलेल्या चुकीचे फळ म्हणून जन्माला आलेली मुलगी ही स्वतःची आहे, हे माहीत होऊनही तो तिच्याकडे कामुकवृत्तीने आकर्षित होतो. वासना ही नेहमीच आंधळी असते. प्रसंगी ती निर्माण झालेले कोणतेही नाते पाहत नाही. सगळी नाती ही कामाग्नीमध्ये टाकून मोकळी होते. शेवटी शिल्लक राहतात; ती केवळ नर आणि मादीच! राजा प्रेमरंजन हा असाच आहे. तर दुसरीकडे सौंदर्य हे नेहमीच कसे अभिशापित असू शकते याचे उदाहरण म्हणजे रूपश्री होय! राजा प्रेमरंजन हे आपले वडील असूनसुद्धा केवळ आपण अनौरस आहोत म्हणून त्यांच्याकडून तिचा स्वीकार होत नाही. उलट त्यांच्या राजदरबारात नृत्यांगना म्हणून तिला भविष्यात त्यांच्याच समाधानासाठी वावरावे लागते. हे तिच्या नशिबाचं करंटेपण! पण तेही ती हसतमुखाने

स्वीकारते. कारण राजाच्या वासनेला ती या नैसर्गिक नात्यामुळे बळी पडू शकत नव्हती. परंतु तिचे सौंदर्य आणि कला मात्र राजवाड्यातच बंदिस्त होणार होती! माणसाच्या नैसर्गिक वासनातृप्तीचा हा सनातन संघर्षच म्हणावा लागेल. अनेकदा तिला अशा पद्धतीने मुरडही घातली जाते. राजाचा निर्णय आणि रूपश्रीची सहमती ही एका अर्थाने मुरडच म्हणावी लागते. परंतु ही कथा प्रेम आणि वासना यांमधील फरक मात्र वाचकांना शिकवून जाते. वासनेसाठी बळाचा वापर केला जातो. अशी उदाहरणे इतिहासातही शोधून सापडतील. मात्र प्रेमासाठी बळाचा वापर हा नेहमीच निरर्थक ठरलेला आहे. त्यात केवळ मनाची सहमती आणि सर्वस्व अर्पण करण्याची तयारी लागते. हेच रूपश्रीने राजाला पटवून दिले आहे. अंतिमतः ती कलेची उपासक आहे.

कलेच्या माध्यमातून मनोरंजन करणे हा तिच्या व्यवसायाचा स्थायिभाव असला तरी तिचं मन मात्र निर्व्याज, निष्पाप प्रेमाच्या शोधात असलेले जाणवते. शेवटी वयात आलेली आणि त्यातही भरभरून सुंदरता लाभलेली ती पोर म्हणता येईल. त्या नैसर्गिक ओढीपासून तीही कशी मुक्त असणार! पुरुषाची कामासक्तता, तिची अर्निबंधता आणि तिचे स्त्रीच्या सौंदर्यापायी विरघळणे हेही ही कथा सांगते. पुरुषाचे सगळे पुरुषार्थ शेवटी इथेच येऊन थांबतात की काय? हे सांगणारी ही कथा आहे. कथेच्या शेवटी रूपश्री ही आपली मुलगी आहे आणि ती कलावंतही आहे हे माहीत असूनदेखील राजा प्रेमरंजन ही तिची मुक्तता करण्याऐवजी राजाच्या नृत्यालयात तिची रवानगी करून तिच्याकडून रंजन करून घेतांना दिसतो. तिला राजदरबारी नृत्यांगना करतो. यातही तो आपला स्वार्थ साधतांना पाहावयास मिळतो. परंतु एका अर्थाने रूपश्री ही जिंकलेलीही पाहावयास मिळते. कारण तिला आपली कलोपासना करण्याची संधी मिळते. शिवाय ती आपली आब्रू वाचवण्यातही यशस्वी होते. हेच रूपश्रीचे यश म्हणता येईल. कला ही माणसाला शाश्वत सत्याकडे नेत असते; सनातन सत्याकडे नेत असते. जीवनातील महन्मंगलाची पाठराखण करत असते. हेच या कथेतून अनुभवता येते.

### १.२.४ राजाला अनुभवायला आलेली विक्षिप्त मनोवृत्तीची प्रजा :

'इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका' या कथेमधून माणसाच्या विविध वृत्ती-प्रवृत्तींचं दर्शन लेखकाने घडवलेले आहे. या कथेत राजा आणि प्रधान जेव्हा फेरफटका मारण्यासाठी वेषांतर करून राजधानीत जातात. तेंव्हा त्यांना विविध प्रकारची कामे करण्यास उद्युक्त केले जाते. एक व्यापारी त्यांना आपल्या दुकानावर ठेवून घेण्याच्या तयारीत असतो. तो त्यांना तांदळात खडे आणि मसाल्यात घोड्याची लीद मिसळण्यास सांगतो. समाजातील व्यापारीवर्ग हा जेव्हा केवळ फायद्यासाठी आपली नीतिमत्ता गमावून बसतो. तेंव्हा समाज हा अधःपतीत होत जातो. समाजाची नैतिक मूल्यव्यवस्था ही बहुतांशी पातळीवर केवळ मध्यमवर्गीय पातळीवर अवलंबून असते. अशा वेळी समाजामध्ये ज्यांना प्रतिष्ठित म्हणून ओळखले जाते; अशी मंडळी जर पाप-पुण्य किंवा नैतिक-अनैतिक हे काहीही न मानता केवळ स्वार्थ साधत असेल तर तो समाजाची फसवणूक करतो आहे, हे समजावे. जेव्हा एक मुलगा आपल्या बापाच्या मरण्याची इच्छा व्यक्त करतो. आणि त्यासाठी तो कोणत्याही स्थितिगती पर्यंत जातो. यातून माणूस संपत्ती मिळवण्यासाठी किती स्वार्थी झालेला आहे, हे कळते. तर तिसऱ्या प्रसंगात राजव्यवस्थेने मंदिराच्या माध्यमातून सुरू केलेल्या अन्नछत्राचा उपयोग मात्र मंदिराचा पुजारी

केवळ आणि केवळ आपल्या आप्तस्वकीयांसाठीच करतो. खरेखुरे गरजू मात्र त्या सुविधेपासून दूरच राहतात. ही अत्यंत लाजिरवाणी बाबही राजा आणि प्रधान मंदिरात आलेल्या गरजू व्यक्तीच्या माध्यमातून अनुभवतांना दिसतात. आणि शेवटचा प्रसंग मात्र राजा हा प्रधानाला स्मशानभूमीत घेऊन जातो. आणि तिथेच जीवनाचे अंतिम सत्य तो त्याला सांगतो. मृत्यू हे जीवनातील अंतिम सत्य आहे. हे माहीत असूनसुद्धा माणसाचा लोभीपणा, स्वार्थीपणा हा कमी होत नाही, हेच यातून सूचित करावयाचे आहे. शेवटी माणूस हा स्वाभाविकपणे आपल्या प्रवृत्तींच्या आहारी असतो. हेच खरे!

### १.२.५ आदिवासींचा प्रामाणिकपणा सांगणाऱ्या कथा :

'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार' ही कथा चक्रम राजा आणि विक्षिप्त प्रजा यांचं दर्शन घडवणारी कथा आहे. या कथेत राजा हा पूर्वजांनी बरचं काही करून ठेवल्यामुळे चार-पाच लग्न करून आपल्या बायकांसोबत गुण्यागोविंदाने राहतो. तर त्याला हसवण्यासाठी एक विदूषक हा नित्यनेमाने राजदरबारात येत असतो. प्रजाही तितकीच विक्षिप्त असलेली दिसते. एका ब्राह्मण पुजाऱ्याला शिवमंदिराच्या बाजूला विष्णुमंदिराची निर्मिती झाल्यामुळे मिष्टान्नाचा भोग मिळत नाही. त्याची तक्रार घेऊन तो राजाकडे येतो. तर दुसरी व्यक्ती आपल्या शेजारचा गृहस्थ हा रात्रभर जोरजोराने खोकत असल्यामुळे राजाकडे तक्रार घेऊन येते. तेंव्हा खोकणाऱ्या व्यक्तीला सैनिकांमध्ये ठेवण्याचे राजा सांगतो; जेणेकरून सैनिक रात्रभर जागे राहतील. तर तिसरी व्यक्ती ही चोर आहे. ती चोरी करायला गेल्यानंतर ज्या घरात चोरी करायला गेली त्या घराची भिंत आणि खिडकी कोसळते आणि त्या चोराचा हात निकामी होतो. तेंव्हा त्या घरमालकाला शिक्षा व्हावी, या माफक अपेक्षेने ती राजाकडे तक्रार करायला येते. ही तीनही उदाहरणे माणसाच्या जगण्याचे अवमूल्यन दर्शवणारी अशी आहेत. खुद्द राजाचे वर्तनच पदाला शोभेल असे दिसून येत नाही. त्यामुळे प्रजा ही अशी निघणारच! आपल्या प्रजेचे मूळ प्रश्न, त्यांच्या समस्या यांवर उत्तरे शोधण्यापेक्षा केवळ व्यंग्य करण्यात आणि विडंबन करण्यातच आपला रोजचा वेळ घालवणारा हा राजा आहे. ही समाजव्यवस्थेतील विसंगती दर्शवणारी ही कथा आहे. परंतु प्रसंगी राजाला ताळ्यावर आणण्यासाठी एक आदिवासी राजदरबारात येतो आणि जीवनातील सातत्य, मंगलता, शाश्वतता आणि परोपकारीपणा सांगताना दिसतो.

मूर्तिमंत दारिद्र्य असूनसुद्धा हा आदिवासी, राजाचा हरवलेला हार शोधून आणून देतो आणि मोबदल्यात कोणत्याही प्रकारचे बक्षीस घेण्यास नकार देतो. यातूनच त्याच्या जगण्यातले मोठेपण आणि निःस्वार्थीपणा अनुभवास येतो. राजाकडे तो चार मागण्या मागतो. आदिवासी जे अन्न खातात; ते अन्न आपण आणि दरबारातील थोर मंडळींनी एक महिना खाऊन दाखवावे. दुसरी मागणी वरील सर्वांनी आदिवासींच्या काडाकुडाच्या झोपडींमध्ये अंधाराच्या सोबतीने एक महिना राहावे. त्यातून सुख म्हणजे काय? हे समजेल. तिसरी मागणी म्हणजे आपल्या पोटाला लागणाऱ्या अन्नापुरते तरी आपण कष्ट करून दाखवावे. चौथी मागणी म्हणजे मी जंगलातून येताना आपणाला भेट म्हणून ओंजळभर बिया आणलेल्या आहेत. त्या बिया आपण लावाव्यात, वाढवाव्यात. यातून त्याची परोपकारीवृत्ती आणि नैसर्गिक जगण्याची जीवनपद्धती अनुभवास येते. शेतकऱ्यासारखाच

आदिवासी समाजसुद्धा किती स्वयंपूर्ण आणि इतरांचा विचार करणारा असतो, हेच यातून दिसून येते. कमीत कमी खर्चात आणि निसर्गाच्या सान्निध्यात जगणारा हा समाज आणि चोर, विदूषक, पुजारी आणि झोप न येणारा गृहस्थ हा नागरी भागातील समाज यांमध्ये आदिवासीच समजदार असलेले जाणवतात. नागरी सभ्यतेने आपले सर्वच निसर्गनियम कसे धाब्यावर बसवलेले आहेत, हेच यातून सूचित होते. स्वार्थलोलूपता, पैशाचा लोभीपणा यापेक्षा प्रामाणिकपणा, निर्मोहीपणा, दातृत्वाची भावनाच सर्वांनी जोपासावी, हेच सांगण्याचा हेतूतः प्रयत्न म्हणावा लागतो.

जीवन हे क्षणभंगुर आहे आणि मृत्यूमुळेच जीवनास खरी परिपूर्णता येते, हे सांगणारी 'राजे वीरसेनास झालेले नवे दर्शन' नावाची कथा आहे. माणूस कितीही जगजेता असला तरी शेवटी मृत्यू हा अटळ आहे. कोणत्याही उपलब्धीचा आपण कधीही अहंकार किंवा गर्व बाळगू नये, हे या कथेतून अनुभवता येते. राज्यारोहणानंतर राजा वीरसेन जेव्हा विष्णुमंदिरात विश्रांतीसाठी जातो; तेंव्हा त्याची भेट एका साधूशी होते. आपण साधूसाठी काहीतरी करावे असे त्याला मनोमन वाटते. आपण राज्याचे राजे आहोत ही ओळख सांगतो. तेंव्हा साधू त्याला समुद्राच्या लाटा किनाऱ्याच्या पुढे येऊ नयेत यासाठी भिंत बांधायला सांगतो. ही अतिशय अशक्यप्राय बाब होती. त्यातून राजाच्या अहंकाराचे गर्वहरण होते. पुढे तो फिरत असतांना एक नग्न मुलगा कुत्र्याच्या पिलाबरोबर अगदी आनंदात खेळत असतो. त्याला कोणत्याही कपड्यांची गरज वाटत नव्हती. त्याच्या आईला राजा जेंव्हा भेटतो तेंव्हा तो कपडे देण्याविषयी सांगतो. त्यावेळी ती नकार देते. इतरांचे उपकार उपयोगाचे नसतात. किंवा इतरांनी दिलेलं हे कधीही सरत नाही. असे म्हणून ती मदत नाकारते. यातून तिचा स्वाभिमान दिसून येतो. शिवाय माणूस कमीत कमी गरजांमध्येही जगू शकतो. याचं हे आदर्श उदाहरण म्हणून पाहता येईल. पुढे त्यांना एक वृद्ध आदिवासी महिला भेटते. ती राजाला जांभळे देते.

राजाही आनंदित होतो. मोबदल्यात तो तिला अंगठी देऊ इच्छितो. तेंव्हा तीही त्यास नकार देते. सरत्या वयाला आणि सुरुकुत्या पडलेल्या शरीराला अलंकाराचा मोह कशाला? मरणाच्या दारात असतांना हे अलंकार कशाला? म्हणून तीही अलंकार नाकारते. आपल्या राजाविषयीचा आदरभाव तिला भेटवस्तूतून व्यक्त करावयाचा असतो. ती तो करते. भरपूर मूल्य असलेली ही वस्तू एक स्त्री नाकारते. सगळं जग हे संपत्ती मिळवण्याच्या मागे धावते आणि प्रत्यक्ष संपत्ती मिळत असतांनादेखील ही स्त्री नाकारते. याचे राजाला आश्चर्य वाटते. खरे तर ती एक आदिवासी स्त्री आहे. सर्वार्थाने जंगल हीच तिची संपत्ती आहे. जंगलाचं संरक्षण करणे, भरण-पोषण करणे, खाण्या-पिण्यापुरत्या वस्तू गोळा करणे, नको असतांना त्या झाडांवर तशाच ठेवणे हे ती करतांना दिसते. अन्नसंचय हा आदिवासींचा जीवन गुणधर्म नाही.

निसर्गामध्ये जगत असतांना निसर्गाच्याच नियमांनी आपण जगलं पाहिजे, हाच आदिवासींचा स्थायीभाव आहे आणि तो ते प्रामाणिकपणे पाळतात. त्यामुळे कोणत्याही धातूचे मूल्य हे त्यांच्यासाठी निरर्थकच मानावे लागते. माणसामाणसांमधील स्नेहसंबंध जुळवणे आणि टिकवणे हाच त्यांचा नैसर्गिक गुणधर्म आहे. जंगलातील नैसर्गिक संपत्ती, पशु-पक्षी, प्राणी हीच त्यांची संपत्ती आहे; परंतु नागरी सभ्यतेमध्ये जगणारे लोक मात्र ही संपत्ती

ओरबाडून नेतात आणि आदिवासींना पोरकं करतात. स्वतःच्या ऐषआरामासाठी, गरजांसाठी, हौसेसाठी ते जंगलांतील प्राणी मारतात आणि आपल्या दिवाणखान्यात सजवतात. ही सभ्यतेला अशोभनीय अशी बाब आहे; परंतु सभ्यतेने याच बाबी प्रतिष्ठेच्या बनवलेल्या आहेत. हीच अत्यंत दुखद आणि खेदाची बाब मानावी लागते. त्यामुळे एक आदिवासी समूह राजाला भेटण्यासाठी येतो आणि विनंती करतो की, आपल्या नगरातल्या लोकांनी तिरकमठा, बंदूक आणि कुऱ्हाड घेऊन जंगलात येऊ नये. यातून जंगलाचं आणि माणसाचं नातं तुटलं जातं. त्यानंतर एक म्हातारा राजा झाडाची हिरवी आणि पिवळी पानं भेट देतो. त्यातून तो आसक्ती आणि विरक्तीचं दर्शन घडवतो. मृत्यू हेच अंतिम सत्य आहे. नेहमी त्याचेच स्मरण करत जगत राहावे; जेणेकरून जीवनातील नित्यनूतनता अनुभवता येते. असे म्हणत राजा या जंगलातील अनुभवाची शिदोरी घेऊन परतीच्या मार्गाने प्रवासास लागतो. जीवनाचं महन्मंगल दर्शन घडवणारी ही कथा आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यातील नातं किती अतूट आहे, हे दर्शवणारी ही कथा आहे. शेवटी माणूसदेखील निसर्गाचाच एक अविभाज्य भाग आहे; त्याने निसर्गावर वर्चस्व मिळवण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे; परंतु शेवटी मातीतून जन्म घेतलेली कोणतीही कलाकृती ही शेवटी मातीतचं मिसळतं असते, हे निर्विवाद सत्य माणूस नावाच्या प्राण्याने वेळीच ओळखणे गरजेचे आहे. हेच यातून लेखकाला सुचवावयाचे आहे. ही कथा नीतिकथा आणि बोधकथेच्या वळणावर जाते.

### १.२.६ माणसाच्या स्वार्थी जगण्यावर बोट ठेवणारी कथा :

'कुणा एकाचे मरण' या कथेतून समाजव्यवस्थेतील स्वार्थीवृत्तीवर लेखकाने बोट ठेवलेले आहे. समाजात भिन्न भिन्न प्रवृत्तींची माणसं असतात; परंतु त्यांच्या गरजा या त्यांना अंतिमतः स्वार्थी बनवत असतात. कथेच्या सुरुवातीलाच राजा आणि प्रधान वेषांतर करून रात्रीच्या वेळी राजधानीत भटकायला जातात. तेंव्हा त्यांना आलेले अनुभव मन सुन्न करणारे ठरतात. सुरुवातीलाच त्यांना एक दारूड्याा भेटतो. तो त्यांच्याकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न करतो. परंतु ते कफल्लक आहे, हे कळतांच तो स्वतःच त्यांना दारू पाजण्याचे पुण्य मिळवण्याचा प्रयत्न करतो. परंतु राजा आणि प्रधान तिथून पळ काढतांना दिसतात. दुसऱ्या एका प्रसंगात नगरातील श्रीमंत व्यक्ती मरणासन्न अवस्थेत आहे; अशा वेळी त्याचे नातेवाईक पोथीपठण करवून घेतात. त्याच मरण लांबावं, ही त्यांची माफक अपेक्षा असते. पण ही फक्त स्वतःची केलेली फसवणूकच ठरते. त्याच्या पुढच्या प्रसंगात एका हॉस्पिटलजवळ ते येतात. तेव्हा एका पेशंटच्या किडन्या निकामी झालेल्या असतात. त्या पेशंटचा कोणताही नातेवाईक किडनी देण्यात तयार होत नाही.

परंतु बाहेरच्या व्यक्तीची किडनी कितीही रकमेत विकत घेण्यास तयार असतात. यातून व्यक्तीचं स्वतःच्या जगण्यावरील प्रेम आणि दुसऱ्याचं केलेलं वस्तुकरण अनुभवता येते. माणसाचा स्वार्थीपणाही त्यातून पाहता येतो. तर दुसऱ्या ठिकाणी मरणासन्न व्यक्तीची संपत्ती आपल्या नावावर करून घेणारे मुलंही दिसतात. आपल्या सावत्र भावांना ही संपत्ती मिळू नये यासाठी वेषांतर केलेल्या राजा आणि प्रधानालाच खोटा साक्षीदार बनवण्याच्या प्रयत्नात ते असलेले दिसतात. शेवटी जग हे पैशाभोवतीचं फिरतं की काय? असे वाटते.

प्रत्येकाला पैसा हवा आहे. सोयी-सुविधा हव्या आहेत. परंतु त्यासाठी आवश्यक असणारे कष्ट मात्र नको आहेत. हे झाले मध्यमवर्गीयांचे! तर दुसरीकडे गरीब माणूस मात्र पोटासाठी आणि गरजांसाठी अहोरात्र कष्ट करतांना दिसतो. स्मशानात गेल्यानंतर अंत्यसंस्काराला वस्तू पुरवणाऱ्या व्यक्तीची हालाखीची परिस्थिती आणि त्याच्या मुलाच्या औषधासाठी हवे असणारे पैसे यातून त्याची हतबलता लक्षात येते. आज मरणाऱ्या माणसावर त्याचे अंत्यसंस्काराचे सामान विकले जाणार असते! त्यावर तो आपल्या मुलाचे औषध आणणार असतो. हे दारिद्र्यही शब्दातीत आहे. स्वतः राजाचा मुलगाच राजाची राजगादी मिळवण्यासाठी राजावर विषप्रयोग करण्याच्या तयारीत आहे. हीदेखील मानवी नात्यांमधील दरी रूंदावणारी घटना मनाला चटका लावून जाते. माणसाची स्वार्थता माणसाला कोणता टोकाचा निर्णय घेण्यास भाग पाडते, याचे वास्तव दर्शनच या प्रसंगातून घडते.

एकूणच समाजव्यवस्थेतील स्वार्थी मनोवृत्तीवर भाष्य करणारी ही कथा आहे. संपत्तीसाठी प्रसंगी नातेसंबंधांनाही तिलांजली देण्यास लोक कसे तयार होतात, हे सांगणारी ही कथा आहे. आधुनिकीकरणाने माणसाच्या जगण्याच्या निष्ठा किती कमकुवत केलेल्या आहेत, हे सांगणारी ही कथा आहे. बाजारामध्ये माणसाच्या प्रत्येक अवयवाची किंमत लावली जाते, हे सागंणारी ही कथा आहे. समाज गुंगीत आणि धुंदीत असले तरच राज्य करता येते, हे सांगणारी ही कथा आहे. हे ध्यानात घ्यावे लागते.

### १.२.७ परोपकारी वृत्तीचे महत्त्व सांगणारी कथा :

'अन्नदान' या कथेतून लेखकाने परोपकारी वृत्ती जोपासण्याचा मूलमंत्रच दिला आहे. आजच्या आधुनिक युगामध्ये पैसे कमावणाऱ्या माणसालाच सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झालेली दिसून येते. त्याच्याकडची संपत्ती, वास्तू, वस्तू यांवरून ती मोजली जाते. परंतु तो परोपकारी असेलच असे ठामपणे सांगता येत नाही. या कथेतील माणूस हा कफल्लक आहे; दरिद्री आहे. स्वतःचे म्हणायला असे काहीच नाही. तरी मंदिराभोवतालची स्वच्छता, अडल्या-नडलेल्यांना मदत करण्यासाठी धावणारा आहे! तो सज्जन आहे. त्याच्या स्वतःच्या जगण्याकडून कोणत्याही विशेष अशा अपेक्षा नाहीत; परंतु पोटासाठी लागणारे अन्न मात्र तो दारोदारी जाऊन मागतो. शिळं असो वा ताजं अन्न; त्याच्यासाठी ते ब्रह्मच आहे! त्याचा तो निमूटपणे स्वीकार करतो. कथेच्या सुरुवातीलाच त्याच्या पदरी करपलेली अर्धी पोळी मिळते. तेव्हा तो कोणतीही प्रतिक्रिया न देता तिचा स्वीकार करतो. पुढे त्याला एका ठिकाणी खरकट्याा पत्रावळीवरचा भात मिळतो. पुढे एक माणूस एक केळ देतो. या सर्वांतच त्याला देव मिळतो.

एवढेच नव्हे तर आपल्याला मिळालेले अन्नाचा काही भाग तो इतरांनाही देतो. मंदिरात एक कुष्ठरोगी स्त्रीला तो खरकट्या पत्रावळीवरचा भात देऊन तिच्या डोळ्यातील कृतार्थताही अनुभवतो. हा परोपकारी माणूस समाजसेवेबरोबरच पुण्यही मिळवतो. पाप-पुण्याच्या संकल्पनेमध्ये अडकलेलं अध्यात्म माणसाकडून बरचंसं काही करवून घेतं; ते या अर्थाने! अशा लोकांना समाजात प्रतिष्ठा असतेच असे नाही; परंतु त्यांच्यामुळं समाज टिकून मात्र राहतो. समाजाची एकसंधता टिकून राहते. माणसाचा जगण्यावरील विश्वास दृढ होत जातो. अन्यथा

वस्तूंची ती काय किंमत! परंतु दातृत्व अधिक महत्त्वाचे!! हे प्रत्येकाकडे असतेच असे नाही. त्यासाठी अंगी परोपकारी वृत्ती आणि सज्जनता असावी लागते. हेच या कथेतून पाहता येते. माणसाच्या सार्वजनिक वर्तनाला समाजव्यवहारामध्ये किती महत्त्वाचे स्थान आहे, हे सांगणारी ही कथा आहे. त्यामुळे ही कथा नीतिकथेचे रूप धारण करतांना दिसते. जो माणूस नैतिकतेला धरून वागत असतो. त्याच्या पदरी नेहमीच पुण्य पडते आणि तो जनसामान्यांच्या पसंतीसही पडतो. हेच या कथेतून अनुभवता येते.

## १.३ कथांचे सारांश :

संवाद, वर्णनपरता, विश्लेषण आणि आवाहकता हा 'आटपाटनगरीच्या कथा'चा रचनाविशेष आहे. कथांमध्ये अधिकाधिक ठिकाणी वर्णने आणि संवाद आलेली दिसून येतात. तर अनेकदा प्रश्न आणि समस्येचे निराकरण करण्यासाठी विश्लेषणाला खूप मोठा अवकाश प्राप्त करून दिलेला आहे. या अवकाशातून कथासंग्रहातील कथा या तत्त्वचिंतनाचा पातळीवरही जातात. अनेकदा कथांतील पात्रांची संख्या लक्षात घेता; ही काही ठिकाणी जास्त झालेली आहे. विशेषतः अनेक कथांमधून येणारी 'राजाची भ्रमंती' हा लोककथांतील कल्पनाबंधाचा झालेला वापर; त्यामुळे या कथा अनेकदा दीर्घ रूप धारण करतात. त्या केवळ एक वा दोन घटना-प्रसंगांपुरत्या मर्यादित न राहता प्रसंगांची साखळीच चित्रित करतांना जाणवतात. लोककथांसारखे त्यांचे रूप लहान राहात नाही. त्यामुळे वर्णनं आणि विश्लेषणांसह काही कथांचे सारांश दिले आहेत.

### १.३.१ सर्वसामान्य माणसांचे शोषण आणि स्वार्थलोलूप माणसांचे चित्रण करणारी कथा :

ही 'आटपाटनगरची गोष्ट' नावाची कथा आहे. या कथेची निवेदिका ही ग्रामीण महिला आहे. कथेच्या सुरुवातीलाच ती म्हणते, ''आज हाय मंगळवार. म्हणजे तुळजाभवानीच्या उपासाचा वार. या दिवशी मी देवीचा उपास करतेच; पण देवादिकांची एखादी कहाणीही सांगते. कधी लेकरं कहाणी ऐकायला गोळा होतात; कधी म्हाताऱ्या बायाबापड्याा असतात. कहाणी सांगणाऱ्या बाईला म्हणे पुण्य लागतं. कहाणी ऐकणाऱ्या बाईलाबी पुण्य लागतं म्हणतात. आता मी तुमाम्नी सांगणारी कहाणी पुण्याची आहे का नाही, मला ठाऊक नाही. पुन्हा ती कहाणी आहे की गोष्ट हे ठाऊक नाही. ती देवाची नसल्यानं पुण्य मिळेल याची खात्री नाही. तरीही करमणूक म्हणून मी सांगते. तुम्ही ऐका ध्यान देऊन. ऐका माझी अन् माझ्या म्हशीची कहाणी.'' या एकूणच विवेचनातून 'कहाणी'चा संबंध हा पुण्याशी जोडलेला आहे, असे म्हणता येते. परंतु ही कहाणी नसून कथा आहे; गोष्ट आहे.

कथेच्या सुरुवातीलाच ती आपली शोकांतिका निवेदन करते. त्यात तिने आटपाट नगरात खूप राहण्याचा प्रयत्न केला. परंतु तिला राहू दिले गेले नाही. आठ पेठांचं नगर असूनदेखील तिची ही शोकांतिका होती. व्यापारी, सचिव, सेवकवर्ग, सैनिक आणि सेनापती या सर्वांची प्रत्येकी पेठ होती. परंतु शेतकऱ्यांची मात्र पेठ नव्हती. हे खरे तिला जागा न मिळण्याचे कारण होते. नगराची शोभा जाण्याच्या भीतीने राजाने ही पेठच निर्माण केलेली नव्हती. त्यामागचे कारण कथेतील राजालाच माहीत!

असो. पण कथेच्या सुरुवातीलाच निवेदक असणाऱ्या ग्रामीण म्हाताऱ्या आजीची म्हैस हरवलेली आहे. सगळी शोधाशोध घेऊनसुद्धा तिचा थांग पत्ता लागला नव्हता. शेवटी हरवलेल्या म्हशीचा राजामार्फत शोध

करण्यात यावा, यासाठी ती राजाकडे आलेली दिसून येते. त्यातून तिला आलेल्या विविध पदाधिकारी व्यक्तींचे अनुभव तिने या कथेतून व्यक्त केलेले आहेत. राजवाड्यात प्रवेश करतांनाच तिला एक रखवालदार अडवतो आणि तिला एका ब्राह्मणाला भेटायला सांगतो. त्या मोबदल्यात तिच्याकडून पपया हिसकावून घेतो. राजवाड्यात जाणाऱ्या ब्राह्मणाला तो थांबवतो. तेव्हा तोही दक्षिणेच्या स्वरूपात तिच्याकडून केळीचा घड, अर्धा किलो पेढे, खडीसाखर, नारळ आणि महावस्त्राची मागणी करतो. काहीशी आकडेमोड करून तो सांगतो, ''तुझी म्हैस चुकलेली आहे. सोळा आणे चुकलेली आहे. चरत चरत लांब गेली. तिला वेळेचा अन् दिशेचा भ्रम झाला. त्यातच ती चुकून एकाच्या वस्तीवर गेली. तो नेमका तुझा वैरी निघाला. म्हशीची ग्रहदशा वाईट. शनि वक्री, मंगळ आडवा आला. शांती करायला पाहिजे. त्यासाठी बराच खर्च असतो. तरीही तुझी म्हैस उत्तर दिशेने गेली आहे. त्याच दिशेने तू शोध. इतर दिशांचा विचार करू नको. मी खात्रीनं सांगतो तुला; ती उत्तर दिशेलाच सापडेल.''

परंतु त्याचे कथन मात्र तिला समजले नाही. दक्षिणा देणे मात्र अटळ होते. पुढच्या क्षणी राजदरबारातला एक जबाबदार अधिकारी तिला भेटतो. तेव्हा तिच्या म्हशीची विविध प्रकारे चौकशी करतो. तेव्हा तीही रागावून जाते. म्हशीचे वय, उंची, रंग, दात शिवाय ती दुधाची की बिनदुधाची इत्यादीची चौकशी करतो. खरे तर त्याचे सर्वच प्रश्न निरर्थक असतात. परंतु राजकारभारातील जबाबदार अधिकारी म्हणजे या सगळ्या चौकशा आल्याच. म्हातारीच गाऱ्हाणं ऐकल्यानंतर तो म्हणतो, ''हे बघा मावशी, राजाच्या व प्रधानाच्या अध्यक्षतेखाली एक चौकशी समिती नेमू. त्या समितीनं काय करायचं त्याचे नियम नक्की करू. या समितीला कोणते अधिकार आहेत व कोणत्या मर्यादा आहेत याची कल्पना देऊ आणि लवकर म्हैस व गुन्हेगार पकडला जाईल याचा लेखी हुकूम काढून त्यांना कामाला लावू. आमी तुमची म्हैस नक्की शोधून देऊ. ती नाहीच सापडली, तर दुसरी एखादी चुकलेली म्हैस तुमच्या दारात बांधू. मग तर झालं? जा आता तुम्ही.'' परंतु हे होत असतांनाचा समिती गठीत करायला मात्र १०-१५ दिवस लागतील हे ऐकल्यानंतर मात्र तिचा विश्वास मात्र डळमळताना दिसतो. आणि तोंडावर खेटरानं मारावं तसा चेहरा करून ती परत निघते. येतांना रस्त्यात मारुतीचं देऊळ लागतं. त्या देवळात ती जाते तर त्या ठिकाणी गावातली दोन श्रीमंत माणसं आलेली दिसतात. त्यापैकी एक सोन्याचा व्यापारी तर दुसरा कडधान्याचा व्यापारी. धान्यांमध्ये खडे मिसळून लोकांची फसवणूक करणारा. त्यांना ती आपल्या म्हशीच्या हरवण्याबद्दल सांगते.

त्यावर ते दोघे तिचेच पाप-पुण्य काढतात. म्हशीच्या दुधात पाणी टाकून लोकांना विकत असशील; लोकांना फसवत असशील म्हणूनच तुझी म्हैस ही हरवली असली पाहिजे, असे सांगून तिची निराशा करतात. तीही त्यांच्या व्यवसायाबद्दल फाडफाड बोलते आणि तिथून काढता पाय घेते. त्यातच घरी येताना गावातला एक माणूस विठोबा तिला भेटतो. तोही तिची म्हशीवरून टवाळकी करतो. रेडकू मेलं तर मला दे त्यात भुसा भरून माझ्या म्हशीसमोर ठेवतो, असे तो म्हणतो. त्यावर ती म्हणते, ''मुड्द्या, विठ्याा, तुज्या जिभेला काय हाड हाय का नाय? तुज्या दुधासाठी मी माझं रेडकू मारू व्हय? त्येला नळीनं दूध पाजून जगवीन. लेकरासारखं सांभाळीन. माज्या रेडकाच्या मरणाची वाट बघण्यापेक्षा तुझी म्हैस आण की माझ्या रेडकाला पाजायला?

अशानं काय पाप लागंल तुला?'' त्याला ओशाळल्यासारखे करते. आणि घरचा रस्ता धरते. वस्तीत प्रवेश करतांनाच तिचा नातू म्हैस स्वतःहून घरी आल्याचे सांगतो आणि तिच्या जीवात जीव येतो. तेव्हा धरणीवर माथा टेकवून धरणीचे आभार ती मानते. आणि इथे ही कथा संपते.

हरवलेल्या म्हशीचा शोध घेण्याचा नाना तऱ्हेने शोध घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या आजीची ही गोष्ट आहे. यातून गावव्यवहारातील लोक, राजाचे सैनिक, राजाचा ब्राह्मण हे आपापला स्वार्थ कसा साधून घेतात, हेच लेखकाला इथे सूचित करावयाचे आहे. गावातल्या एका महिलेला मदत, सहाय्य करण्याऐवजी तिला लुटण्याकडेच गावातली काही लोकांचा कल असतो. आणि अशीच लोकं या कथेतून चित्रित केलेली आहेत. राजाच्या शासनव्यवस्थेवर, न्यायव्यवस्थेवरदेखील याठिकाणी आक्षेप येताना जाणवतो. शिवाय सामान्य माणसाला आपले प्रश्न स्वतः होऊनच सोडवावे लागतात, अन्य कुणीही त्यांच्या मदतीला येऊ शकत नाही. हाही निर्वाळा या कथेतून अनुभवता येतो. ही कथा बोधकथेचं रूप धारण करणारी कथा आहे.

### १.३.२ जीवनाचा मुक्त अनुभव प्रदान करणारी कथा :

ही कथा 'एका सोमवारची कहाणी' या नावाची आहे. या कथेची निवेदिका ही म्हातारी आजी आहे. सोमवारच्या दिवशी दुपारच्या वेळेला भरपूर उपवासाचे पदार्थ खाऊन आराम करत असताना विरंगुळा म्हणून ती आपल्या नातवांना, शेजारच्या लहान मुलांना कहाणी सांगतांना दिसते. या कथेत राजाच्या चुकीच्या निर्णयामुळे एका व्यक्तीला आपल्या आयुष्यातील बराच काळ हा जंगलात कसा व्यतीत करावा लागतो. आणि त्यातून तो जगण्यातील मुक्तता कशा प्रकारे अनुभवतो, हे चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही कथा गरजेतून जन्माला आलेला शोध, कल्पकता आणि रंजकता यांचा पुरेपूर मिलाफ असे म्हणता येईल.एका स्त्रीच्या घरात गुंड शिरून तिच्या अब्रूवर झाला घालत असताना एक माणूस मधे पडतो आणि त्या गुंडाचाच सुरा त्याच्याच काळजात घुसवतो. त्या नराधमाला ठार मारतो. त्याला राजापुढे गुन्हेगार म्हणून उभे केले जाते. तेव्हा राजाही चांगले काम केले म्हणून बक्षीस देण्याऐवजी त्याला गुन्हेगार ठरवतो आणि एका घनदाट जंगलात, निर्मनुष्य जंगलात त्याला एकटे राहण्याची शिक्षा सुनावली जाते. तिथेच हिंस्त्र पशूंच्या हल्ल्यात त्याला मृत्यू येईल किंवा अन्नपाण्यावाचून तडफडेल किंवा सर्पाच्या दंशाने तो मरेल, असे राजाला वाटते. त्यातूनच त्याला जंगलात सोडले जाते आणि त्या जंगलातील एकांतातच जीवनाचे विविध रंग तो न्याहाळतांना दिसतो. जंगलांतच मुक्त जगणं अनुभवतांना दिसतो.

निसर्गातील पशु-पक्ष्यांशी कसे बोलावे, वागावे हे तो शिकतो. त्यातून त्याची निसर्गाशीही मैत्री होते. जंगलात गेल्यागेल्या त्यानं सगळं हिरवंगारं जंगल न्याहाळलं. त्या हिरव्यागार चैतन्यानं तो पार मोहरून जातो. हिरव्या रंगाच्या नाना छटा त्याच्या मनाला भुरळ घालून जातात. जंगलात आल्यानंतर सुरक्षित जागा शोधण्याच्या प्रयत्नात तो एका तळ्याकाठी हिरव्यागच्च झाडाखाली तो काही लाकडांच्या आणि पालापाचोळ्याच्या सहाय्याने झोपडी बांधतो. खाण्यासाठी अन्नाचा शोध घेत असतांनाच त्याला दोन गारगोट्या मिळतात; रुईचा कापूस मिळतो. त्यातून अग्नी उत्पन्न होतो. आणि त्याची अग्नीची प्राथमिक गरज पूर्ण होते.

निवेदक पुढे म्हणतो, ''या अग्नीमुळे एका परीनं त्याने मरणालाच जिंकलं होतं, त्याच्या मनात आलं, ज्याच्याजवळ अग्नी, पाणी, मडकं अन् माती उकरण्याचं खुरप्यासारखं साधन असेल तर तो उपाशी मरत नाही. संकटांवर मात तो करतो. समाधानानं जगते अन् स्वतःच्या जगण्यालाही उन्नत करतो. तो एक नवं जगच निर्माण करतो.'' त्यातूनच पुढे तो अनेक गोष्टींचा शोध घेतो. उदाहरणार्थ, कंदमुळे, त्यांना भाजणे, इत्यादी. जंगलातील या जगण्यात तो पक्ष्यांशी जवळीक करतो. तो पक्ष्यांच्या विविध रूप-रंगांनी भारावून जातो. त्यांना आपलंसं करण्याचा प्रयत्न करतो. आपल्या अनुभवकक्षेपलीकडील अनेक पक्षी त्याचे सोयरे होतात. जंगलात दिवसभर भटकणं हाच त्याचा उद्योग होतो; पण रोज त्याला नवीन काहीतरी शिकायला मिळत असे. रोज एक नवीन अनुभव त्याच्या पदरी पडत असे. त्यामुळे तो जंगलांला आपलंस करतांना दिसतो. दिशाहीन जगत असतांनाच जगण्याच्या नव्या दिशेचा शोध तो घेत होता. कृमी-कीटक, पशु-पक्षी न्याहाळणे हे त्याच्या नित्याचे काम बनले होते. जगाला आपलंसं करण्यातचं खरी कृतार्थता आहे. निसर्गाला आपलंसं केलं की निसर्गही आपलंसं करतो, याची प्रचीती वेळोवेळी त्याला येत होती. त्यातच त्याचा एकाकीपणाही दूर झाला. असाच एक सहृदय प्रसंग लेखकाने वर्णन केलेला आहे. तो असा :''नव्या जगाच्या अनोख्या धुंदीत असेच काही दिवस गेले आणि आणखी एका प्रसंगाला त्याला सामोरं जावं लागलं.

एकदा काय झालं, सायंकाळच्या वेळेला सोसाट्याचा वारा सुटला. बघता बघता त्याचं रूपांतर वादळात झालं आणि त्यात त्याची झोपडीही बरीच विस्कटली. पण त्यापेक्षाही समोरच्या झाडाची फांदी आवाज करीत त्याच्यासमोर कोसळली. फांदी तुटून पडण्याचं त्याला नवल वाटलं नाही. पण त्या फांदीवर असलेलं एक घरटे चक्काचूर होऊन मातीत पडलं. त्यात असलेल्या इवल्याशा पिलास जखम झाली असावी. ते केविलवाण्या आवाजात चिवचिवाट करत होतं. याला राहवेना. तो तीराप्रमाणे धावला आणि आपल्या ओंजळीत त्याला घेऊन आला. त्याला थोडीशी ऊब दिली. त्याचा पाय बांधला अन् गवताच्या गादीवर ठेवून मगच त्याने आपली विस्कटलेली झोपडी नीट बांधली. मग त्याला त्याने चार थेंब पाणी पाजलं. कसल्या तरी रानपाल्याचा चीक त्याच्या पायावर बांधला व आपल्या पोटाशी घेऊन झोपला. खाणं-पिणं, औषधाला आणि त्याच्या प्रेमाची ऊब यामुळे ते बरं झालं. त्याचा पायही ठीक झाला. पण तरीही ते परत आपल्या आईकडे गेलं नाही. किंवा मोकळ्या आकाशात उडूनही गेलं नाही. ते त्याच्याबरोबर त्याचा एक सवंगडी म्हणूनच राहू लागलं. त्याचा पाखराला लळा लागला. अन् पाखराचा त्याला लळा लागला. नंतर नंतर तर ते त्याच्या ओंजळीत बसून त्याच्याबरोबर साऱ्या रानावनात फिरू लागलं. त्याच्याबरोबर खाऊ लागलं. झोपू लागलं. काही वेळापुरते ते गेलेच बाहेर तर पुन्हा एखाद्या लेकरानं घरी परतावं नि आईच्या मांडीवर बसावं, तसं ते बसू लागलं. या छोट्याशा घटनेनं त्याच्या साऱ्या जीवनालाच कलाटणी मिळाली. त्याचं एकाकीपण पार पळून गेलं. या मित्राच्या संगतीत त्याला मिळालेल्या शिक्षेचं रूपांतर सुखात झालं. आनंदात झालं. त्याने देवाचे मनोमन उपकार मानले.''

माणूस आणि पक्षी यांच्यातील लळा दर्शवणारा हा प्रसंग आहे. निसर्ग आणि माणूस यांच्यातील दुरावा मिटवणारा हा प्रसंग आहे. अन्नसंचय हा प्राण्यांचा गुणधर्म नाही. याची प्रचीतीही त्यातून येते. प्राथमिक

गरजांसाठीचा माणसांचा संघर्ष मात्र नेहमीच प्रत्ययाला येतांना दिसतो. तो पदोपदी निसर्गाचं प्रेम आणि वात्सल्य अनुभवतांना दिसतो. हा दैनंदिन अनुभव घेत असतांनाच एक दिवस राजाचे सैनिक येतात आणि त्याला शिक्षा संपली म्हणून घेऊन जाण्यास निघतात. त्यावर तो म्हणतो, ''मला तुमच्या माणसांच्या जगात यायचं नाही. तिथं मला खरंखुरं सुख मिळणार नाही. खरीखुरी शांती मिळणार नाही. आणि हे लक्षात घ्या, मी मरावं म्हणून तुम्ही मला जंगलात फेकून दिलं, पण देव या सृष्टीच्या-जंगलाच्या-रूपानं कुणालाही नाहक मरू देत नाही. जंगलाच्या मांडीवर खेळणारा माणूस खरा आनंदी, खरा समाधानी आणि खऱ्या शांतीच्या जगात राहतो. त्याचा स्वार्थ आपोआप गळून पडतो. त्याची वखवख कमी होते. तो स्वच्छ आणि शुद्ध आयुष्य जगतो. या खऱ्या जगण्याचा मला लळा लागला आहे. शिवाय, इथला पशू पक्ष्यांचा मला लागलेला लळा सोडता येत नाही. त्यांच्यामुळेच मी तृप्त जगतोय.'' कथेच्या शेवटी शिक्षा भोगणारा माणूस हा निसर्गाशी एकरूप होतांना जाणवतो. खऱ्या सुखाचा अनुभव हा केवळ जंगलातच मिळतो, यावर तो ठाम राहतो. माणसाने जंगलाच्या, निसर्गाच्या विरुद्ध जगण्याऐवजी निसर्गाशी एकरूप होऊनच जगावे, असा संदेश देणारी ही कथा आहे.

### १.३.३ प्रजेच्या सुखासाठी पोशिंद्याचा 'बळी' देणारा राजा :

'प्रजेच्या सुखासाठी' ही कथासुद्धा एका आटपाट नगरात घडलेली कथा आहे. अगदी कुबेराची वैभवशाली नगरी असलेल्या देवभूषण राजाच्या राजधानीतील ही कथा आहे! राजा हा नेहमी चाणाक्ष, व्यवहारदक्ष आणि समाजहितैषी असावा. परंतु लोकांचा ऐकणारा आणि त्यांप्रमाणे वागणारा राजा असेल तर नगराची काय अवस्था होते, याचे चित्रण या कथेतून वाचायला मिळते. नगरातली सर्वच जनता ही सुखवस्तू आणि आळशी आहे. त्यांना मिळणाऱ्या मूलभूत गरजांच्या सुविधा या प्रमाणापेक्षा जास्त असूनसुद्धा आपल्यापरीने राजाने त्या पुरवाव्यात, असे त्यांना वाटते. यातून त्यांना हव्या असणाऱ्या वस्तूंची पूर्तता ही शेतकऱ्यांकडून व्हावी, ही त्यांची माफक अपेक्षा असते. त्यासाठी ते शेतकऱ्यांना वेठीस धरण्यास राजाला सांगतात आणि राजाही त्यांप्रमाणेच वागताना दिसतो. याचा परिणाम काय होतो, हे कथेच्या शेवटी एक अनुभवी व्यक्ती राजाला सांगते आणि राजाला त्याचा कसा पश्चात्ताप होतो, हे विशद करणारी ही कथा आहे.

कथेच्या सुरुवातीलाच देवभूषण राजाने आपल्या नगरामध्ये विविध देवीदेवतांची मंदिरे बांधल्याचे समजते. त्यामुळे तो निश्चितच आस्तिक राजा असला पाहिजे. त्याचबरोबर राज्यामध्ये शांती आणि समाधान नांदत असतांनाच राज्याचे लष्करही सज्ज ठेवले होते. त्यांच्यासाठी विशेष सोयीही पुरवलेल्या होत्या. विविध नाट्यगृहे, तलाव, बागबगीचे तयार केली होती. परंतु प्रसंगी तो ब्रह्मवृंदाच्या आहारी कसा जातो? याचे चित्रणही पुढे येते. एक ब्राह्मण राजाला म्हणतो, ''आमच्या सर्वांच्या पूजाविधीला अलीकडे भरपूर फुलं आणि भरपूर तुलसीदल उपलब्ध होत नाही. त्यामुळे ही पूजा यथासांग होत नाही. यथाशास्त्र होत नाही. आणि त्यामुळे आपणा सर्वांना मिळणारी पुण्यप्राप्ती, आपणा सर्वांना मिळणारी ईश्वरीकृपा खंडित होईल असं वाटतं. एवढंच नव्हे, तर हे राजन, आपणावर ईश्वरी कोपदेखील होऊ शकेल. म्हणून आम्हा सर्व साधकांची आणि पुरोहितांची आपणास नम्र प्रार्थना आहे की, आपण असा आदेश जारी करावा की, आपल्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांनी

आपल्या शेतामधील एक एकर वा निदान अर्धा एकर तरी फुलवेलींची लागवड करावी, तुलसीची लागवड करावी आणि आम्हा उपासकांना हे पूजासाहित्य दान म्हणून बहाल करावं. त्यामुळे पूजेतून मिळणारी यथासांग पुण्यप्राप्ती सर्वांनाच मोक्षपदाला नेण्यास कारणीभूत ठरेल. आमची ही प्रार्थना महाराजांनी स्वीकारावी आणि ताबडतोब तसा आदेश द्यावा. गावा-गावातून राजाज्ञा फिरवावी, अशी विनंती करण्यासाठीच नगरीतील सर्व मंदिरांचे पुरोहित-पुजारी आपल्या दरबारात हजर झालो आहोत.''

एवढं बोलून झाल्यावर त्या वयोवृद्ध ब्रह्मवृंदाने पुन्हा एका महाराजांना अभिवादन केलं. यातून राजाला ईश्वरीकोपाची भीती दाखवण्यात येते आणि आपल्याला हवे असणारे ईप्सितही साध्य करून घेतले जाते. शिवाय ब्राह्मणांसाठी केलेलं काम हे ईश्वरसेवा असते, असेही सांगतात. त्यात राजाला पुण्य लाभतं. पाप-पुण्यांच्या विक्षिप्त धार्मिक संकल्पनेमध्ये राजाला बांधून टाकलं जातं. त्यामुळे राजाही त्याला हवा असणारा आदेश काढतो आणि त्यांच्या पूजाअर्चेसाठी आवश्यक असणाऱ्या फुलझाडांची लागवड प्रत्येक शेतकऱ्याने करावी, असा आदेश काढतो. कथेत येणारा यानंतरचा पुजाऱ्यांचा समूह हा शिवभक्त आहे. त्यांनाही शिवलिंगाच्या पूजेसाठी दूध हवे असते. त्यामुळे त्यांची पूर्तता करण्यासाठी नगरातल्या सर्वच शेतकऱ्यांच्या जनावरांचे दूध हे शिवलिंगाच्या पूजाअर्चनेसाठी गरजेचे आहे, म्हणून सगळे दूध लहान मुलांना न देता आणि वासरू, कोकरांना न देता शिवलिंगाच्या अभिषेकासाठी देण्यात यावे, असा आदेश काढण्यात येतो. त्यातून त्याला अनेक यज्ञांचे पुण्य लाभणार असते. वरील हे दोन्ही आदेश शेतकऱ्यांशी संबंधित असल्यामुळे शेतकरी जनता ही उपाशी मरणार होती.

निम्मी जमीन ही फुललागवडीसाठी गेल्यामुळं पिकांचे उत्पादन घेता येत नव्हते. राज्यातील जनतेला आवश्यक असणारे धान्याचे उत्पादन होणे शक्य नव्हते. शिवाय दूध न मिळाल्यामुळे जनावरे आणि मुलं उपाशी मरणारं होती. महाराजांच्या वैयक्तिक पुण्यप्राप्तीसाठी हे सर्व होत असतांना राजा खूप समाधानी होता. मागच्या दुष्काळातील सर्वांचे झालेले हालही त्याला आठवलेले होते. त्याचबरोबर राज्याच्या सैन्यातील घोडदळ, हत्तीदळ आणि उंटदळासाठीही चारापाणी लागणार होता. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांनी केवळ एखादं दुसरं जनावरं पाळावं आणि सर्व चारा हा दळातील घोडे, हत्ती आणि उंटांसाठी पाठवून द्यावा. जेणेकरून ते सहजपणे जगतील. त्याप्रमाणे राजाने चारावसुलीचा आदेश काढला. त्याचबरोबर राज्यातील प्रजेला सरपणाचा तुटवडा होत असताना राजाच्या अखत्यारीतील जंगलांतील लाकूडफाटा तोडण्यासही तो परवानगी देतो.

कथेत सुखवस्तू, ऐशआरामी लोकांचे प्रश्नही उपस्थित होतांना जाणवतात. आपल्या सोयीने घरच्या नळांना पाणी हवं आहे. म्हणून ते राजाला विनंती करतात. त्यांच्या झोपीच्या वेळी पाणी सोडले जाते. पाणी सोडले असतांनासुद्धा ते सकाळी झोपलेले असतात किंवा कामावर असतांना पाणी सोडले जाते किंवा दिवसा पाणी चालू असतांनासुद्धा त्या नळाला चावी लावली जात नाही. परंतु पाणी येण्याच्या वेळी मात्र ती प्रजा उठत नाहीत. याला पर्याय म्हणून शेतकऱ्यांचे शेतीचे पाणी कमी करून चोवीस तास पाणी त्यांना देऊ करण्याचा निर्णय राजाकडून घेतला जातो.

वरील सगळे घटना-प्रसंग डोळ्यासमोर ठेवले तर प्रत्येक घटनेतील निर्णय हा शेतकऱ्यांच्या विरोधी असलेला दिसतो. प्रत्येक निर्णयामध्ये राजा शेतकऱ्यांचा बळी घेताना दिसतो. त्यामुळे जगाचा पोशिंदा हा नेहमीच उघडा राहतो. त्याला एकूण समाजव्यवस्थेत आणि निर्णयव्यवस्थेत दुय्यम स्थान असलेले दिसते. राजाशी एकनिष्ठ व्यक्ती, ब्राह्मण पुरोहित, शिवभक्त, आरामी-चैनी करणारे लोकं, बेजबाबदारपणे पाणी वाया घालणारे लोक यांच्यापेक्षा शेतकरी हा गौण ठरवला जातो. जो जगाचा पोशिंदा आहे; त्यालाच अत्यंत खालचे स्थान देण्यात आलेले आहे. हेच यातून सूचित होते.

लेखक निवेदन करतो, ''ठरल्याप्रमाणे आठवड्याभरात सारे आदेश निघाले. त्याची अंमलबजावणी सुरू झाली. आदेशाचं पालन न करणाऱ्या शेतकऱ्यांना तंबी देण्यात आली. गावा-गावात आदेशाचं जाहीर वाचनही करण्यात आलं. त्यानुसार शेतकऱ्यांनी फुलशेती सुरू केली. जास्तीत जास्त जमिनीवर तुळशी पेरल्या. चाऱ्यासाठी गहू, मका, ज्वारी, तीळ, तांदूळ यांची जमीन वापरण्यात येऊ लागली. एखादं दुसरं म्हातारं आणि भाकड जनावर सोडून सारी जनावरं शेतकऱ्यांनी विकून टाकली. काही कत्तलखान्याला गेली. दुधावाचून लेकरं उपाशी राहिली. कोकरं रोडावून गेली. म्हातारी माणसं अधिक अशक्त झाली. एखाद्या-दुसऱ्या शेळी-मेंढीचं दूध जबरदस्तीने महाअभिषेकासाठी उचलून नेलं. पाण्याची टंचाई सुरू झाली. पिकं वाळून गेली. धान्याची टंचाई सुरू झाली. झाडाझुडपांवर कुऱ्हाड चालवली गेली. फळझाडांवरही कुऱ्हाड फिरली आणि खेडापाड्यातले सारे भूमिपुत्र नशिबाला दोष देत घरात डोक्याला हात लावून बसले. मोठा बिकट प्रसंग निर्माण झाला. खायला अन्न नाही. पाणी नाही. शेतात धान्य नाही. गोठ्यात जनावर नाही. घरात पैसा नाही. कशाचाच आधार उरला नाही. कुणी देश सोडून गेलं. कुणी गाव सोडून गेलं. कुणी जगच सोडून गेलं. कुणी आत्महत्या केल्या.

सगळीकडे हाहाःकार माजला. त्याचा दुष्परिणाम राजधानीतल्या जनजीवनावरही झाला.'' या सर्व वर्णनांतून राजाच्या निर्णयाचा काय दुष्परिणाम झाला, हे सहजपणे कळून येईल. कोणत्याही दूरदृष्टी असलेल्या राजाने असे केले नसते. परंतु या कथेतील राजा मात्र काही ठराविक लोकांच्या हितासाठी आणि धर्मजागरासाठी हे सर्व करतांना दिसतो. शेवटी माणसांचं जगणं हे सर्वात महत्त्वाचं असतं. परंतु त्या निर्बुद्ध राजाला हे कोण समजावणारं. पण शेवटी लोककथेमध्ये जशी एखादी अनुभवी, बहुश्रुत व्यक्ती ही सल्लागाराची भूमिका निभावते; तशीच इथेही एक वयस्क व्यक्ती ही भूमिका करतांना दिसते. ते वयस्क आचार्य म्हणतात, ''महाराज, माझं हे बोलणं माझ्या एकट्याच नाही. तुमच्या राज्यातल्या खेड्यात राहणाऱ्या आणि धर्म म्हणून, ईश्वराची पूजा म्हणून शेतात राबणाऱ्या तमाम भूमिपुत्रांचंच हे मत आहे. मनोगत आहे.

राजधानीतल्या प्रजेच्या सोयीसाठी आपण आदेश काढले. शेतकऱ्यांवर बंधनं घातली. खरं तर या प्रजेच्या गैरसोयी नाहीत, त्यांच्या सुखविलासासाठी आणि पुण्यप्राप्तीच्या खोट्या समाधानासाठी काढलेले हे आदेश आहेत. आम्ही ग्रामवासीय आपले सर्व हुकूम पाळतो. पण आपण आपल्या प्रजेला काय खाऊ घालणार तेवढं सांगा. तुळशीची पानं उकडून खाऊ घालणार का? तुम्ही काय खाणार? लेकरांना दूध कुठलं देणार? महाराज,

आपल्या भोजनाच्या ताटात पडणारी प्रत्येक वस्तू या शेतकऱ्याने पिकवलेली असते! तुमच्या ताटातला भात, भातावरणं वरण, वरणावर घातलं जाणारं तूप, तुमच्या ताटातली भाजी-भाकरी, तुमच्या भोजनानंतर दिला जाणारा पानविडासुद्धा शेतकऱ्याच्या कष्टातून त्याच्या शेतीमध्ये पिकतो. शेती आणि शेतकरी हेच तुमच्या राज्याचं वैभव आहे. त्याची केलेली सेवा हीच ईश्वराची सेवा असते. राजांचे राजवाडे, राण्यांचे महाल, सेनापतींचे गडकिल्ले आणि पुरोहितांची मंदिरे ही त्याच्या कष्टातून, त्याने पिकवलेल्या सुवर्णातून निर्माण होत असतात. म्हणून त्याची सोय आधी बघा. त्याच्या मुखात आधी घास घाला. मग तो साऱ्या जगाला घास घालेल. देवाला दुधाचा अभिषेक घातला नाही तरी चालेल; कारण परमेश्वर लेकरांना उपाशी ठेवून दूध मागत नसतो. त्याच्या पूजेला चार फुलं कमी झाल्याने बिघडत नाही. अंगावरचे घामाचे थेंब त्याला फुलापेक्षा अधिक प्रिय असतात. आपण सारासार विचार करा नि निर्णय घ्या. मी वावगं बोललो असेन तर माफी असावी.'' या एकूण वक्तव्यानं राजाचे डोळे उघडलेले दिसतात. राज्याच्या सर्व व्यवहारामध्ये पोशिंदा शेतकरी हाच अत्यंत महत्त्वाचा ठरतो. परंतु इथल्या समाजव्यवस्थेने त्याला अतिशय गौण स्थान दिल्यामुळे त्याच्याबरोबर होत असणारे व्यवहार हे नेहमीच कमी प्रतीचे ठरलेले आहेत. आणि जो घटक राज्याच्या व्यवहारामध्ये अनुत्पादक घटक म्हणून ओळखला जातो. उदाहरणार्थ, ब्राह्मण, पुजारी, गुरव, आळशी सुखवस्तू समाज इत्यादी. त्याला मात्र समाजाने डोक्यावर घेतलेले आहे. पाप-पुण्याच्या विक्षिप्त संकल्पनेमध्ये समाज कसा अडकून पडलेला आहे, हे या कथेतून दिसून येते. राजालाही शेवटी शेतकऱ्यांचे महत्त्व कळते. त्याने पिकवलेल्या धन-धान्यांवरच समाज पोसला जाणार आहे. आपण सगळे जगणार आहोत. हे त्याला सरतेशेवटी कळते. एकूणच श्रमिकांचे, शेतकऱ्याचे महत्त्व विशद करणारी ही कथा आहे.

### १.३.४ शेतकरी हाच खराखुरा सर्जक :

'एका राजकन्येचा विवाह' ही कथाही एका आटपाट नगरामध्ये घडते. ही कथा राजकन्येच्या विवाहाशी संबंधित कथा आहे. एखाद्या धर्मग्रंथातील, पंचतंत्रातील अथवा पुराणग्रंथातील राजकन्येच्या विवाहाची कथा शोभावी अशी ही कथा आहे. या कथेतील विवाहाच्या कल्पनाबंधाचे स्वरूप हे उपरोक्त ग्रंथांतील कल्पनाबंधांसारखेच आहे. मुळात स्वयंवर (वधूप्राप्तीसाठी वरमुलाने द्यावयाची विवाहाची परीक्षा) ही संकल्पना हिंदू पुराणग्रंथांनी आणि महाकाव्यांनी जोपासलेली आहे. याला ना रामायण अपवाद ना महाभारत! त्यामुळे लोककथेतही हे स्वयंवर झिरपलेले आहे. आणि या विद्यमान ललितकथेतही हे झिरपलेले आहे! इथे हे स्वयंवर प्रश्नोत्तराच्या स्वरूपात आयोजित केले आहे. अनेकदा एखाद्या लोककथेत राजकन्येला आई नसते तशी इथल्याही राजकन्येला आई नाही; परंतु सावत्र आई मात्र आहे! तीही साहजिकच दुर्लक्ष करणारी! त्यामुळे तिचा प्रतिपाळ एका दासीने केलेला आहे. उपवर होण्यापर्यंत ती अगदी काळजीने तिचा प्रतिपाळ करताना दिसते. त्यामुळे राजकन्येच्या विवाहाची चिंताही तिला आहेच! वडील म्हणवणारा राजाही राजकन्येच्या विवाहाविषयी चिंतीत आहे. कथेच्या सुरुवातीलाच लेखकाने वैभवशाली आटपाट नगराचं सचित्र वर्णन केलेलं आहे. नगराची सुबत्ता वर्णन केलेली आहे. कथेतील दासीला राजकन्येचा स्वभाव हा पुरता माहीत असतो. राजकन्येला हवा असणारा नवरा हा कोणत्यातरी राज्याचा राजकुमारच हवा असे मुळीच नव्हते. हे ती पुरतेपणाने जाणून होती. राजकन्येचं मन

हे कोणत्याही सुखोपभोगात, घरांत अथवा दाग-दागिन्यात रमण्यासारखे नव्हते. किंबहुना तिला गुणवान, चारित्र्यसंपन्न आणि सेवाभावी नवरा हवा असतो.

काही दिवसांनंतर राजकन्येच्या स्वयंवराची दवंडी संपूर्ण राज्यामध्ये पिटवली जाते. देशोदेशी पत्रव्यवहार केला जातो. आणि राजकन्येच्या विवाहाचे स्वयंवर भरवले जाते. प्रत्येक इच्छुकाला राजकुमारीविषयी अभिलाषा निर्माण होते. ती आपणाला मिळावी, असे मनोमन वाटत होते. त्यामुळे प्रत्येक इच्छुक हा आपापल्या पातळीवर तयारीला लागतो. अधिकाधिक सुस्वरूप दिसण्यासाठी प्रयत्न करतो. आपले बौद्धिक चातुर्य समृद्ध करण्याचा प्रयत्न करतो.

राजकन्येच्या विवाह स्वयंवरात राजकन्येमार्फत प्रश्न मात्र राजकन्येचा प्रतिपाळ केलेली दासी विचारणार असते. आणि प्रत्यक्षात घडतेही तसेच! अनेकदा लोककथांमध्ये हे प्रश्न राजाचे ब्राह्मण-पुरोहित विचारत असतात. इथे मात्र दासी विचारणार असते. हे कथेचे स्वातंत्र्य म्हणता येईल. विविध प्रकारच्या राजपुत्रांना आणि इच्छित व्यक्तींना निमंत्रित करण्यात आलेले असते. आणि एक दिवस परीक्षेचा उजाडतो. परीक्षेला सर्वांत अगोदर उतरतो तो युद्धात प्रवीण असणारा एक राजपुत्र. ज्याने युद्धाच्या आधारे आणि निरापराध्यांचा बळी घेऊन, घरेदारे लुटून आपल्या राज्याच्या सीमा विस्तारलेल्या असतात. अत्यंत पराक्रमी असणारा हा राजपुत्र असतो. तलवार उंचावून तो सर्वांना अभिवादन करतांना जाणवतो. तेव्हा दासी प्रश्न विचारते, ''केवळ स्वार्थासाठी शत्रूशी युद्ध खेळून एवढा रक्तपात करणं, एवढंच पराक्रमाचं प्रतीक मानायचं का? ज्याला जीवन देता येत नाही, त्याला इतरांचं जीवन संपवण्याचा काय अधिकार? ज्या गावकऱ्यांची घरदारं तुम्ही जाळून टाकली आणि पिकांची नासधूस केली, त्यांनी तुमचा कोणता गुन्हा केला होता? ज्याच्या हातात कसलंही हत्यार नाही, जो तुमच्या चालून गेला नाही, ज्याचा तुमच्या युद्धाशी तिळमात्र संबंध नाही, त्यांना तुम्ही क्रूरपणे ठार केलं, ते कशासाठी? कोणत्या नीति-नियमाआधारे? निरपराधांना ठार मारणं हे पुण्याचं काम की पापाचं काम?.....'' असे एकना अनेक प्रश्न विचारले जातात. तेव्हा तो राजकुमार निरूत्तर होतो आणि हिरमुसल्या चेहऱ्याने खाली बसतो.

दुसरा राजपुत्र हा भरजरी सोनेरी धाग्यांनी विणलेलं वस्त्र परिधान करून आलेला असतो. आपल्या श्रीमंतीचंच प्रदर्शन तो मांडतांना दिसतो. आपल्या राज्याच्या खजिना कसा ओसंडून वाहतो आहे, हे तो यातून सिद्ध करतांना जाणवतो. परंतु त्यात त्याचं स्वतःचं काहीही कर्तृत्व दिसून येत नाही. दासी त्यालाही असेच काहीसे प्रश्न विचारते. ती विचारते, ''युवराज, आपल्या वडिलांनी तुमच्या राज्याचं आणि राजधानीचं वैभव खूप वाढवलं. तुमची नगरी म्हणजे जणू कुबेराची अलंकानगरीच दुसरी. पण तुमच्या वडलांचा मोठेपणा तुम्ही सांगण्यात कसला आहे पराक्रम? प्रजेच्या सुखसोयीसाठी खुद्द तुम्ही काय केलं? या आजच्या वैभवात तुमची भर किती आहे? तुमचं कर्तृत्व किती? माणसाला उच्चपदाला नेतात चार योग : ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग आणि अनासक्तयोग. यापैकी तुम्ही कोणत्या योगाचे उपासक आहात?........'' असे विविध प्रश्न विचारले जातात. तेव्हा राजकुमारही निरूत्तरीत होतो. आपल्या वडिलांच्या कर्तृत्वावर सुसंपन्न राजकुमारी आपला

स्वीकार करेल ही त्याची इच्छा फलद्रूप होत नाही. तेव्हा पायांची आदळ आपट करत तोही आपल्या जागेवर जाऊन बसतो.

दोन राजपुत्रांच्या अपयशानंतर एका धर्मपीठाचा अधिपतीही अभिलाषेने उपस्थित होतो. त्याचे नाव आचार्य शास्त्री महाराज. तो स्वतःला ईश्वराचा पुत्र मानतो. आपल्या अंगी असणाऱ्या विविध चमत्कृतीपूर्ण शक्तींच्या आधारे स्वतःचे वेगळेपणं सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. तिन्ही लोक, तिन्ही काळ यांवर आपलं अधिपत्य आहे, हे सभागृहाला सांगण्याचा प्रयत्न करतो. राजसत्तेपेक्षा धर्मसत्ता अधिक श्रेष्ठ आहे, हे सांगण्याकडे त्याचा कल असतो. त्यावर दासी प्रश्न विचारते, ''आपण हवेतून अंगठी काढता, माळ काढता, आणखी काही काही काढता, मग याच शक्तीच्या आधारे तुमचं धर्मपीठ असलेल्या तीर्थक्षेत्रात हजारो गरीब माणसं रात्री उपाशी झोपतात, त्यांच्यासाठी तुम्ही अन्न का निर्माण करत नाहीत? तुम्हाला एवढी अलौकिक दैवी शक्ती लाभली असताना तुमच्या किडलेल्या दाढेचा ठणका कमी का करता येत नाही? तुमच्या भक्ताला छळणारा दमा संपवता येत नाही? काय उपयोग या तुमच्या शक्तीचा? आचार्य, तुमची ही दैवी शक्ती म्हणजे माणसाची नजरबंदी करणारा पाण्यावरचा रंगीत बुडबुडा आहे, ना त्यानं तहान भागते, ना त्यानं जमीन भिजते.'' या एकूणच प्रश्नानं तो भंडावून जातो. आणि त्याला आपल्या मर्यादाही कळतात. तोही अपमानित होऊन निघून जातो. त्यानंतर एका प्राचीन विद्यापीठाचा कुलपती राजकुमारीला मागणी घालण्यासाठी उठतो. सर्व प्रकारच्या प्राचीन साहित्याचा अभ्यासक व मार्गदर्शक म्हणून लोक त्याला ओळखत असतात. धर्म-अधर्म, पाप-पुण्य, जीव आणि जगत यांचचं नातं आणि त्यातील गुंतागुंत उत्तम रीतीने सांगणारा तो कुलपती असतो. त्यानंतर महाराजांचे धर्मगुरू हे त्याला काही लौकिक कर्माविषयी प्रश्न विचारतात. भूक भागवण्यासाठी आपण काय करतात? तुमच्या विद्येचा प्रजाजनाच्या सुखासाठी काय उपयोग? इत्यादी, इत्यादी. त्याची विद्या म्हणजे कष्टाविना अन्न देणारं साधन होती. दासीला तो कुलपती आवडला नव्हता. राजालाही तो आवडला नव्हता.

कथेच्या शेवटी मात्र एका शेतकऱ्याला धरून आणले जाते. राजकुमारीच्या सावत्र आईने नियोजनबद्ध रीत्या राजकुमारीचा एका ग्रामीण व्यक्तीबरोबर विवाह लावण्याचा कट आखलेला दिसतो. एकदाची ही धोंड गेली की आपल्या धाकट्याा भावाला गादीवर बसवण्यास ती मोकळी होती. चार एकराचा शेतीचा तुकडा असणारा हा माणूस तसा कोणत्याही अंगाने श्रीमंत नव्हता. त्यामुळे राजकन्येचं भलं व्हावं असं म्हणून तो सभागृहातून जाण्यास निघतो. परंतु राजकुमारीला मात्र या माणसातच जगण्याचा सच्चेपणा दिसतो. हा शेतकरीच समाजाचा आणि संस्कृतीचा खरा आधारस्तंभ असलेला दिसतो. याच्या कष्टानेच राजाचे राजवाडे, सेनापतींचे गडकिल्ले निर्माण होतात आणि सुरक्षितही राहतात. हाच खरा जगाचा पोशिंदा आहे. तेव्हा दासी याच शेतकऱ्याची राजकन्येसाठी निवड करते. राजकन्येलाही हाच शेतकरी आवडतो. जगण्यातलं आणि राहण्यातलं सच्चेपण असणारा हा शेतकरी असतो. या निवडीमुळे राजकन्या अतिशय आनंदी होते. आणि कथा इथेच संपते. जे लोक दैनंदिन जगण्यात केवळ आणि केवळ अवंडबर, अहंकार, कृत्रिमता आणतात; असे लोक जीवनात कधीही यशस्वी होत नाहीत. शिवाय अलौकिक जीवनापेक्षा लौकिक जीवन हे नेहमीच कौतुकास पात्र असते. त्यामुळेच माणसाने नेहमी लौकिकात जगले पाहिजे. अध्यात्म, धर्मशास्त्र या समाजअभ्यासाच्या शाखा

असल्यातरी पोटासाठी शरीरश्रम हे आलेच! ज्याला श्रम करण्याची ही कला जमली तोच खरा यशस्वी होऊ शकतो, हेच यातून सूचित करावयाचे आहे.

**१.३.५ शेतीशास्त्राचे ज्ञान पारंपरिक संस्कार म्हणून जतन करणारा शेतकरी मुलगा :**

ही कथा 'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी' या नावाची आहे. या कथेमध्ये राजा हा आपल्या राज्यातील अलकापुरी नगरीत गुप्तपणे फेरफटका मारतांना दिसतो. त्यात आपल्या राज्यातील असाक्षर शेतकऱ्याकडे कोणकोणत्या प्रकारचे ज्ञान आहे, या प्रातिनिधिक अनुभव या कथेत वाचकाला वाचायला मिळतो. अन्य कथांमधून ज्या प्रमाणे वैभवशाली नगरांचे वर्णन येते; तसेच वर्णन या कथेतही येते. या नगरीचं नाव अलकापुरी नगरी. या नगरीतील राजा हा प्रजाहितदक्ष राजा म्हणून ओळखला जात असे. ज्या प्रमाणे एखाद्या लोककथेतील राजा हा प्रजेची सुख-दुःखे पाहण्यासाठी वेषांतर करून नगरातून हिंडत असतो. तसाच या कथेतील राजाही वेषांतर करून नगरातून हिंडताना दिसतो. त्यामुळे त्यालाही आपल्या राज्यातील लोकांची सुख-दुःखे अनुभवतांना पाहावयास मिळतात.

एकदा तो राजधानी सोडून राज्याच्या ग्रामीण भागात हिंडताना दिसतो. तो आणि त्याचा प्रधान हे दोघेही वेषांतर करून हालहवाल बघण्यासाठी ग्रामीण भागात जातात. तिथली शेती, शेतकरी, पिकं, त्यांची सुख-दुःख पाहणे हा त्यांचा प्रमुख हेतू होता. राजधानीशेजारच्या जवळच्या गावात ते जातात. गावातला ओढा ओलांडून ते एका कलिंगडाच्या शेतात येऊन थांबतात. कलिंगडाच्या वेलीला लहान-मोठी कलिंगडे लगडलेली होती. राजाला वाटले खाण्यासाठी एक कलिंगड तोडून घ्यावे तेव्हा प्रधान दोघांना प्रत्येकी एक कलिंगड तोडून घेतो. तेव्हा एक कुत्रा त्यांच्यामागे धावत सुटतो. शेजारचा मुलगा तो पाहतो आणि तो कुत्र्याला पळवून लावतो. तो राजा आणि प्रधानाची विचारपूस करतो. आमच्या शेतातील कलिंगड का तोडलीत? असा प्रश्नही विचारतो. शिवाय कलिंगडाची शेती करत असतांना होणारा त्रासही सांगतो.

रानडुकरांचा होणारा त्रास सांगतो. वेषांतर केलेल्या प्रधानाने राजाला देण्यासाठी कलिंगडं तोडलेली आहे, हे सांगतो. तेव्हा मुलगा ही कलिंगडं कच्ची आहे, असे सांगतो. शेतकऱ्याच्या मुलाकडे असणाऱ्या ज्ञानाची चुणूक त्यांना कळते. तो म्हणतो, ''तुम्ही तसे मोठे आहात. शहाणे आहात. एक उत्तम तलवार चालवतो. दुसरा उत्तम वेद म्हणतो. वय आणि अनुभवाने आपण थोर आहात. पण शेतीचं, पिकाचं-फळाचं ज्ञान तुम्हाला नाही. ते अडाणी असलेल्या शेतकऱ्याजवळ असतं. जगायला अनेकदा त्याचा उपयोग होतो, तुमच्या वेदांचा व धर्मशास्त्राचा नाही. आकार आणि वजनावर कलिंगड पिकलेलं अन् न पिकलेलं ठरत नसतं. ते त्याचं एकमेव लक्षण नव्हे. तळहात पालथा करून वाकड्याा बोटांनी कलिंगडावर टक-टक केलं की, त्याच्या आवाजावरून ते पिकलेलं आहे की नाही हे आम्हास लगेच कळतं. शिवाय, त्याच्या सालीचा रंगही थोडासा बदलतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, त्याचा देठ थोडासा बारीक होतो. थोडासा वेगळा बनतो. ते बारीक नजर असलेल्या आम्हालाच कळतं. तुम्हाला न्हाय कळायचं. हवेत तलवार फिरवण्याइतकं हे ज्ञानही महत्त्वाचं असतं.'' आणि आपलं म्हणणं खरं आहे हे दाखवण्यासाठी त्या पोरानं महाराजांच्या हातातलं कलिंगड घेतलं.

आपल्या गुडघ्यावर ठेवून जोराची बुक्की मारून त्याचे दोन तुकडे केले. तर त्यातून लाल-गुलाबी गर दिसण्याऐवजी पांढरट गर दिसला. त्याला पुन्हा रसही नव्हता. आणि चवीला पार तुरटही लागत होतं. पोरानं दिलेला पांढरा गर तोंड वाकडं करून थुंकत असतानाच प्रधानजी म्हणाले, ''कमाल आहे तुझी. कलिंगडाची पारख तू अगदी बिनचूक केलीस, गड्या. मानलं गड्या तुला. आता तुलाही दुसरी एक विनंती करतो. आपले इंद्रसेन महाराज राजा म्हणून फार थोर आहेत. फार आदर्श आहेत. प्रजेच्या सुखासाठी ते धडपडतात. तेच आपले रक्षणकर्ते. तेच आपले अन्नदाते. तेच आपले आश्रयदाते आहेत. अशा या थोर आणि गुणी राजाला तुझ्यातर्फे काहीतरी भेट दिली पाहिजे. त्यांच्या उपकारांची जाणीव ठेवून. तुझ्या या पारखी नजरेनं त्यांना चार-दोन कलिंगडं दिलीस तरी ते खूश होतील. त्यांना खूप आनंद होईल बघ.'' यातून शेतकऱ्याच्या मुलाचं शेतीविषयक ज्ञान किती संपन्न आहे, हेच दिसून येते. असे एक ना अनेक उदाहरणे कथेमधून सापडतात. राजा हा जसा राज्याचा राजा असतो. तसा शेतकरीही शेताचा राजा असतो. जगाचा पोशिंदा असतो. पुढं जाऊन तो म्हणतो, ''तुम्हा मंडळींइतकाच शेतात राबणारा शेतकरी महत्त्वाचा असतो. ज्ञानी असतो, त्याला तुमच्यासारखा धर्मग्रंथ वाचता येत नसेल, मंत्र म्हणता येत नसेल, पण पेरणी कधी करावी, वाफसा किती आलाय, कोणतं बियाणं वापरावं? ते किती खोल पेरावं, रोगराई आली तर पीक कसं वाचवावं; याचं ज्ञान त्या अडाणी शेतकऱ्याजवळ असतं. तुमच्या दरबारातल्या कुणाजवळच ते नसां... नव्हे, कुणाजवळच ते नसतं. मग मला सांगा, शहाणा कोण?'' या संवादाने राजा आणि प्रधान दोघेही आश्चर्यचकित होतात.

त्यानंतर कारल्याचा वेल आणि काकडीचा वेल यांतील फरक कसा ओळखायचा, हेही सांगतो. शिवाय नरफुलं आणि मादीफुलं कशी ओळखायची हेही सांगतो. कलिंगडाच्या फोडीमध्ये असणाऱ्या बियांचे तीन थर कसे असतात. सर्वांत वर आणि खाली कमी बिया असतात आणि मधल्या ठिकाणी सगळ्यात जास्त बिया कशा असतात, हेही तो सांगतो. शिवाय कलिंगडाच्या बिया पेरतांना कोणती काळजी घ्यावी लागते, हेही सांगतो. तो म्हणतो, ''पंडितजी, या बिया लावण्याचं किंवा पेरणीचंसुद्धा एक शास्त्र आहे. तुमच्या पूजेच्या शास्त्राप्रमाणं. ओलं बी पेरून चालत नाही. किडलेलं बी पेरून चालत नाही. पोकळ असलेलं बी पेरून चालत नाही. तीन-चार वर्षाचं जुनं बी चालत नाही. फार खोलवर बी पेरून चालत नाही. त्याची उगवण चांगली होत नाही. फार वरवर बी पेरून चालत नाही. एक तर ते वाऱ्यानं उडून जातं. किंवा पाखरं खाऊन टाकतात. सारखं पाणी देऊन चालत नाही. खूप पाणी देऊन चालत नाही.

बी टोचल्यावर तिसऱ्या दिवशी पाणी देणं विसरून चालत नाही. कारण बी रुजण्यासाठी त्याला ओल्या मातीची गादी आवश्यक असते. त्याला आम्ही शेतकरी 'आमुनं' म्हणतो. पंडितजी, तुमच्या पूजेतला मंत्र चुकला तरी चालतो. मागं-पुढं झाला तरी चालतो. इथं शेतात मात्र प्रत्येक गोष्ट जिथल्या तिथं व्हावी लागते. वेळच्या वेळी व्हावी लागते. आता हे सारं तंत्र तुम्हाला किती जुळतंय ते बघा. तुम्हाला ह्या बिया मी देतो. फक्त एकच सांगतो. तुम्हाला. शेती करणं एवढं सोपं नाही. जन्माला येणाऱ्या बाळाची काळजी घ्यावं; इतकं ते जोखमीचं काम आहे. कौशल्याचं काम असतं.'' त्यानंतर शेतकरी मुलाने राजा आणि प्रधानाला पेरू आणि गाभुळलेल्या चिंचाही खायला दिल्या. त्या दोघांनाही तो रानमेवा अतिशय आवडला. नंतर तो राजाला म्हणतो,

रात्र झाल्यावर तर खऱ्या अर्थाने राखणीला सुरुवात होते. रानडुकरांपासून पिकांना त्रास होऊ नये यासाठी रात्रभर जागावे लागते. शेताच्या बांधावर दोन-तीन ठिकाणी जाळ करावा लागतो. हरणांचा कळपही यापेक्षा वेगळा नसतो. तोही कलिंगडांची नासधूस करतो. शिवाय आमचा वृक्ष हाच आमचा देव असतो, असेही तो म्हणतो. रात्रीच्या ढेकळात चालतांना राजा पाय अडखळून पडतो आणि पायाला जखम होते. तेव्हा या शेतकऱ्याचा मुलगा कोणत्यातरी झाडाचा पाला आणून, त्याला ठेचून राजाच्या जखमेवर लावतो आणि राजाच्या जखमेतील ठणकही बरी होते. याचेही राजाला कौतुक वाटते. त्यानंतर राजा आणि प्रधान आपली खरी ओळख त्या मुलाला सांगतात. आणि तुझ्याकडून आपल्याला खूप काही शिकायला मिळाले, हेही कबूल करतात.

शेतकरी मुलाला मात्र त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसत नाही. तो मात्र त्यांना चांगल्या मनाने निरोप देतो आणि आपल्या कामाला निघून जातो. राजा आणि प्रधानही आपल्या राजधानीकडे जाण्यास निघतात. इथे कथा संपते. राजाच्या मुलुखगिरीची अशी कथा आहे. राज्याच्या एकूण व्यवहारामध्ये केवळ सैनिक, व्यापारी यांनाच महत्त्व नसते तर त्यांचा असणारा पोशिंदा आणि त्यांच्यासारखे कित्येक लोक यांनाही अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. याचेच उदाहरण हा शेतकरी मुलगा आहे. तो कलिंगड पिकवतो म्हणूनच जग ते खाते. त्याच्याकडेही सामान्य आजारांवरचे घरगुती, ग्रामीण उपाय आहेत. नगराकडे जाणे ज्यांना परवडणारे नसते, अशांसाठी हे शेतकरी देवापेक्षा कमी नसतात. शेतकऱ्याचे अनन्य साधारण महत्त्व विशद करणारी ही कथा आहे. प्रत्येक कथेच्या शेवटी बोध देण्यात यावाच, असे नसते. अशावेळी कथेचा तपशिलचं कथेचं महत्त्व विशद करतांना जाणवते.

### १.३.६ वासना आणि कलोपासना यांच्यातील संघर्ष टिपणारी कथा :

'राजा प्रेमरंजन आणि नर्तिका' ही कथा माणसाच्या नैसर्गिक वासना, प्रवृत्ती आणि कलासक्तता विशद करणारी कथा आहे. ही कथा नर्तिका रूपश्रीची नृत्यअदाकारी आणि राजाचे तिच्यावर प्रेम जडणे हे सांगत असतांनाच रूपश्रीच्या जन्माचे एक भयंकर सत्य वाचकांसमोर उभे करते.

ही कथा रत्नपूर नगरात घडते. प्रेमरंजन राजाची ही राजधानी. प्रेमरंजन हा राजा कलासक्त राजा म्हणून ओळखला जात असतो. त्यामुळे कलावंतांचा मान-सन्मान राखणारा हा राजा होता. त्यामुळे नगरजनही राजाचे भरभरून कौतुक करत असत. असेच एकदा प्रेमरंजन राजा आपला सत्तेचाळीसावा वाढदिवस साजरा करत असतो. त्यासाठी संपूर्ण राजवाडा सुशोभित केला जातो. प्रजाजन घरांसमोर गुढ्याा उभारतात. संपूर्ण राजधानी सजवली जाते. अश्वांच्या शर्यती लावल्या जातात. कुस्तींचे फड उभे केले जातात. कलावंतांचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यात एक दिवस नर्तनाचाही कार्यक्रमही आयोजित केला जातो. ती नर्तिका असते रूपश्री. लेखक वर्णन करतो, ''अप्सरेचे लावण्य, विजेची चपळाई, नजाकत आणि पदन्यास यांचा झालेला अपूर्व संगम म्हणजे रूपश्री होय.'' तिच्या रूप-गुणांमुळे तिची ख्याती ही संपूर्ण राजधानीत पसरलेली असते. नृत्याच्या कार्यक्रमात ती आपल्या नृत्याच्या माध्यमातून सर्वांना घायाळ करते; त्यात राजा प्रेमरंजनही

अपवाद कसा ठरेल! तोही तिच्या स्वर्गीय सौंदर्यावर अनुरक्त होतो. तिच्या घायाळ करणाऱ्या नृत्याला सर्व प्रेक्षक अभिवादन करतात. तिच्या मानसन्मानाचा सोहळाही पार पडतो. राजा प्रेमरंजनच्या मनात मात्र तिला मिळवण्याची आसक्ती निर्माण होते. वाढदिवसाच्या सोहळ्यानंतर एका रात्री राजा प्रेमरंजन आपल्या विश्वासू सेवकांसह रूपश्रीला भेटायला तिच्या निवासस्थानी जातो. रूपश्रीच्या आईला स्वतःच्या मनातली इच्छा व्यक्त करतो. तो तिला राणी बनवू इच्छित होता. दोघींसाठीही हा धक्का होता.

रूपश्रीची आई स्वतःशीच पुटपुटते, ''त्यांच्या खुशीसाठी एखादा-दुसरा नृत्याचा कार्यक्रम करणे वेगळे. एखादी नर्तिका पत्नी झाली की, तिचे पाय जडावतात. पदन्यास मंद होतात. ते मुक्त राहात नाहीत. राजमहाल वेगळा आणि रंगमहाल वेगळा. अस्तुरी वेगळी आणि अप्सरा वेगळी. आपल्या पोरीला उद्या कलेच्या आकाशात किती उडता येईल, किती भराऱ्या घेता येतील, हे सांगता येत नाही. यासरखे अनेक विचार त्या आईच्या मनात दाटून आले. तिचा चेहरा भांबावून गेला.'' यातून तिला रूपश्रीच्या भवितव्याची चिंता असलेली जाणवते. राजा प्रेमरंजन हे रूपश्रीच्या वडिलांच्या वयाचे होते. त्या दोघांमध्ये कमालीचे अंतर होते. रूपश्रीच्या आईचे अवसान गळून जाते. तेव्हा राजा आक्रमक होऊन म्हणतो, ''दोघांच्या वयात अंतर असलं म्हणून काय फरक पडतो? रूपसौंदर्याची मोहिनी वयावर थोडीच अवलंबून असते? मरणाच्या वाटेवरचा माणूससुद्धा स्त्रीलावण्यानं वेडा होतो! बाईचं रूप वयावर अवलंबून असेल, पण त्या सौंदर्याचं आकर्षण वयावर अवलंबून नसतं. अजिबात नसतं. अप्सरेचं लावण्य तरुणांच्या डोळ्यांना जितकं खुणावतं, तितकंच ते वृद्धांच्या-प्रौढांच्या-विझत चाललेल्या डोळ्यांनाही घायाळ करतं. तुला नाही समजायचे हे. माझ्यापेक्षा अधिक वय असलेल्या अनेक राजांनी कोवळ्या मुलींबरोबर विवाह केलेले आहेत. किती उदाहरणे सांगू तुला? लांब कशाला, खुद्द माझ्याच पिताश्रींनी गलितगात्र शरीर असतानाही एका तुरुण मुलीबरोबर विवाह केला होता! इथं वयाचा प्रश्न नाही. मनाचा प्रश्न आहे. आतून जाग्या होणाऱ्या कामवृत्तीचा हा प्रश्न आहे...''

राजाच्या वक्तव्यातून राजा रूपश्रीकडे केवळ स्त्री-पुरुष संबंधातून पाहत असतो. स्वतःच्या शरीराची कामवासना भागवण्यासाठी त्याला कोणत्याही परिस्थितीत रूपश्री हवीच असते. तिला मिळवण्यासाठी तो कोणत्याही निर्णयापर्यंत जाऊ शकत होता. परंतु रूपश्रीने स्वतः होऊन या नात्याला मान्यता द्यावी, असे त्याला मनोमन वाटत होते. परंतु रूपश्रीला मात्र हे नाते नको असते! ती म्हणते, ''मला दासी करण्यापेक्षा कलेची उपासक राहू द्या. महाराज, मला असं वाटतं की, संसार, संपत्ती आणि सुखोपभोग हे कलेचे भक्षक असतात, संरक्षक नसतात. या तीन गोष्टी अनेकदा अडसर ठरतात. कलेला संपवून टाकतात. कलावंताला संपवून टाकतात. माणसाने लौकिक सुखाचा त्याग केल्याशिवाय अलौकिक स्वरूपाची कला त्याला प्राप्तच होत नाही. नृत्यकला शिकविणारे माझे गुरू खरोखर दोन घास आणि दोन कपडे यावर आयुष्यभर जगले, पण त्यांनी अनेकांची आयुष्येच उजळवून टाकली. मला त्यांचा आदर्श समोर ठेवावासा वाटतो. माझ्या रूपाचा कृपया विचार करू नका. ते बघता बघता संपून जाईल. सुरकुत्यांनी माखून जाईल.''

रूपश्रीला अलौकिक सुखाचा आनंद आणि कलोपासना करावयाची होती. तिच्या जगण्याचे अंतिम उद्दिष्ट

हे नृत्याची उपासना करणे हेच होते. ती नृत्यकलेला वाहून घेऊ इच्छित होती; परंतु राजा मात्र तिला कोणत्याही परिस्थितीत लौकिकार्थनं उपभोगू इच्छित होता. त्याला ती कोणत्याही परिस्थितीत हवी होती. त्यासाठी तो कोणतीही किंमत मोजण्यास तयार होता. कोणतेही अनैतिक कृत्य करण्यास तयार होता. शेवटी तो राज्याचा राजाच! त्याला विचारणारे कोण? त्यामुळे साहजिकच रूपश्री आणि तिची आई या दोघीही पुरत्या हतबल झालेल्या दिसून येतात. राजा प्रेमरंजन तिला सौंदर्याच्या अभिशापाविषयीही बोलतो. माणसाच्या रूपानं अवतीभोवती हिंस्त्र जनावरंही राहतात. तेव्हा ते कोणत्याही क्षणी तुझ्या आब्रूवर घाला घालू शकतात. तेव्हा तू काय करशील? असा प्रश्नही उपस्थित करतो. त्यावर तुमच्याबरोबर राहतांना मला शरीर विकावे, फेकावे लागेल, आत्मा विकावा लागेल, बंधने लादून घ्यावी लागतील. नव्हे, एका अर्थाने कैद स्वीकारावी लागेल हे तरी कितपत सुखाचे आहे? असे ती म्हणते.

राजाच्या प्रत्येक प्रश्नाकडे तिचे उत्तर आहे. याचवेळी रूपश्रीची आई रूपश्री ही तुमचीच मुलगी आहे, हे गुपित राजा प्रेमरंजन याला सांगते. तिची आई ही राजमातेची दासी असतांना एका रात्री राजा प्रेमरंजन यांचा जीव रूपश्रीच्या आईवर जडतो. आणि त्यातून घडलेल्या चुकीची फलश्रुती म्हणजे रूपश्रीचा जन्म होय. राजमातेने हे उत्तरदायीत्व स्वीकारलेले होते; परंतु त्यांच्या निधनानंतर मात्र उपजीविकेसाठी त्यांना या कलेचा आश्रय घ्यावा लागला. यावर राजा प्रेमरंजन याचा विश्वास बसत नाही. पायाखालची जमीन मात्र सरकते. रूपश्रीलाही ही बातमी त्याच क्षणी कळते. तेव्हा तीही कोसळल्यासारखी खाली बसते. तिचा स्वतःच्या कानावर विश्वास बसत नाही. रूपश्रीची आई राजाला म्हणते, कोणताही पुरुष आपल्या मुलीबरोबर विवाह करत नाही. ही कल्पना मनाला शिवणे म्हणजे देखील पाप होय. त्यामुळे रूपश्रीचा स्वीकार मुलगी म्हणून करायचा? की पत्नी म्हणून हे तुम्हीच ठरवा. अशी विनंती ती करते. रूपश्रीचे भावविश्व उद्ध्वस्त झालेले दिसते. एक विदारक सत्य तिचे जीवन अंधारमय करत चालले होते. नियतीने केलेली क्रूर चेष्टा ती अनुभवत होती.

त्याच क्षणी राजा म्हणतो, ''मला वाटणाऱ्या देहआकर्षणाचा हा विजय म्हणायचा, की पराभव म्हणायचा? कदाचित याला असेही म्हणता येईल की, कामवृत्तीचा विजय झाला, आणि आयुष्याचा पराभव झाला...असं मला वाटण्याचं कारण असं की, या क्षणाला तू हे जळजळीत सत्यकथन केलेले असले, तरी त्याचा स्वीकार करायला माझ्या मनाची तयारी होत नाही. माझ्यासमोर उभी असलेली तुझी पोर ही माझी कन्या आहे, असं न वाटता माझ्या मनाला कामतृप्तीचं मूर्तिमंत लावण्य उभे आहे असंच वाटतं. अजूनही तिला पाहताच माझ्या मनात वात्सल्य दाटून येत नाही. वासनाच दाटून येते. म्हणून हा आयुष्याचा पराभव आहे असं मी मानतो. शिवाय माझं दुसरं मन मला सांगतं की, माणसामाणसांत निर्माण झालेली ही नाती मानण्यावर अवलंबून असतात. तो देहाचा धर्म नाही, मनाचा धर्म आहे. म्हणून नाते महत्त्वाचे नाही, तर प्रेमाला महत्त्व आहे. जीवानं जीवासाठी केलेला आकांत महत्त्वाचा आहे. माझ्या दृष्टीने जीवन वेगळं असते. मन वेगळे असते. मनाचे सारेच धर्म जीवाला कवेत घेत नसतात. म्हणूनच वासनेला नाते मान्य होत नसावे. तू हे सत्य मला सांगितले नसते, तर काय फरक पडला असता? माणसाला लागणारी भूक महत्त्वाची आहे. त्या भुकेचा गळा आवळून गप्प बसवणे योग्य नसते. माणसाला भूक लागल्यावर त्याच्यासमोर येणारे अन्न राजाचे आहे, की

भिक्षेकऱ्याचे आहे हे तो ओळखत नाही. त्याला त्याची गरजच वाटत नाही. तीच गोष्ट या शरीराला असणाऱ्या भुकेची आहे.''

राजा प्रेमरंजनच्या मनात वात्सल्य आणि वासना यातील कमालीचा संघर्ष पाहावयास मिळतो. त्यातही तो वासनेलाच महत्त्व देतांना दिसतो. तो स्वतःची वासना पाशवी पातळीवर येऊन विझवण्याचा प्रयत्न करतो. त्याला रूपश्रीमध्ये मुलीपेक्षा एक सौंदर्यवती मादीच अधिक दिसते. त्यामुळे रूपश्रीची आईही नापसंती दाखवतांना दिसते. माणूस आणि पशू यात काय फरक राहिला? असा प्रश्नही ती उपस्थित करते. देहाची भूकच जर अंतिम सत्य असेल तर वात्सल्याचं काय करायचं? हेही नैसर्गिक नाही का? असा प्रश्नही उपस्थित करते. भुकेला शरण जाण्यापेक्षा भुकेला शरण आणण्यातच माणसाचं माणूसपण दडलेलं आहे, असे ती शेवटी म्हणते आणि थांबते. तरीदेखील राजा प्रेमरंजन अधिकाराची भाषा वापरतो. रूपश्रीला उचलून नेण्याची भाषा करतो. तेव्हा रूपश्रीही ताठ मानेने उभे राहते आणि आपलं मत मांडण्यास सुरुवात करते. ''महाराज, तुम्ही माझे तुमच्या अधिकारात काहीही करू शकता. मला आपल्या जनानखान्यात डांबून ठेवू शकता. माझ्या शरीराशी तृप्तपणे खेळू शकता. पण ते काही सच्चे प्रेम नव्हे. तुमचा हा खेळ आणि एखाद्या कागदाचा झालेला चोळामोळा यात फरकच नाही. आतून सहजपणे उमटलेल्या आणि उत्कट झालेल्या प्रेमभावनेने फुलून आलेल्या देहाला जो एक सुगंध असतो, तो तुम्हाला या खेळात कधीच मिळणार नाही. न फुललेल्या देहाला मारलेली मिठी आणि सुकलेल्या झाडाला मारलेली मिठी यात फरक नसतो. अशा या न फुललेल्या देहाला कितीही मिठ्या मारल्या तरी, आणि खूप वेळ मिठी मारली, तरी श्वासाला गंध येत नसतो. मिठीला सुगंध येत नसतो आणि खेळाला रंग चढत नसतो हे आपण लक्षात घ्यावे. माझा देह तुमच्या मिठीत असेल, पण त्या तुमच्या मिठीत माझी प्रेमभावना आढळणार नाही. ती दूर कुठे तरी गेलेली असेल किंवा घायाळ होऊन मूर्च्छित झालेली असेल. ...'' या संवादातून तिने राजाविषयीचे आपले मत परखडपणे मांडलेले दिसून येते. यात राजाची सध्याची शरीरस्थितीही लक्षात येते. शिवाय रूपश्रीला प्रेम हवे असते. आणि राजाला वासनापूर्ती! हे दोन्ही एकाच वेळी कधीही शक्य नाही. शिवाय राजा आणि रूपश्री यांतील नात्याचं काय करायचं? हा प्रश्नही वाचकाच्या मनात रेंगाळत राहतोच.

पुढे ती म्हणते, ''वासनेचा दर्प म्हणजे प्रेम नव्हे. वासनेची उफाळणारी वखवख म्हणजे प्रेम नव्हे. आसक्ती शरीराशी निगडित असते; तर प्रीती मनाशी निगडित असते. वासना माणसाला अतृप्तीच्या वादळात पुन्हा पुन्हा ढकलत असते, तर प्रीती ही तृप्तीच्या शांत सरोवरात विहार करायला नेत असते. महाराज, बाईच्या देहाला दिलेलं घट्ट अलिंगन, दीर्घ चुंबन आणि उन्मादक स्पर्श म्हणजे प्रेम नव्हे. या साऱ्या गोष्टीशिवाय सुद्धा प्रेम असू शकतं. त्यासाठी पाकळी न दुखवता पाकळीवर बसणाऱ्या भ्रमराची रसिकता हवी. तरलता हवी असते. महाराज, श्रेष्ठ प्रीती कधी विकत मिळत नाही. उधार मिळत नाही आणि ओरबाडूनही मिळत नाही. कामवासना आणि कामव्य भिचार एक नसतो, एवढे कृपया आपण लक्षात ठेवावं. महाराज, मी आपली सेविका आहे व त्याचबरोबर एक प्रजाजनही आहे. या दोन नात्यांनी आपण कसा व्यवहार करायचा आणि कोणता निर्णय घ्यायचा हे आपण ठरवा. आपला कोणताही निर्णय मी मान्य करणार आहे. मी थोडसं मर्यादा सोडून बोलले याबद्दल मला माफ करावे.''

यातून रूपश्रीचा निर्णय वाचकाला सहजपणे कळतो. राजा प्रेमरंजनही शुद्धीवर आल्यासारखा वागायला सुरुवात करतो. त्याचे डोळेही पाणावतात. प्रेम आणि वासना यातील फरक तिने सांगितला होता. तिच्या विचारांमध्ये एक प्रकारची प्रौढता आणि समंजसपणा होता. तिच्या वक्तव्याने राजा प्रेमरंजनही अंतर्मुख होतो. खरे तर राजाची चाललेली ही सर्व धडपड केवळ आणि केवळ वंशसातत्यासाठी असणारी होती. त्यातच त्याचा स्वभाव असा घडतांना दिसतो. शेवटी तो रूपश्रीला म्हणतो, ''हे मुली, मी तुला मोकळेपणानं सांगतो की, तू माझी कन्या म्हणून येण्यापेक्षा, प्रेयसी म्हणून येण्यापेक्षा, नृत्यदेवता म्हणून यावे आणि माझा राजवाडा शोभायमान करावा असं मला वाटतं. या नृत्यदेवतेची मनोभावे पूजा करायला मला आवडेल. पाहा. विचार कर तू, आणि ठरव.'' राजाच्या या मागणीला रूपश्री मान्यता देते आणि आपल्या जवळची घुंगरे ती राजाच्या पायासमोर ठेवते आणि मनःस्वी आनंदित होते. कथा इथे थांबते. शेवटी कामवासनेसमोर प्रगल्भ अशा कलोपासकाचा विजय होतो. नृत्यदेवतेचा विजय होतो. जगण्याच्या आणि जीवनाच्या शाश्वतेसमोर अनैतिक बाबींची माघार होते. खरे म्हणजे ज्या वंशसातत्यासाठी राजा धडपडत होता, ज्या मुलाच्या सुखासाठी तो धडपडत होता, ते मूल नृत्यदेवतेच्या स्वरूपात राजाच्या राजदरबारात विहार करणार होते. आपल्याच अनौरस संततीला तो नृत्यदेवतेच्या स्वरूपात स्वीकारून आपण केलेल्या चुकीचे प्रायश्चितही भोगणार होता. हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. कथेच्या शेवटी कथेला यापद्धतीने एक नैतिक वळण मिळतांना दिसते. त्यामुळे राजा प्रेमरंजन आणि रूपश्री दोघेही आनंदी होतांना दिसतात.

### १.३.७ राजा आणि प्रधानाचा राजधानीत फेरफटका आणि प्रजेची सुख-दुःखे :

'इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका' या कथेनेही बोधकथेचे रूप धारण केलेले आहे. प्रस्तुत कथासंग्रहातील बहुतांश कथांमध्ये राजा आपल्या प्रधानासह राज्यातील विविध भागात फेरफटका मारून प्रजेची सुख-दुःखे जाणून घेण्याचा प्रयत्न करत असतांना दिसतो. प्रस्तुत कथासंग्रहातील 'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी' ही कथासुद्धा अशीच आहे. 'इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका' या कथेतील राजा प्रजेची विचारपूस करण्यासाठी गुप्तपणे वेषांतर करून राजधानीत हिंडतांना दिसतो. प्रजेच्या वारंवार येणाऱ्या तक्रारी आणि न येणाऱ्या तक्रारीचा विचार करता राजाने हा निर्णय घेतलेला दिसतो.

राजा आणि प्रधान दोघेही साधूंचा वेष परिधान करून राजधानीत हिंडण्यासाठी निघतात. एकूणच प्रवासात आलेले त्यांचे अनुभव अत्यंत वाईट असलेले पाहावयास मिळतात. हे सर्व अनुभव कल्पनेपलीकडचे आणि नीतिबाह्य असलेले जाणवतात. समाजाची जडण-घडण जर नैतिक मूल्यांवर झाली नाही तर काय अवस्था होते? याचा अनुभवच दोघांना आलेला दिसून येतो. स्वार्थ, लोभीपणा आणि आसक्ती यामुळे माणूस कोणत्या थराला जाऊ शकतो; याचे प्रत्यंतरच या कथेतून येते. प्रवासात पहिल्यांदा त्यांना एक व्यापारी भेटतो आणि धकधाकट असूनसुद्धा साधूंसारखे फिरता म्हणून हिणवतो. आमच्या दुकानात काम करता का? असे विचारतो. काम मात्र अत्यंत चुकीचे आणि प्रजेला फसवण्याचे करतांना दिसून येतो. तो व्यापारी गहू आणि तांदळात बारीक माती आणि खडे मिसळण्यासाठी सांगतो. शिवाय चहापावडर आणि मसाल्यामध्ये घोड्याची लीद

मिसळण्यासाठी सांगतो. खरे तर ही लोकांची, प्रजाजनांची शुद्ध फसवणूक असलेली दिसून येते; परंतु स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तो हे कामगारांकडून करून घेत असे. वेषांतर केलेल्या राजा आणि प्रधानालाही तेच सांगतो. यामुळे त्यांना धक्काच बसतो. व्यवसायामध्ये आणि व्यवहारामध्ये पाप आणि पुण्य असं काहीही नसते. तिथे केवळ नफ्याच्या गोष्टी असतात. परिणामांचा विचार करायला परिणाम तरी समोर येणे गरजेचे आहे. ज्या वस्तूंच्या भेसळीमुळे आरोग्यावर कोणताही परिणाम होत नाही, अशा गोष्टीं नफ्यासाठी करणे, हे कोणत्याही व्यापाऱ्याचे कर्तव्यच मानले पाहिजे, हे तो सांगतांना दिसतो आणि करतोही! आपल्या राजधानीतल्या व्यापाऱ्याचा आणि राजदरबारातील कर्मचाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचा आलेला पहिला अनुभव राजाचा अत्यंत धक्कादायक आणि जिव्हारी लागणारा ठरतो.

राजा आणि प्रधानाला आलेला दुसरा अनुभव म्हणजे राजधानीत हिंडत असतांना एक माणूस त्यांना भेटतो आणि आपल्या वडिलांच्या मरणासाठीचा उपाय विचारतो. कारण ते मेल्यानंतर त्यांची सगळी संपत्ती ही आपल्या नावावर करून घेता येईल, ही त्याची मनोमन इच्छा होती. हे ऐकून राजाला धक्काच बसतो. आपल्या जन्मदात्या बापाचं मरण मागणारा मुलगा ते पहिल्यांदाच पाहत होते. आई-बापाच्या कष्ट, प्रेम आणि त्यागामुळेच मुलांचं आयुष्य घडत असतं. असं असतांनासुद्धा मुलगा हे काय मागतो आहे? यावर राजा आणि प्रधान त्याला समज देतांना दिसतात. त्यावर चिडलेल्या सूरात तो म्हणतो, ''महाराज, काय सांगू मी तुम्हाला? आमच्या या बापाजवळ खूप मोठी संपत्ती आहे. तो स्वतः वाटेल तशी उधळतो. मागे तो त्याच्या रखेलीला घेऊन तीर्थयात्रेला जाऊन आला. एकदा त्यानं वाढदिवसाला बेसुमार दानधर्म केला. एका मंदिराला रंग देण्यासाठी पैसा उधळला. शिवाय त्या बाईवर वाटेल तसा खर्च करतो अन् मी खर्चायला मागितले पैसे तर मोजके देतो. त्यामुळे मला मनासारखी चैन करता येत नाही.'' शिवाय त्या मुलाच्या जगण्याविषयीच्या कल्पनांचा विचार केला तर आपल्या बापाने कमावलेल्या संपत्तीवर मौजमजा लुटणे, उपभोग घेणे हे आहे, त्यामुळे तो वडिलांच्या मरणाची वाट पाहात असतो. शेवटी महाराज कोणताही उपाय सांगत नाही, जन्म आणि मरण हे कोणाच्या हातात नसतं असे ते सांगतात. हे ऐकल्यानंतर नाराज होऊन तो निघून जातो.

राजधानीत हिंडत असतांनाचा तिसरा प्रसंगही तितकाच हृदयद्रावक असलेला दिसतो. मंदिर हे पवित्र क्षेत्र असतं. सामान्य लोक हे आपलं दुःख निवारण करण्यासाठी मंदिरात ईश्वराशी संवाद साधण्यासाठी येत असतात. जेव्हा ते एका मंदिरात जातात. तेव्हा मात्र तिथली अस्वच्छता, दुर्गंधी पाहून त्यांना कमालीचे वाईट वाटते. देवपूजेसाठी दिलेले राशन पुजारी खाऊन घेतो. देवाचं भांडवल करून आपला स्वार्थ साधणारा हा पुजारी असतो. एक जर्जर म्हातारा अन्नाच्या लालसेने मंदिरात येतो आणि देवासमोरील दोन केळी उचलतो. हे दृश्य महाराज आणि प्रधान पाहतात. तो महाराजांना म्हणतो, ''दोन दिवसांचा उपाशी आहे. प्रसाद म्हणून मी दोन केळी घेतली. तिथल्या तुमच्या पैशाला, सुपारीला, पेढ्याला अन् कशालाच मी हात लावला नाही. इथंच खाऊन घोटभर पाणी पितो व इथंच देवळाच्या कोपऱ्यात अंग टाकतो.'' शिवाय तो म्हणतो, देवळात अन्नछत्र चालू आहे; परंतु तेथील पुजारी हे केवळ आणि केवळ आपल्या नातेवाईकांनाच जेवू घालतात आणि प्रत्यक्ष गरजूंना मात्र हाकलून देतात. हे ऐकून राजाला विश्वासच बसत नाही. राज्याच्या प्रशासनव्यवस्थेवर त्याचा

विश्वास बसत नाही. माणसाचा स्वार्थीपणा, लोभ आणि पैशांचा दास असणं याचा प्रत्यय वेळोवेळी येतांना जाणवतो. मंदिराचा पुजारीही नीतिबाह्य वर्तन करतांना दिसतो. तोही भिकाऱ्याला मंदिरातून हाकलून देतो. राजाही हा माणुसकीशून्य व्यवहार पाहतो. आणि निःशब्द होतो. आपल्या प्रजेवर असणारा त्याचा विश्वास कमीतकमी होत जातो. राजा आणि प्रधान त्या भिकाऱ्याच्या भोजनाची व्यवस्था करतो. मंदिराच्या आडून चालणारी ही शोषणाची व्यवस्था राजा अनुभवतो.

शेवटी राजा आणि प्रधान दोघेही स्मशानभूमीचा रस्ता धरतात. कारण जीवनाचं खरं दर्शन हे स्मशानात होतं. ओंजळभर राख अन् मूठभर अस्थी हेच जीवनाचे खरे सार आहे. जीवनाचं क्षणभंगुरत्व अनुभवण्यासाठीचं ते स्मशानात जातात. त्याठिकाणी एक प्रेत जळत असतांना दिसते. मृत व्यक्तीविषयी संबंधिताचे नातेवाईक चांगलं बोलत असेल, असे वाटते. चार, पाच समूह वेगवेगळ्या ठिकाणी बसून वेगवेगळ्याा विषयांवर गप्पा मारतांना दिसतो. मृताचे आप्त मात्र गारठल्यासारखे दिसत होते. माणसाचं मरण असं जगण्याला गती देत असतं, असं राजा प्रधानाला सांगतो. जन्म-मरणाची शाश्वतता सांगणारं हे ठिकाण असतं. मरण म्हणजेसुद्धा एकप्रकारचं वेषांतरच असतं नवीन जन्म घेण्यासाठीच. शाश्वत आणि नश्वर यातील सनातन संघर्षच या प्रसंगातून चित्रित केलेला आहे. एकूणच, ही कथा बोधकथेचं रूप धारण करतांना दिसते. राजा आणि राज्यव्यवस्था यातील बेबनाव, दुरावा, असहकार्यवृत्ती याचं चित्रण करणारी कथा आहे. राजाचे आपले राज्यव्यवस्थेवर नियंत्रण असणे गरजेचे आहे. असे झाले नाहीतर प्रजा ही सर्व सोयी-सुविधांपासून वंचित राहू शकते, याचा अनुभव अनेक प्रसंगातून राजाला आलेला दिसतो. प्रजा आणि राजा यांतील सख्य यातूनच सूचित होत असते.

### १.३.८ राजा, विदूषक आणि चक्रम प्रजा :

लोककथांच्या प्रकारात ज्याप्रमाणे मूर्ख माणसांच्या कथांचा समावेश होतो; त्याप्रमाणेच 'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार' या कथेमध्येही मूर्ख राजाची गोष्ट आकारास आलेली आहे. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाने सुखसंपन्न झालेली ही राजधानी. त्यात राजा चक्रमसेन आपले राज्य चालवत असतांना दिसतो. नावाप्रमाणेच त्याचा स्वभाव आणि वर्तनसुद्धा! आपलं कर्तृत्व सिद्धीला यावं असं करण्यासारखं त्याच्याकडे काहीही नव्हतं. फक्त सांभाळणं हेदेखील कर्तृत्वच होतं! परंतु राजाच्याने तेही शक्य नव्हतं. त्यातचं त्याने गंमत म्हणून पाच-सहा लग्नं मात्र केली होती. त्यातच तो सुख मानत होता. आपल्या स्त्रियांबरोबर रात्री गाण्यांच्या भेंड्या खेळत बसणं आणि विदूषकाबरोबर हास्यविनोद करून वेळ घालवणं एवढचं तो करत असत. आपल्या एकूणचं वर्तनाने तो आपल्या जनतेचा तो विनोदाचा विषय झालेला दिसून येतो. राजपदाला शोभणारी कोणतेही गुणवैशिष्ट्ये त्याच्याकडे नव्हती.

लोकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी कधीतरी तो दरबार भरवत असे. लोकांचे प्रश्नही गंभीर नसले तरी त्यांच्या स्वार्थातून जन्माला आलेले होते. त्यामुळे ते त्याचा निपटारा करण्यासाठी येणं तितकचं स्वाभाविक होतं, हेही ध्यानात घ्यावे लागते. असाच एक दिवस दरबार भरवला असतांना काही लोक आपापली तक्रार घेऊन दरबारात दाखल झालेले दिसून येतात. एक पुरोहित प्रश्न उपस्थित करतो, ''महाराज, मी आपल्या

शिवमंदिराचा उपासक, सेवक. गेल्या अनेक वर्षांपासून मी मंदिराची सेवा करतो आहे. पुरोहित म्हणून पूजा-अर्चा करतो आहे. पण आजकाल शेजारी नव्याने विष्णुमंदिर झाल्यामुळे शिवमंदिराला खूप कमी भक्तगण येतात आणि जे येतात ते दक्षिणाही फारशी टाकत नाहीत. फळे आणि भेटवस्तूही देवासमोर ठेवत नाहीत. त्यामुळे माझी खूप उपासमार होऊ लागली आहे. आठ-आठ दिवसांत एकदाही मला मिष्टान्न खायला मिळत नाही.''

यावरून तक्रार करणारा वर्ग कोणत्या प्रकारचा होता हे कळते. केवळ मिष्टान्न खायला मिळत नाही म्हणून तक्रार करणारा हा पुरोहित आहे. तर दुसरा प्रौढ नागरिक हा रात्रीच्या वेळी शेजारी जोरजोरात खोकतो; त्यामुळे मला झोप येत नाही. अशी तक्रार करतो. त्यामुळे या व्यक्तीची योग्य ती व्यवस्था करावी, अशी विनंती करतो. त्यावर राजा उत्तर देतो, ''प्रधानजी या खोकणाऱ्या माणसाला पकडून आणा आणि नगरीचं रात्री संरक्षण करणाऱ्या चौकीवर आणून ठेवा. म्हणजे चौकीतले आपले शिपाई तरी जागे राहतील व थोडेसे काम तरी करतील. आणि या तक्रार करणाऱ्या महाशयाला रात्री शांतपणे झोप यावी यासाठी थोडीशी अफू खायला द्या. आपण काय त्याला विकत किंवा उसनी झोप आणून देऊ शकत नाही.'' तिसरा तक्रारदार हा अत्यंत विचित्र स्वरूपाची तक्रार करताना दिसतो. तो चोरी करायला गेला असतांना संबंधित घरमालकाच्या घराची भिंत खिडकीसह कोसळलेली दिसते. त्यामुळे त्याचा हात जखमी झालेला दिसतो. त्यामुळे संबंधित घरमालकाला शिक्षा देण्यात यावी, अशी त्याची तक्रार आहे. शिवाय त्याने भरपाईसुद्धा द्यावी, ही त्याची माफक अपेक्षा आहे. राजाने चोराला नाव विचारले असता आई-बापानं चार-पाच नावं ठेवलेली आहेत, असे तो सांगतो. चोराचे म्हणून जे गुणधर्म असतात, तो ते तंतोतंत पाळतांना दिसतो. चोरी करणं हे पाप आहे, हे त्याला मान्य नाही. या जगात प्रत्येकजणच चोर आहे, असे तो सांगतो.

तो महाराजांना सांगतो, ''महाराज, आपले प्रधानजी चुकीचं बोलत आहेत. कोण म्हणतं चोरी करणं पाप आहे? वाल्या कोळ्यापासून चालत आलेली ही थोर परंपरा आहे. ते सेवाकार्य आहे. महाराज, आपण लक्षात घ्या. साचलेला पैसा चार अन् तुंबलेलं पाणी लगेच नासायला लागतं. बिनकामाचं ठरतं. ते सगळीकडे गेलं पायजे. सगळ्यांना वापरता आलं पाहिजे तेव्हा साचलेला पैसा चार घरात जाणं पाप का पुण्य? तुम्हीच सांगा? अन् दुसरं असं की, एखाद्या श्रीमंताकडे असणारा पैसा जितका त्याचा असतो, तितका तो लुबाडल्या गेलेल्या गरिबांचाही असतो. तेव्हा आम्हा गरिबांचा तो पैसा आम्ही घेतला तर ती चोरी कशी? आणि त्यातूनही आपण याला चोरी म्हणत असाल तर जगातला प्रत्येकजण चोर आहे. त्याचं काय? तुम्ही वासराचं दूध चोरून स्वतः वापरता. तुम्ही दुधाची चोरी करता. भुंगा मधाची चोरी करतो. शेतकरी फळा-फुलांची चोरी करतो. धंदेवाईक सरकारी करांची चोरी करतो अन् राजा तर प्रजेच्या उत्पन्नाची चोरी करतो. कराच्या रूपानं साऱ्या जगाकडून पैसा घेणारा राजा केवढा मोठा चोर म्हणावा? महाराज, तुम्ही चोर आहात असं मला बिलकूल म्हणायचं नाही. त्याशिवाय कारभार चालणार नाही हे मला कळतं? पण चोरीचा विषय निघाला म्हणून मला हे बोलावं लागलं. महाराज, मला क्षमा करा. माझ्या या बोलण्याकडे दुर्लक्ष करा, अशी मी विनंती करतो.''

त्याच्या या वक्तव्यातून सगळं जगचं चोर असल्याचं जाणवतं. जगातल्या सर्वच नैतिक कृतींना तो

अनैतिकतेच्या विळख्यात आणतांना जाणवतो आणि स्वतःच्या कृतीचंही समर्थन करतांना दिसतो. चोरी ही शेवटी चोरीचं असते, हे तो शेवटपर्यंत मानायला तयार नाही.

राजदरबार म्हणजे निरर्थक गप्पांची मैफल याचा अनुभवही राजदरबारात विदूषक आल्यानंतर अनुभवता येतो. विदूषक राजदरबारात येण्यास उशिर का झाला याचे विवेचन करत असतांना आपले कौटुंबिक अनुभव कथन करतांना दिसतो. बायकोच्या खाल्लेल्या शिव्या, उशिरा उठल्यामुळे धुवावे लागलेले कपडे, मिठाईच्या दुकानातील खाद्यपदार्थ आणि बसलेल्या ललना यांना बघणं इत्यादी इत्यादी कारणांची मीमांसा तो करतांना दिसतो. भांडे घासण्याविषयी विदूषक म्हणतो, ''महाराज, गाण्याच्या ठेक्यावर मी प्रत्येक भांडं घासतो, कपडा आपटतो, एवढंच नव्हे तर गीतेचा दुसरा अध्याय म्हणतो. त्यातल्या स्थितप्रज्ञाच्या लक्षणामुळे तर मी दुःख विसरतो. शिवाय अनिष्ट निवारणाचे मंत्र म्हणतो, मनःशांतीची प्रार्थना करतो, संकटमुक्तीसाठी गोपीप्रमाणे श्रीकृष्णाचा धावा करतो. म्हणून तर आजपर्यंत मी टिकून आहे...''

त्याच्या या एकूण वक्तव्यामध्ये केवळ आणि केवळ विनोदबुद्धीच पाहावयास मिळते. शिवाय महाराजांच्या शिकार कार्यक्रमाविषयीही थट्टा-मस्करी करतो. अनेकदा महाराजांच्या गुणगौरवार्थ राज्यातील सैनिकांना अगोदरच एक शिकार करून जंगलांत लपवावी लागते आणि नंतर ती राजाने केली असे सांगावे लागते. यातून विदूषकाची विनोदीशैली अनुभवता येते. शिवाय राजाची खूशमस्करी करण्यासाठीच त्याची नियुक्ती असल्यामुळे त्यापेक्षा अधिकचे तो काहीही करूही शकत नव्हता. शेवटी चक्रमसेन महाराजांचा दरबारचं होता तो! शेवटी यापेक्षा दुसऱ्या कशाची अपेक्षा करणेही गैरच! ही बाबही ध्यानात घ्यावी लागते. महाराजांच्या अकुशल बाबींवरही विनोदाने बोट ठेवणारा हा विदूषक आहे. महाराजांना शिकारीचे कौशल्य हस्तगत नसतांनासुद्धा शिकारीला जाणे हा त्यातीलच एक भाग आहे.

दरबार चालू असतांनाच एक आदिवासी येतो आणि राजाला त्याचा हरवलेला रत्नहार आणून देतो. तो त्याचा प्रामाणिकपणा दाखवतो. मूर्तिमंत दारिद्र्य असतांनासुद्धा तो आपला प्रामाणिकपणा जपतो. हे त्या आदिवासीचं मोठेपणं आहे. खरं तर दारिद्र्य माणसाला पाप करायला लावत असतं; परंतु इथला अनुभव मात्र निराळाच ठरलेला आहे. महाराजांना त्याच कौतुक वाटतं. त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल राजा त्याला बक्षीस देऊ इच्छित होता. परंतु ते बक्षीस तो नाकारतो. राजाकडे तो चार मागण्या मागतो. आदिवासी जे अन्न खातात; ते अन्न आपण आणि दरबारातील थोर मंडळींनी एक महिना खाऊन दाखवावे. दुसरी मागणी वरील सर्वांनी आदिवासींच्या काडाकुडाच्या झोपडींमध्ये अंधाराच्या सोबतीने एक महिना राहावे. त्यातून सुख म्हणजे काय? हे समजेल. तिसरी मागणी म्हणजे आपल्या पोटाला लागणाऱ्या अन्नापुरते तरी आपण कष्ट करून दाखवावे. प्रत्येक पदार्थासाठी किती कष्ट करावे लागतात, हे आपणाला कळून येईल.

चौथी मागणी म्हणजे मी जंगलातून येताना आपणाला भेट म्हणून ओंजळभर बिया आणलेल्या आहेत. त्या बिया आपण लावाव्यात, वाढवाव्यात. ईश्वराची कधीही न संपणारी ही संपत्ती आहे. ही हिरवीगर्द ईश्वराची धनसंपदा साऱ्या राज्यात विस्तारू दे. आणि त्याबरोबरच एक विनंती आहे की, ऊठसूट पशुपक्षांना मारू नका.

या मागण्याच माझे बक्षीस आहे. असे तो म्हणतो. यातून राजा आणि विदूषकाला आज खरा दरबार भरल्यासारखा वाटतो. आज खऱ्या अर्थाने प्रजा भेटल्यासारखी वाटते. जीवनाचे दर्शन घडल्यासारखे वाटते. कथा याठिकाणी थांबते. राजा चक्रमसेनसारख्या राजाचे प्रबोधन करणारी ही कथा आहे.

### १.३.९ जीवनाच्या व्यापक दर्शनासाठी भ्रमण आवश्यक :

'राजे वीरसेनास झालेले नवे दर्शन' या कथेत राजा वीरसेनास जीवनाचे व्यापक आणि निरपेक्ष जीवनदर्शन झालेले अनुभवता येते. या कथेचा नायक राजा वीरसेन हा आहे. राज्यारोहणाचा समारंभ नुकताच थाटामाटात संपन्न झाल्यानंतर विश्रामासाठी तो एका समुद्राकाठी असणाऱ्या विष्णुमंदिरात जातो. तेव्हा त्याला त्या दिवसांमध्ये जो अनुभव आला त्यात त्याला माणसाच्या जगण्याची दुर्दम्यता आणि क्षणभंगुरता या दोन्हींचाही परिचय आलेला दिसून येतो.

विष्णुमंदिरात गेला असतांना आपल्या कारकिर्दीत या मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा, असे त्याला मनोमन वाटते. ही चर्चा चालू असतांनाच एक साधू त्यांना चर्मासनावर बसलेला दिसला. त्या साधूशी चर्चा करतांना जरासा रूबाबात तो चर्चा करत होता. आपण राजा असल्याचे सांगत होता. मी आपल्यासाठी काहीही करू शकतो, असे तो म्हणाला. त्यावर तो साधू एक विनंती करतो, ''या सागरभरतीचे पाणी मंदिरात येणार नाही, असे काही तरी करा. किंवा समोर काठावर येऊन आदळणाऱ्या लाटा आहेत, त्या थोपविता आल्या तर बघा.... '' क्षणभर थांबून साधू पुन्हा म्हणाला, ''राजन, सत्ता मिळवणे एक वेळ सोपे असते, पण सत्ता पचवणे त्याहून अवघड असते. सत्ता पचवली नाही तर तिचे मग पदोपदी प्रदर्शन होते. ... तुम्ही तेवढ्याा सागराच्या लाटा थोपवा. म्हणजे माझी सोय होईल.'' त्यावर राजा प्रधानाला म्हणाला, ''जगातला कुठलाही माणूस कितीही सत्तासंपन्न असला तरी या लाटा थांबवू शकत नाही. माणसाजवळ असलेल्या प्रबळ सत्तेपेक्षाही सागराच्या ठायी असणारी सत्ता अमर्याद आहे.'' यातून राजाचा अहंकार क्षणार्धात मालवतो आणि त्याला आपली चूक कळते.

त्याच सागराच्या काठाकाठाने फिरत असतांना त्यांना एक मुलगा कुत्र्याच्या पिल्लाबरोबर खेळत असतांना दिसला. त्या मुलाच्या अंगावर कोणत्याही प्रकारचा कपडा नव्हता. तरीही तो खेळण्यात दंग होता. त्या मुलाच्या आईला प्रधान राजाची ओळख करून देतो. राजाच्या राज्यारोहण सोहळ्याची बातमी सांगतो. त्यावर ती उदास शब्दांत म्हणते, ''झाला काय अन् न झाला काय, थाटामाटाचा झाला का एवढासा झाला, आमाला काय देणं-घेणं त्याचं? गावातल्या मुखियाला पोरगा झाला तरी ते आमाला ठाऊक होत नाही. इतक्या लांबचं कसं कळणार आम्हाला? आन् कळून तरी काय फायदा आमचा?'' तिचे हे उत्तर पाहून प्रधान हिरमुसतो. सामान्य जनमाणसांचं प्रातिनिधिक स्वरूपात ती उत्तर देतांना दिसते. सामान्य माणसांचंही असंच असतं. त्यांना राज्याच्या राज्यकारभाराशी काहीही देणंघेणं नसतं. आपल्या मूलभूत आणि नैसर्गिक गरजांच्या परिपूर्तीसाठीच त्यांना रोज जगावं लागतं. त्यामुळे राजा असला काय? किंवा नसला काय? त्यांच्या दृष्टीने त्याचा काहीही फरक पडत नसतो. ते आपल्या लौकिक जीवनाशी आणि जगण्याशीच दैनंदिन पातळीवर संघर्ष करत असतात.

मुलाच्या अंगावर कपडे नसल्याने राजा मुलाला कपडे देऊ का? असे विचारतो. त्यावर ती म्हणते, ''तशी एक आडजुनी पैरण हाय लेकराला. ती जास्ती दिवस टिकावी म्हणून घालतो कधी-मधी. बस झाली तेवढी आमाला. आता एवढे तुमी होऊन देताय हे खरं पण, महाराज, 'दुसऱ्यानं दिलेलं पुरत नाही, आन् घरचं आसेल ते सरत नाही' अशी आमच्याकडं एक म्हणच आहे. आन् नागवंपण म्हणत असाल तर तशी आपण सारी नागवीच आहोत की! काही कापडाच्या आत असतात. काही कापडाशिवाय नागवी असतात. आन् यात पुन्हा लाजायचं कशाला? मला जे हात-पाय डोळं आहेत, तेच माज्या पोराला आहेत. तेच तुमाला हायेत. तुमच्या राणीसायबाम्नी हायेत. मग कुणी कुणाला लाजायाचं आन् कशासाठी? देवानं दिलेला हा देह आहे. त्याची लाज का म्हणून बाळगावी? आणि महाराज, तुम्ही बघा. गुराढोरांना कापडं नसतात. वाघ-सिंह नागवेच असतात. सिंह झाला म्हणून तो काय तुमच्यासारखी कापडं थोडीच घालतोय? तसं मला अडाण्या बाईला काय कळत न्हायी. मनात आलं ते बोलले मी. माफ करा मला तुम्ही.'' यातून राजा जीवनाच्या नवीन अनुभवाला सामोरे जातांना दिसतो. तो आत्मचिंतनाच्या पातळीवर जातो. जगण्या-मरण्यातलं रहस्य त्याच्या डोळ्यासमोर उभं राहतं.

राजा आणि प्रधान दोघेही सागरकाठावरून फिरत फिरत झाडाझुडपात जातात. तेव्हा एक जख्ख म्हातारी राजाला भेट देण्यासाठी जांभळाची फळे द्रोणात साठवून राजाची वाट पाहत होती. गरिबाची भेट महाराजांनी घ्यावी, एवढीच तिची माफक अपेक्षा होती. राजालाही या भेटीचा आनंद झाला होता. या आनंदात तो आपल्या हाताच्या बोटातील अंगठी तिच्या हातावर ठेवतो. त्यावर ती म्हणते, ''महाराज, ही अंगठी घेऊन मी काय करू? मी आहे मरू घातलेली म्हातारी, काळी, कुरूप आणि सुरकुत्यांनी माखलेली. हे फळाफुलांनी नटलेलं जंगल आणि हा समुद्र आम्हाला भरपूर देतो. तेच सरता सरत नाही. या दोघांइतका श्रीमंत कुणी नाही. दाता कुणी नाही. आमच्यावर आपली कृपा असावी एवढीच विनंती आहे.'' असे म्हणून ती अंगठी परत करते. याउलट राजदरबारातले लोक मात्र कमी बक्षीस मिळतात म्हणून उदास चेहऱ्यांचे लोक राजा बघत होता. जीवनातील क्षणभंगुरताही तिला माहीत होती. म्हणून तिच्या जगण्यात निरपेक्ष प्रेमाचा साक्षात्कार झालेला दिसून येतो. ती मृत्यूच्या समीप होती. म्हणून वस्तूंविषयीचं आकर्षण संपले असावे. हाच त्यामागचा अर्थ काढता येईल. परंतु निसर्गाच्या सान्निध्यात असणाऱ्या माणसाला धातूंच्या वस्तूंचे ते मूल्य काय असावे!

पुढे त्यांना प्रवास करतांना चार-पाच आदिवासी तरुण भेटतात. राजाचे चरणस्पर्श करतात. आपला राजा त्यांना पाहायचा होता. राजा त्यांना अडचणी विचारतो. तेंव्हा आपली कोणतीही अडचण नाही, असे ते म्हणतात. त्याचबरोबर एक विनंतीही करतात. ती म्हणजे, ''तिरकमठा, बंदूक आणि कुऱ्हाड घेऊन जंगलात येणाऱ्या माणसावर बंदी घालावी. ती जंगलाचं आणि माणसाचं नातं तोडतात.'' यावर राजा त्यांना होकारार्थी प्रतिक्रिया देतो. त्यावेळी एक आदिवासी म्हातारा राजाच्या हातावर पिंपळाची हिरव्या, पिवळ्याा रंगाची पाने ठेवतो. अनुक्रमे आसक्ती आणि ओहोटीचे प्रतीकं आहेत. जगण्यातली क्षणभंगुरताच यातून स्पष्ट होते. तो म्हातारा म्हणतो, ''सोन्याच्या छडीसारखी दिसणारी बाई सुकलेल्या मुळीसारखी होते. बघता बघता कुजते. तलवार घेतलेल्या हातात बघता बघता आधारासाठी काठी येते. कमळफुलाची आठवण देणारं आपलं रूप

करपलेल्या भाकरीची आठवण देतं. तेव्हा माणसानं रूपाचाही अभिमान बाळगू नये आणि हे वाळून गेलेलं आणि मातीनं माखलेलं पान आपणाला मरणाची आठवण देतं. फांदीवरचं प्रत्येक पान गळून खाली पडतं. नव्या येणाऱ्या पालवीसाठी त्याला जागा करून द्यावी लागते. खाली पडलेलं पान मातीत मिसळलं जातं. त्याची माती माती होते. त्याचा अंत होतो. म्हणून जगताना प्रत्येकानं मरणाचं स्मरण करीत जगावं, असं हे स्मरणच जगण्याला पूर्णत्व देत असतं. महाराज, सत्ता, संपत्ती आणि सौंदर्य यांचे प्रतीक म्हणजे ही पानं आहेत. या पानांचं आपण स्मरण करावं, एवढीच या म्हाताऱ्याची विनंती आहे. ... वेळ काढून पुन्हा आपण आमच्याकडे यावं. समुद्र आणि जंगल याचं होणारं दर्शन कधीच शिळं होत नाही. उलट ते आपणाला जगण्याचं बळ देतं आणि आपलं छोटेपणही लक्षात आणून देतं. आपल्या या नव्या सम्राटपदाला आमच्या मनापासून शुभेच्छा आहेत.'' राजाही या भेटीमुळे कृतार्थ होतो. निसर्गात जगणाऱ्या माणसाकडं जगण्याचं भरपूर तत्त्वज्ञान असतं. आणि तो त्या तत्त्वज्ञानालाच उराशी कवटाळून जगत असतो. तो नागरी समाजासारखे त्यांचे म्हणून स्वतःचे तत्त्वज्ञान निर्माण करत नाही. निसर्गाच्या सान्निध्यातच जीवन जगण्याची खरी कृतार्थता आहे, असे त्यांना वाटून जाते.

### १.३.१० स्वार्थलोलूपता हा समाजाचा स्थायीभाव :

'कुणा एकाचे मरण' ही सुद्धा एका आटपाट नगरातील कथा आहे. या कथेतही राजा आणि प्रधान वेषांतर करून आपल्या राज्यातील प्रजेची सुख-दुःखे पाहण्यासाठी आणि राज्याची पाहणीसाठी निघतात. प्रवासात त्यांना आलेला अनुभव हा अत्यंत भयावह स्वरूपाचा ठरतो. तोच त्यांनी कथन केलेला आहे. एके दिवशी रात्री राजा आणि प्रधान भिकाऱ्याचा वेश परिधान करून आपल्या नगरात फेरफटका मारायला जातात. त्यांचा पहिलाच अनुभव हा दारूड्याच्या संदर्भात येतो. दारूडा त्या भिकारी झालेल्या राजा आणि प्रधानाला दारूसाठी पैसे मागतो. परंतु दोन-चार पैसे हातावर ठेवल्यानंतर मीच तुम्हाला दारू पाजतो, असे म्हणून तो दारूच्या गुत्त्यावर दोघांना नेतो. परंतु दारू पित नाही असे म्हणून ते पळ काढतात. प्रधान राजाला म्हणतो, महाराज, आपल्या प्रजेतील दारू पिण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यावर राजा म्हणतो, ''प्रधानजी, तुम्ही म्हणता ते अगदी खरे आहे. अगदी शंभर टक्के खरे आहे. दारूडी माणसं कशी वागतात, याचा आत्ताच आपण अनुभव घेतला. पैसे नाहीत म्हणून त्याने आपणास बदडले नाही, तेच आपले नशीब म्हणायचे. पण मी तुम्हाला एक सत्य सांगतो. राज्यातील प्रजा सतत एखाद्या धुंदीत, गुंगीत, नादात गुंतून पडलेली चांगली. त्यामुळे ती बाहेरचं जग विसरते. आपल्या कारभाराविषयी ते तक्रार करीत नाहीत, संताप करीत नाहीत वा बंडही करू शकत नाहीत. कारण तेवढी त्यांना शुद्धच राहिलेली नसते. त्यामुळे आपला कारभार आणि आपलं राज्य निर्धोक राहातं. आपणाला सुखाने जगता येतं. सुखाची झोप मिळते.'' यातून कोणत्याही राजाला आपली प्रजा ही नेहमी गुंगीत राहावी, असे नेहमी वाटते. ती गुंगीत राहते तेव्हाच राजाला आपला राज्यकारभार सुरळीतपणे पार पाडता येतो. हे एक राजकीय सत्यही राजा प्रधानाला सांगतो.

थोड्या अंतरावर गेल्यानंतर त्यांना एका दुमजली इमारतीसमोर काही माणसं जमलेली दिसतात. त्यांनी

एवढी गर्दी का? असे एक जणाला विचारले. त्यावर त्यांचे मालक शेवटचे श्वास घेत आहेत, असे तो म्हणाला. तिथे घरासमोरच्या मोकळ्याा जागेत चार ब्राह्मण कुठल्यातरी ग्रंथाचं वाचन करीत होते. मरणासन्न असलेल्या धनिकाच्या नातेवाईकाने हा विधी चालवलेला होता. प्रत्येक जण मालकाचे प्राण वाचावे यासाठी प्रार्थना करत होता. त्या धनिकाने गैरमार्गाने संपत्ती कमावलेली होती. राजानेही त्याला दंड केला होता. परंतु नागरिकांच्या सांगण्यावरून तुम्ही पुढे जाऊन भीक मागा, असे सांगितल्याने राजा आणि प्रधान पुढे निघून जातात.

पुढे दवाखान्यासमोर भीक मागण्याच्या निमित्ताने जातात. तेव्हा त्यांना वेगळाच अनुभव आलेला दिसतो. तिथे भीक मागितल्यानंतर त्यांना दोन केळी मिळतात. त्यानंतर मात्र आपला पेशंट आजारी आहे. त्याच्या दोन्हीही किडन्या निकामी आहे. आपल्या दोघांपैकी कुणी किडनी देण्यास तयार झाले तर आपण त्यांना हवी तेवढी रक्कम देण्यास तयार आहोत. असे ते म्हणतात. ते ऐकून ते थरारतात. तेव्हा तुमच्या नातेवाईकांमध्येही कुणी किडनी देऊ शकतात की? असे म्हणल्यावर ''आम्ही कष्ट करणारी माणसं आहोत. धावपळ करणारी माणसं आहोत. आम्हाला असं अधू होऊन चालणार नाही. एकाने राजाला उत्तर दिले. त्यावर प्रधानजी म्हणाले, ''जे कष्ट करत नाहीत, अशा त्यांच्या घरातल्या कुणीतरी द्यावी, अन् कष्टाचा आणि किडनी काढण्याचा काय संबंध?'' ते आणखी रक्कम देऊ करतात. जबरदस्तीची भाषा करतात. तेव्हा घरी जाऊन येतो म्हणून निघून येतात. पुढे राजा प्रधानाला म्हणतो, ''प्रधानजी, हे असले जगावेगळे अनुभव मिळाले असते का आपणाला? अहो, या वेषांतरामुळेच आपणाला माणूस समजला. त्यांचे व्यवहार समजले.

मरणाविषयीची माणसाची भावना समजली. आणि आपली प्रजा आजकाल काय काय विकू लागली आहे, हेही कळले. आपल्या प्रजेने आपले अवयव विकण्या-घेण्यापर्यंत प्रगती केली आहे, हे या वेषांतरामुळेच समजले ना? काल-परवापर्यंत माणसं शेतजमीन विकत होती. जनावरं, झाडं, दूध, धान्य विकत होती. नंतर नंतर आपल्या मुलाबाळांना, विशेषतः मुलींना विकू लागले. कुणी स्वतःची घर विकली. कुणी घरावरचे पत्रे विकले. पण किडनीसारखा आपला अवयव विकण्याइतपत प्रगती करतील, असं वाटलं नव्हतं. पैसा कमाईचे किती नवलपूर्ण मार्ग आपल्या नागरिकांनी शोधलेत, पाहा. तुम्हाला असले मार्ग सुचले असते का?... दुसरी गोष्ट अशी की, आज तुम्ही माझे ऐंशी हजार रूपये बुडवले. द्यावी म्हणत होतो त्या लोकांना माझी किडनी. एका माणसाचे प्राण तरी वाचले असते त्यामुळे.'' माणसाची प्रगती ही माणसाला कोणत्या स्तरापर्यत घेऊन आली. माणसाचं कसं वस्तूकरणं होऊ लागलेलं आहे, हे याचं उत्तम उदाहरण म्हणून पाहता येईल. माणसाची स्वार्थीवृत्ती अनुभवता आली. रक्ताची नाती असलेल्या माणसांना आपल्या माणसाविषयी काहीही करावे वाटत नाही. नात्यांतील हा ढोंगीपणाही अनुभवता आला. माणसाला शेवटी आपला जीव महत्त्वाचा वाटतो. शेवटी तो प्राण्यांसारखाच स्वतःचा स्वार्थ साधतांना दिसतो. प्रसंगी दुसऱ्याचा बळी देऊ पाहतो. हेच यातून पाहता येते.

पुढे परतीच्या प्रवासात राजवाड्याकडे जात असतांना रस्त्यात एका वेगळ्या प्रसंगाला राजा आणि प्रधान सामोरे जात असतांना जाणवतात. त्यांना असे दिसते की, शहरातला एक श्रीमंत जमीनदार व्यक्ती मृत्यूच्या घटका मोजत आहे, अशा वेळी त्याचा मुलगा चुकीच्या पद्धतीने त्याची सगळी संपत्ती स्वतःच्या नावावर करून

घेण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यासाठी राजा आणि प्रधानाला खोटे साक्षीदार म्हणून उभे करून सह्याही घेण्याचा प्रयत्न करतो; जेणेकरून त्याच्या सावत्र भावाला संपत्तीतील एक छदाम मिळणार नाही. एकीकडे माणूस मरू नये म्हणून पाण्यात देव ठेवले जातात; तर दुसरीकडे माणूस मरावा म्हणून नवस बोलला जातो. हा परस्पर विरोधी अनुभव राजा आणि प्रधान एकाच वेळी घेतांना दिसतात. माणसाच्या स्वभाव आणि प्रवृत्ती लोभीपणामुळे कशा बदलत जातात, याचेच हे एक उत्तम उदाहरण मानता येईल. प्रसंगी राजा आणि प्रधान दोघेही तिथून पळ काढण्याचा प्रयत्न करतात.

पुढे ते चालत असतांना स्मशानभूमीच्या जवळ येतात. तिथे एका ओट्यावर राजा आणि प्रधान आलेल्या अनुभवांवर बोलत होते. तोपर्यंत अंत्यसंस्कारासाठी सामान पुरवणारा माणूस आतल्या खोलीतून बाहेर येतो. आणि कोणी मेलं आहे का? असे विचारतो. अंत्यसंस्काराचं साहित्य पुरवणारा मी आहे. त्यावेळी तो आपली अडचणही सांगतो. गावातला धनिक लवकर मरावा, असे त्याला वाटते. जेणेकरून त्यांना विकलेल्या अंत्यसंस्काराच्या वस्तूतून येणाऱ्या पैशातून तो आपल्या मुलाला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाऊ शकेल. न राहवून राजा प्रधानाला म्हणतो, ''प्रधानजी, एकाच माणसाचं मरण दोन ठिकाणी कसं वापरलं जातंय बघा. माणसाचं मरण हे जीवनाला मिळालेला पूर्णविराम नाही. तो अर्धविराम आहे आणि दुसऱ्याच्या जीवनाला मिळणारे ते वरदानही आहे. एक मरण माणसाला कशाप्रकारे नाचविते, नाही?'' स्मशान हेच त्या माणसाचं सर्वस्व असतं. त्यावरच त्याचा संसार चाललेला असतो. तापाने फणफणलेल्या लेकरांला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्यासाठी त्याला हे सर्व करणं अगत्याचं असतं. तो दोघांनाही थांबायला सांगतो. उद्यापर्यंत कुणीतरी मरेल; तेव्हा त्याच्यावर उधळलेली नाणी तुम्ही घेऊन जा, असे तो म्हणतो.

लेखक निवेदन करतो, ''एकाचं मरण म्हणजेच दुसऱ्याचं जगणं हे जीवनातले भयानक सत्य या माणसाच्या मुखातून ऐकल्याबरोबर राजा आणि प्रधान कमालीचे थक्क झाले. अंतर्मुख झाले. या सगळ्याचं एकमेव कारण आहे, माणसाला नाचवणारी आणि त्याचं आयुष्य कुरतडून टाकणारी भूक. तुमच्या चांगुलपणाला गिळून टाकणारी भूकच नसेल, तर तो खरोखर देवमाणूस झाला असता; नव्हे देवच झाला असता. असला काहीतरी विचार राजाच्या मनात आला. या विचाराच्या गुंत्यातून बाहेर येत राजा म्हणाला, ''बाबा, नको थांबायला इथे. या असल्या पैशातून पोटाची आग विझवणं आम्हाला योग्य वाटत नाही. ते पाप वाटतयं मनाला. पण जाता जाता एक शब्द देतो, आम्ही उद्या तुमच्या पोराच्या औषधासाठी नक्की पैसे आणतो. नाहीच भीक मिळाली तर आम्ही दोघे थेट राजाला विनंती करू. त्याचे पाय धरू. आणि त्याच्याकडून मिळेल ते तुम्हाला आणून देतो. एखाद्या मंदिराच्या दारात दोन तास उभे राहिलो, तरी औषधापुरते पैसे आम्हाला मिळतील. तुम्ही निश्चिंत राहा.'' यातून राजाला आणि प्रधानाला आपल्या प्रजेची किती काळजी आहे, हे पाहावयास मिळते.

त्यानंतर राजा आणि प्रधान राजवाड्याजवळ येतात. तेव्हाचे चित्र पाहून राजाच्या मनात धडकीच भरताना दिसते. खुद्द राजाचा मुलगाच राजाच्या हत्येचं षडयंत्र करताना पाहावयास मिळतो. एका अंधाऱ्या कोपऱ्यात मुदपाकखानात्यातील मुख्य आचारी राजपुत्राशी बोलतांना दिसतो. राजपुत्र त्याला राजाला अन्नात विष कालवून

खाऊ घालण्यास सांगतो. असे केले तर त्याला खूप मोठे बक्षीस दिले जाईल. चार गावची जहागिरी इनाम म्हणून दिली जाईल. शिवाय महाराजांच्या मृत्यूचा कोणावरही संशय येणार नाही. शेवटी राजपुत्राने दम भरल्यानंतर तो तयार होतो. राजपुत्राचे हे वर्तन पाहून राजा मात्र कमालीचा हतबल झालेला दिसतो. सत्तेसाठी मुलगा कोणत्या स्तरापर्यंत जाऊ शकतो, हे त्याने याची देही याची डोळा अनुभवलेले असते. राजा रडतो आणि प्रधानाला म्हणतो, ''प्रधानजी, आजपासून मी तुमच्या घरचे अन्न खाणार अन् तेही मिळाले नाही तर रात्री भिकाऱ्याचा वेष परिधान करून देवळासमोर भीक मागणार. पण राजवाड्यातल्या अन्नास मी स्पर्श करणार नाही.'' प्रधानही अत्यंत प्रामाणिक आहे. तोही म्हणतो, ''विषदग्ध अन्न आधी मी खाईन, पण तुम्हाला वाचवीन. तुम्ही शांत व्हा आणि शांतपणे राज्यकारभार करा. ईश्वर सर्व काही ठीक करेल.'' यातून त्यांचा खंबीरपणाही दिसून येतो. एकाच्या मरणावरच दुसऱ्याचं जीवन अवलंबून असते की काय? असेच या कथेतून लेखकाला सूचित करावयाचे आहे की काय? असे वाचकाला वाटून राहते.

## १.३.११ जीवनमूल्यांची वृद्धी करणारी कथा :

'अन्नदान' या कथेतून अन्नदान हेच परमश्रेष्ठ दान आहे, हे सांगण्याकडे प्रस्तुत लेखकाचा कल आहे. या कथेतील विविध घटना-प्रसंगांतून हेच सूचित करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला पाहावयास मिळतो. कथेच्या सुरुवातीलाच रणरणत्या उन्हात एक भुकेला माणूस एका घरासमोर भीक मागतांना दिसतो. तेव्हा त्या घरातील बाई त्याला अर्धवट भाजलेली, करपलेली आणि तेलाचं बोटही न लावलेली पोळी आणून देते. त्यालाच तो ईश्वराचा प्रसाद म्हणून स्वीकारतो. त्याचबरोबर तुम्ही धष्टपुष्ट असतांनाही कष्ट का करत नाहीत? असेही ती विचारते. तेंव्हा तो आपल्या परीने उत्तर देऊन टाकतो. तो म्हणतो, ''देवी, आपण आपला घरसंसार करावा, बायकोमुलात रमावे, असं मला अगदी तरुण वयातसुद्धा वाटलं नाही. प्रपंच म्हणजे परमार्थाच्या वाटेवरचा धोंडा या भावनेने मी संसाराचा त्याग केला नाही. उलट मला मनापासून असं वाटतं की, परमार्थाच्या मार्गावरची सशक्त पायरी म्हणजे प्रपंच. गृहस्थाश्रमाशिवाय संन्यासाश्रमाला आधार नाही. पूर्णता नाही.

घरसंसार असणाऱ्या माणसाने अन्न दिल्याशिवाय संन्यासी जगू शकत नाही. शरीराच्या भुकेसाठी गृहस्थाश्रम आवश्यक, तर आत्म्याच्या भुकेसाठी संन्यासाश्रमाची गरज. दोन्हीही एकमेकांना पोषक. पण होतं काय की, घरसंसारात रमलेला माणूस त्या पलीकडे जात नाही. त्यातच तो बुडतो. त्यातच तो रमतो. अन् अखेरीला तडफडतो. अशा आसक्त प्रापंचिकांना त्यातून बाहेर काढण्याचं काम मी करीत असतो. त्यांना आपल्या जगाच्या पलीकडे एक जग आहे याची जाणीव करून देत असतो. असार मानला गेलेला संसार सारयुक्त कसा करावा हे मी सांगतो. पटवून देतो. त्यांच्या जगण्याचा अर्थ विस्तारतो. ''जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो अपुले।'' या संतवचनाच्या याच ओळीवर भर देतो.'' याशिवाय अनेक सार्वजनिक कामे तो ईश्वराची सेवा म्हणून करतांना दिसतो. त्यामुळे तो कुणाच्याही अन्नावर हक्क सांगत नाही. दिले तर ठीक! नाही दिले तरी ठीक!! अशा वृत्तीने तो आपले दैनंदिन जीवन जगत असतांना जाणवतो.

आपल्या जगण्याबरोबरच इतरांच्या जगण्याच्या करुण कहाण्याही तो पाहतो. आणि वेळप्रसंगी मदतही

करतांना दिसतो. हेच त्याच्या जगण्याचे उद्दिष्ट म्हणता येईल. शेवटी प्रत्येक जीवाच्या जगण्याचे एक उद्दिष्ट असतेच. त्याचेही हेच उद्दिष्ट मानता येईल. पुढे तो तसाच चालला जातो; पुढे कुठेतरी भरपेट अन्न मिळेल या हेतूने! चालत असतांना त्याला गर्दी दिसली. त्या ठिकाणी प्रतापशेठ नावाच्या सावकाराच्या मुलाचा वाढदिवस होता. आपल्या लौकिकाला साजेसा असा तो आपल्या मुलाचा वाढदिवस साजरा करत होता. तिथे भरपेट अन्न मिळेल या हेतून तो थांबला. परंतु त्याला कोणतीही दाद मिळेना. शेवटी कोणीतरी बँकेचे अध्यक्ष भेटण्यासाठी येणार म्हणून इथे भिकारी नकोत या हेतूने त्याला एका खरकट्याा पत्रावळीवरचा भात आणून देतात.

त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करत तो घेऊन एका झाडाखाली सावलीत जेवण्यासाठी बसणार असतो. त्याच झाडाखाली एक माणूस आपल्या मुलाला घेऊन बसलेला दिसतो. त्या माणसाचीही वेगळीच शोकांतिका असते. मुलगा तापेने फणफणलेला असतो. त्या मुलाला आई नाही. दोघांच्याही पोटात दोन दिवसांपासून अन्न नाही. मुलाला दवाखान्यात नेण्यासाठी त्या इसमाने घरातले भांडे विकले होते. ते पाहून त्या फिरस्त्या माणसाला दया आली. आपल्याला मिळालेला भात त्याने त्या मुलाला खाण्यासाठी बापाजवळ दिला व स्वतः सुरुवातीला मिळालेली करपट, अर्धवट भाजलेली पोळी खाल्ली. त्या बापानेही या माणसाला आपल्याजवळचे एक केळ खाण्यासाठी दिले. माणसाची गरिबी अथवा श्रीमंती याठिकाणी महत्त्वाची ठरत नाही तर त्याजवळची दानत आणि परोपकारी वृत्ती इथे अनुभवयाला मिळते. हा एकूणच सांस्कृतिक मूल्यांचा प्रभावही म्हणता येईल. आपल्या भोवतालचे नैतिक आणि सामाजिक आवरणही म्हणता येईल. जेणे करून समाजव्यवस्थेतील बहुतांश समाज हा व्यवस्थेची घडी याच नैतिक मूल्यांच्या जोरावर टिकवत असतो. हेच यातून निष्पन्न होते. जेवल्यानंतर तो गृहस्थ देवळाकडे झपाझपा पावले टाकत निघाला. त्या देवळातील दीपमाळेच्या पायथ्याशी त्याला एक महारोगी म्हातारी दिसली. त्यानेही तिच्याकडे पाहिले.

ती म्हणाली, ''महाराज, मी तुमच्या देवळात आली नाही. पायरीवरसुद्धा थांबले नाही. मला माहीत आहे. लोक मला हाकलून देतात. दगड मारतात. शिव्याही देतात. म्हणून मी इथंच थांबले. या उन्हामुळं तोंडाला कोरड पडलीया. घोटभर पाणी द्याल तर उपकार होती माझ्यावर'' त्यानंतर त्याने त्या म्हातारीला आपल्याला मिळालेला भात दिला. तिनं तो आधाशासारखा खाल्ला. तोही मनापासून तृप्त झाला. आपल्याला मिळालेल्या अन्नामुळे आज कोणाचीतरी भूक भागली. याचे त्याला मनस्वी समाधान लाभले. धर्मशास्त्रामध्ये अन्नदान हे पवित्र दान म्हणून ओळखले जाते. आज त्याच्या हातून दोन वेळेस हे पवित्र दान घडले होते. एकूण नीतिकथा म्हणून या कथेकडे पाहता येते. कोणीतरी आपल्याला देत असतो म्हणून आपणही कोणालातरी देत असतो. परोपकाराची वृत्ती हाही एक सामाजिक संस्कारच असतो. तोही सहवासातूनच होत असतो. भूतदया, सहृदयता, कनवाळूपणा हा माणसामध्ये येणे, हीदेखील नैसर्गिक बाब म्हणावी लागते. याचा अनुभव या कथेतून मिळतो. माणूस कमावता असला पाहिजे असे नाही तर माणूस सज्जन, परोपराकारी आणि समाजाची नैतिक घडी अबाधित ठेवणारा असला पाहिजे. हीच खरी श्रीमंती आहे, हे सांगणारी ही कथा आहे.

## १.३.१२ सारांश :

'आटपाटनगरीच्या कथा' अभ्यासल्यानंतर असे लक्षात येते की, या कथांची रचना ही लोककथेच्या रचनापद्धतीशी मिळतीजुळती असली तरी त्यातील आशय आणि मूल्यविचार हा शाश्वत, जीवनोपयोगी आणि आधुनिक समाजव्यवस्थेच्या निर्मितिसंदर्भात आहे. या कथासंग्रहातील सर्वच कथांच्या मुळाशी नीतिव्यवहार, बोध, उद्बोध दडलेला आहे. त्यामुळे प्रत्येक कथेच्या शेवटी वाचकाच्या हाती समाजव्यवहार येतो. समाजामध्ये असलेल्या भिन्न भिन्न प्रकारच्या प्रवृत्तींच्या माणसांची ओळख होते. स्वार्थासाठी माणसं एकमेकांना कसे फसवतात, एकमेकांचा वापर कशा पद्धतीने करून घेतात, हे अनुभवता येते. सैनिक, ब्राह्मण पुजाऱ्याकडून होणारी म्हातारीची लूट हे समाजातील अज्ञानी समूहाच्या लूटीचं प्रातिनिधिक दर्शन आहे. तर दुसरीकडे 'अन्नदान' सारख्या कथेमधून दरिद्री असणारा माणूसही कुष्ठरोगी स्त्रीला खरकट्याा पत्रावळीवरील अन्न देऊन जगवतो. ही परोपकारी वृत्ती आहे.

अशा प्रकारे समाजातील विसंगत वर्तणुकीची नोंदही लेखकाने आपल्या कथांमधून घेतलेली आहे. कथासंग्रहातील कथा या लोककथांसारख्या वाटत असल्यातरी यातून चित्रित केलेला समाज हा शोषित स्वरूपाचा आहे. प्रामुख्याने हे शोषित शेतकरी आणि आदिवासी आहेत; परंतु त्यांच्या प्रामाणिकपणाची विश्वासार्हता दर्शवणाऱ्या या कथा आहेत. जंगलातल्या आदिवासींसाठी राजाचा रत्नहार कवडीमोल आहे; तर नगरातला एखादा माणूस संपत्ती मिळवण्यासाठी आपल्या वडिलांचेच खोटे मृत्युपत्र बनवण्याचा प्रयत्न करतो. एका कथेत तर शरीराच्या अवयवांची वाटेल ती किंमत मोजण्यास माणूस तयार आहे. समाजातील स्वार्थलोलूपता, ढोंगीपणा; विशेषतः नागरी समूहजीवनातील बेडगीपणा लेखकाने आवर्जुन टिपलेला आहे. प्रेमरंजन आणि रूपश्रीच्या माध्यमातून वासना आणि वात्सल्याचा संघर्ष शिगेला पाहोचवलेला आहे. तर दुसरीकडे राजाश्रयाच्या माध्यमातून ब्राह्मण, साधू, पुजारी, भक्तगण हे शेतकऱ्यांची लूट कशी चालवतात, हेही दाखवले आहे. ब्राह्मणांसाठी धर्मग्रंथांचे ज्ञान जितके महत्त्वाचे आहे; तितकेच शेतकऱ्यासाठी शेतीचे ज्ञान महत्त्वाचे आहे. ते ऋतूंशी संबंधित असते. ते पोथीनिष्ठ ज्ञान नसून प्रायोगिक स्वरूपाचे ज्ञान आहे. हे एक शेतकऱ्याचा मुलगा राजा आणि प्रधानाला कलिंगडशेतीच्या माध्यमातून सांगतांना दिसतो.

एकूणच कथासंग्रहाचा विचार करता 'आटपाटनगरीच्या कथा' या माणसाला नैतिकमार्गावर चालण्याचा संस्कार प्रदान करतात, असे म्हणता येईल.

## १.४ पारिभाषिक शब्दार्थ :

**१. कथा :** विविध घटनाप्रसंगाची निवेदनप्रधान सुसूत्र रचना असणारे कथानक; ज्याला आदि, मध्य आणि अंत असतो, त्यास कथा म्हणतात.

**२. लोककथा :** ज्यांना कुणी एक कर्ता नसतो अशी मौखिक परंपरेने चालत आलेली गद्य गोष्ट म्हणजे लोककथा होय.

३. **कहाणी :** व्रतकथा.

४. **आटपाटनगर :** कोणतेतरी निनावी; रहदारीचे गाव/ आठ पेठा असलेले मोठे शहर/ बाजाराचे आठ चौक असलेले शहर/ आठ मोठे राजरस्ते असलेले गाव.

५. **काळा बाजार :** चोरीच्या सामानाची खरेदी-विक्री करावयाची पेठ.

६. **ब्रह्मवृंद :** ब्राह्मणांचा समूह.

७. **कुर्निसात :** जोहार करणे.

८. **दासी :** सेविका.

९. **भीकबाळी :** कानाच्या वरच्या भागात घालावायाचा दागिना.

१०. **कुलपती :** विद्यापीठाचा प्रमुख.

११. **आमुनं :** बी रुजवण्यासाठी तयार केलेली ओल्या मातीची गादी.

१२. **पदन्यास :** पावलांची लयबद्ध चाल.

१३. **रंगमंच :** नाटक सादर करावयाची जागा.

१४. **व्यभिचार :** नीतिबाह्य किंवा अनैतिक वर्तन.

१५. **मूर्च्छा :** भोवळ.

१६. **मिष्टान्न :** गोड अन्न.

१७. **मुक्रर होणे :** निश्चित होणे.

१८. **चर्मासन :** प्राण्याच्या चामड्याचं आसन.

१९. **तिरकमठा :** धनुष्यबाण.

२०. **मुदपाकखाना :** स्वयंपाकघर/भटारखाना.

२१. **संन्यासाश्रम :** हिंदुधर्मव्यवस्थेतील चार आश्रमांपैकी एक.

## १.५ स्वाध्याय :

**(अ) योग्य पर्याय निवडा.**

१. आठ पेठांचं नगर असूनसुद्धा नगरात कोणत्या लोकांची स्वतंत्र पेठ नव्हती?

अ) व्यापारी ब) सैनिक क) शेतकरी ड) सेनापती

२. जंगलात राहाण्याच्या शिक्षेचा प्रसंग कोणत्या कथेत चित्रित करण्यात आला आहे?

अ) राज चक्रमसेन महाराजांचा दरबार ब) एका सोमवारची कहाणी

क) अन्नदान ड) कुणा एकाचे मरण

३. ब्राह्मणाच्या पूजाविधीसाठी राजा शेतकऱ्यांना आपापल्या शेतात कोणती झाडं लावण्यास सांगतो?
अ) तुळशीची ब) औदुंबराची क) पिंपळाची ड) वडाची

४. राजकन्येच्या स्वयंवरात राजकन्येच्यावतीने उपवर मुलांना कोण प्रश्न विचारतो?
अ) राजकन्येची दासी ब) राजकन्येची सावत्र आई क) पुरोहित ड) प्रधान

५. 'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी' या कथेतील राजा आणि प्रधान कोणते फळ तोडून सोबत घेतात?
अ) सफरचंद ब) कलिंगड क) जांभुळ ड) बोरं

६. 'राजा प्रेमरंजन आणि नर्तिका' या कथेतील नर्तिकेचे नाव काय आहे?
अ) श्रेया ब) रूपश्री क) यशश्री ड) धनश्री

७. इंद्रवदन राजा आपल्या प्रधानाला कथेत सगळ्यात शेवटी कोणत्या ठिकाणी घेऊन जातो?
अ) स्मशानभूमी ब) मंदिरात क) मदिरालय ड) बाजारपेठ

८. 'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार' कथेतील विदूषकाचे नाव काय आहे?
अ) गजानन ब) षडानन क) पंचानन ड) शिवानंद

९. राजा वीरसेन हा राज्यारोहणानंतर विश्रांतीसाठी कोणत्या देवतेच्या मंदिरात जातो?
अ) शिव ब) विष्णू क) गणेश ड) हनुमान

१०. 'कुणा एकाचे मरण' या कथेत राजा आणि प्रधानाला रात्रीच्या वेळी भटकंती करत असताना सुरुवातीला कोण भेटतो?
अ) दारूड्या ब) भिकारी क) शेतकरी ड) आदिवासी

**उत्तरे :** १) शेतकरी २) एका सोमवारची कहाणी ३) तुळशीची ४) राजकन्येची दासी ५) कलिंगड ६) रूपश्री ७) स्मशानभूमी ८) पंचानन ९) विष्णू १०) दारूड्या

**(ब) दीर्घोत्तरी प्रश्न :**

१. 'आटपाटनगरीच्या कथा' या कथासंग्रहाची आशयसूत्रे विशद करा.
२. 'आटपाटनगरीच्या कथा' या समाजव्यवस्थेतील शोषितवर्गाच्या प्रतिनिधित्व करणाऱ्या कथा आहेत, या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.
३. 'आटपाटनगरीच्या कथा' या कथासंग्रहातून शेतकऱ्याचे अनन्य साधारण महत्त्व कशा पद्धतीने लेखकाने चित्रित केले आहे, ते सोदाहरण विशद करा.
४. 'आटपाटनगरीच्या कथां' मधून आदिवासी समाजाचा प्रामाणिकपणा कशा प्रकारे चित्रित केला आहे, ते सोदाहरण विशद करा.

५. नीतिकथांतील मूल्यव्यवस्था 'आटपाटनगरीच्या कथां' मधून कशाप्रकारे अनुभवास येते, ते कथांच्या आधारे सविस्तपणे लिहा.

६. लोककथांचा रूपबंध 'आटपाटनगरीच्या कथां'नी लिलया पेललेला आहे, हे विधान साधार विवेचन करा.

७. निसर्गाचे वैविध्यपूर्ण दर्शन 'एका सोमवारची कहाणी' या कथेतून कसे अनुभवास येते, ते सविस्तर वर्णन करा.

८. कला आणि वासना यांच्यातील संघर्षाचे प्रतिबिंब 'राजा प्रेमरंजन आणि नर्तिका' या कथेमधून कसे चित्रित झालेले आहे, ते सविस्तरपणे लिहा.

९. 'आटपाटनगरीच्या कथा' मधून दिसून येणाऱ्या विविध राजांचे स्वभावचित्र रेखाटा.

१०. समकालीन मराठी कथेच्या तुलनेत 'आटपाटनगरीच्या कथा' तील कथांचे वेगळेपण विशद करा.

## १.६ संदर्भ ग्रंथ सूची :


| | | |
|---|---|---|
| १) भोसले द.ता. | : | आटपाटनगरीच्या कथा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. (२०१५). |
| २) हातकणंगलेकर म.द. | : | मराठी कथा : रूप आणि परिसर, सुपर्ण प्रकाशन, पुणे. (१९८६) |
| ३) कदम महेंद्र | : | 'आटपाटनगरीची सामान्य तत्त्वे' हा लेख, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे, जुलै-सप्टेंबर. (२०१७) |
| ४) जवंजाळ सुनील | : | जगण्याला श्रीमंत करणाऱ्या विचारांची संपत्ती म्हणजे आटपाटनगरीच्या कथा, दैनिक एकमत, ७ फेब्रुवारी २०१६ |


## १.७ अधिक वाचन :


| | | |
|---|---|---|
| १) टापरे पंडित | : | कथा - रूप आणि आस्वाद, नीहारा प्रकाशन, पुणे. |
| २) जाधव रा.ग. | : | मराठीतील कथारूपे, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे. (१९९९) |
| ३) जोशी सुधा | : | कथा - संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन, मुंबई. |


## १.८ उपक्रम :

१. द.ता.भोसले यांच्या इतर साहित्याचे वाचन करणे.

२. आपल्या परिसरातील लोककथांचे संकलन करणे.

घटक २

# मिथकातून उलगडणारे समकालीन वास्तव

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ मिथक म्हणजे काय?

२.२.२ साहित्यिक मिथकांचे संदर्भ

२.२.३ मिथकातून उलगडणारे समकालीन वास्तव

२.२.३.१ नैतिक तत्त्वे व मानवी मूल्यांचे वास्तव चित्रण

२.२.३.२ प्रशासनातील गैरव्यवहार

२.२.३.३ स्त्रीजीवनाचे वास्तव चित्रण

२.२.३.४ देव–धर्माच्या नावाखाली चाललेला गैरव्यवहार

२.२.३.५ शेतकरी व आदिवासींचे जीवन

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्दार्थ

२.५ स्वाध्याय

२.६ संदर्भ ग्रंथ सूची

## २.० उद्दिष्ट्ये :

आटपाटनगरीच्या कथा'' या संग्रहातील कथा हया मिथक कथारूपातून आविष्कृत झालेल्या आहेत. तरी या कथा वर्तमानाला कशा पद्धतीने भिडतात याचे याचा विचार इथे महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे प्रस्तुत घटकांतर्गत आपण पुढील उद्‌दिष्ट्ये साध्य करू शकतो.

१) मिथक कथा म्हणजे काय याची ओळख करून घेणे.

२) या कथासंग्रहातून कोणकोणती मिथके आलेली आहेत त्याचा विचार करणे.

३) तसेच कथासंग्रहातून येणाऱ्या मिथकांचे समकालीन वास्तवतेशी असणारा संबंध तपासून बघणे.

४) समकालीन वर्तमान मिथक रूपाने व्यक्त होत असताना कथार्थ लक्षात घेणे.

## २.१ प्रस्तावना :

मानवी जीवनानुभव व्यक्त करणारा प्राचीन, आदिम प्रकार म्हणजे कथा होय. मानवाच्या आदिम काळापासून या कथेचे रूप हे मौखिक होते. त्यालाच 'गोष्ट' असे नामाभिदान दिले गेले. या गोष्टीचा समावेश लोककथेमध्ये झाला. आणि आधुनिक युगात ती लिखित रूपातील कथा म्हणून ओळखली जाऊ लागली. कथेचा हा प्रवास पाहिला असता गोष्टीवेल्हाळपणा हा मानवी स्वभावाचा एक विशेष मानला गेला. यातील मौखिकतेची परंपरा अज्ञात अशा काळापासूनची आहे. पण कथेचा प्रारंभ हा लिखित कालखंडाच्या प्रारंभापासून सांगता येतो. अव्वल इंग्रजी कालखंडाच्या प्रभावाने आणि साहित्यप्रकाराची संकल्पना अस्तित्वात आल्यानंतर कथा या साहित्यप्रकाराची वेगळया पद्धतीने दखल घेतली जाऊ लागली. या कथेतून मांडल्या गेलेल्या मानवी जगण्याला, त्यातील आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगांचा विचार विशेषतेने घेतला जाऊ लागला.

१९६० या काळात साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले. ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी इ. या सर्व प्रवाहांनी आपआपल्या जीवनजाणिवा विविधांगानी व्यक्त केल्या. कथा या साहित्यप्रकारातून या जीवनजाणिवाही अधिकतेने प्रकट झाल्या. या काळात लिहित्या झालेल्या अनेक लेखकांपैकी द.ता.भोसले हे एक महत्त्वाचे लेखक. दशरत तायाप्पा भोसले असे त्यांचे पूर्ण नाव. त्यांनी कथा, कादंबरी, ललित, समीक्षा असे विविध प्रकारचे लेखन केले आहे. त्यांच्या नावावर दोन कादंबऱ्या, सात कथासंग्रह, लोकसंस्कृतीवरील पाच ग्रंथ प्रकाशित आहेत. लोकसंस्कृतीचा अभ्यास करताना हाती आलेली मानवी मूल्ये आणि आधुनिक मानवी जगणे यांचा परस्पर संबंध जोडण्याचा लेखनप्रपंच लेखकाने या कथासंग्रहातून मांडला आहे. म्हणून मानवाचे आधुनिक जीवन जुन्या मिथकीय जीवनशैलीतून मांडण्याचा आगळावेगळा प्रयोग लेखकाने इथे केला आहे.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ मिथक म्हणजे काय?

'आटपाटनगरीच्या कथा' हा डॉ.द.ता.भोसले यांचा कथासंग्रह आहे. या कथासंग्रहात एकूण अकरा कथा समाविष्ट असून कथेचा रचनाबंध हा लोककथेतील मिथक कथांच्या रूपातून साकारलेला आहे. मुळातच

लोककथांची निर्मिती ही मानवाची आदिम काळापासूनची निर्मिती आहे. तसेच त्या निर्मितीमागील कारणेही बहुविध आहेत. त्यातील एक मुख्य कारण हे मनोरंजन आहे. पण त्यासोबतच निसर्गात घडणाऱ्या अद्‌भूत, चमत्कारिक घटनांचे विश्लेषण करण्यासाठी मानवाने मिथकांचा वापर केला. तसेच मानवी नातेसंबंधांचे चित्रण प्राचीन आदिबंधाच्या आधाराने केले. या सर्वाच्या तळाशी कुतुहलपूर्ती असते. म्हणजे विशिष्ट घटनेबद्‌दलची, व्यक्तीबद्‌दलची कुतूहलपूर्ती अशा प्रकारच्या कथारचनेतून साध्य होत असते.

'मिथ' हा मूळ इंग्रजी शब्द आहे. त्यालाच मराठीमध्ये मिथक किंवा प्राक्कथा असे म्हणतात. मिथ म्हणजे खोटे किंवा पूर्ण कल्पनेवर आधारलेले. निसर्गाची भव्यता, त्यात भरून राहिलेले अद्‌भूततेचे, चमत्कारिकतेचे विश्व आणि त्याबद्‌दल मानवी मनातील असणारे समज व्यक्त करणाऱ्यासाठी अशा मिथकांचा वापर केला जातो. मानवाच्या मनातील हे समज प्राचीन असतात. ते केव्हा निर्माण झाले हे सांगता येत नाही. तसेच त्याचे पुरावे कोणत्याही स्वरूपात उपलब्ध नसतात. त्यामुळे मिथके ही काल्पनिक, खोटी आणि रचलेली असतात असा दावा अनेक अभ्यासक करतात. परंतु अशा मिथकांचे उल्लेख प्राचीन ग्रंथातून झाल्यामुळे त्यांना धर्माचे व श्रद्धेचे आश्रय मिळाले. त्यामुळे ते एकप्रकारे धर्मव्यवस्थेचा एक भाग बनत गेले. उदा.सत्यवान सावित्री, राम-सीता-लक्ष्मणाची कहाणी, नारद, विष्णू, दत्तात्रेय, नृसिंहावतार, वामन, विष्णूचे दहा अवतार अशी अनेक उदाहरणे आपल्याला सांगता येतील. हया सर्व व्यक्ती, स्थल, प्रदेश तिथले महात्म्य या सर्व गोष्टी प्राचीन ग्रंथामधून समाविष्ट आहेत. त्यासोबतच मराठीत लेखनबद्ध नसलेल्या मौखिकतेने पुढे आलेल्या अनेक गोष्टींमध्येही अशी मिथके जतन केलेली आहेत. उदा.आटपाट नगर, कावळा चिमणीची गोष्ट, पिंगळा पक्षाला माणसाचे भविष्य माहीत असणे, शाप-उःशाप, जन्म-मृत्यू, पूनःर्जन्म, स्वप्न, विशिष्ट गोष्टीत माणसाचा जीव असणे इ. ही सर्व मिथके प्राचीन-अज्ञात अशा काळात जन्माला आली असली तरी वर्तमानकाळात आणि भविष्यातही अशा मिथकांचा उपयोग माणूस त्याचे जीवन जगताना करत असतो. त्यामुळे मिथके यांचा संबंध भूत आणि वर्तमानाशी-भविष्यकाळाशी जोडलेला असतो. त्यामुळे साहित्यिक वर्तमानातील संवेदना भूतकालीन मिथकांच्या आधाराने अभिव्यक्त करून कलाकृतीला सौंदर्यात्मक, अर्थदृष्टया बहुस्तरीय बनवत असतात. प्रस्तुत कथासंग्रहातील सर्वच कथा या मिथक कथा आहेत. वर्तमानातील मानवी जगणे भूतकालीन आटपाटनगरीच्या लोकजीवनाच्या आधारे मांडले आहे.

### २.२.२ साहित्यिक मिथकांचे संदर्भ :

मानवी समूहामध्ये अनेक प्राचीन समज असतात. उदा. 'काळा रंग' हा अशुभाचे सूचन करणारा असतो, हिरवा रंग भरभराटीचे, पालीचे चुकचुकणे अशुभ असते इ. अशा अनेक समजांना लेखक आपल्या साहित्यकृतीतून नव्याने उजाळा देत असतो. साहित्य हे मानवी जगण्याचे प्रतिबिंब असल्याने मानवी मनाचे साकार रूपच साहित्यातून उमटत असते. त्यामुळे विशिष्ट एखाद्या घटनेविषयी, प्राण्याविषयी, स्थलाविषयी मानवाच्या मनात ज्या भावना असतात ते त्या आदिम काळापासूनच्या असतात. या भावनांसहित लेखक अशा व्यक्तिनामांचा, स्थलांचा किंवा प्राण्यांचा उच्चार एका नव्या अर्थाच्या चित्रणासाठी साहित्यातून करत असतो. जसे की एखाद्या ठिकाणी ठरावीक वेळी जाणे वाईट असते. कावळा घरावर बसून ओरडला असता घरी पाहुणा येतो किंवा

रामाचे, सीतेचे किंवा रावणाचे नाव किंवा शंकराचा तिसरा डोळा उघडणे या सर्वांचा अर्थ आदिम असतो. या सर्वच गोष्टीमध्ये असलेला अर्थ सर्वज्ञात असतो. वास्तवातील घटनांचे असे अर्थ वेगळया पद्धतीने मांडण्यासाठी लेखक साहित्यातून अशा मिथकांचा वापर करत असतो.

**कथासंग्रहातून येणारी मिथके :**

''आटपाटनगरीच्या कथा'' हा संपूर्ण संग्रह मिथककथांचा संग्रह आहे. आटपाटनगर हेच मुळात एक मिथक आहे. आणि तिथे घडणाऱ्या घटना हयाही मिथकांवर म्हणजेच कल्पनेवर आधारलेल्या आहे. उदा. असामान्याला सामान्याच्या पातळीवर आणणारे प्रसंग कथेतून वर्णिले आहेत. उदा.''कदाचित भीत भीत आपला देवच सांगेल की, त्याच्या नावावर पुरोहितानं रेशनकार्ड काढूनही तो कधी देवाला भाताचा नैवेद्य देत नाही.'' (पृ.८५) देवाचे रेशनकार्ड असण्याची कल्पना ही वेगळी आहे. देवाजवळचे दैवी शक्तीला अमान्य करून सर्वसामान्यासारखे देवाला रेशनकार्डवर धान्य, वस्तू मिळवण्याची वेळ आल्याचे सूचन यातून होते. जो जगाचे कल्याण करतो तो देव अशी मानली गेलेली कल्पना पोकळ ठरून देवही स्वतःच्या पोटासाठी रेशनकार्ड काढतो ही गोष्ट कल्पकतेने इथे योजिलेली आहे. कथांतून प्रतीत होणारे वास्तव वर्तमानकाळाचे सूचन करणारे आहे. पण ते वास्तव मिथकांद्वारे व्यक्त होते आहे. या मिथकातून सूचित होणाऱ्या वास्तवांचा शोध आपल्याला इथे घ्यावयाचा आहे. कथांमध्ये वापरलेली काही महत्त्वाच्या मिथकांचा विचार आपण सुरूवातीस करू. त्यानंतर संपूर्ण मिथककथेतून मांडलेल्या समकालीन वास्तवतेचा विचार करू.

**आटपाटनगर :**

'आटपाटनगर' ही मराठी कोशामध्ये स्पष्ट केलेली संकल्पना ही पुढीलप्रमाणे आहे. कोणतेतरी रहदारीचे निनावी गाव म्हणजे आटपाट नगर होय. आठ पेठा एकत्र असलेले किंवा बाजाराचे आठ चौक एकत्र असलेले शहर, किंवा आठ मोठे हमरस्ते एकत्र असलेले गाव म्हणजे आटपाट नगर होय. हे गाव म्हणजे एक काल्पनिक गाव, शहर आहे. ते इतिहासात किंवा वर्तमानाच्या कोणत्याही नकाशात त्याचे अस्तित्व नाही. कल्पनेवर आधारलेल्या या नगरीत घडणाऱ्या घटनांही कल्पकतेने रचलेल्या असतात. अनेक प्राचीन कथा, पुराणकथा किंवा दैवतकथांमध्ये या नगरीचे नाव पहिल्यांदाच येते. मग तिथल्या राज्याचे, प्रजेचे आणि तिथल्या दैनंदिनीचे चित्रण होते. त्यामुळे आटपाट नगरात घडणाऱ्या सर्वच घटनांचा मिथकांचा, कल्पकतेचा संदर्भ आहे. पण प्रस्तुत संग्रहातून या कल्पित जगात घटनाऱ्या घटनांतील सत्य हे वास्तव मानवी जीवनाशी जोडले गेलेले आहे.

**स्वर्ग-नरक :**

माणसाच्या आदिम काळापासून स्वर्ग आणि नरक या संकल्पना चांगल्या आणि वाईट या दोन गोष्टीच्या सूचनासाठी येतात. यातील स्वर्ग हे सौंदर्याचे, चांगल्या गोष्टीचे, समृद्धीचे, सुख-संपन्नतेचे वर्णन करणारे आहे. तर नरक ही संकल्पना त्याच्या अगदी विरोधातील आहे. देवांचे, चांगले वर्तन करणाऱ्या, शक्तिमान व सौंदर्यसंपन्न देवतांचे वास्तव्य हे स्वर्गनगरीत आहे. तर वाईट गोष्टींचे, दुष्टतेचे, कुरूपतेचे व दुष्कृत्य करणाऱ्या वृत्तीचे प्रतीक म्हणून नरक ही संकल्पना अस्तित्वात आली. वेदांमध्ये स्वर्गलोकाची कल्पना आढळते. स्वर्ग हे देवांचे, पुण्यवंतांचे निवासस्थान असून तेथे केवळ आनंदच नांदत असल्याचे सांगितले जाते. मानवी

स्वभावातील कोणत्याही गोष्टीची तुलना करताना या दोन संकल्पनांमध्ये समाविष्ट असणाऱ्या गोष्टीशी करण्याची एक परंपरा आपल्या लोकमानसात वसत असते.

**अप्सरा :**

'राजा प्रेमरंजन आणि नर्तिका' कथेतील नर्तिका ही अप्सरेचे लावण्य असणारी व स्वर्गीय सौंदर्याचे आरस्पानी प्रतीक असणारी होती. यातील अप्सरा आणि स्वर्गीय सौंदर्य ही मिथके इथे वापरलेली आहेत. स्वर्गातील इंद्रसभेतील नर्तिका म्हणजे अप्सरा. जी इंद्रसभेतील देवांना व पुण्यवान पुरूषांना नृत्यगायन करून शृंगारसुख देते. स्वर्ग व नरक हे पुण्य आणि पाप, प्रकाश आणि अंधार, सुंदर आणि विकृत अशा परस्परविरोधी गोष्टीचे प्रतीक आहे. या मृत्यूनंतर प्राप्त होणाऱ्या अवस्था आहेत. पुण्य, सुंदरता, प्रकाशाचे प्रतीक असणाऱ्या स्वर्गातील सर्वच गोष्टी सुंदर आहेत. त्यामुळे तिथे असणाऱ्या सुंदर स्त्रियांची आणि त्यांच्या सौंदर्याची तुलना कशाचीच करता येत नाही. ते एकमेवाद्वितीय अशा स्वरूपाचे असते असे मानले जाते. त्यामुळे पृथ्वीवरच्या स्त्रीसौंदर्याचे कौतुक अशा स्वर्गातील अप्सरांसारखे एकमेवाद्वितीय असणे ही मिथकीय उपमा इथे योजिली आहे.

**मदन :**

'राजे वीरसेनास झालेले नवे दर्शन' कथेतील वीरसेन राजाच्या रूपाचे वर्णन हे मदनाला लाजवेल अशा स्वरूपात केले आहे. स्वर्गातील ब्रह्मदेवाच्या हृदयापासून कामदेवाचा जन्म झाला. हा कामदेव म्हणजेच मदन होय. कामदेवाच्या प्रभावाने ब्रह्मदेव व त्याची मुलगी संध्या यांच्या मनात एकमेकांविषयी कामविकास उत्पन्न झाला. यागोष्टीसाठी शंकराने ब्रह्मदेवाचा उपहास केला. त्यामुळे चिडलेल्या ब्रह्मदेवाने दिलेल्या शापामुळे कामदेव शंकराकडून जाळला गेला व अशरीरी झाला. पण पुढे ब्रह्मदेवाच्या उःशापानेच शंकर पार्वतीच्या मीलनानतर तो पुन्हा शरीरधारी झाला. पण संध्येनेही विष्णूकडून वर घेतला की कामभावना ही प्राणिमात्रांत जन्मतःच नसावी ती तारूण्यात उत्पन्न व्हावी. (संदर्भ मराठी विश्वकोश, https://vishwakosh.marathi.gov.in/26524) अशी कथा यामागे आहे. प्रस्तुत कथेत राजाचे रूप कामप्रेरणेसाठी उद्युक्त करणारे असल्याचे सूचन अशा प्रकारच्या मिथक योजनेतून लेखक करू पाहतो आहे.

**इंद्र :**

तसेच या राजाच्या राजवैभवाचे वर्णन स्वर्गातील इंद्रदेवाशी केलेली आहे. 'स्वर्गामध्ये इंद्रदेव आणि भूतलावर वीरसेन' अशा शब्दात केलेली आहे. स्वर्ग ही मुळातच दुःखाचा लवलेशही नसलेले व सर्वप्रकारची सुख-समृद्धीची कोणतीही उणीव नसलेले ठिकाण म्हणजे स्वर्ग. आणि या स्वर्गाचा अधिपती-राजा म्हणजे इंद्रदेव होय. वैदिक देवतांमधील इंद्र हा मुख्य देव असून तो वैदिक भारतातील सर्वश्रेष्ठ व प्रमुख राष्ट्रीय देव आहे. इंद्र हा युद्धदेव असून तो विश्वातील राक्षसी शक्तीशी निरंतरपणे लढून त्यांचा नायनाट करत असतो. त्याला चांगल्या पद्धतीचे युद्धशास्त्र माहीत आहे. बलशाली असून सर्व पृथ्वी व इतर लोकांवर त्याने विजय मिळविल्याचे पराक्रम त्याच्या नावावर आहे. माणसाच्या तुलनेत अशा स्वरूपाची समृद्धी पृथ्वीतलावर कुठे दिसली की त्याची तुलना या उपमेयाशी होताना दिसते. प्रस्तुतच्या कथेतही वीरसेन राजाच्या या त्याच्याकडे

असलेल्या शौर्याचे आणि राजवैभवाचे हेच गुणविशेष नोंदविण्यासाठी स्वर्गातील इंद्रदेव हे मिथक उपमा म्हणून वापरलेले आहे.

**मृत्युंजयस्त्रोत :**

तसेच 'कुणा एकाचे मरण' या कथेमध्ये यमदूताचा उल्लेख येतो. कथेतील सावकार मरणासन्न अवस्थेत आहे. तो वाचावा म्हणून गीता किंवा मृत्युंजयस्तोत्राचे पठण केले जात आहे. यामागे एक मिथकीय भावना अशी आहे की अशा ग्रंथाचे पठण केले असता यमदूत घाबरून तिथून निघून जातो. गीता किंवा मृत्युंजयस्तोत्र हे दोन्ही ग्रंथांबाबत असणारी ही भावनाही मिथकीय स्वरूपाची आहे. हे दोन्ही ग्रंथ धर्माशी निगडित असल्याने त्या ग्रंथाबाबतचा आदर सर्वसामान्यांत निर्माण व्हावा यासाठी रचलेले हे एक कथन आहे. त्याची सत्यता पडताळून पाहता येत नसली तरी पूर्वजांनी सांगितलेले हे कथन पुढची पिढी मान्य करते. आणि अशा ग्रंथाचे पठण त्यांना सांगण्यात आलेल्या धार्मिक आस्थेपोटी केले जाते. तसेच माणूस मेल्यानंतर एक तर त्याच्या पुण्याईने स्वर्गात जातो किंवा त्याने अधिक पाप केले असेल तर तो नरकात जातो. हेही एक मिथक आहे.

**यमदूत :**

यातील दुसरे मिथक म्हणजे यमदूत. यम हा हिंदू पुराणकथांमधील मृत्यूदेवता. ज्याचा मृत्यू जवळ आला आहे त्याच्या पापपुण्याचा हिशोब चित्रगुप्त सांगतो. यम देवता या हिशोबानुसार त्या व्यक्तीबाबत कठोर न्यायदान देते. अशा यमाच्या आदेशानुसार ज्याचा जीव हरण करायचा आहे त्यासाठी यमाचे दूर जातात व तो हरण करतात. (https://Vishwakosh.marathi.gov.in/30739/) अशा यमदूताला केवळ अशा धर्मग्रंथाच्या पठणाने भीती घालता येते हे एक मिथक सर्वसामान्यांमध्ये रूढ आहे. त्याचाच उल्लेख या कथेतून होताना दिसतो.

**शंकराचा तिसरा डोळा (पृ.३०) :**

सृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या शंकराचा तिसरा डोळा उघडणे म्हणजे सर्व सृष्टीचा विनाश अटळ असल्याचे मानले जाते. शंकराची दृष्टी व त्याची शक्ती ही त्रिकालाबाधित आहे. त्याच्या कोपालाही सीमा नाही. जर मानवाच्या कोणत्याही कारणाने शंकर कोपला तर त्याचा तिसरा डोळा उघडेल आणि सर्व मानवजातीला भयंकर दुष्काळाला सामोरे जावे लागेल. मानवाचे हाल हाल होऊन त्याचा संपूर्ण विनाश होईल अशी एक भीती सर्वांच्या मनात असते. यासंबंधीचे मिथक प्राचीन पुराणांमध्येही आहे. शंकर हा एक रूद्रावतार आहे. महादेव, महेश, शंकर, शिव अशी त्याची नावे सांगितली जातात. याला संहाराची देवता मानले जाते. सर्व देवतांमध्ये तीन डोळे असलेली ही एकमेव देवता आहे. भोळा शंकर अशी त्याची प्रतिमा असली तरी राग आल्यानंतर तो तिसरा डोळा उघडून सर्व भस्म करण्याची शक्तीही त्याच्याकडे आहे. त्याला कुठेही काहीही अनिष्ट, विकृत घडते आहे असे वाटते तेव्हा त्याचा विनाश स्वतःचा तिसरा डोळा उघडून तो करू शकतो.

### २.२.३ मिथकातून उलगडणारे समकालीन वास्तव :

याआधी पाहिल्याप्रमाणे मिथक म्हणजे एक खोटी कल्पना होय. साहित्यामध्ये अशा मिथकांच्या आधाराने वास्तव रेखाटले जाते. लोककथेतील दैवतकथा किंवा पुराणकथा या मिथक कथा आहे. म्हणजे त्या

कल्पनेने रचलेल्या आहेत. पण तरीही त्यातून शाश्वत अशा सत्याचा, नैतिक तत्त्वांचा उल्लेख होताना दिसतो. उदा. शंकराचा तिसरा डोळा उघडणे. या मिथकामध्ये कोणत्याही वाईट गोष्टीचा अतिरेक झाला की त्याचा नाश अटळ आहे हे एक शाश्वत सत्य किंवा नैतिक तत्त्व मांडलेले आहे. ते सार्वत्रिक व सार्वकालिक आहे. या तत्त्वाला सांगणारे हे एक मिथक आहे. वर्तमान काळात घडणाऱ्या वाईट घटना कुठेतरी थांबल्या पाहिजेत किंवा त्यांचा नाश झाला पाहिजे ही एक जनसामान्यांची भावना असते. हेच एखादा लेखक आपल्या साहित्यकृतीतून विशिष्ट पद्धतीने मांडत असेल तेव्हा तो अशा घटनांच्या सूचनासाठी अशा मिथकांचा अवलंब करत असतो. कथेचे कथानक जरी कल्पनेवर आधारलेले असले तरी त्यातील व्यक्तींची जीवनमूल्ये ही वास्तवातीलच असतात. माणसां-माणसांतील नातेसंबंध, हेवेदावे, प्रेम, असूया या सर्वच गोष्टी वास्तव मानवी जगण्यातीलच असतात. प्रस्तुत कथासंग्रहात लेखकाने हा एक धागा पकडला आहे. व त्यातून कल्पित अशा मिथकांच्या आधारे समकालीन मानवी वास्तवचित्रण केले आहे. मिथकांतून मांडलेल्या समकालीन वास्तवाची मांडणी पुढील मुद्दयांच्या आधारे करता येते.

### ३.२.३.१ नैतिक तत्त्वे व मानवी मूल्यांचे वास्तवचित्रण

प्रस्तुत संग्रहातील सर्वच कथांमधून मानवी मूल्यांचे आणि त्याच्या संस्काराचा भाग असणाऱ्या नैतिक मूल्यांची उजळणी होताना दिसते. या सर्व गोष्टी मानवी विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या असल्या तरी स्वार्थापायी माणूस त्या विसरून जातो. पण असे केल्याने मानवी जीवनाचे मोल कसे क्षुल्लक होते आहे याचे चित्रण या कथांतून होते. वर्तमानकाळातील मानवाचे जगणे हे अशाच प्रकारचे आहे. त्याच्या आचरणात अशी मानवी मूल्ये अजिबात आत्मसात केली जात नाही. हे वास्तव मांडण्यासाठी लेखक मिथकांचा आधार घेऊन त्याची मांडणी करताना दिसतो. पुढील मानवी मूल्यांचा होणारा ऱ्हास लेखकाने अधोरेखित केला आहे.

**बाप मुलाच्या नात्यातील वाढता वैरभाव-मृत्यूचे मोल :**

'इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका' या कथेमध्ये आपल्याच बापाची हत्या करण्याचे मनसुबे बांधणारा इंद्रवदन राजाच्या परिसरातील एक तरूण येतो. आपला बाप आपल्याला हवे तसे पैसे देत नाही त्यामुळे आपल्याला कष्ट करावे लागतात. व तो स्वतः चैनीचे जीवन जगतो हे सहन न होणारा तरूण आपल्या बापाच्या मरणाची वाट पाहतो. 'कुणा एकाचे मरण' या कथेमध्ये वेषांतर केलेल्या राजाला त्याच्या राज्यातील जनतेमध्ये एक व्यक्ती स्वार्थासाठी दुसऱ्याच्या मरणावर टपून बसल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसते. किडणी खराब झालेल्या पेशंटला वाचवण्यासाठी त्या पेशंटचे नातेवाईक दुसऱ्या एखाद्या माणसाला, भिकाऱ्यांना पकडून आणून किडनी देण्यासाठी याचना करत होते. पण रक्ताची नाती असलेल्या एकाही माणसाला त्यासाठी त्याग करावासा वाटत नव्हता. आपल्यासाठी माणसांनी मरावं, पण आपण माणसासाठी मरू नये ही वृत्ती तिथे दिसते. तसेच एक सावकार मरणाच्या दारात आहे. त्याला दोन पुत्र आहे. दोघे सावत्र भाऊ आहेत. त्यामुळे त्यातील एकाने बापाच्या मृत्यूसमयी त्याच्या नकळत मृत्यूपत्र बनवून सहया घेतल्या आहेत. का तर सारी मालमत्ता आपल्याला मिळावी. दुसऱ्याला काहीच मिळू नये म्हणून. आणि त्या मृत्यूपत्रावर साक्षीदार म्हणून पैसे देऊन भिकाऱ्याच्याही सहया घ्यायला तो तयार आहे. आणि बापाची सही झाली आहे तरी त्याने आता मेले तरी

चालेल अशी भावना त्याच्या मनात आहे. इथेही स्वार्थापोटी, लोभापोटी बापाच्या सहया घेऊन त्याच्या मरणाची वाट पाहणारा मुलगा आहे. स्वार्थ आणि मरण याची ही साखळी राजाला अनुभवायाला मिळते. याच कथेत याच गोष्टीची अनुभूती राजाला स्वतःच्या मुलाकडून मिळते. राजा मेल्यानंतर सिंहासनावर बसण्याची घाई राजपुत्राला झालेली असते. त्यासाठी आचाऱ्याकरवी अन्नात विष कालवून राजाला मारण्याची योजना राजपुत्र बनवतो. ही गोष्ट राजा स्वतःच्या कानांनी ऐकतो तेव्हा स्वार्थापायी, लोभापायी स्वस्त झालेल्या मरणाची जाणीव राजाला अधिक तीव्रतेने होते.

तसेच 'इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका' या कथेतील वेषांतर केलेल्या राजाला एक तरूण भेटतो जो आपल्या बापाच्या मरणाची इच्छा बाळगतो. कारण त्याला कष्ट करायचे नसते. शिवाय त्याच्या बापाने भरपूर संपत्ती मिळविलेली असते. या संपत्तीचा तरूणाला म्हणावा तसा उपभोग घेता येत नाही. कष्ट करावे लागतात. म्हणून त्यामध्ये अडसर असलेल्या आपल्या पित्याचाच मृत्यू व्हावा असे त्याला वाटते.

या कथांतून मरणाबाबतचे मानवाचे विचार आणि त्यातून येणारी अनुभूती ही लाजिरवाणी आहे. यातून मानवी जीवनाची क्षुद्रता लक्षात येते. प्रत्येकजण जीवनासोबत मृत्यूही सोबत आणतच असतो हे जरी सत्य असले तरी एखाद्या व्यक्तीच्या मनात स्वार्थाचे बीज रूजले गेले तर तो कुठल्याही पातळीला जाऊ शकतो, मरणापर्यंतही. ही जाणीव अस्वस्थ करणारी असली तरी ते वास्तव आहे. वर्तमानातही अशा अनेक घटना घडतात जेथे माणूस स्वार्थामुळे, स्वतःच्या हितासाठी आपल्या जीवलगांचेही मरण इच्छितात. हे जुन्या काळापासून चालत आलेले सत्य वर्तमानातही तसेच आहे. मरणाविषयीच्या माणसाच्या वेगवेगळया भावना या मिथकांतून लेखकाने मांडल्या आहेत. या कथांचा आकृतिबंध मिथकांचा असला तरी ते वास्तवाला अधिक तरलतेने मांडताना दिसतात.

**कामभावना व प्रेमभावना :**

'राजा प्रेमरंजन आणि नर्तिका' कथेतून मानवी कामभावना आणि  निखळ प्रेम यामधील तफावतीचे व त्यामागील नैतिक तत्त्वांचा विचार या कथेतून मांडलेला आहे. नर्तिकेची आई ही राजाच्या पूर्वायुष्यातील प्रेमिका. त्यावेळच्या राजाच्या मनातील कामभावनेचे चित्रण रूपश्रीची आई पुढील शब्दात करते. ''तारूण्याची धुंदी डोळयांत उतरलेली असेल, तर माकडीण सुद्धा अप्सरेसारखी भासते.''(पृ.७३) हे एक सामाजिक सत्य या विधानातून मांडलेले आहे. या दोघांच्या मिलनातून नर्तिका असणाऱ्या रूपश्रीचा जन्म झालेला आहे. पण राजा हे पूर्णतः विसरून गेलेला आहे. तो नृत्य करणाऱ्या रूपश्रीच्या प्रेमात पडतो व तिला तो आपल्याशी लग्न करण्याचा आदेश देतो. पण हे वाईट आहे याची जाणीव रूपश्रीला आहे. तेव्हा ती प्रेम आणि कामभावना यातील भेद सांगणारे नैतिक तत्त्व राजापुढे कथन करते. ''आसक्ती शरीराशी निगडित असतेय तर प्रिती मनाशी निगडित असते. वासना माणसाला अतृप्तीच्या वादळात पुन्हा पुन्हा ढकलत असते, तर प्रीती ही तृप्तीच्या शांत सरोवरात विहार करायला नेत असते. त्यासाठी पाकळी न दुखवता पाकळीवर बसणाऱ्या भ्रमराची रसिकता हवी.'' (पृ.७७) ''माणसाच्या ठायी असणारी कामभावना ही माणसाला मिळालेला शापही आहे. आणि मिळालेले वरदानही आहे. ती अतृप्तीचं दुःख देते म्हणून ती शाप वाटते, तर वंशसातत्यासाठी सर्जनाचा आनंद

देते म्हणून ती वरदान वाटते.'' (पृ.७८) ही विधाने नैतिकतेची शिकवण देणारे आहेत. राजा प्रेमरंजन हा नर्तिका रूपश्रीचा बाप आहे. त्याला या गोष्टीची माहिती नसते. पण नर्तिकेचे सौंदर्य त्याला भूरळ घालते आणि तो तिच्याशी विवाह करण्याचा प्रस्ताव तिच्याच आईसमोर ठेवतो. तेव्हा नर्तिकेची आई सत्य काय आहे ते सांगून राजाला यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करते. पण तरीही राजा अनेक तात्विक क्लृप्त्या करून तिच्याशी विवाह करण्याचा हट्ट सोडत नाही. वडिलांची मुलीविषयी वाटणारी आसक्ती ही वैचित्र्य निर्माण करणारी आहे. मानसशास्त्रामध्ये मांडलेल्या इडिपस गंडाची लौकिक जीवनातील प्रस्तुतता या कथेतून मांडलेली आहे. तसेच कामभावना आणि प्रेमभावना याची पुरेपूर समज आलेली रूपश्री यातील भेदाची जाणीव राजाला करून देते.

**दया, परोपकार वृत्ती :**

'अन्नदान' ही एक दया व परोपकार या तत्त्वांची उजळणी करणारी मिथक कथा आहे. कथेमधील जो एक 'प्रपंच म्हणजे परमार्थाच्या वाटेवरचा धोंडा' या तत्त्वाला अनुषंगुन राहणारा भिकारी. जो दिवसरात्र एक मंदिराच्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कष्ट करतो. गटार साफ करतो व भिक्षा मागून खातो. आपल्याला मिळालेल्या अर्ध्या उष्टा भात, तेलाचे बोटही न लावलेली अर्धी गाईच्या मुखातली पोळी यावर समाधान मानतो. व त्यातीलही अन्न दुसऱ्यासोबत वाटून खाण्याची परोपकारी वृत्ती बाळगतो. तर याच कथेतील एक गरीब आपले मूल उपाशी व आजारी असतानाही आपल्या भूकेला चिमटा देऊन एक केळ भिकाऱ्याला देण्याची दयाबुद्धी दाखवतो. तर 'राजा विरसेनास झालेले नवे दर्शन' कथेतील आदिवासी मुलाला राजा जेव्हा मिठाईचा पुडा देतो तेव्हा तो स्वतः खातो पण सोबत खेळणाऱ्या कुत्र्याच्या पिलालाही खाऊ घालतो. ही प्रेमभावना निखळ आहे. याउलट देवाच्या नावावर आठ दिवसातून एकदाही मिष्टान्न खायला मिळत नाही म्हणून तक्रार करणारा 'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार' कथेतील पुरोहित या दोन वेगळया प्रवृत्ती दिसतात. तुंटपुंज्या अन्नधान्य मिळवणारा शेतकरी, भिकारी, लहान मूल यांच्याकडे असणारी दयाबुद्धी, परोपकारी वृत्ती मात्र श्रीमंत लोकांमध्ये दिसत नाही. पैशासाठी रक्ताच्या नात्याचीही जाणीव माणसांना राहत नाही हा कथांमधून अधोरेखित केलेला विरोधाभास समकालीन वास्तवाला भिडणारा आहे.

निसर्गाचे जतन :

### ३.२.३.२ प्रशासनातील गैरव्यवहार :

या संग्रहातील सर्वच कथांची शीर्षके तपासली असता त्यामध्ये बहुतांश शीर्षकांमध्ये राजा व त्याच्या राज्याचा उल्लेख येतो. इंद्रसेन, इंद्रवदन, चक्रमसेन, वीरसेन, देवभूषण इ. हे राजा म्हणजे प्रशासन चालविणारे अधिपती आहेत. त्याच्या वर्तन, विचारांवर राज्याचा कारभार चालू असतो. यातील काही राजे हे स्वतःच व्यसनाधीन, विलासप्रिय आहेत. त्यामुळे त्यांची प्रजाही तशाच स्वरूपाची आहे. पण राजा हा सर्वेसर्वा असला तर राज्यात चालणाऱ्या बारीक-सारीक गोष्टींमधील गैरव्यवहार त्याला समजू शकत नाही. राजाला हे सत्य वेषांतर करून राजाचा फेरफटका मारल्यानंतरच लक्षात येते.

'आटपाटनगरची गोष्ट' कथेतील शेतकरी स्त्रीची म्हैस चोरीला गेली आहे. ती तिला शोधते आहे. पण राज्यामध्ये चाललेल्या गैरव्यवहाराचे प्रत्यंतर तिला सर्व ठिकाणी मिळते. ती म्हैस चोरीला गेली आहे हे सांगण्यासाठी राजवाडयावर जाते तर तिला राजाचा रखवालदार तिला आत सोडत नाही. याउलट तो राजाला भेटण्यापेक्षा भविष्य सांगणाऱ्या बामणाला भेटण्याचा सल्ला देतो आणि राजाला देण्यासाठी आणलेल्या पपया स्वतःसाठी काढून घेतो. ही सामान्य गरजवंत माणसाला राजापर्यंत जाऊ न देण्याची व दिशाभूल करून अंधश्रद्धेच्या आहारी घालवण्याची वृत्ती सेवकांमध्ये दिसते. ती बामणाकडे जाते तर तो तिला चुकीची माहिती देतो व सारवासारव म्हणून तिला सांगतो की, ''मी याआधी म्हशीचं भविष्य कधीच सांगितलं नाही. गोमातेचं भविष्यमान खूपदा सांगितलं आहे''(पृ.५) हे बोलून तो मंगळाला हात जोड, वक्रदृष्टी असलेल्या शनीची प्रार्थना कर, म्हसोबाला नवस बोल असे अंधश्रद्धेने दिशाभूल करून निघून जातो. तर राजाच्या जवळचा असणारा अधिकारी तिला म्हशीचे नको ते सर्व तपशील विचारून घेऊन ती पंधरा-वीस दिवसांनी मिळेल असे खोटेच सांगून तिला कटवतो. पुढे तिला सोन्याचा आणि धान्याचा व्यापारी भेटतात की जे तिला कोणत्याही पुराव्याच्या अभावी तू दुधात पाणी घालत असशील म्हणून असे झाले असल्याचे सांगतात. जो व्यापारी स्वतः स्वार्थापोटी धान्यात पोत्याने खडे घालत होता तोच तिला हे सांगत होता. तर पुढे तिच्याच गावातील एक विठोबा नावाचा गृहस्थ तिला भेटतो. जो तिची म्हैस तर आता गेली. तिचे रेडकू मेले तर ते मला दे मी त्या मेलेल्या रेडकाच्या पोटात भुसा भरून माझ्या म्हशीच्या समोर ठेवतो व त्याचे पाच-दहा रूपये तुला देतो असे बोलतो. मडयाच्या टाळूवरील लोणीही खाण्यास मागे पुढे न बघणारी माणसे या स्त्रीला दिसतात. राज्याच्या कारभारातील अधिकारी, व्यापारी, सामान्य माणसांच्या एकसारख्या स्वार्थी, लोभी प्रवृत्ती या कथेतून दिसतात. 'कुणा एकाचे मरण'याच प्रवृत्ती अनेक कथांतील व्यक्तिरेखांमध्ये दिसतात.

धान्यात भेसळ करून धान्य महागाईने धान्य विकणारा व्यापारी जसा 'आटपाटनगरची गोष्ट' या कथेत येतो. हा व्यापारी स्वतः करत असलेली भेसळ माहिती असूनही शेतकऱ्याला तो दुधात पाण्याची भेसळ करत असल्याचा आरोप करतो. तसेच 'इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका' कथेतील व्यापारीही मसाल्यात घोडयाची लीद आणि गहू, तांदळात बारीक माती व खडयांची भेसळ करणारा आहे. राज्यातील भेसळीला उत आला असतानाही प्रजेची दुःखे राजापर्यंत पोहोचत नाहीत कारण प्रशासनातील नोकरही भ्रष्ट आहेत. राजाच्या अन्नछत्रात गरजू माणसाला खाऊ घालण्याऐवजी तिथल्या प्रशासनातील मंडळी आपल्या साऱ्या नातेवाईकांना खाऊ घालण्यात मग्न आहेत. राज्यातील पुरोहित राजाकडे सर्व देवांना दुधाचा अभिषेक घालण्याचा आदेश काढायला सांगतात. सर्व शेतकऱ्यांना केवळ फुलांच्या शेती करायला लावून, घरातील मुलांनाही दूध न देता सर्व देवाच्या अभिषेकासाठी द्यावे असा आदेश काढतात. प्रशासनातील हा गैरव्यवहार स्वार्थापोटी फोफावल्याचे दिसते. चोरीचे समर्थन करणारा चोर 'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार' या कथेत येतो. त्यासाठी तो अनेक लोकांचे कष्ट हे चोरी या नावातून उल्लेखित करतो. ''जगातला प्रत्येकजण चोर आहे. तुम्ही वासराचं दूध चोरून स्वतः वापरता. तुम्ही दुधाची चोरी करता. भुंगा मधाची चोरी करतो. शेतकरी फळा-फुलांची चोरी करतो. व्यापारी शेतकऱ्यांची चोरी करतो. कारखानदार कामगारांच्या कष्टाची चोरी करतो. धंदेवाईक सरकारी करांची चोरी करतो अन् राजा तर प्रजेच्या उत्पन्नाची चोरी करतो.''(पृ.९६) तसेच देव-आणि धर्माच्या नावावर नको

त्या गोष्टींना प्राधान्य देऊन प्राथमिक गरजांना टाळले जाण्याची वृत्ती वाढलेली दिसते. राज्यकारभारात होणारा हा गैरव्यवहार वर्तमानातील गैरव्यवहारांचे थेट दर्शन घडवतो. सामान्य माणसाला त्याचे हक्क आणि अधिकारांसाठी रस्त्यावर यावे लागते. भेसळयुक्त अन्नापासून, औषधापर्यंतच्या अनेक गोष्टीचे लोकांचे आरोग्य धोक्यात येते. याचेच प्रतिकात्म चित्रण या मिथककथांतून होताना दिसते.

### ३.२.३.३ स्त्रीजीवनाचे वास्तव चित्रण :

वर्तमानकाळातील स्त्रियांच्या स्थितीचे चित्रण या संग्रहातील कथांमधून येते. यामध्ये ग्रामीण स्त्री, नृत्य करून स्वतःचा उदरनिर्वाह करणारी स्त्री, राजवाडयातील स्त्री आणि आदिवासी स्त्री अशा स्त्रीजीवनाचे चित्रण होताना दिसते. आपल्या हरवलेल्या म्हशीला शोधणाऱ्या एका ग्रामीण स्त्रीला अनेक अडचणी येतात. राजाच्या दरबारातील अधिकारी, सेवक, पुरोहित, गावातील रहिवासी हे सर्व अनेक प्रकारांनी तिची दिशाभूल करतात. 'एका सोमवारची कहाणी' राज्यकारभारावर राज्याचे लक्ष नसल्याने चोर, दरोडेखोर, गुंड मोकाट सुटले होते. भरदिवसा एखाद्या स्त्रीवर बलात्कार करण्याइतपत त्यांचे धाडस वाढले. 'एका राजकन्येचा विवाह' या कथेतील राजकन्येला तर आपला पती कोणत्याही संकटाला धैर्याने तोंड देणारा, चारित्र्यवान व माणुसकी ठायी असलेला हवा अशा माफक अपेक्षा ठेवणारी आहे. स्त्री म्हणजे केवळ उपभोगाची वस्तू अशी विचारबुद्धी ठेवून कलाउपासकांना आपली दासी बनविणारी वृत्ती 'राजा प्रेमरंजन आणि नर्तिका' या कथेत येते. ''रक्त पिण्यासाठी आसुसलेल्या वाघाच्या समोर गाळात अडकलेली शेळी काय करू शकते.'' (पृ.७६) या तिच्या संवादातून स्त्रीची हतबदलता दिसते. तर राज्यात काय घडते आहे याची आजिबात माहिती नसणारी आदिवासी स्त्री 'राजे वीरसेनास झालेले नवे दर्शन' या कथेतून येते. कथांमधून येणाऱ्या या स्त्रिया म्हणजे समकाळाचे प्रातिनिधिक चित्र आहे. स्त्रीला उपभोगाची वस्तू माणून तिच्याशी व्यवहार करण्याची वृत्ती कथांमधील पुरूषांच्या ठायी दिसते. हे समकाळाचेही वास्तव आहे. आताच्या दररोजच्या घटनांमध्ये सर्वत्र स्त्रियांवरील असे अत्याचार दिसतात. आणि हे अत्याचार स्त्रियांकडे पुरूषसत्ताकतेने पाहिल्यानेच होत राहतात.

### ३.२.३.४ देव-धर्माच्या नावाखाली चाललेला गैरव्यवहार :

देव आणि धर्माच्या नावावर चालणारा व्यापार हे तर आताच्या समाजातील मोठी बाब आहे. दया, क्षमा, शांती हे धर्माचे मूलाचार न मानता देवाच्या मूर्ती, मंदिरे मोठी करणे, वेगवेगळया देणग्या मिळविणे, अन्नान्न करणाऱ्या गरिबांपेक्षा देव-देवतांना वेगवेगळ्याा नावांनी अभिषेक घालणे, सोन्या-नाण्यांची लयलूट करणे, नको त्या विधी, क्रिया-कर्मांना प्राधान्य देणे, देवांना अर्पण केलेल्या गोष्टींना खाजगी मालमत्ता मानणे या सर्व गोष्टी जोरकसपणे चालतात. देव धर्माच्या नावांवर अंधश्रद्धा बळकट करणे, स्वतःला धर्मगुरू समजून देवाचे आपणच सर्वेसर्वा आहोत आणि इतर लोक व त्यांचे कष्ट क्षुल्लक असल्याचे सांगणे इ. हे समकालीन वास्तव या संग्रहातील अनेक कथांमधून मांडलेले दिसते.

'एका राजकन्येचा विवाह' या कथेतील राजकन्येसाठी मागणी घालणारा व्यक्ती हा महाकालेश्वर धर्मपीठाचा अधिपती आहे. जो स्वतःला ईश्वराचा पुत्र मानतो. देवाच्या कृपेने तो हवेतून अंगठी, मुठीतून अंगारा

काढू शकतो. अग्नी ओंजळीत घेऊ शकतो. पण एवढे सामर्थ्य असणाऱ्या आचार्याला मात्र तीर्थक्षेत्रात हजारो गरीब माणसं रात्री उपाशी झोपतात त्यांच्यासाठी तो अन्नाची निर्मिती करू शकत नाही. तर दुसरा जो स्वतःला धर्मभास्कर (पृ.५१) म्हणवून घेतो तो धर्मातील केवळ तत्त्वज्ञानच सांगतो. पण त्या तत्त्वज्ञानाला अनुभवाची जोड नाही. जो केवळ वाणीने, पठणाने धर्मपंडित आहे. धर्माला, श्रद्धाभावाला विकृततेने मांडणारे हे लोक स्वतःला देवाचे भक्त मानतात. ही विकृती वाचकांसमोर आणण्याचे काम या कथेतून होते.

'प्रजेच्या सुखासाठी' कथेतील शिवाच्या मंदिराचे पुरोहित हे देवासाठी राजाने महाअभिषेक करावे असे सुचवितात. असे नाही केले तर शंकराचा तिसरा डोळा उघडेल आणि राजावर ईश्वराचा कोप होईल अशी भीतीही ते घालतात. यासाठी सर्व भूमिपुत्रांना राजाज्ञा काढावी असे ते सांगतात. की ज्यामध्ये, शेतकऱ्याने कोणतेही पीक न घेता केवळ फुले आणि तुळशी लावाव्यात. शिवलिंग पूर्ण बुडेपर्यंत अभिषेक करायचा असल्याने ''एकाही लेकराला, एकाही वासराला, एकाही कोकराला आणि एकाही म्हाताऱ्याला दुधाचा एक घोटही न देता सारं दूध देवाच्या अभिषेकासाठी आणावं.'' (पृ.३०) आणि पुढे राजा असा आदेशही काढतो. हा आदेश देव-देवतांचे स्तोम माजविणारा, गरिब जनतेला दुःखाच्या खाईत लोटणारा असा आहे. शेतकऱ्याने जर धान्य पिकवले नाही तर भविष्यात भूकबळी होईल. त्याचे कुटुंब जगले नाही तर शेती पिकणार नाही. भविष्यातील हा धोका लक्षात न घेता असे अंधश्रद्धेच्या आहारी जाणारे मार्ग देवाचे ठेकेदार लोकांना सुचवितात. वर्तमानातही अशा देव आणि धर्माच्या नावावर अनेक गोष्टी चालल्याचे चित्र आपल्या नजरेसमोर येते. याच वास्तवाला अशा काही कथांतून लेखकांने कथांच्या माध्यमातून मांडले आहे.

### ३.२.३.५ शेतकरी व आदिवासींचे जीवन :

आपली भारतीय समाजव्यवस्था ही शेती या व्यवसायाशी जोडलेली आहे. दिवसभराच्या श्रमानंतर कुठेतरी मानसिक विसावा म्हणून धर्माची, देवतांची व देवालयांची निर्मिती झाली. पण काळाने या मुख्य हेतूला मागे सारले. समाधानाची जागा अधिकाधिक हव्यासाने घेतली. औद्योगिकरणाने या आत्मिक भावनेचे रूपांतर व्यापारात केले. याचे सूचन त्यांच्या अनेक कथांतून आले आहे. देवळांतील ब्राहमणांच्या वर्तनातून याचे सूचन होते. पण या सर्वामध्ये कष्टकरी शेतकरी आणि आदिवासींचे हाल होताना दिसते. या वास्तवचित्रणाला लेखकाने कथांतून मांडले आहे.

सरपणासाठी व इमारतींसाठी लाकूड हवे म्हणून जंगलातील लाकूडफाटा तोडण्याची परवानगी मागणारे 'प्रजेच्या सुखासाठी' (पृ.३२) या कथेतील मंत्रीमहोदय आहेत. याउलट जंगलातील झाडे वाचवावीत म्हणून पुरेश अन्न न मिळणारा आदिवासी राजाकडे प्रार्थना करताना दिसतो. समकाळातील अनेक आदिवासींचे मोर्चे व सामाजिक कार्यकर्त्यांचे लढे याच विषयाला हात घालणारे आहेत. गावात येणारे पाणी घरापर्यंत आणि तेही प्रत्येकाच्या वेळेनुसार किंवा दिवसभर असावे यासाठी मागणी करणारे आळशी नगरवासी दिसतात. तर वर्तमानातील पाण्याच्या प्रश्नामुळे शेतकऱ्याच्या शेतीची होणारी नासाडी हा मोठा गंभीर प्रश्न आहे. तसेच काही प्रदेश हे दुष्काळी म्हणूनही सरकार घोषित करत असते आणि लोकांना स्थलांतर करावे लागते. असे असताना शहरातून मात्र पाण्याची मुबलकता असून ते पाणी निष्काळीजीपणाने वापरले जाते. या विरोधाभासाचे चित्र

चिंताजनक आहे. एकाबाजुला स्वार्थापोटी निसर्गाची, मानवी मूल्यांची हेळसांळ करणारी वृत्ती तर दुसऱ्या बाजूला निसर्गाचे जतन करणारी व मानवी मूल्यांना जपणारी मानवतावादी संस्कृतीधारक वृत्तीचे लोक दिसतात. हया दोन्ही विचारसरणीचा संघर्ष हा प्राचीन आहे. तो आताच्या काळातही चालू आहे. त्याचीच प्रतिमा या कथांतील व्यक्तिरेखांमधून दिसते.

'राजा चक्रमसेन महाराजांचा दरबार' या कथेतील अर्धनग्न अवस्थेत असलेल्या आदिवासीला राजाचा चंद्रहार सापडल्यानंतर राजाला तो हार आणून देतो. ''पापाच्या पैशावर जगण्यासारखा गुन्हा दुसरा नाही. कष्टाचं खाण्यात मला समाधान आहे.'' (पृ.१०१) हे त्या आदिवासीच्या साध्या पण मौलिक तत्त्वज्ञानामुळे तो आपल्या राजाला त्याचा हार परत करतो. प्रामाणिकपणा हा माणसाच्या दिसण्यावर अवलंबून असत नाही तर तो त्याच्या वृत्तीवर, संस्कारांवर अवलंबून असतो याची साक्षच या आदिवासीच्या वर्तनातून मिळते. कमालीचे दारिद्र्य आणि उपासमार असली तरी चोरी, भेसळ यासारखी वैगुण्य स्वतःमध्ये न पाळणारे शेतकरी आणि आदिवासी स्त्री-पुरूष खऱ्या अर्थाने नैतिकतेचे पालन करताना दिसतात.

समाज हा बऱ्या.वाईट अशा सर्व प्रवृत्तीच्या माणसांना समाविष्ट करून घेणारा असतो. त्या त्या प्रवृत्तींच्या माणसांची उदाहरणे समाज त्यांच्या जीवनाच्या फलश्रुतीतून निर्माण झालेल्या गोष्टीबाबत सदैव देत असतो. त्यामुळे कुठल्या गोष्टी आत्मसात करायच्या याचे एक अप्रत्यक्ष ज्ञानच समाज अशा इतिहासातून देत असतो. पुढच्या पिढीला आनंद देऊ शकणाऱ्या गोष्टींचा उल्लेखही अशाच पद्धतीने होत असतो. १.वृक्ष जो किडा, मुंगी, मातीपासून माणसापर्यंत सर्वांना सर्व काही देतो म्हणून वृक्षालाच देव मानणारा 'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी' या कथेतील कलिंगडाचे शेत करणारा शेतकरी येतो. २.तरूणपण, वृद्धावस्था आणि मृत्यू-लयावस्था या तिन्हीचे स्मरण सतत लक्षात राहावे म्हणून राजाला पिंपळाची हिरवे, पिवळे व सुकलेले अशी तीन पाने देणारे आदिवासी येतो. यातून प्रतिकात्मता दिसते. पानांचे रंग हे मानवाच्या विशिष्ट अवस्थेचे प्रतीक आहेत. त्यातून सूचित होणारा अर्थ हा साहचर्याने, सूचकात्मतेने झालेला आहे.

तर 'एका सोमवारची कहाणी' या कथेत निसर्गाचे महत्त्वच कथन केले आहे. निसर्ग आपल्याला सर्व गोष्टी भरभरून देत असतो. तो माणसाला आत्मसात करून त्याला हव्या असणाऱ्या गोष्टीही देत असतो. पण माणूस स्वार्थापायी, अतिलोभापायी निसर्गाकडून सर्व ओरबाडून घेण्याचा प्रयत्न करतो. निसर्गाच्या मूल गोष्टींना नष्ट करून तिथे आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत असतो. शेतकरी आणि निसर्गाच्या सहवासात राहणाऱ्या आदिवासींच्या नजरेतून निसर्ग काय आहे याचे चित्रही या कथांतून उमटलेले दिसते. 'राजा वीरसेनास झालेले नवे दर्शन' या कथेतील शेतकरी कुटुंबातील म्हातारीला राजा सोन्याची अंगठी देता तेव्हा ती म्हणते, ''ही अंगठी घेऊन मी काय करू? हे फळाफुलांनी नटलेलं जंगल आणि हा समुद्र आम्हाला भरपूर देतो. तेच सरता सरत नाही.'' (पृ.१११) तर याच कथेतील आदिवासी म्हातारा राजाला विनंती करतो की, ''तिरकमठा, बंदूक आणि कुऱ्हाड घेऊन जंगलात येणाऱ्या माणसावर बंदी घालावी. ती जंगलाचं आणि माणसाचं नातं तोडतात.''(पृ.११२) ही सर्व माणसे म्हणजे निसर्गाला जपणारी, त्याला जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करणारी आहेत. तसेच 'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी' या कथेतील वेषधारी राजाला एक तरूण शेतकरी शेती-निसर्ग आणि

माणसाचे असणारे मौलिक नात्याचे नवे दर्शन घडवून देतो. त्याच्या अनुभवातून आलेल्या अनेक गोष्टी तो राजाला सांगतो. कलिंगड, त्या फळातील बीजठेवण आणि त्यासोबत जोडलेली निसर्गाची धारण राजापुढे स्पष्ट करतो आणि निसर्ग हेच देवाचे कसे रूप आहे ते स्पष्ट करतो.

एकूणच निसर्ग आणि माणसाच्या सनातन नात्याला अधिक स्पष्ट करणारी आणि वर्तमानातील मानवाच्या स्वार्थी बुद्धिने होणाऱ्या लयलूटीचे वास्तव चित्रण या कथांतून होते. 'एका सोमवारची कहाणी' या कथेच्या शेवटी येणारे निवेदन कथेतून मिळणारा बोध सांगून होतो. कहाणी सुफळ संपूर्ण झाल्याचे सांगून त्यातून मिळणाऱ्या पुण्याचा उल्लेखही यातून केलेला आहे.''या माझ्या कहाणीनं तुमाला पुण्य लाभो, मलाही पुण्य लाभो.'' या निवेदनात कहाणी सांगणाऱ्याला आणि ऐकणाऱ्याला पुण्य मिळण्याची शाश्वती कथानिवेदक देतो. हे लोककथेतील दैवतकथांच्या रचनेतील तत्त्व इथे योजिलेले दिसते.

## २.३ सारांश :

एकूणच 'आटपाटनगरीच्या कथा' या संग्रहातून विविध मानवी मूल्यांचा वर्तमानात होणारा ऱ्हास, प्रशासनात चालणारा गैरव्यवहार आणि त्याला सामान्यांना बसणारा फटका, देव आणि धर्माच्या नावावर पसरविल्या जाणाऱ्या अंधश्रद्धा, स्त्री, शेतकरी व आदिवासींच्या जीवनात होणारे वास्तवदर्शी बदल याचे चित्रण आले आहे. वर्तमानकाळाची स्पंदने या कथांच्या मिथकरूपातून व्यक्त होतात. कथारचनेच्या नव्या प्रयोगामुळे वास्तवाला भिडणारे हे नवे रूप अधिक अर्थवाही आहे.

## २.४ पारिभाषिक शब्दार्थ :

## २.५ स्वाध्याय :

**दिर्घोत्तरी :**

१.'आटपाटनगरीच्या कथा' या संग्रहातील मिथकातून उलघडणाऱ्या समकालीन वास्तवाचे चित्रण तुमच्या शब्दात करा.

२.'आटपाटनगरीच्या कथा' या संग्रहातील शेतकरी व आदिवासींची वास्तव स्थिती कशा पद्धतीने चित्रित झाली आहे ते तुमच्या शब्दात वर्णन करा.

**टिपा लिहा.**

१. मिथक म्हणजे काय?

२. राजा आणि प्रजेचे नाते

३. प्रशासनातील गैरव्यवहाराचे चित्रण

## २.६ संदर्भ ग्रंथ सूची :


१) लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे - मधुकर वाकोडे, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, १९९४.

२) आटपाटनगरीच्या कथा - द. ता. भोसले ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, २०१५

३) मराठीतील कथनरूपे- डहाके, वसंत आबाजी पॉप्युलर प्रकाशन, मंबई. २०१२.

४) ऑनलाईन मराठी विश्वकोश, (https://vishwakosh.marathi.gov.in/16524)

५) ऑनलाईन मराठी विश्वकोश, (https://vishwakosh.maratho.gov.in/30739)


❖❖❖

### घटक ३

# आटपाटनगरीच्या कथा – वाङ्‌मयीन विशेष

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ पात्रचित्रण
- ३.२.२ निवेदन
- ३.२.३ वर्णनशैली
- ३.२.४ म्हणी व वाक्‌प्रचार
- ३.२.५ भाषास्तर
- ३.२.६ प्रतिकात्मकता
- ३.२.७ कथेचा आकृतिबंध

३.३ सारांश

३.४ प्रश्नावली

३.५ संदर्भ ग्रंथ सूची

## ३.० उद्दिष्ट्ये :

प्रस्तुत घटकात आपण आटपाटनगरीच्या कथा या कथासंग्रहातील वाङ्मयीन विशेषांचा विचार इथे करणार आहोत. द. ता. भोसले लिखित आटपाटनगरीच्या कथा या संग्रहातील कथांचे वाङ्मयीन दृष्ट्या काय महत्त्व आहे त्याचे विश्लेषण या संग्रहाच्या अनुषंगाने करणे इथे अपेक्षित आहे. या अभ्यासापुढील उद्दिष्टये पुढीलप्रमाणे असतील.

१) संपूर्ण कथासंग्रहाची ओळख करून घेणे.

२) या संग्रहातून कोणकोणते वाङ्मयीन विशेष व्यक्त झाले आहेत हे समजून घेणे.

३) या संग्रहाच्या प्रेरणा लक्षात घेणे.

४) वाङ्यीन वेगळेपण लक्षात घेणे.

## ३.१ प्रस्तावना :

द. ता. भोसले हे १९६० नंतरच्या कालखंडातील एक महत्त्वाचे कादंबरीकार व कथाकार होत. ते लोकसंस्कृतीचे अभ्यासकही आहेत. आतापर्यंतच्या त्यांच्या कथांमधून ग्रामीण जीवन, शेतकरी, शेतकऱ्यांची दुरावस्था, तिथले बकालपण या विषयाच्या अनुषंगाने लेखन झाले आहे. समाजजीवनाचे यथार्थ चित्रण हा त्यांच्या लेखनाचा मूळ गाभा आहे. ''आटपाटनगरीच्या कथा'' ही त्यांच्या या आशयविषयाच्या पुढे जाऊन मानवी जगण्याचे प्रतिकात्मक चित्रण करणारी कथा आहे. या कथांचा चेहरा हा मिथकीय असला तरी यात मांडलेल्या मानवी जगण्याचे आदिम आणि आधुनिक ताणेबाणे रेखांकित झालेले आहेत. यामुळे त्यांचा हा कथासंग्रह आशय आणि अभिव्यक्तीच्या अनुषंगाने वेगळा ठरतो. कथेचे बाह्यरूप गोष्टीसारखे वाटणारे आहे पण त्याच्या गाभ्यात आधुनिक मानवी जगण्याचे प्रतिबिंब दिसते. कथा साहित्यप्रकारातून केलेला हा प्रयोग विलक्षण आहे. त्यामुळे या कथेचे वेगळेपण सिद्ध करणाऱ्या वाङ्मयीन विशेषांचा विचार आपल्याला इथे करणे गरजेचे आहे.

## ३.२ विषय विवरण :

वाङ्यीन विशेष कथेचा आकृतिबंध, तिची भाषा, त्यातून येणारी प्रतीके, प्रतीमा, रूपके, म्हणी, वाक्प्रचार याचा विचार विशेषतः करावा लागतो. कथेची सौंदर्यमूल्ये याअंतर्गत तपासली जातात. शब्दांची निवड, शब्दांची जुळणी, वाक्यांची, परिच्छेदाची रचना या त्यातून व्यक्त करावयाचा आशय हे सर्व कलात्मक, सौंदर्यात्मक होणे हे साहित्यरचनेच्या गाभ्यात असते. प्रस्तुतच्या कथासंहितेत कथेतून सांगावयाची गोष्ट ही प्राचीनतेची सूचन करणारी असली तरी समकाळातील संदर्भांना ती विशेष महत्त्व देते. त्यामुळे प्राचीन आणि आधुनिक अशा दुहेरी चौकटींचा वापर कथारचनेमध्ये झालेला आहे. स्थळ आणि काळाचे संदर्भ हे प्राचीन आहेत. उदा.आटपाटनगरीची कथा, इंद्रसेन नावाचा राजा आणि त्याची प्रजा इ. कथा हया विशिष्ट अशा इतिहासकाळाचे सूचन करणाऱ्या आहेत पण कथांमधील मानवी जगण्याशी जोडलेले संदर्भ हे आधुनिक युगातील माणसांच्या जगण्याचे आहेत. अशा दोन चौकटीमुळे ती भिन्न भिन्न अशा संमिश्र रूपातून व्यक्त होते.

काळ बदलला तरी माणसाच्या जगण्यातील आदिम गोष्टी जशाच्या तशाच राहिल्याचे त्यातून सूचित होते. कथांचा हा विषय आणि आशय अभिव्यक्तीसाठी विशिष्ट अशा उदा.पात्रचित्रण, निवेदन, म्हणी आणि वाक्प्रचारांचा वापर इ. वाङ्मयीन शैलीचा अवलंब लेखकाने केला आहे. त्याचा विचार आपल्याला इथे करावयाचा आहे.

### ३.२.१ निवेदन :

कथेच्या कथनासाठी विशेषतः दोन पद्धतीच्या निवेदन पद्धतीचा अवलंब केला जातो. एक प्रथमपुरूषी आणि दुसरी म्हणजे तृतीयपुरूषी निवेदनपद्धती होय. यातील प्रथमपुरूषी निवेदक हा कथेमधीलच एक पात्र असते. आणि कथेमध्ये घडणाऱ्या घटनांचे वर्णन त्याच्या नजरेतूनच झालेले असते. अशा निवेदनपद्धतीला मर्यादा असते. कथेमध्ये दुसऱ्या पात्राच्या मनात काय चालले आहे याचे चित्रण हा निवेदक करू शकत नाही. पण तृतीयपुरूषी निवेदक मात्र हे सर्व करू शकतो. हा निवेदक कथाबाहय एक पात्र असते. तो सर्वसाक्षी असतो. म्हणजे कथेमध्ये घडणाऱ्या सर्वच गोष्टी त्याला माहीत असतात. कथेमध्ये समाविष्ट असणाऱ्या सर्वच पात्रांच्या मनात, जीवनात काय चालले आहे याचे चित्रण तो करू शकतो. प्रस्तुत कथासंग्रहामध्ये लेखक द. ता. भोसले यांनी या दोन्ही निवेदन पद्धतींचा वापर कथनासाठी कथेच्या उपयोगितेनुसार केलेला आहे.

प्रस्तुत कथासंग्रहामध्ये कथेला गोष्टीशी संधान साधणारे निवेदन तंत्र अवलंबिलेले आहे. हे या कथेचे महत्त्वाचे विशेष आहे. या संग्रहातील 'आटपाटनगरीची गोष्ट' आणि एका 'सोमवारची कहाणी' या दोन कथांमध्ये प्रथमपुरूषी निवेदन तंत्र वापरलेले आहे. वाचकांशी, ऐकणाऱ्यांशी संवाद साधणे, त्यांना कथेत सामील करून घेण्याचा प्रयत्न कथेतील निवेदक करताना दिसतो. कित्येकदा कथागत पात्रच संपूर्ण कथेचे निवेदन करते. उदा. ''श्रावणातला सोमवार हुता. सोमवार शंभू महादेवाच्या उपासाचा वार. त्या दिवशी केलेला उपास लई पुण्याचा म्हणं. म्हणूनशान सरावणतले सगळे वार मी करत्ये.'' इथे कथेतील एक पात्रच कथेचे निवेदन करते आहे. तिच्या सांगण्यातूनच कथा पुढे सरकते. पण त्यासोबत ती कथेतील एक पात्रही आहे. त्यामुळे निवेदक आणि कथागत पात्र अशा दोन भूमिका यातून साकारतात. वरील निवेदनातून स्वतः निवेदक स्वतःविषयीचे कथन करतो. आणि कथेच्या पुढच्या भागात आपण स्वतःच कोणतीतरी कथा सांगत असल्याचे निवेदन येते. संपूर्ण कथा सांगून झाल्यानंतर हा सुरूवातीचा निवेदक-'मी' कथेच्या शेवटी पुन्हा हजर होतो. ''तर ही अशी आहे श्रावणातली माझी कथा. या कथेपासून बोध घ्या.''(पृ.२४) अशा पद्धतीने वाचकांशी थेट संवाद साधून निवेदक आपली कथा संपल्याचे सूचवितो. अशा पद्धतीने कथेमध्ये लेखकाने निवेदनाचे तंत्र अवलंबिले आहे.

तर काही कथागत पात्राच्या शिवायच निवेदन सुरू होते. उदा. ''एक होतं आटपाट नगर. खूप मोठं पसरलेलं. अगदी 'आटपाट' शब्दाला शोभून दिसणारं. अगदी आठ दिशांना टेकलेलं.'' (पृ. ३७) हे निवेदन कथाबाहय, सर्वसाक्षी निवेदकाचे आहे. कथेतील कोणतेही पात्र वाचकाला ती कथा कथन करत नाही. त्यामुळे हे तृतीयपुरूषी स्वरूपाचे निवेदन येते. पण कथनकर्ता वाचकांशी बोलतो आहे हे मात्र सतत जाणवत राहते ते कथेच्या घडून गेलेल्या भागाबद्दल हा निवेदक आपले विचार मांडताना दिसतो. ''इंद्रवदन राजाचा राजधानीतील फेरफटका'' या कथेतील निवेदक राजा आणि प्रधानाला वेषांतर केल्यानंतर जे जे दिसते त्यानंतरचे निवेदकाला

वाटणारे विचार इथे व्यक्त होतात. उदा. ''एक नवं आणि जळजळीत सत्य समोर आल्यानं माणसाचा स्वार्थ आणि माणसाचं आयुष्य याचं एक विद्रूप दर्शनच त्यांना झाले होते.'' (पृ.८२) या निवेदनात माणसाचं विद्रूप दर्शन झाले असे निवेदकाला सांगतो तेव्हा विद्रूप ही भावना निवेदक स्वतःत वर्णन करतो आहे.

खरेतर कथा ही वाचत आपण असलो तरी ती आपण पाहत असतो कथनकर्त्याच्या नजरेतून. त्याने निश्चित केलेल्याच घटना हया आपल्याला कळू शकतात. त्याने निवडलेल्या कथेच्या पात्रांचेच जगणे आपल्याला जवळून समजत असते. एवढेच नाही तर पात्रांच्या भल्या बुऱ्या असण्याचा न्यायही आपण कथनकर्त्याने जेवढे दाखवून दिले आहे त्या कक्षेतूनच करत असतो.

प्रस्तुतच्या संग्रहातील बहुतांश कथांचा कथनकर्ता, निवेदक हा प्रत्यक्षात हजर असल्याची जाणीव कथाप्रारंभीच होते. कारण कुठेतरी आटपाट नावाचे नगर असल्याचे आणि तिथे चालणाऱ्या मानवी व्यवहाराचे चित्रण हा निवेदकच करत असतो. उदा.''एक होती आटपाट नगरी. चक्रमसेन राजांची ती होती राजधानी.''(पृ.९१) पण कथा जसजशी पुढे सरकत जाते तसतशी कथेतील कथनकर्त्याची भूमिका ही अदृश्य होत जाते. आता वाचकाचा संबंध उरतो तो केवळ कथेत घटनाऱ्या घटनेशी. कथेतील प्रसंग आपल्या डोळयासमोर घडताहेत असेच निवेदन वाचक वाचत असतो. त्या घटनांसोबत वाचक शेवटापर्यंत प्रवास करत राहतो आणि पुन्हा कथेच्या शेवटाकडे सरकल्यानंतर कथेचा कथनकर्ता कथेच्या शेवटाचे निवेदन करताना दिसतो. ''राजा आणि प्रधान या दोघांचीही पावलं जड झाली होती. कलिंगडाच्या ओझ्यानं की त्याच्या वियोगानं, हे त्यांना समजत नव्हतं''(पृ.६३) कथेतून उलगडलेल्या एखाद्या श्वाश्वत सत्याची जाणीवही तो या कथेच्या शेवटी येणाऱ्या निवेदनातून करून देतो.

### ३.२.२ पात्रचित्रण :

प्रस्तुतच्या संग्रहातील सर्वच कथा लोककथेच्या रूपातून आविष्कृत होतात. या कारणामुळे कथेतील येणारी पात्रे ही आतापर्यंतच्या वाचकापर्यंत गोष्टीरूपातून पोहोचलेली असतात. त्यांचे वाचकांच्या मनातले असणे हे आदिम स्वरूपाचे आहे. राजा हा रूबाबदार, धाडसी, शूरवीर, निर्णय देणारा असतो अशा कर्तृत्वशाली राजाबरोबरच राजा आळशीही असतो. दुराचारी, भित्रा अशा दोन टोकांच्या स्वभावानी राजा ही व्यक्तिरेखा वाचकाच्या मनात लोककथेतल्या गोष्टीने निर्माण केलेली आहे. त्यामुळे या संग्रहातील कथांचे कथानक जस जसे पुढे जाते तशा या दोन टोकांमध्ये विभागलेल्या राजाचे व्यक्तिमत्त्व वाचकाच्या मनात आपोआप तयार होत जाते. यासाठी वेगळी शारीरिक वैशिष्टये निवेदकाला इथे कथन करावी लागत नाही. हेच तंत्र प्रस्तुतच्या कथेच्या बाबतीत लेखकाने हाताळले आहे. त्यांचे बाह्यचित्रण माहीत असू शकणाऱ्या वाचकाला निवेदकाने इथे फक्त त्यांचे स्वभावचित्रणच केले आहे. कथेतील राजा हे मुख्य पात्र असून राजाला सतत मदत करणारा, त्याच्यासोबत वेषांतर करून भटकणारा, योग्य निर्णय घेण्यासाठी विचारमंथन करणाऱ्या प्रधानाचे पात्र कथेतून येते. व त्यानंतर राज्यातील वेगवेगळया स्वभावांच्या व्यक्ती म्हणजे कथेतील प्रजा ही पात्रे कथांमधून येतात.

प्रस्तुत कथेतील पात्रचित्रण हे मोजक्याच व्यक्तिविशेषांनी साकारलेली आहेत. व्यक्तिरेखांच्या बाहय चित्रणाला यामध्ये फारसे महत्त्व नाही. कथागत पात्रांचा स्वभावच हा व्यक्तिचित्रणाला ठळक करतात. सुधा

जोशी यांनी पात्र म्हणजे काय याची व्याख्या केली आहे. ''कथाकादंबरीत शब्दांतून मूर्त केलेली एखाद्या व्यक्तीची प्रतिमा म्हणजे पात्र. व्यक्तीचे बहिरंग आणि तिचे अंतरंग म्हणजे तिचे बोलणेवागणे, स्वभावविशेष, तिच्या वृत्तीप्रवृत्ती, तिचे भावविश्व, तिची जीवनदृष्टी, जीवनसरणी इ.च्या चित्रणातून पात्राच्या विशिष्ट प्रतिमा साकार होते.'' (पृ.५,सुधा जोशी, कथा संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन गृह, २०००) विशिष्ट घटनेबाबत व्यक्तींचे विचार, त्यांच्या कृतिउक्ती, त्यांचा वर्तनव्यवहार हाच त्यांच्या कथागत व्यक्तिमत्त्वाला ठळक करत असतात. या संग्रहातील कथांमधून येणारी सर्वच पात्रे प्रधान पात्रे नाहीत. काही दुय्यम स्वरूपाची आहेत. पण त्यांचे असे असणे देखील कृतीशिल असते. कथात घडणाऱ्या घटिताला ते गती देत असतात. पण सर्वच कथांच्या केंद्रस्थानी राजा आणि त्याची प्रजा असे एक सूत्र दिसते. बऱ्या वाईट स्वभावाचा, वर्तनाचा, कृतींचा, विचारांचा प्रभाव राजा आणि त्याच्या प्रजेतील व्यक्तिरेखांतून दिसतात. उदा. 'प्रजेच्या सुखासाठी' या कथेतील राजा हा ''देवभूषण राजा स्वभावानं देवासारखा होता. राज्याला भूषण झालेला होता.''(पृ. २५) असे चांगल्या राज्याचे व्यक्तिविशेष येते. तर राजा चक्रमसेन याच्या पूर्वजांनी आधीच सर्व केले होते. त्यामुळे त्याच्या आळशी व्यक्तिमत्त्वाचे चित्रण पुढील शब्दात येते. ''त्यांना करण्यासारखं काहीच उरलं नव्हतं. कुणावर स्वारी करावी, तर तशी परिस्थिती नव्हती. राजवाडा, मंदिर, नदीवर एखादा घाट बांधावा, तर आधीच्या महाराजांनी आधीच ते बांधून ठेवले होते.'' (पृ. ९२) अशा दोन प्रकारच्या प्रवृत्तींचे चित्रण कथेतून येते.

जसे राजाचे तसेच त्यांच्या प्रजेचेही चित्रण येते. उत्तम जीवनविचार ठेवणाऱ्या जनाचे चित्रण कथेतून येते. कथांमध्ये शेतकरी, आदिवासी, शेतात राबणारा तरूण आदींची व्यक्तिचित्रणे हे कथेमध्ये चांगल्या कृतीचे प्रेरक असणाऱ्या व्यक्ती म्हणून चित्रण येते. वास्तव अशा समाजस्थितीला विडंबनात्मक स्वरूपाने मांडणाऱ्या व्यक्तिरेखाही कथेतून येतात. उदा. 'राजा चक्रमसेन महाराजाचा दरबार' कथेतील पुरोहिताचे चित्रण पुढील शब्दात येते.''एक पुरोहित अंगावरचे रेशमी वस्त्र सावरीत हात जोडत म्हणाला, ''महाराज, मी आपल्या शिवमंदिराचा उपासक, सेवक. गेल्या अनेक वर्षांपासून मी मंदिराची सेवा करतो आहे. पुरोहित म्हणून पूजा-अर्चा करतो आहे. पण आजकाल शेजारी नव्याने विष्णूमंदिर झाल्यामुळे शिवदर्शनाला खूप कमी भक्तगण येतात आणि जे येतात ते दक्षिणाही फारशी टाकत नाहीत. त्यामुळे माझी उपासमार होते. आठ दिवसांत एकदाही मला मिष्टान्न खायला मिळत नाही.''(पृ. ९३) देवाची सेवा करणारा पुरोहित हा वृत्तीने शांत आणि आचरणाने आदर्श मानला जातो. पण प्रस्तुत कथेतून येणारा पुरोहित हा लालची, देवाच्या नावावर मिळालेल्या सर्व गोष्टींवर स्वतःचा हक्क सांगणारा असा आहे. अशा पद्धतीच्या व्यक्तिचित्रणातून विरोधात्मक स्वरूपाचे चित्रण आले आहे.

### ३.२.३ वर्णनशैली :

कथेमध्ये वातावरण निर्मितीचे काम कथेतील वर्णनातून होत असते. वर्णनातून एखादा प्रदेश जसाच्या तसा उभा राहतो. कथा जिथे घडते त्या स्थळांचे, तिथल्या निसर्ग-ऋतूंचे, प्रहरांचे वर्णने कथानिवेदनातून येतात. या वर्णनामुळे वाचकाच्या मनावरती एक कल्पित चित्र उभे राहत असते. याचीच जादू ही की वाचकाने कधीही न पाहिलेला, आतापर्यंत केवळ ऐकण्यास मिळालेला आटपाटचा प्रदेश तो मनामध्ये साक्षांकित करू शकतो.

कथेतून येणारी वर्णने ही कथेचा असा भाग असतो की जी कथागत वास्तवाचा खऱ्या वास्तवाशी संबंध जोडत असतात. खरेतर कथागत वास्तव हे वास्तव जगाची एक प्रतिकृतीच असते. त्यामुळे कथागत व्यक्तिरेखा हया वास्तवातील व्यक्तींसारख्याच वर्तन करताना, बोलताना दिसतात. हे खऱ्या वास्तव माणसांचे अनुकरण असू शकते. पण ती वास्तवातील नेमकी व्यक्ती असे ठामपणे सांगता येत नाही. कारण कथेतील वास्तव हे लेखकाने निर्मिलेले वास्तव असते. म्हणून लेखक एखाद्या घटनेचे, व्यक्ती स्वभावाचे वर्णन करतो तेव्हा ते एक अनुकरण असते. त्याला कल्पकतेचे आयामही असते. उदाहरणार्थ पुढील वर्णनात संध्याकाळच्या प्रहराचे वर्णन आलेले आहे. हे वर्णन त्या घडणाऱ्या घटनेतील वातावरण निर्मितीला पोषक ठरताना दिसते. ''सूर्यास्तापूर्वीचं मऊसूत झालेलं कोवळं ऊन साऱ्या शेतावर सांडले होतं. साऱ्या जमिनीला झाकून टाकणारे कलिंगडाचे हिरवेजर्द वेल रसरसीत दिसते होते. जमिनीवर वेलांमुळे धरणीमातेने जणू अंगभर हिरवं वस्त्र परिधान केलेलं असावं, असं या दोघांना वाटलं.'' (पृ. ५४) प्रस्तुत वर्णनात राजाला त्याच्या समोर दिसणाऱ्या वातावणाचे मनोहारी दृश्य वर्णन झाले आहे. सूर्याच्या उन्हाची प्रखरता कमी झाली आहे आणि तो अस्ताचा प्रवास करतो आहे, तो शांत होत चालला आहे याची सौंदर्यात्मक जाणीव या वर्णनातील मऊसूत हा शब्द करून देतो. मऊसूत हा शब्द स्पर्शाशी संबंधित आहे. नाजूकतेशी, हव्याशा वाटणाऱ्या स्पर्शाशी संबंधित आहे. आणि ते पुन्हा कोवळया उन्हासारखे हवेसे वाटणारे आहे. अशा शब्दरचनेतून त्या प्रसंगाची आत्म्याला सुखावह वाटणारी मौलिकता अधिक ठळक होताना दिसते. तसेच उन्हं ही पसरणारी गोष्ट असली तरी लेखक मुद्दामहून या उन्हाला सांडल्याची शब्दयोजना करतो. खरेतर पसरणे हा शब्द सर्वत्रतेचे सूचन करणारा आहे. पण सांडणे या शब्दामागे-शेतातील जिथे जिथे उंचवटे असतील तिथे तिथे हे उन दिसू शकते. पण त्याच उंचवट्याच्या आडोशाला गेलेल्या खोलगट भागावर हा उन्हाचा भाग दिसू शकणार नाही. त्यामुळे सांडणे हा शब्द सर्वत्र समान पसरलेला असा नसून जिथे जिथे उंच आहे त्या त्या ठिकाणीच त्याचे वास्तव दिसू शकेल.

कथेतून येणाऱ्या वर्णनांना आलंकारिकतेचे रूप लाभलेले दिसते. उदा.''ऊन-सावल्यांची रांगोळी अंगावर झेलत जंगली झाडांच्या वासांमागे दिशाहीन धावणं.''(पृ.१८) इथे ऊन सावल्यांना लेखकाने रांगोळीचे आलंकारिक रूप योजिले आहे. तसेच ''आकाशाला कवेत घेण्यासाठी आसुसलेले सत्तर-ऐंशी फूट उंचीचे वृक्ष ध्यानस्थ बसले होते. त्याच्या शेजारी छोटया आकाराची गच्च झाडी एकमेकांना मिठीत घेऊन डोलत होती. त्यांच्या अंगा-खांद्यावर चढण्यासाठी छोटया-मोठया वेलींनी गर्दी केली होती. त्या वेलीवर आणि झाडावर नुकतीच जन्मलेली तांबूस-तेलकट पानं, थोडीशी वयात आलेली रसरशीत पाने, काळसर छटा असलेली प्रौढ वयातली पानं, अर्धवट पिवळी अन् अर्धवट फिक्कट हिरवी असलेली वानप्रस्थश्रमाच्या वाटेवरची पानं अन् पिकून खाली गळायला टेकलेली जीर्ण पानं याची जणू एक मैफलच रंगली होती.''(पृ.२१) आकाशाला कवेत घेणारे ध्यानस्थ वृक्ष, एकमेकांना मिठीत घेऊन डोलणारी झाडं, अंगा-खांद्यावर चढणाऱ्या वेलींची गर्दी होणे, वेली-झाडांवर जन्मणारी, वयात येणारी, प्रौढ व वानप्रस्थाश्रमाच्या वाटेवरची पानं आणि या सर्वांची रंगणारी मैफिल असे आलंकारिक वर्णन लेखकाने केले आहे. निसर्गातील घडामोडीचा साक्षात्कार मानवी जीवनाच्या अनुषंगाने करण्याचे, मानवी जगण्याचे आरोपण निसर्गसृष्टीवर करण्याचे काम इथे या लेखनशैलीतून झाले आहे.

हे दृश्य बघणारे जरी राजा आणि त्याचा सोबती असले तरी त्याचे वर्णन हे त्या कथेचा कथनकर्ता करतो आहे याची जाणीव वर्णनाच्या शेवटच्या वाक्यातून होते. जमिनीवर वेलांमुळे धरणीमातेने जणू अंगभर हिरवं वस्त्र परिधान केलेलं असावं, असं या दोघांना वाटलं. 'त्या दोघांना वाटलेल्या' जाणीवेचे सौंदर्यात्मक चित्रण हा कथनकर्ता इथे करतो आहे. कथेतून येणाऱ्या निसर्गदृश्याला मानवी जगण्याच्या अवकाशातून वर्णन करण्याचा लेखकाचा कल इथे ठळक होताना दिसतो. म्हणून जमिनीवर वेलींमुळे दिसणारे हिरवेपण लेखकाला हिरवे वस्त्र परिधान केल्यासारखे वाटणे हे याचे सूचन करते.

कथेमध्ये वर्णनाला किंवा स्थल-परिस्थितीचित्रणामध्ये एक लय येते. ही लय तो प्रसंग वाचनीय बनविण्यात यशस्वी होताना दिसते. उदा. ''ओलं बी पेरून चालत नाही. किडलेलं बी पेरून चालत नाही. पोकळ असलेलं बी पेरून चालत नाही. तीन-चार वर्षांचं जुनं बी चालत नाही. फार खोलवर बी पेरून चालत नाही. त्याची उगवण चांगली होत नाही. फार वरवर बी पेरून चालत नाही. एक तर ते वाऱ्यानं उडून जातं. किंवा पाखरं खाऊन टाकतात. सारखं पाणी देऊन चालत नाही. खूप पाणी देऊन चालत नाही. बी टोचल्यावर तिसऱ्या दिवशी पाणी देणं विसरून चालत नाही.'' (पृ. ५९) यामध्ये शेतकऱ्याच्या अनुभवाचे बोल सामावलेले आहे. पण ते सांगण्याची पद्धत शेतकऱ्याच्या अनुभवाला अधिक ज्ञानात्मक व रूचिमय बनवते. निवेदनातून जाणवणारी ही काव्यात्मक लय गद्य वाङ्मयातील सौंदर्य अधिक वाढवते.

### ३.२.४ म्हणी व वाक्प्रचारांचा वापर :

मानवी व्यवहाराची एक मूल्यचौकट बनत असताना नैतिक मूल्यशिक्षण देण्याचे भाषाधारित एक माध्यम म्हणजे म्हणी आणि वाक्प्रचार होय. साहित्य हे लौकिक जीवनाचे प्रतिबिंब असल्याने लौकिक जीवनात वापरल्या जाणाऱ्या जीवनव्यवहारातील म्हणी आणि वाक्प्रचारांचा अवलंब कथागत पात्रे करताना दिसतात. या म्हणी म्हणजे अनुभवातून आपलेले मानवी जगण्याचे सार असते. ते विशिष्ट प्रकारचे तत्त्वज्ञानच यातून इतरांपर्यंत साध्या आणि सरळ भाषेतून पोहोचविले जाते. प्रस्तुतच्या कथासंग्रहात अशा अनेक म्हणी आणि वाक्प्रचार व्यक्तिरेखांच्या संवादातून येतात.

**म्हणी :**

काही विशिष्ट हेतू सिद्ध करण्यासाठी म्हणी या चुटपुटीत वाक्यरचनेचा अवलंब केला जातो. वि.द.भिडे यांनी म्हणीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''यात काही अनुभव, उपदेश, माहिती, सार्वकालिक सत्य किंवा ज्ञान गोवलेले आहे,जे अल्पशब्दात्मक आहे, ज्यात काही चटकदारपणा आहे आणि लोकसंभाषणात वगैरे जे वारंवार योजतात असे वचन किंवा वाक्य म्हणजे म्हण होय.''(पृ.३६०, वि.वा.भिडे, १९५९) या म्हणीच्या स्वरूपावरून लक्षात येते की म्हणीद्वारे मोठा आशय किंवा सार्वकालिक सत्य नेमक्या आणि अल्पाक्षरातून व्यक्त होत असतो.

''दुसऱ्यानं दिलेलं पुरत नाही, आन् घरचं आसेल ते सरत नाही.'' (पृ.१०९) मानवी प्रवृत्तीवर नेमकेपणाने भाष्य करणारी ही म्हण आहे. बहुतांश म्हणींमध्ये यमक अलंकार साधलेला असतो. उदा.पुरत

नाही, सरत नाही इ. या दोन शब्दांमध्ये विरूद्ध स्वरूपाचे भावदर्शन होते. मानवी जीवनातील शाश्वत सत्याचा उच्चार या म्हणीतून होताना दिसतो. आपण स्वतःहून जेव्हा स्वतःसाठी काही करत नाही तोपर्यंत आपला विकास होऊ शकत नाही. दुसऱ्याने आपल्यासाठी कितीही प्रयत्न केला आणि स्वतः मात्र कोणतेही कृत्य करण्यासाठी क्रियाशील नसू तर यश मिळणे अशक्य असते. या मतितार्थ व्यक्त करणारी ही म्हण आहे.

**वाक्प्रचार :**

१.''माणसं आपण शेण खातात, अन् दुसऱ्याचं तोंड हुंगतात.'' (पृ.९)

२. ''खोबरं तिकडं चांगभलं'' (पृ.१३)

३. बेफिकीर बाचा संसार आन् या राजाचा कारभार सारकाच. (पृ.१४)

हे सर्वच वाक्प्रचार मानवी प्रवृत्तीवर नेमकेपणाने बोट ठेवताना दिसतात. समाजात अशी अनेक प्रकारची माणसे असतात ज्यांना आपल्या चुका दिसत नाहीत. आणि त्या चुका लक्षात आल्या तरी त्याचे खापर कुणाच्यातरी माथी फोडण्याचे काम असे लोक करत असतात. हा अर्थ यातील पहिल्या वाक्प्रचारातून सूचित होतो. तर ''खोबरं तिकडं चांगभलं'' हा वाक्प्रचार तिथे काही मिळणार असेल, फायदा असेल तिकडेच लोकांचा ओढा असतो या अर्थाचे सूचन करणारा आहे. तर एखाद्या कुटुंबाचा प्रमुख हा निष्काळजीपणे वागणारा असेल तर त्याच्या कुटुंबाची वाताहत ज्याप्रमाणे होते त्याप्रमाणेच राजाचा कारभार असेल तर त्याचे राज्य व त्यातील प्रजेचेही कुटुंबाप्रमाणे वाताहत होते. व्यापक अर्थ व्यक्त करणारे अशा अल्पाक्षरी म्हणी व वाक्प्रचारांचा वापर लेखकाच्या लेखनशैलीत होतो.

**३.२.५ भाषास्तर :**

साहित्यकृतीच्या आशयद्रव्यानुसार त्याच्या बाहयरूपाचे प्रकटन होत असते. म्हणजेच कथातून येणारे स्थलकालाचे सूचन हे त्या त्या काळातील भाषासंवेदनेतून व्यक्त होत असते. जसे महानुभाव काळातील भाषा, शिवकाळातील भाषा, पेशवेकाळातील भाषा या भाषा हया त्या त्या काळातील वेगवेगळया भाषारूपांच्या आहेत. मूळ रूप मराठीच असले तरी त्यामध्ये काळाचे एक वेगळे भान प्रकट होताना दिसत असते. प्रस्तुत कथेतील काळ हा लोककथेचा म्हणजेच प्राचीन आहे. त्यामध्ये प्राचीन काळाची भाषानमुने काळाचे सूचन करण्यासाठी येणे गरजेचे आहेत. पण प्रस्तुत कथालेखनासाठी कथाकाराने हा संकेत जसाच्या तसा न ठेवता त्यामध्ये प्रयोग केला आहे. जसे राजाच्या, प्रधान, सामान्य जनता, शेतकऱ्याच्या तोंडच्या संवादामध्ये इंग्रजी किंवा आधुनिक काळातील भाषानमुने येतात. उदा.'मोठया प्रमाणात देखणे आणि चपळ असे घोडे विकत घेतले. त्यांचं आता ट्रेनिंगही सुरू केले आहे'' (पृ.३१) या संवादात येणारा ट्रेनिंग हा शब्द इंग्रजीतला असून आधुनिक काळाचे भान देणारा आहे. प्राचीन भाषारूपात हा सापडण्याची शक्यता कमी असली तरी लेखकाने हे काळाचे अंतर मिटवणारे तंत्र वापरून कलात्मकता प्राप्त करून दिली आहे. कथांमधून वर्णिल्या जाणाऱ्या घटनेचा काळ हा ऐतिहासिक किंवा प्राचीन आहे. कारण आता राजा आणि राज्य ही संकल्पना राहिली नाही. ती प्राचीन काळी अस्तित्वात होती. त्यामुळे इंग्रजी भाषेतील शब्द या काळातील घटनांमधील व्यक्तिरेखांच्या

तोंडी असणे शक्य नाही. पण लेखकाने अशा शब्दांचा वापर सर्रासपणे करून काळाचे हे अंतर मिटवून टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

तसेच 'कुणा एकाचे मरण' या कथेमध्ये आजारी माणसाच्या नातेवाईकांमध्ये चाललेल्या चर्चेचे वर्णन वर्तमानातील भाषासंदर्भ घेऊन येते. ''आमचा एक पेशंट खूप आजारी आहे. त्याच्या दोन्ही किडन्या निकामी झालेल्या आहेत. त्यासाठी त्याला चांगली किडनी देणारा कोणी दाता भेटला तरच याचे प्राण वाचतील, असे डॉक्टरांनी सांगितले आहे.'' (पृ.११८) प्रस्तुतच्या संवादातून येणरे निकामी किडनी, डॉक्टर, किडनी देणारा दाता असे शब्द हे प्रगत अशा वैद्यकशास्त्रातील शब्द आहेत. प्राचीन काळातील आटपाटनगरीत अशा शब्दांची रेलचेल असणे अशक्यप्राय. पण लेखक अशा भाषेबाबतच्या नव्या प्रयोगातून मानवी जीवनरीतीचे जुन्या आणि नव्या काळातील एकसारखेपणाचे सूचन यातून घडवू पाहतात.

ग्रामीण माणूस हा त्याच्या भाषेतून अधिक ठळक होत असतो. लेखक किंवा निवेदकाला अमूक एखादी व्यक्तिरेखा ही ग्रामीण भागातील, खेडूत आहे हे मुद्दाहून सांगण्याची गरज नसते. संग्रहातील कथा ही लोककथेतून आविष्कृत होत असल्याने निवेदकाला कथेच्या सुरूवातीला कथेतील पात्रांचा परिचय करून द्यावा लागतो. तेव्हा मात्र तो कथेतील व्यक्तिरेखांचे ग्रामीण असणे सुरूवातीसच सांगत असतो. पण बऱ्याचदा त्या व्यक्तिरेखांच्या संवादांचे स्वरूप हे ग्रामीण ठेवले असता वाचकाला ती व्यक्तिरेखा ग्रामीण भागातील असल्याचे सहज लक्षात येत असते. भाषेचा हा परिणाम वाचकाला ती व्यक्तिरेखा समजून घेण्यास अधिक उपयुक्त ठरते. उदा. संग्रहाच्या पहिल्याच 'आटपाटनगरची गोष्ट' या कथेत सुरूवातीसच कथागत निवेदनातून हे स्पष्ट होताना दिसते. ''आज हाय मंगळवार. म्हणजे तुळजाभवानीच्या उपासाचा वार. या दिवशी मी देवीचा उपास तर करतेचय पण देवादिकांची एखादी कहाणीही सांगते. कधी लेकरं कहाणी ऐकायला गोळा होतातय कधी म्हाताऱ्या बायाबापड्याा असतात.'' (पृ.१) प्रस्तुत कथेतील व्यक्तिरेखा ही आपल्याला कहाणी सांगत असली ती मूळची ग्रामीण समूहातून आपल्याचे तिच्या भाषेवरून आपल्या लक्षात येते. काही ठिकाणी लेखकाने दोन व्यक्तिरेखांच्या संवादांमध्ये भाषेची ही बदलती रूपे वापरून योग्य तो परिणाम साधला आहे. प्रस्तुत कथासंग्रहातही अनेक ठिकाणी लेखकाने हेच लेखनतंत्र वापरले आहे.

### ३.२.६ प्रतिकात्मकता :

संग्रहातील 'राजे वीरसेनास झालेले नवे दर्शन' या कथेमध्ये राजाला भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्ती, घडणारे प्रसंग हे काहीतरी नवे अनुभव, ज्ञान देत असतात. कथेच्या शेवटी राजाला भेटणारे आदिवासी राजाला भेट म्हणून पिंपळाची तीन पाने देतात. ही तीन पाने म्हणजे त्याआधी राजाने दिलेल्या वचनाची आठवण राजाला सदैव राहावी म्हणूनची भेट होय. या तीन पानातील एक पान हिरवेगार, दुसरे पान हे पहिल्याचे बदलले रूप. म्हणजे पिवळया रंगाचे पान व तिसरे या सर्वाची अवकळा असलेले म्हणजे सुकलले आणि मातीत माखलेले होते. या एकाच पानाच्या तीन अवस्था. हिरवे पान म्हणजे तारूण्याचे प्रतीक होते. दुसरे पान म्हणजे तारूण्य, कर्तृत्व कधी ना कधी लयाला जाते आणि त्याचे रूप बदलते याचेच सूचन यातून होते. तर तिसरे पान म्हणजे म्हातारपण. जगातून प्रत्येकाला निरोप घ्यायचा असतो. तसेच पान सुकून गेले की ते झाडावरून

गळून पडते आणि नव्या येणाऱ्या पालवीसाठी जागा तयार करते. सुकलेल्या पानाचे मातीने माखणे हे प्रजा आणि राजा यांच्या नात्यातला वेगळा बंध 'इंद्रसेन राजाची मुलुखगिरी' या कथेतून आली आहे. राजा हा प्रजेचे रक्षण करतो, तोच त्यांचा अन्नदाता असतो हा पारंपरिक विचार खोडून काढण्याचे काम या कथेतून केले आहे. खरा राजा तो असतो जो सर्वांचा अन्नदाता असतो आणि तो म्हणजे शेतकरी. अशाच एका शेतकऱ्याच्या शेतात वेषांतर करून गेलेला राजाला याचा पुरावा देणारा शेतकरी भेटतो. ज्याच्या म्हणण्यानुसार जो शेतात दिवसरात्र राबतो त्याच्या श्रमाने शेती फुलून बहरून येते, सर्वांना अन्न मिळते, पर्यायी परकीय आक्रमण झाले असता हा शेतकरीच राजाच्या मदतीला धावतो याची जाणीव हा शेतकरी इंद्रसेन राजाला करून देतो.

## ३.२.७ कथेचा आकृतिबंध :

'आटपाटनगरीच्या कथा' या संग्रहातील सर्वच कथा हया मराठी साहित्यपरंपरेत रचनेच्या दृष्टीने वेगळा प्रयोग करणाऱ्या कथा आहेत. मराठी कथा या वाङ्मय परंपरेत रूढ अर्थाच्या कथेच्या आकृतिबंधातील या कथा नाहीत. या कथा लोकसाहित्यातील लोककथेच्या रूपातील कथा आहेत. सर्वच कथा या 'आटपाटनगरी'पासून प्रारंभ होणाऱ्या गोष्टीरूप कथा आहे राजा आणि त्याची प्रजा, राजा आणि त्याचे वर्तन, प्रजेमध्ये असणारे राग, लोभ, स्वार्थ, समज, माणुसकी, धर्माचरण, तत्वनिष्ठा अशा अनेक तत्त्वांचा उल्लेख कथेतून येतो. या कथेमध्ये गोष्ट सांगण्याचा जो मूळ बंध आहे तो लोककथेतला आहे. त्यामुळे या लोककथांचा आकृतिबंध 'फॉर्म' वापरून समकाळातील मानवी जीवन रेखाटण्याचा प्रयत्न या कथा करतात. ग्रामीण व जनसमूहाला लिखित अशा कथेपेक्षा मौखिक रूपाने सांगितल्या जाणाऱ्या गोष्टी जास्त जवळच्या वाटतात. तसेच अशा गोष्टींना केवळ चित्रणाचे स्वरूप नसते तसे कोणतेही सत्य सांगून, चांगले तत्त्व सांगून लोकांचे उद्बोधन करण्याचा उद्देश किंवा हेतूतून अशा लोककथांची निर्मिती झालेली असते. लोककथेचा हा धागा या संग्रहातील सर्वच कथांतून पकडल्याचे दिसते. या संग्रहातील सर्वच कथांमधून मानवी जीवनातील एक शाश्वत सत्य कथन करण्याचा, माणसाला चांगला उपदेश करण्याचा हेतू या कथांतून साध्य केला आहे. कल्पनेतील मानवांकडून वास्तव जगातील सत्याचा उच्चार करून घेण्यासाठीच अशा पद्धतीचा आकृतीबंध लेखकाने इथे वापरलेला आहे.

## ३.३ सारांश :

एकूणच समकालीन वास्तव रेखाटणाऱ्या कथा द.ता.भोसले यांनी लोककथेच्या रूपातून साकार केलेल्या आहेत. समाजजीवनातील बऱ्या वाईट मानवी वृत्ती-प्रवृत्तींचे चित्रण या संग्रहातून होते. वर्तमानातल्या प्रशासन आणि जनसामान्य यांच्यातील आंतरिक नात्याचे प्रतिकात्मक चित्रण लेखकाने या कथांच्या आधाराने केले आहे. कथेतून वापरलेल्या भाषास्तर, निवेदन पद्धती, पात्रचित्रण, वर्णनशैली, म्हणी-वाक्प्रचारांचा वापर आदि वाङ्मयीन वैशिष्ट्यांनी ही कथा अधिक अर्थघन ठरते. लोकथांचा आकृतिबंध वापरून समाकालीन वास्तवावर भाष्य करणाऱ्या प्रयोगशील कलाकृती मराठीमध्ये कमीच आहेत. मराठी कथालेखन परंपरेतील अतिशय महत्त्वाचा प्रयोगशील कथासंग्रह म्हणून या ग्रंथाची नोंद घ्यावी लागते.

## ३.४ प्रश्नावली :

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) 'आटपाटनगरीच्या कथाा' या संग्रहाचे वाङ्मयीन विशेष स्पष्ट करा.

२) 'आटपाटनगरीच्या कथा' या संग्रहातील पात्रचित्रण व वर्णनशैलीचे वाङ्मयीन विश्लेषण तुमच्या शब्दात करा.

**टिपा लिहा :**

टिपा लिहा.

१) कथासंग्रहातील म्हणी वा वाक्प्रचार

२) कथासंग्रहातील भाषास्तर

## ३.६ संदर्भ ग्रंथ सूची :


१) जोशी, सुधा : कथा संकल्पना आणि समीक्षा, मौज प्रकाशन गृह, मुंबई (२०००).

२) भिडे वि. वा. : मराठी भाषेतील वाक्प्रचार व म्हणी, चित्रशाळा प्रकाशन, पुणे (१९५९).

३) भोसले, द. ता. : आटपाटनगरीच्या कथा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई (२०१५).

४) डहाके, वसंत आबाजी : मराठीतील कथनरूपे, पॉप्युलर प्रकाशन, मंबई (२०१२).


❖❖❖

## घटक ४

# उपयोजित मराठी – मुलाखत लेखन तंत्र

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ मुलाखत व स्वरूप
- ४.२.२ मुलाखत म्हणजे काय?
- ४.२.३ मुलाखत लेखन प्रकाराची वाटचाल
- ४.२.४ मुलाखतीचे तंत्र
- ४.२.५ मुलाखत पर्व

४.३ सारांश

४.४ स्वाध्याय

४.५ संदर्भ ग्रंथ सूची

## ४.० उद्दिष्ट्ये :

१) मुलाखत लेखनाचे कौशल्य विद्यार्थ्यांच्यात रुजावे.

२) मुलाखतीचे महत्त्व व स्वरुप विद्यार्थ्यांना समजणे हा हेतू आहे.

३) मुलाखत म्हणजे काय? त्याविषयी विचारवंतांची मते माहीत करुन देणे.

४) मुलाखत लेखन प्रकाराची वाटचाल समजून सांगणे.

५) मुलाखतीचे तंत्र विद्यार्थ्यांना अवगत करण्यासाठी त्यांच्या समोर मांडणे.

६) मुलाखतपूर्व तयारी कशी करावी याचे तंत्र विद्यार्थ्यांना अवगत करुन देणे.

७) वृत्तपत्रासाठी मुलाखत घेत असताना घ्यावयाची काळजी समजून घेणे.

८) आकाशवाणीवरील मुलाखतीचे स्वरुपविवेचन मांडणे.

९) आकाशवाणीवरील मुलाखतीची तयारी कशी करावी.

१०) आकाशवाणीवरील मुलाखत घेत असताना कोणती काळजी घ्यावी, हे विद्यार्थ्यांना माहीत करून देणे.

११) दूरदर्शवरील मुलाखतपूर्व कोणती काळजी घ्यावी याचे याचे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना अवगत व्हावे.

## ४.१ प्रस्तावना :

आजच्या स्पर्धेच्या युगात 'मुलाखत' हा लेखनप्रकार अतिशय महत्त्वाचा मानला गेला आहे. मुलाखत लेखनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून मुलाखत लेखनाचे कौशल्य विद्यार्थ्यांच्यात रुजावे. या हेतूने बी. ए. भाग २ साठी, आय. डी. एस. पेपर क्रमांक २ मध्ये घटक क्रमांक ४ मुलाखत लेखन हा घटक निवडण्यात आला आहे. मुलाखत म्हणजे काय? हे समजावून देणे. मुलाखत लेखन हा एक सृजनशील प्रकार असून मुलाखत प्रकारात मुलाखत घेणारा व मुलाखत देणारा यांच्यात होणाऱ्या संवादाला महत्त्व असते. मुलाखतीतून एखाद्या व्यक्तीचे कार्य, त्यांचे विचार यांची ओळख सामान्याना व्हावी हे मुलाखतीचे प्रयोजन असते. त्यासाठी मुलाखतीचे स्वरुप समजावून सांगणे, मुलाखत लेखनप्रकाराची वाटचाल सांगणे, मुलाखतींच्या प्रकारांची चर्चा करणे, मुलाखत घेताना कोणती पथ्ये पाळावीत यांचा विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे. मुलाखत घेत असताना व प्रकाशित करीत असताना मुलाखतकाराने घ्यावयाची काळजी, करावी लागणारी पूर्वतयारी याविषयी विद्यार्थ्यांच्यात जागृती करणे, पूर्व तयारीचे महत्त्व सांगणे, मुलाखत माध्यमे या अनुषंगाने येथे विचार करायचा आहे. त्याचबरोबर काही मुलाखतींचे नमुने मांडून मुलाखत लेखन कौशल्य विकसित करण्याच्या हेतूने प्रस्तुत माहिती मार्गदर्शक ठरेल.

## ४.२ विषय विवरण :

### ४.२.१ मुलाखत व स्वरूप :

मुलाखत हा प्रकार वृत्तपत्रीय माध्यमातीलच नव्हे, तर आकाशवाणी, दूरदर्शन या इलेक्ट्रॉनिक माध्यमातील एक महत्त्वपूर्ण असा लेखन प्रकार आहे. 'मुलाखत' हा शब्द अरबी भाषेतील 'मुलाकात' या शब्दापासून आला

असून त्याचे अर्थ श्री ह. अ. भावे यांनी आपल्या 'वरदा' या मराठी शब्दकोषात भेट, बोलाचाली, संवाद असे अर्थ नोंदविलेले आहेत. मुलाखत हा मानवी व्यक्तिमत्त्वाचा अभिव्यक्तिपूर्ण असा प्रकार आहे. मुलाखत वृत्तपत्रातून प्रकाशित केल्याने वृत्तपत्र रोचक बनते. आकाशवाणी आणि दूरचित्रवाहिनीवर प्रसारित होणाऱ्या मुलाखतींनी श्रोते आणि रसिक उद्बोधित होतात. मुलाखत हा प्रकार वाचनीय, श्रवणीय, दर्शनीय आहे. मुलाखती लोक आवडीने वाचतात, आकाशवाणीवरुन ऐकतात, दूरचित्रवाणीवरुन पाहतात. यातून मुलाखतीचे महत्त्व अधोरेखित होते.

पत्रकारितेतील एक विश्वसनीय घटक म्हणून 'मुलाखत' या लेखनप्रकाराकडे पाहिले जाते. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, कला, क्रीडा, विज्ञान, धर्म, शिक्षण, उद्योग अशा अनेक क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीविषयी जाणून घेण्याची उत्सुकता लोकांत असते. त्यासाठी पत्रकार यशस्वी व्यक्तींच्या मुलाखती घेऊन त्या समाजातील लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करतात. असे करण्यात पत्रकारांचा समाजहितोपयोगी उद्देश असतो. समाजातील ज्या व्यक्ती आपल्या कार्यकतृत्वाने यशस्वी झाल्या आहेत. अशा माणसांची लोकांना ओळख व्हावी, त्यांनी यशोशिखर गाठण्यासाठी घेतलेल्या कष्टाची, त्यांनी केलेल्या अपार त्यागाची, संघर्षाची व एकूणच वाटचालीची माहिती, त्यांचा आदर्श लोकांसमोर ठेवण्याचे कार्य मुलाखतकार करीत असतो. यातून समाजातील इतरांच्या मनात प्रेरणा फुलावी, त्यांच्यात स्फुल्लिंग चेतवले जावे हा सुप्त हेतू मुलाखतीच्या मागे दडलेला असतो.

एखाद्या व्यक्तीच्या विचारांचा आणि जीवनकार्याचा परिचय करुन देणाऱ्या लेखापेक्षा मुलाखतीतून त्या व्यक्तीचे विचार, जीवनकार्य अधिकाधिक चांगल्या पद्धतीने उलगडत जाते. परिचयवजा लिहिलेल्या लेखातून त्या व्यक्तीबद्दल लेख लिहिणाऱ्याला जे ज्ञान असेल तेवढीच माहिती प्रकट होते. परंतु प्रत्यक्ष मुलाखतीतून व्यक्तीचे विविध पैलू उलगडत जातात. कारण मुलाखतीत प्रत्यक्ष ती व्यक्तीच समोर उपस्थित असते. त्यामुळे त्या व्यक्तीबद्दल असलेले कुतूहल आणि त्यापोटी मनातले असंख्य प्रश्न यांचे निरसन मुलाखतीद्वारे होऊ शकते. म्हणून व्यक्तीला समजून घेण्याचे माध्यम म्हणून मुलाखतीकडे पाहता येते. ज्यांनी समाजात आपल्या कर्तृत्त्वाचा ठसा उमटविलेला आहे. अशा व्यक्तींची मुलाखत घेऊन त्याचां आदर्श समाजापुढे मांडला जातो. त्याचप्रमाणे सामान्य माणूस आणि त्याची जीवनशैली, जीवनसंघर्ष करण्याची वृत्ती, त्यांच्यातली आत्मीयता, सामाजिक भान, मानवतावादी दृष्टी इ. अनेक पैलू सामान्य माणसाच्या अंतरंगात घुसून बाहेर काढता येतात. म्हणजेच नोकरीसाठी लाचारी न पत्करता स्वतःचा व्यवसाय करणारा माणूस, घरात पुरूष माणूस नसतानाही संसाराचा गाडा ओढत आपल्या मुलांना मोठं करणारी स्त्री, नगरपालिकेतील स्वच्छता कामगार, अंगणवाडीतील शिक्षिका यांसारख्या अनेक सामान्य माणसांच्याही मुलाखती घेतल्या जातात.

पत्रकारितेत 'मुलाखत' या घटकाला विशेष असे महत्त्व आहे. 'सत्य' काय आहे. हे समजण्यासाठी संबंधित व्यक्तीची मुलाखत महत्त्वाची ठरते. अव्वल दर्जाची प्रेरणादायी माहिती देणारे, मुलाखत हे एक साधन आहे. मुलाखत घेणाऱ्याला मुलाखतकार असे म्हटले जाते तर मुलाखत देणाऱ्याला मुलाखतदाता असे म्हटले जाते. मुलाखतकाराने योग्य व्यक्ती निश्चित करुन मुलाखत घेण्याचे ठरले की, त्याची नेमकी अशी पूर्वतयारी

करावी लागते. आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकलेल्या व्यक्तीपासून ते सामान्य माणसांपर्यंत मुलाखत घेऊन मुलाखतकार नवी माहिती, तपशील, वाचकांपुढे ठेवत असतात. या मुलाखतीच्या आगळ्या वेगळ्या लेखन प्रकाराची सुरूवात, त्याचा विकास, मुलाखत लेखन करताना घ्यायची काळजी, यांचा विचार आपण करू.

### ४.२.२ मुलाखत म्हणजे काय? :

'मुलाखत' हा मानवी अभिव्यक्तीचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. 'मुलाखत' हा शब्द 'मुलाकात' या अरबी भाषेतील शब्दावरुन आला असल्याचे मानले जाते. इंग्रजीत याला Interview असे म्हटले जाते. ऑक्सफर्डच्या इंग्रजी शब्दकोशात इ. स. १८६९ साली Interview या शब्दाचा समावेश करण्यात आला. तो शब्द पत्रकारितेतील एक संज्ञा (Journalistic term) म्हणून ओळखली जाऊ लागली. मुलाखत म्हणजे दोन व्यक्तींच्या संभाषणाचा वृत्तांत होय. मुख्यतः माध्यमांसाठी एखाद्या जबाबदार, मान्यवर व्यक्तीला काही महत्त्वाच्या गोष्टी जाहीररित्या सांगण्याची संधी मुलाखतकाराला असते. 'न्यूजपेपर हॅण्डबुक' मध्ये रिचर्ड किबल यांनी 'The fascinating territory of the interview' असा उल्लेख केला आहे. मुलाखत हा खरोखरच एक थरारक, रोमांचकारी असाच प्रदेश आहे. अर्थात प्रत्येक मुलाखतीच्या तऱ्हा वेगवेगळ्या असतात. लेखक किंवा कलावंताच्या मुलाखतींपेक्षा राजकीय नेत्याची मुलाखत वेगळ्या स्वरुपाची असते, त्यातून नवेनवे अनुभव मुलाखतकार आणि श्रोते घेत असतात. तर एखाद्या लढवय्या सैनिकाची मुलाखत थरारक असते. मुलाखतीचे तंत्र खरे म्हणजे प्रत्यक्ष अनुभव घेऊनच अवगत करायचे असते.

रिचर्ड किबल मुलाखतीची ओळख 'An interview is intentional Coversation' अशी करुन देतात 'सहेतुक संभाषण म्हणजे मुलाखत' असेच त्यांना थोडक्यात सांगायचे आहे. अशा मुलाखतींच्या शोधात पत्रकार असतात.

The shorter Oxford English Divtionary मध्ये Interview या शब्दाचे Intervue किंवा Entervoir (To have Glimpsc of) असे पर्यायी फ्रेंच शब्द दिले आहेत. त्यांचे अर्थ -

i) Meeting of person face to face for the purpose of formal Conference.

ii) A Meeting a representative of the press and some one from whom he seeks to obtain statement for publication.

iii) Mutual view of each other आणि Inspection. असे अर्थ दिले आहेत, तर Interviewer या शब्दाचे अर्थ

a) One who interviews

b) A journalist who interviews a person with object of obtaining matter for publication.

असे दिले आहे.

यावरुन आपणास असे म्हणता येईल की, मुलाखत म्हणजे एखाद्या विशिष्ट प्रयोजनाच्या निमित्ताने दोन

व्यक्तीमध्ये होणारे अनौपचारिक संभाषण किंवा वृत्तपत्रासाठी माहिती घेण्यासाठी होणारे संभाषण किंवा माणसाला जाणून घेण्याचा प्रयत्न म्हणजे मुलाखत असेही म्हणता येईल.

थोडक्यात, दोन व्यक्तीत होणारे संभाषण म्हणजे मुलाखत असे म्हणता येत असले तरी कोणत्याही दोन व्यक्तीत होणारे संभाषण म्हणजे मुलाखत असे म्हणण्यात अपूर्णता असल्याचे जाणवते. कारण संभाषणास मुलाखतीचे स्वरुप प्राप्त होण्यासाठी त्या संभाषणाची व्यापकता, हेतू, दर्जा, उपयुक्तता विचारात घ्यावी लागते. ज्या संभाषणाची व्यापकता अधिक असून ती समाजातील इतरांना उपयुक्त ठरावी. त्या संभाषणाचा दर्जा वैयक्तिक पातळीबरोबरच सामाजिक पातळीवर उतरणारा असावा. संभाषणातून नाविन्य शोधून ते इतरांसमोर मांडण्याचा शुद्ध हेतू असावा. अशा काही गोष्टी त्या संभाषणाच्या मुळाशी असल्या पाहिजेत, संभाषणात अनैतिक, अव्यवहार्य, काल्पनिक असे काही असू नये. तरच त्या संभाषणाला मुलाखतीचे स्वरुप येईल. म्हणून दोन व्यक्तीत होणारे उच्च दर्जाचे, समाजोपयोगी, नाविन्यपरता, वास्तवपूर्ण होणारे संभाषण म्हणजे मुलाखत म्हणता येईल.

### ४.२.३ मुलाखत लेखन प्रकाराची वाटचाल :

'मुलाखत' ही अमेरिकन वृत्तपत्रसृष्टीची निर्मिती मानली जाते. आरंभीच्या काळात इग्लंड आणि अमेरिकेतील वृत्तपत्रांनी मुलाखत लोकप्रिय करण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसते. त्यासाठी अमेरिका विशेष करुन प्रयत्नशील आणि आघाडीवर होती. 'न्यूयॉर्क ट्रिब्यून' चे संपादक होरॅक ग्रीले आणि 'द न्यूयॉर्क हेरॉल्ड' चे प्रोप्रायटर जेम्स जॉर्डन बेनेर या दोघांना 'मुलाखत' हा वृत्तपत्रीय लेखनप्रकार सुरु केल्याचे श्रेय द्यावे लागेल असे 'इंटरव्ह्यूज' या ग्रंथाचे संपादक सिल्हेस्टर यांनी नोंदविले आहे. पेंग्विन प्रकाशनाने मुलाखतीचा अतिशय अभ्यासपूर्ण वेध घेणारा आणि जगातील नामवंतांच्या मुलाखतींचा समावेश असणारा 'इंटरव्ह्यूज' ग्रंथ १९९३ साली प्रसिद्ध करुन मोलाचे काम केले आहे. इंग्लंडमधील ज्येष्ठ पत्रकार ख्रिस्तोपर सिल्हेस्टर यांनी या ग्रंथाचे संपादन केले आहे. यापूर्वी ग्रीले (Greelay) यांनी घेतलेली मामॉन चर्चचे नेते ब्रायहम यंग यांची तपशीलवार व वेधकपणे घेतलेली मुलाखत २० ऑगस्ट १८५९ च्या अंकात प्रसिद्ध झाली होती. प्रश्नोत्तराच्या स्वरुपात 'ट्रिब्यून' ने ही मुलाखत प्रसिद्ध केली होती. 'हेरॉल्ड' चे बेनेर यांनी अमेरिकेचे अध्यक्ष 'मार्टिन व्हॅन बरो' यांची मुलाखत घेतली होती. ती ग्रीले (Greelay) यांनी घेतलेल्या मुलाखतीच्या अगोदर वीस वर्षे प्रसिद्ध झाली होती. मात्र त्यात प्रत्यक्ष संभाषण कुठेच नोंदविलेले नव्हते. मार्टिन यांची भेट कशी झाली, त्यांचे व्यक्तिमत्त्व याबाबतचे तपशील, काही उतारेच असलेली मुलाखत होती. त्यामुळे त्याला मुलाखत कसे म्हणणार? असे सिल्हेस्टरने विचारले आहे. म्हणून ग्रीले (Greelay) यांनी घेतलेली मुलाखत हीच आज लेखनप्रकारातील 'आद्य' स्वरुपाची मुलाखत मानावी लागते. आधुनिक काळातील मुलाखत वाचणाऱ्या वाचकांच्या दृष्टीने मुलाखतीतील प्रश्नोत्तरांचा साचा अधिक ओळखीचा झाला आहे. म्हणून चर्चचा प्रमुख असलेल्या 'ब्रायहम यंग' यांची मुलाखत विशेष महत्त्वाची ठरते.

मुलाखत घेताना नामवंत व्यक्तीचे वेगळेपण टिपण्याची दृष्टी आणि सगळ्या संभाषणातील मोकळेपणा या वैशिष्ट्यांमुळे मुलाखत वाचकप्रिय ठरल्याचे त्याकाळातही जाणवत होते. त्याविषयीच्या चांगल्या प्रतिक्रिया

लेखी स्वरुपात पत्रकारांना मिळत होत्या. त्याचबरोबर मुलाखत लेखन प्रकाराबाबत नाखुशी दर्शवणारेही तितकेच होते. याचीही नोंद घ्यावी लागते. युरोपातील अनेक छोट्या देशांच्या मुलाखती (ब्राझील, पर्शिया, तुर्कस्तान) प्रसिद्ध होत होत्या. याबाबत 'टाइम्स' सारख्या दैनिकांनी विशेष प्रयत्न केले असल्याचे दिसते. आज मुलाखतकर्त्याला ज्याची मुलाखत घेतली आहे, त्याला विश्वास देऊन, ती मुलाखत टिकेल अशा रीतीने लिहावी लागते. अर्थाचा विपर्यास करणे, सांगितलेले नाही असे काहीतरी नमूद करणे असे करता येत नाही. टाइम्सचे प्रतिनिधी आणि ज्येष्ठ पत्रकार डब्ल्यू.टी.स्टेड यांनी मुलाखत हा प्रकार इंग्लंड आणि परिसरात लोकप्रिय केला. स्टेड स्वतः एका सायं. दैनिकाचे संपादक होते. १८८४ च्या पहिल्या सहा महिन्यात त्यांनी ७९ मुलाखती घेतल्या आणि या नव्या पत्रकारिता स्वरुपाला लोकप्रिय केले. असे सिल्हेस्टर यांनी नोंदविले आहे. इंग्रजी वृत्तपत्रांच्या क्षेत्रात मुलाखतीला मिळणारी प्रतिष्ठा आणि भरीव स्थान पाहून स्टेडना आनंद झाला होता.

अमेरिकेत याच काळात 'जोसेफ पुलित्झर' यांनी 'मुलाखत' हा लेखनप्रकार लोकप्रिय केला. 'न्यूयॉर्क वर्ल्ड' या दैनिकात पुलित्झर यांनी रोजच्या रोज नामवंतांच्या मुलाखतींची मालिकाच सुरु केली होती. राणी व्हिक्टोरिया, अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष यूलिसिस ग्रँट यांच्या पुलित्झर यांनी घेतलेल्या मुलाखतींनी 'न्यूयॉर्क वर्ल्ड'ला वेगळा चेहरा मिळाला होता. यावेळी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना बारकावे लक्षात घेऊन मुलाखती कशा घ्यायच्या याविषयी मार्गदर्शन केले होते. ते मार्गदर्शन आजही उपयुक्त ठरणारे आहे.

आपल्याकडेही मुलाखत हे अभिव्यक्ती माध्यम म्हणून गेल्या सत्तर ते ऐंशी वर्षात अधिक जोमाने विकसित झाले आहे. अभ्यासपूर्ण आणि लेखस्वरुपात येणाऱ्या विस्तृत मुलाखती हा आता वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा महत्त्वाचा भाग बनला आहे. दैनिकांबरोबरच, साप्ताहिके, मासिके, रविवारच्या विशेष पुरवण्या आणि दिवाळी अंकात मुलाखतींना अग्रस्थान मिळते आहे. राजकारणात व समाजकारणात होणारी स्थित्यंतरे, खेळाबरोबरच नाटक, चित्रपट, संगीत, चित्रकला, साहित्य, स्थापत्यकला, आरोग्य या कलामाध्यमांतील कलावंताविषयी वाटणारे कुतूहल, वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींची मते जाणून घेण्याची जिज्ञासा इ. गोष्टीमुळे मुलाखती वाचणारा एक वाचक वर्ग तयार झाला आहे.

मराठीत मुलाखतवजा लेखनाला प्रारंभ इ. स. १९२८ च्या सुमारास झाला असे मानले जाते. 'मी आणि माझे लेखन' या मथळ्याखाली विविध लेखकांना प्रश्नमालिका पाठवून त्याची उत्तरे मागविली जात व ती 'अरुण' या मासिकातून प्रकाशित केली जात असत. तत्कालीन वाचकांनी या 'अरुण' मासिकातील मुलाखतवजा लेखनाला भरभरुन दाद दिली होती. इ. स. १९२८ नंतर 'आशा', 'चित्रा', 'विहार', 'पूर्णिमा', 'सह्याद्री' इत्यादी नियतकालिकांतून विविध क्षेत्रातील नामवंतांच्या मुलाखती प्रसिद्ध होऊ लागल्या. इ. स. १९४० च्या आसपास शं. वि. पर्वते यांचा 'मी घेतलेल्या मुलाखती अर्थात वादसंवादातील व्यक्तिदर्शने', ह. वि. देसाई यांचा 'मोठ्यांच्या मुलाखती' तर य. गो. जोशी यांचा 'अनौपचारिक मुलाखती' असे तीन मुलाखतसंग्रह प्रकाशित झाले. इ. स. १९६० नंतर 'दीपावली', 'ललित', व अन्य वाङ्मयीन नियतकालिकांतून मुलाखतींना

स्थान मिळत गेले. यातून प्रभाकर अत्रे यांचा 'कथा सृजनांची', जयवंत दळवी यांचा 'साहित्यिक गप्पा' विजया राजाध्यक्ष यांचा 'संवाद', गिरिजा कीर यांचा 'जगावेगळी माणसं', 'अनोळखी ओळख' इ. गो. म. कुलकर्णी यांचा 'दलित साहित्य प्रवाह आणि प्रतिक्रिया' असे अनेक महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. शिवाय दिवाळी अंकातून प्रसिद्‌ध होत असलेल्या दर्जेदार मुलाखतींचा एक वाचकवर्ग निर्माण झाला आहे.

### ४.२.४ मुलाखतीचे तंत्र :

मराठीत मुलाखतीच्या तांत्रिक बाबींची चर्चा श्री. रा. टिकेकर यांनी 'बातमीदार' या आपल्या पुस्तकात केली आहे. याच पुस्तकाच्या शेवटच्या भागात गो. म. लाड यांनी 'मुलाखत' या विषयावर एक छोटेशे टिपण जोडलेले आहे. यात मुलाखतीचे महत्त्व स्पष्ट करुन मुलाखत घेण्याबाबतच्या काही सूचनांचा निर्देश केला आहे. आज भारतात जवळ जवळ सर्वच भाषात 'मुलाखत' पत्रकारिता प्रकाराचा सिलसिला सुरु आहे. मुलाखतीच्या तंत्रातील ठळक बदल पाहात असताना नवनव्या गोष्टी आपल्या लक्षात येत आहेत. पूर्वीच्या काळी टेपरेकॉर्डरसारखी साधने नव्हती. आजच्या सारखी मोबाईल, कॅमेरा ही साधनेही नव्हती. त्यामुळे मुलाखत लेखन करताना त्याला आपल्या स्मरणावरच विसंबून राहावे लागते. मुलाखत घेताना आणि नंतर निवड करताना पत्रकार अथवा मुलाखतकारावर एक नैतिक बंधन असे आणि ते म्हणजे मुलाखतीची प्रत दाखवण्याचे. त्यामुळे अपुरे, अर्धवट किंवा वेगळे असे काही प्रसिद्‌ध होण्यावर बंधने पडत आणि ते योग्यही असायचे. आजही ही पद्‌धत टिकून आहे.

अभ्यासपूर्ण आणि लेख स्वरुपात येणाऱ्या विस्तृत मुलाखती हा आता वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा एक भाग बनला आहे. अनेक मुलाखती गाजत असतात, त्यावर चर्चा होत राहतात. माध्यमांमुळे चर्चेचे, मनोगताचे वातावरण तयार होत असते. त्याचा परिणाम आणखी नवीन विषय निर्माण होण्यावर होत असतो. चांगले मुलाखतकार आता माध्यमांच्या काळात महत्त्वाच्या व्यक्ती बनले आहेत. कुमार केतकर, सुधीर गाडगीळ, चेतन दातार ही मराठी मुलाखतकारांची नावे वानगी दाखल सांगता येतील, तर हिंदीमध्ये राजीव शुक्ला, रजत शर्मा, वीर संघवी, करण थावर, राजदीप सरदेसाई ही नावे चमकू लागली आहेत.

'आप की अदालत' किंवा 'जनता की अदालत' सारख्या मुलाखतींच्या कार्यक्रमातून रजत शर्मा यांनी अभ्यासपूर्ण, नेटक्या आणि चर्चेत केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीची जिवंत मुलाखत घेण्याचे तंत्र विकसित केले. 'रु-ब-रु' या कार्यक्रमात अतिशय सौम्यपणे राजीव शुक्ला प्रश्न विचारत राहतात आणि मुलाखत देणाऱ्या व्यक्तीची कशी गोची होत आहे, हे आपण पाहू शकतो. वीर संघवी हे ज्येष्ठ पत्रकार आहेत. 'स्टार ट्रेक' या कार्यक्रमात चित्रपट, कला आणि साहित्य जगताशी संबंधित मुलाखती ते अतिशय खेळकरपणे घेत असतात. त्यामुळे त्या मुलाखती प्रेक्षणीय आणि वेगळ्या होतात. करण थापर यांच्या मुलाखतीच्या शैलीने एक आक्रमकपणा वातवरणात निर्माण होतो. त्यांनी तत्कालीन संरक्षणमंत्री असलेले जॉर्ज फर्नांडिस यांची घेतलेली मुलाखत विशेष गाजली. करण थापर यांचे नेमके प्रश्न मुलाखत देणाऱ्या व्यक्तीच्या मर्मावर आघात करणारे आणि उत्तरावरुनही निर्माण होणारे उपप्रश्न आणखी कोंडीत पकडणारे असे असतात. स्टार, झी, सोनी या वाहिन्यांनी असे विविध मुलाखतकार आपल्यासमोर ठेवले आहेत. मुख्यतः या सगळ्याच मुलाखती किंवा

तद्नुषंगिक कार्यक्रम हे वार्तामूल्याशी संबंधित असतात. मात्र चांगल्या मुलाखती वृत्तपत्रासाठी, नियतकालिकासाठी लिहिण्याच्या कामी live मुलाखतींचा निश्‍चित उपयोग होत असतो.

मुलाखत विषयाचे वेगळे रुप बी. बी. सी. या जगप्रसिद्ध प्रक्षेपण संस्थेने आपल्या 'Hard Talk' या कार्यक्रमातून दाखवले आहे. या कार्यक्रमात मुलाखतकर्ता समाजाच्या विविध थरांतील मान्यवरांशी संपर्क साधत असतो. मुख्यतः लंडनमध्ये येणारे जगातील पाहुणे 'Hard Talk' च्या मुलाखत कार्यक्रमात निमंत्रित केले जातात. उदा. अमिताभ बच्चन, बेनझीर भुट्टो, शोभा डे, माधुरी दीक्षित या मान्यवरांच्या मुलाखती या कार्यक्रमात घेतल्या आहेत. आज इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी जग व्यापलेले असताना मुलाखतीचे हे वेगळेपण लिहिणाऱ्या लोकांनी जाणीवपूर्वक लक्षात घेणे आवश्यक आहे. बी. बी. सी. च्या या कार्यक्रमात २००० साली किम फूक नावाची एक चाळीशीतील महिला निमंत्रित करण्यात आली होती. कोण ही किम? असा प्रश्न मनात निर्माण होत असतानाच त्या मुलाखतीने साऱ्या प्रेक्षकांच्या मनाचा कब्जा घेतला आणि एक वेगळाच विषय मांडण्याचे समाधान मुलाखतकर्त्याला मिळाले. इ. स. १९७० ते १९७२ च्या दरम्यान अमेरिकेने व्हिएतनामवर हल्ला केला होता. एका बॉम्ब हल्ल्यात व्हिएतनामचे लोक सैरावैरा पळत असल्याचे छायाचित्र साऱ्या जगभर प्रसिद्ध झाले होते. या छायाचित्रात ७ ते ८ वर्षांची किम फूक अंगावरचे जळके कपडे फेकून वस्त्रहीन अवस्थेत पळताना दिसत होती. हिच किम त्या दिवशी बी. बी. सी. च्या मुलाखतीत बोलत होती आणि आपल्या त्या दिवशीच्या अनुभवांना वाट करुन देत होती.

मुलाखतकर्त्याने असे विषय जाणीवपूर्वक निवडायचे असतात. त्याबाबत पूर्वतयारी आणि काळाचे भान याला विशेष महत्त्व असते. पत्रकार म्हणून सगळेच विषय लिहावे लागतात. हाताळावे लागतात पण या सर्वात महत्त्वाचे असते विषयाचे वेगळेपण आणि पत्रकाराला असलेले काळाचे भान. मराठी अथवा भाषिक वृत्तपत्रात मुलाखती घेण्याची निमित्ते अथवा कारणेही ठरलेली आहेत. साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी निवड, साहित्य अकादमीचा पुरस्कार, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार, एखादी कलाकृती (नाटक, चित्रपट, चित्र अथवा कादंबरी) चर्चेचा विषय होणे, एखादी सामाजिक, राजकीय भूमिका घेतल्यानंतर उठलेले वादळ, एखाद्या नव्या आंदोलनाची घोषणा असे साधारणतः विषय मुलाखत घेण्यासाठी नेहमीच महत्त्वाचे ठरु लागले आहेत. याच संदर्भातील मुलाखतींनी वाचकांना विशेष समाधान मिळाल्याचे आढळून आले आहे.

याबाबतीत काही उदाहरणे द्यायला हवीत. राजू शेट्टी यांनी १५ वर्षापूर्वी शेतकऱ्यांचे आंदोलन ऊसाच्या प्रश्नावर सुरु केले होते. त्यानंतर त्यांनी 'स्वाभिमानी शेतकरी संघटना' स्थापन करुन पश्चिम महाराष्ट्रातील ऊसाचे आंदोलन संपूर्ण राज्यभर आणि देशभर नेले. ऊसाच्या एफआरपी प्रमाणे ऊसाला भाव मिळाला पाहिजे ही मागणी करत राजू शेट्टी पुढे आले. ते पुढे लोकसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. या काळात पत्रकार विशेष मुलाखतीसाठी राजू शेट्टी यांना घेरत असत. आण्णा हजारे, शरद जोशी, गो.रा.खैरनार, छगन भुजबळ, शरद पवार, अविनाश धर्माधिकारी अशी अनेक नावे सांगता येतील. मुलाखतीत विचारले जाणारे प्रश्न, त्याची मान्यवरांनी दिलेली उत्तरे यासाठी आवर्जून वाचायला हवीत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा विचार किती विविधांगी आहे, हे या मुलाखतीमधून लक्षात येते.

प्रासंगिक अथवा ताज्या विषयावरील मुलाखतींचा आणि मुख्यतः प्रश्नोत्तरांच्या स्वरुपातील मुलाखतींची एक मालिका आपण टाइम्स ऑफ इंडियाच्या अंकात संपादकीय पानावर रोज वाचू शकतो. यात बातमीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या अथवा मुंबई-दिल्लीत आलेल्या बाहेरच्या नामवंतांच्या मुलाखती घेतलेल्या असतात. या मुलाखतीत त्या व्यक्तीचा संक्षेपात परिचय देऊन प्रश्नोत्तरांच्या स्वरुपात सादर केलेली असते. 'सकाळ', 'महाराष्ट्र टाइम्स', 'लोकसत्ता' या मराठी दैनिकांनी मुलाखतींची स्वतंत्र सदरे आपल्या अंकात नियमितपणे सुरु ठेवलेली आहेत. प्रासंगिक विषयाच्या मुलाखतीपासून ते विषयाच्या गाभ्यात डोकावण्यापर्यंतच्या अभ्यासपूर्ण मुलाखतींचा समावेश यात असतो.

वाङ्मयीन अथवा सांस्कृतिक क्षेत्राशी संबंधित महत्त्वपूर्ण व्यक्तींच्या मुलाखती हा अलिकडे सर्वच माध्यमांत लोकप्रिय झालेला प्रकार आहे. चित्रपट पुरवण्या अथवा वाङ्मयीन नियतकालिके यातून हे अनुभवता येते. ज्येष्ठ नामवंत नाट्य समीक्षक प्रा. माधव वझे यांनी नाट्यक्षेत्रातील नामवंतांच्या काही मुलाखती घेतल्या, त्या 'साप्ताहिक सकाळ' च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाल्या होत्या. प्रा. वसंतराव कानेटकर, डॉ. श्रीराम लागू, डॉ. विजया मेहता, नसरुद्दीन शहा, भक्ती बर्वे, नीना कुलकर्णी यांच्या मुलाखती आजही वाचकांच्या स्मरणात आहेत. या मुलाखती वाचताना लेखकाने स्वीकारलेला मुलाखतीचा ढाचा आपल्या लक्षात येतो. कलावंताचे एकूण चरित्र, त्याच्यासंबंधीची काही थेट प्रश्नोत्तरे असे या मुलाखतींचे एकंदर स्वरुप असल्याचे लक्षात येते. वझे हे रुढ अर्थाने पत्रकार-मुलाखतकार नाहीत. ते तज्ज्ञ, जाणकार मुलाखतकार आहेत. त्यामुळे त्यांच्या मुलाखती वाचताना आपल्याला अनेक नवे संदर्भ आणि माहिती मिळत असते. नाटकाशी संबंधित अनेक नवे घटक आणि तत्सम माहितीही आपल्या आकलनात भर टाकते. कलावंताचे, नाटकाचे वेगळेपण आपल्याला अधिक जाणतेपणाने लक्षात येते. या मुलाखती प्रदीर्घ असतात. त्यामुळे तपशीलवार आणि अभ्यासपूर्ण अशा त्यांच्या मुलाखतींच्या रुपाने आपण एक वेगळाच अनुभव घेत आहोत; असे जाणवते. या मुलाखतींनी आपण संबंधित व्यक्तींच्या एकूणच जीवनाशी वाचक-रसिक म्हणून नकळतपणे जोडले जातो.

काही व्यक्ती मुलाखत देण्यासाठी नाखूष असतात. त्यांच्या मुलाखती घेणे हे दिव्यच असते. पण पत्रकारांना ही आव्हाने स्वीकारावी लागतात. विश्राम बेडेकर, जी.ए.कुलकर्णी आणि ग्रेस ही मराठी विश्वातील त्रिमूर्ती. यांच्या फार थोड्या मुलाखती वाचायला मिळतात. विश्राम बेडेकर हे मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले तेंव्हा एका दैनिकाच्या पत्रकाराला त्यांची मुलाखत घ्यायची होती. त्या दरम्यान बेडेकरांना 'एक झाड दोन पक्षी' या त्यांच्या आत्मचरित्रपर ग्रंथाला साहित्य अकादमीचा पुरस्कारही लाभला होता. पण ही मुलाखत घेणे पत्रकाराला शक्य झाले नाही. त्यामुळे मराठी वाङ्मयाच्या एका तज्ज्ञ व्यक्तीकरवी ही मुलाखत घेतली गेली व प्रसिद्ध झाली. जी. ए. कुलकर्णी हे मराठीतील फार मोठे कथाकार. त्यांच्या कथांनी मराठी साहित्याला उंची, खोली लाभली आहे. त्यांच्या कथांची इंग्रजीत भाषांतरे झाली असती तर मराठीला नोबेल पारितोषिक मिळाले असते असे ज्येष्ठ समीक्षक शंकर सारडा यांनी वारंवार म्हटले आहे. पण जी. ए. ची मुलाखत त्यांच्या प्रसिद्धी पराङ्मुखतेमुळे कोणालाही घेता आली नाही.

कवी ग्रेस यांच्या कवितांनी रसिकांना वेड लावले होते. ग्रेसबद्दल एक वेगळेच कुतूहल जनमानसात

आहे. मराठी वाङ्मयाचे अनेक जाणकार वाचक ग्रेसचे चाहते आहेत. विदर्भात नागपूरस्थित कवी ग्रेस यांची विस्तृत अशी मुलाखत ज्येष्ठ समीक्षक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी घेतली होती. नागपूरहून त्याकाळी प्रसिद्ध होणाऱ्या दैनिक 'तरुण भारत' च्या रविवार अंकात ती प्रसिद्ध झाली होती. वाङ्मयाच्या अभ्यासकांना आणि ग्रेस यांच्या चाहत्यांना त्या मुलाखतीने ग्रेस यांच्या बरेच जवळ नेले, हे येथे आवर्जून नोंदवावे लागते. ग्रेसची जीवनदृष्टी, त्यांचा पूर्वकाळ, त्यांचा व्यासंग या साऱ्याचे सम्यक दर्शन त्या मुलाखतीतून घडते.

मुलाखतीमधून एखादा चांगला माणूस किंवा एखादा विषय शोधणे आणि त्याची सुसंगत मांडणी करणे हेही एक वेगळे लेखन आहे. त्याचे येथे बोलके उदाहरण म्हणून महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचे देता येईल. यशवंतराव चव्हाण हे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचे निकटचे सहकारी होते. यशवंतराव चव्हाण एक व्यासंगी, कल्पक आणि चिकित्सक वाचक होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गोफ गुंफण्याचे काम विविध मुलाखतींच्या आधारे 'कृष्णाकाठचा माणूस' या पुस्तकातून अरुण शेवते यांनी केले आहे. मा. वसंतदादा पाटील, मा. शरद पवार, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आदींच्या मुलाखती या पुस्तकात त्यांनी घेतल्या आहेत. यशवंतराव चव्हाण यांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व शोधण्याचा एक वेगळा प्रयत्न या माध्यमातून शेवते यांनी केला आहे. या मुलाखती वाचनीय आहेत. महाराष्ट्रातल्या राजकारणातले, सांस्कृतिक क्षेत्रातले अनेक संदर्भ यातून समजतात आणि यशवंतराव चव्हाण यांचबरोबरच महाराष्ट्राच्या एकूण स्वभावाचीही आपल्याला ओळख होते. याच्याच जोडीने वसंतदादा पाटील, शरद पवार ही ज्येष्ठ नेते मंडळी यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल किती आत्मीयता, आदर भावना बाळगणारी होती, हेही जाणवते.

मुलाखतीचा असा प्रकार चित्रपटावर लिहिणारे सुभाषचंद्र जाधव यांनी वापरला आहे. चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंतांच्या आणि वार्धक्याकडे झुकलेल्या, बदलत्या काळाच्या ओघात झगमगाटाच्या पडद्याआड विस्मरणात गेलेल्या अशांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या आहेत. संगीतकार रवी, ओ.पी.नय्यर, मेहमूद, मुक्री, निरुपा रॉय, देवेन वर्मा, जॉनी वॉकर यांच्या मुलाखतींचे संकलन असलेले ''वो भूली दास्तॉं' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. अतिशय अनौपचारिक रितीने मुलाखत घेण्याची जाधव यांची पद्धत आहे. या कलावंतांच्या जीवनातल्या व्यथा, वेदना आणि आनंदाचे क्षण त्यांनी या मुलाखतीत जिवंत केले असल्याचे लक्षात येते. चित्रपटांची पार्श्वभूमी, त्यातील खुमारी आणणारे प्रसंग यांचे तपशील यामुळे जाधव यांनी घेतलेल्या मुलाखती विलक्षण रंगतात. केवळ एखाद्या विषयाची आवड अथवा त्यात रुची असून चालत नाही, त्यापाठोपाठ त्याचा अभ्यासही करावा लागतो. जाधव यांनी याकडे विशेष लक्ष दिल्याचे दिसते. मुलाखतीतला अनौपचारिकपणा, कलावंताच्या घरातील वातावरण, कलावंतांचे स्वभाव समजून घेण्यासाठी जाधव यांचे 'वो भूली दास्तॉं' हे मुलाखतींचे पुस्तक वाचायला हवे.

### ४.२.५ मुलाखत पर्व :

मुलाखत उत्तम होण्याच्या दृष्टीने मुलाखतकाराला काही गोष्टींची ओळख असणे आवश्यक असते. मुलाखतकाराने योग्य ती दक्षता घ्यायला हवी. त्याचा विचार येथे करुया.

१. ज्यांची मुलाखत घ्यायची आहे, ती व्यक्ती कोण आहे? कोणत्या क्षेत्रातील आहे? तिची मुलाखत आपण का घेणार आहोत? या प्रश्नांचा विचार मुलाखतकाराने प्रथम केला पाहिजे. संबंधित व्यक्ती ज्या क्षेत्रातील आहे त्या क्षेत्राविषयी मुलाखतकाराला माहिती असणे आवश्यक आहे. व्यक्तीचे त्या क्षेत्रातील नेमके स्थान कोणते, याची माहिती मुलाखतकाराला असावी.

२. मुलाखत घेत असताना जे प्रश्न विचारले जाणार आहेत, त्याची टिपणे मुलाखतकाराने तयार करुन ठेवली पाहिजेत.

३. मुलाखतदात्याचा वयोगट, त्याची प्रकृती याबाबत मुलाखतकाराने माहिती संकलीत केलेली असली पाहिजे.

४. मुलाखतीत मुलाखतदात्याला विचारायचे प्रश्न लिहून झाल्यावर ते प्रश्न संबंधित व्यक्तीला दाखवावेत व त्यांची त्यास मान्यता घ्यावी.

५. मुलाखतीत मुलाखतदात्याने दिलेली उत्तरे लिहिण्यासाठी कागद, पेन, हाताखाली पॅड, टेपरेकॉर्डर यासारखी साधने बरोबर असावीत. आजच्या काळात मुलाखतीतील मजकूर टिपण्यासाठी अनेक साधने उपलब्ध आहेत. ती तंदुरूस्त असल्याची खात्री करावी.

६. मुलाखत घेण्यापूर्वी आपण तणावमुक्त राहावे. कोणताही दबाव आपल्यावर येणार नाही याची काळजी घ्यावी. मुलाखतदात्याशी संपर्क साधून वातावरणात मोकळेपणा आणावा

७. मुलाखत घेत असताना आपण मुलाखतकार आहोत याची जाणीव आपल्याला असली पाहिजे.

८. मुलाखतकाराने मुलाखतीची वेळ आणि स्थान निश्चित करावे.

९. मुलाखत घेत असताना वाचकांना/प्रेक्षकांना डोळ्यासमोर ठेवत भाषाशैली वापरावी. अलंकारिक, क्लिष्ट शब्द येणार नाहीत याची दक्षता बाळगावी. अशा प्रकारे मुलाखतकाराने मुलाखतपूर्व तयारी करुन मुलाखत घ्यावी म्हणजे ती मुलाखत चांगली, वाचकांना, रसिकांना आवडणारी होण्यास मदत होते.

### ४.२.५.१ वृत्तपत्रासाठी मुलाखतलेखन :

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळातही वृत्तपत्रांचे स्थान टिकून राहिले आहे. रोज सकाळी लज्जतदार चहाची चव घेत असताना सोबत वृत्तपत्र असेल तर चहाचा लज्जतदारपणा आणखी वाढण्यास मदत होते. वृत्तपत्र वाचणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. वृत्तपत्रात बातमीशिवाय इतर अनेक बाबी महत्त्वाच्या असतात. त्यातील एक बाब म्हणजे वृत्तपत्रीय मुलाखत होय. वृत्तपत्रातील मुलाखतीचे दोन प्रकार पडतात. एक म्हणजे नवी माहिती मिळविण्यासाठी घेतलेली मुलाखत त्याला इंग्रजीत 'न्यूज इंटरव्ह्यू' म्हणतात. आणि दुसरा प्रकार म्हणजे एखाद्या विशिष्ट विषयावरील चर्चा व्हावी अशा प्रकारे माहिती मिळविण्याच्या हेतूने घेतलेली मुलाखत, याला 'फीचर इंटरव्ह्यूज' असे म्हणतात. विशिष्ट विषयावरील चर्चा मुलाखतीमुळे प्रकाशात येते. मुलाखत घेणे व मुलाखत लिहिणे या दोन्हींचे विशिष्ट तंत्र आहे. वृत्तपत्राप्रमाणेच दूरचित्रवाणी,

रेडिओ या माध्यमांत मुलाखतींचा वापर अधिक होतो. परंतु वृत्तपत्रात मुलाखती प्रसिद्ध करताना भाषिक कौशल्य अधिक प्रमाणात उपयोगात येते. कित्येकदा उत्कृष्ट मुलाखतलेखनाचा नमुना वाङ्मय गुणांचे दर्शन घडविणारा ठरतो.

● **वृत्तपत्रीय मुलाखतकाराची भूमिका :**

मुलाखत म्हणजे दोन व्यक्तींचा प्रश्नोत्तर स्वरुपात होणारा संवाद असे ढोबळमानाने म्हणता येते. परंतु येथे प्रश्न विचारणारा मुलाखत दात्याला प्रश्न विचारुन त्याचे व्यक्तिमत्त्व कसे खुलवतो, त्यासाठी प्रश्नकर्ता प्रश्नांची मांडणी कशी करतो यावर त्या मुलाखतीचे यश अवलंबून असते. ज्याची मुलाखत घ्यायची आहे, त्याचा आत्मविश्वासास सहाय्यभूत होतील असे प्रश्न मुलाखत घेणारा कसे विचारतो, हे त्यात महत्त्वाचे असते. व्यक्तिमत्त्वाचे आविष्करण करणारी मुलाखत यशस्वी समजली जाते. प्रश्न विचारण्याचा दृष्टिकोण, भूमिका, त्यांची मते जशी मुलाखतीतून प्रकट होतात तसेच ज्याची मुलाखत घेतली जाते त्याचा दृष्टिकोण, त्याची मते, त्याची भूमिका स्पष्ट होणे महत्त्वाचे असते.

मुलाखत दोन व्यक्तीतील संवाद होय याची चर्चा आपण पाठीमागे केलेली आहे. शं.वि.पर्वते यांनी गाजलेल्या व्यक्तींच्या घेतलेल्या मुलाखतींच्या पुस्तकास 'मी घेतलेल्या मुलाखती अथवा वादसंवादातील व्यक्तिदर्शन' असे समर्पक नाव दिले आहे. याचाच अर्थ मुलाखत म्हणजे व्यक्तिदर्शन, ते जितके प्रसन्न, खुलविणारे, मनमोकळे आणि जिवंत वाटेल तितकी मुलाखत उत्कृष्ट ठरेल.

● **वृत्तपत्रासाठी मुलाखतीची तयारी कशी करावी? :**

वृत्तपत्रासाठी ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे, त्या व्यक्तीविषयी जितकी माहिती मिळवता येईल तितकी माहिती मिळवून ठेवावी, मुलाखतीत जे प्रश्न विचारायचे त्याची प्रश्नावली लिहून काढावी, त्यामुळे मुलाखतीची चौकट तयार होण्यास मदत होते. पत्रकाराने आपली भूमिका दुसऱ्याला जास्तीत जास्त समजून घेण्याची आहे, याचे भान बाळगावे. त्यासाठी आत्मविश्वासाने मुलाखतीला जाता आले पाहिजे; पण त्याचबरोबर अतिउत्साह देखील दाखवू नये, नाहीतर ज्याची मुलाखत घ्यायची त्याच्यापेक्षा आपणच आपली माहिती सांगत राहायचो आणि याचा वाचकांना अडथळा वाटण्याची शक्यता असते.

**अ) प्रश्न विचारण्यातील कौशल्य :** वृत्तपत्रासाठी मुलाखत घेत असताना प्रत्यक्ष गाभ्याला हात घालणारे प्रश्न विचारावेत, परंतु मुलाखत देणाऱ्या व्यक्तीस अवमान वाटेल, त्याची उलटतपासणी होत आहे, त्याला अडचण वाटेल असा प्रकार करु नये. त्यांच्याविषयी पूर्ण सहानुभूती ठेवून प्रश्न विचारावेत. त्यांचा विश्वास संपादन करुन मुलाखत घ्यावी.

**ब) टिप्पणे घेणे :** वृत्तपत्रासाठी मुलाखत देणाऱ्यासमक्ष टिपणे घेऊ नये, त्याच्या परवानगीने ध्वनिफितीचा वापर करावा. परंतु त्यामुळे मुलाखत देणाऱ्यास दडपण येऊ नये. त्याची महत्त्वाची वाक्ये किंवा विचार मुलाखतीनंतर पुन्हा त्यांना वाचून दाखवून खात्री करावी. असे केले म्हणजे प्रभावी व अचूक मुलाखत लिहिता येते. मुलाखतीच्यावेळी मोकळे प्रसन्न वातावरण असावे.

### ४.२.५.२ वृत्तपत्रासाठी मुलाखतलेखन :

आपल्या टिपणावरुन मुलाखतीत कोणता प्रश्न महत्त्वाचा ठरला हे लक्षात येते. त्यावरुन मुलाखतीचे शीर्षक ठरविता येते. तसेच मुलाखतीच्या प्रारंभीच शिरोभाग असा लिहावा की, मुलाखत कशाबद्दल आहे हे वाचकांच्या लक्षात यावे. मुलाखतीच्या लेखनातून ज्याची मुलाखत घेतली आहे, त्याचे व्यक्तिमत्त्व प्रकट झाले पाहिजे. त्यासाठी मुलाखत घेणाऱ्यास चांगल्या निरिक्षणाची सवय असायला हवी. त्या व्यक्तीचे वेगळेपण चट्कन लक्षात आले पाहिजे. मुलाखत लिहिताना साहित्यगुणांच्या आविष्कारास वाव असतो. परंतु त्यात कृत्रिमता वाटू नये, सहजपणा असावा. चांगली मुलाखत साहित्याचा नमुना ठरु शकते. शिवाय महत्त्वाची व्यक्ती, विषय संवादामुळे खुले होतात. लोकांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले जाते. आणि नवी माहिती, जुन्या माहितीतील नवे दृष्टिकोण स्पष्ट होतात. त्यामुळे मुलाखती हा पत्रकारितेतील महत्त्वाचा व आवश्यक भाग झाला आहे. त्यामुळे लेखकांनी-पत्रकारांनी जागरुक राहणे, अवधान ठेवणे आवश्यक आहे. आपण लिहिलेली मुलाखत जाणकार वाचक वाचणार आहेत, याचे भान ठेवले पाहिजे. शेवटी या लेखनातून आपण वाचकांशी संपर्क साधतो. समाजाशी संवाद साधत असतो. या दृष्टीने 'मुलाखत' या लेखनाकडे पाहावे.

- **आकाशवाणी अथवा नभोवाणीवरील मुलाखतलेखन :**

वृत्तपत्र, साप्ताहिक, मासिक यामधून अनेक मान्यवरांच्या मुलाखती देण्याची पद्धत लोकमान्य झाली होती. ती लोकांना वाचायला आवडत असे. परंतु काळ जसा बदलत गेला आणि नवी माध्यमे जशी येऊ लागली तसे वृत्तपत्रातील मुलाखत लेखनाच्या मर्यादा ध्यानात येऊ लागल्या. वृत्तपत्रातील मुलाखतही छापील असते. त्यामुळे लिहता, वाचता येणाऱ्यांना या मुलाखतीचा उपयोग होत असे. आकाशवाणीवरील मुलाखत मात्र श्राव्य स्वरुपाची असते. ती समाजातील सर्व स्तरावरील लोकांना ऐकता येते. त्यामुळे आकाशवाणीवरील मुलाखतीचे वेगळेपण काय आहे? असा प्रश्न पडणे साहजिकच आहे. पण जरा बारकाईने विचार केला वृत्तपत्रातील मुलाखतीपेक्षा आकाशवाणीवरील मुलाखती बऱ्याच वेगळ्या असतात; पण त्या श्रोत्यांच्या मनावर परिणाम करणाऱ्याही असतात.

आकाशवाणीवरील मुलाखतीत महत्त्वाची बाब म्हणजे ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यायची त्याच्याच आवाजात ध्वनिमुद्रित केलेली असते. वर्तमानपत्रात छापलेली मुलाखत वाचकांना दुसऱ्या दिवशी वाचावी लागते. आकाशवाणीवरील मुलाखत प्रत्यक्ष मुलाखत देणाऱ्याच्या आवाजात ऐकायला मिळत असल्याने ती जास्त प्रभावी वाटते. आपल्या आवडत्या नेत्याची, कलाकाराची, खेळाडूची मुलाखत त्याच्या आवाजात ऐकणे आनंद देणारी असते.

- **आकाशवाणीवरील मुलाखत कशी घ्यावी? :**

मुलाखत ही बातमी स्वरुपात नसून ती मुलाखत देणाऱ्याचे मत प्रदर्शन असते, हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. मुलाखत घेण्यापूर्वी प्रश्नकर्त्याने आधी स्वतःची तयारी केली पाहिजे. त्या विषयाचा, व्यक्तीचा अभ्यास असायला हवा. एखादी व्यक्ती अष्टपैलू स्वभावाची असते. अनेक गोष्टी एकाचवेळी प्रभावीपणे करण्याची त्या

व्यक्तीची क्षमता असते. अशावेळी विषयातून विषय निघत गेल्यास मुलाखत भलतीकडे जाण्याची शक्यता असते. त्यावेळी एकच विषय निवडून त्यावर मुलाखत घणे हे मुलाखत घेणाराचे कौशल्य असते.

आकाशवाणीवरील मुलाखत घेणाऱ्याचा आवाजही ध्वनिमुद्रित होत असतो. त्यामुळे नेमका प्रश्न विचारण्याचे भान राखावे लागते. उत्तर देणाऱ्याला प्रश्न जसा चटकन कळावा तसेच श्रोत्यांनाही तो कळायला हवा. प्रश्नकर्त्याने स्वतःच्या ज्ञानाचे प्रदर्शन करायचे नसते. स्वतः कमीत कमी बोलून मुलाखतदात्याला जास्तीत जास्त बोलकं करावे लागते. त्यासाठी प्रतिसादात्मक अशा प्रतिक्रिया अधूनमधून द्याव्या लागतात.

- **आकाशवाणीवरील मुलाखत घेताना पाळावयाची पथ्ये :**

आकाशवाणीवरील मुलाखत घेताना पुढील गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

१. सर्वप्रथम मुलाखत देणाऱ्याची परवानगी व वेळ घ्यावी. त्यांच्या घरी थेट जाऊ नये.

२. मुलाखत स्टुडिओत घ्यायची की बाहेर हे ठरवावे. स्टुडिओबाहेर घ्यायची असेल तर चांगल्या दर्जाचे ध्वनिक्षेपक, ध्वनिमुद्रक, टेप्स इत्यादी गोष्टी बरोबर घ्याव्या लागतात. त्या तांत्रिकदृष्ट्या निर्दोष असल्याची खात्री करुन घ्यावी.

३. मुलाखत स्टुडिओबाहेर असेल तर तिथे इतर कोणतेही अनावश्यक आवाज मुद्रित होणार नाहीत, याची काळजी घ्यावी. यासाठी जागेच्या निवडीबाबत चोखंदळ असावे. क्वचित प्रसंगी मुलाखत देणाऱ्याचा आणि मुलाखत स्थळाचा परस्पर संबंध असतो. अशावेळी इतर आवाजही मुलाखतीत पूरक ठरु शकतील, पण त्या आवाजाचे मुलाखतीवर आक्रमण होऊ नये.

४. मुलाखतीसाठी निवडलेले प्रश्न काही काळ अगोदरच मुलाखत देणाऱ्याला पाठवून द्यावेत. म्हणजे त्यालाही तयारी करायला सोयीचे जाते. ऐन वेळी नव्याच प्रश्नाची गुगली टाकणे शक्यतो टाळावे. त्यामुळे उत्तर देणाऱ्याची अडचण होण्याची शक्यता असते. तसेच मुलाखत घेणाऱ्याची विद्वत्ता दिसण्याची शक्यता असते. ते मुलाखतीच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारे नसते.

५. मुलाखतकाराने आपण श्रोते आणि मुलाखत देणारा यांच्या मधला दुवा आहोत, हे पक्के ध्यानात ठेवले पाहिजे. त्यामुळे अनावश्यक बोलून मुलाखतीची चर्चा होणार नाही याची काळजी घ्यावी.

६. एखाद्या संवेदनशील मुद्द्यावर किंवा एखादया विषयावर मुलाखत घेताना दोन्ही बाजू प्रकाशात येतील याची काळजी घेतली पाहिजे. आपल्याला योग्य वाटेल अशीच बाजू लावून धरु नये.

७. अनेकदा मुलाखत घेत असताना मुलाखत देणाऱ्याच्या विरोधात प्रश्न विचारले पाहिजेत अशी मुलाखत घेणाऱ्याची समजूत होते. विशेषतः राजकीय स्वरुपाच्या मुलाखतींमध्ये हे पहायला मिळते. मुलाखत देणाऱ्याच्या विरोधात प्रश्न विचारु नयेत. त्यामुळे मुलाखतीचा तोल ढळण्याची शक्यता असते, तो कोणत्याही क्षणी ढळू न देणे मुलाखत घेणाराचे कौशल्य असते.

८. मुलाखतीत संवाद घडणे आवश्यक असते. मुलाखत घेणाऱ्याने छापील प्रश्न विचारायचे आणि

देणाऱ्याने छापील किंवा लिहून आणलेली उत्तरे द्यायची याने मुलाखत घेणारा, देणारा व ती ऐकणारे श्रोते यांपैकी कोणालाही समाधान देणारी ती मुलाखत ठरत नाहीत.

९. मुलाखत देणाऱ्याने विषयाची मांडणी नीट केली असेल, तर त्याचेच मत पुन्हा एकदा श्रोत्यांना सांगण्याच्या भानगडीत पडू नये. त्याची कठिण भाषा थोडक्यात सोपी करुन संवादाला पूरक असे वातावरण निर्माण करणे आवश्यक असते, पण तेही जरुर तेथेच करावे.

१०. मुलाखत देणाऱ्याशी आधीच जर मैत्री असेल तर खेळीमेळीच्या वातावरणात मुलाखत पार पडते. त्यासाठी मुलाखतीपूर्वी त्याच्याशी गप्पा मारल्या, जरा बातचीत केली तर ती व्यक्तीही थोडी मोकळी होते. याचा अतिशय सकारात्मक परिणाम मुलाखतीवर होत असतो.

- **आकाशवाणीवरील मुलाखतींचे प्रकार :**

आकाशवाणीवरील मुलाखतीचे काही प्रकार सांगता येतील यामध्ये प्रामुख्याने व्यक्तिगत मुलाखत (feature/personal interview), गट मुलाखत (group interview), वर्गीय मुलाखत (class interview) आणि जन मुलाखत (mass interview) असे चार प्रकार आहेत.

**अ) व्यक्तिगत मुलाखत** (feature/personal interview) **:** आकाशवाणीवरील मुलाखतीमध्ये एखाद्या विषयावर प्रकाश टाकण्यासाठी विशिष्ट व्यक्तीची मुलाखत घेण्यात येते. एखादा महत्त्वाचा विषय लोकांना समजावा यासाठी अशा मुलाखती घेतल्या जातात. उदा. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या भावी योजनांबद्दल ज्येष्ठ संगणक तज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांची मुलाखत किंवा मराठी चित्रपटांच्या सद्यस्थितीबाबत दिग्दर्शक अमोल पालेकर इ. मात्र याच मुलाखती विशिष्ट विषय डोळ्यासमोर न ठेवताही त्या त्या व्यक्तीचे चित्रण करण्यासाठी घेता येतात. त्यामुळे विशिष्ट विषयासाठी त्या क्षेत्रातल्या जाणकार व्यक्तीची मुलाखत (future interview) आणि व्यक्तीचे जीवन समजावून घेण्यासाठी त्याची खास मुलाखत (personal interview) असेही याचे दोन भाग पाडता येतात.

**ब) गट मुलाखत** (group interview) **:** एखाद्या विषयावर त्या विषयाशी संबंधित अनेकांची मुलाखत घ्यावी लागते. एखाद्या विषयावर समान प्रश्न काढून ते संबंधित लोकांना विचारुन मुलाखती घेता येतात. उदा. हृदयविकाराचा झटका बसल्यानंतरचे प्राथमिक उपाय, हृदयविकार आणि आहार, व्यायाम इत्यादी अनेक पैलूंवर त्या त्या विषयातल्या विशेषज्ज्ञांच्या थोडक्यात मुलाखती घेऊन सादर करता येतात.

**क) वर्गीय मुलाखत** (class interview) **:** आपल्या आजूबाजूला अनेक चांगल्या गोष्टी घडत असतात. अनेकवेळा त्यामागे एकच व्यक्ती नसून एखादा समूह कार्यरत असतो. अशाप्रकारे विशिष्ट ध्येय ठेवून कार्य करणाऱ्या विशिष्ट वर्गाची मुलाखत घेता येते. पर्यावरण, अनाथ मुले, विधवा स्त्रियां, बचत गट इ. विषयी कार्य करणाऱ्या संस्थांच्या जबाबदार व्यक्तींच्या मुलाखती घेता येतात. संगीत, नृत्य, कला, नाटक यांसारख्या क्षेत्रात कार्याची चमक दाखवणाऱ्या वर्गाचीही मुलाखत श्रोत्यांच्या आवडीची असते.

**ड) जनमुलाखत** (mass interview) **:** समाजातील विविध प्रश्नात अनेक नागरिकांना आपले मतप्रदर्शन

करायचे असते. हेल्मेट सक्ती करावी की नाही? शहरात वन वे वाहतूक असावी की नाही? वैद्यकीय महाविद्यालयाचे शुल्क किती असावे?, माहितीचा अधिकारात बदल करावा काय? अशासारख्या विषयावर मत घेणे आवश्यक ठरते. सामान्यांना या विषयावर बोलण्यास प्रवृत्त करुन तो विषय श्रोत्यांपुढे मांडणे आवश्यकही असते.

आकाशवाणीवर प्रदर्शीत होणाऱ्या मुलाखतींचे असे असे विविध प्रकार आज प्रचलित आहेत. आकाशवाणीवरील मुलाखतींना महत्त्व आहे. मुलाखत देणाऱ्याचे विचार थेट त्यांच्याच तोंडून ऐकायला मिळतात. आकाशवाणीवर मुलाखतदात्याचा प्रत्यक्ष आवाज ऐकायला मिळत असल्याने मुलाखतीत रुची निर्माण होण्यास मदत होते. परंतु येथे मुलाखत घेणाऱ्याने आपली जबाबदारी नीट पाडली पाहिजे, तरच ती मुलाखत रंगते. रंगलेल्या मुलाखती श्रोते आपल्या मनाच्या एका कप्प्यात मोरपिसासारख्या जपून ठेवत असतात.

### ४.२.५.३ दूरचित्रवाणीवरील मुलाखत :

आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात खूप लोकप्रिय असलेले माध्यम म्हणून दूरचित्रवाणी ओळखली जाते. दूरचित्रवाणीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याने तिच्यातील विविधता प्रेक्षकांना भुरळ घालते. शिवाय दूरचित्रवाणी हे दृक-श्राव्य माध्यम असल्याने प्रेक्षकांना दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम घरबसल्या पहायला मिळत असल्याने त्याची लोकप्रियता चांगली आहे. दूरचित्रवाणीवर मनोरंजनाबरोबरच माहितीवर आधारित कार्यक्रम दाखविले जातात. त्यामध्ये चर्चा, संवाद, मुलाखत, निवडणूक निकाल विश्लेषण इ. कार्यकमांचा समावेश असतो. या सर्वांमध्ये एक समान धागा पाहायला मिळतो, तो म्हणजे या सर्वांमध्ये संवादाला प्राधान्य असते. मुलाखत हा एक असाच संवादमय कार्यक्रम दूरचित्रवाणी प्रेक्षकांसाठी आयोजित करीत असते. यापूर्वी आपण वृत्तपत्रासाठी मुलाखत आणि आकाशवाणीवरील मुलाखत याचे स्वरुप अभ्यासले आहे. यांपेक्षा दूरचित्रवाणीवरील मुलाखतीचे स्वरुप किंचितसे वेगळे असल्याचे जाणवते. त्याचा विचार येथे करुया.

- **दूरचित्रवाणीवरील मुलाखतीचे प्रकार :**

दूरचित्रवाणीवरील मुलाखतीचे मुख्य दोन प्रकार सांगता येतात.

१) पूर्वनियोजित, सविस्तर २) काही संक्षिप्त व आयत्यावेळी घेतलेल्या मुलाखती.

**१) पूर्वनियोजित, सविस्तर :**

पूर्वनियोजित मुलाखतीचे तीन प्रकार पडतात.

**अ) माहिती मिळविण्यासाठी घेतलेली मुलाखत :** ताजा संदर्भ असलेल्या एखाद्या घटनेसंबंधी तज्ज्ञांची मते जाणून घेण्यासाठी तसेच त्या विषयासंबंधी माहिती मिळविण्यासाठी मुलाखतीचे आयोजन केले जाते. त्याकरिता तज्ज्ञाला दूरचित्रवाणी केंद्रावर बोलावून त्याची मुलाखत घेतली जाते.

उदा. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी स्वयंरोजगार योजना सुरु झाली असेल आणि त्याविषयी संबंधित

योजनेच्या संचालकांची मुलाखत घेतली, तर त्या योजनेची सर्व माहिती मिळू शकते. संचालकांना त्या योजनेवर भाषण द्यायला लावले तर ते कंटाळवाणे होऊ शकते. कारण त्यात एकसुरीपणा येतो. त्या तुलनेत मुलाखत जिवंत वाटते. ती अधिक उपयुक्तही ठरु शकते. कारण सामान्य प्रेक्षकांना पडणारे प्रश्न मुलाखतकार जाणकार व्यक्तीला विचारु शकतो. मुलाखतीऐवजी जाणकार व्यक्तीने भाषण केले तर कदाचित सामान्य माणसाच्या मनातले प्रश्न अनुत्तरीत राहण्याची शक्यता असते. एखाद्या घटनेचे संभाव्य परिणाम, घटनेविषयी तज्ज्ञांची मते, इत्यादी जाणून घेण्यासाठी देखील अशाप्रकारच्या मुलाखती घेतल्या जातात. या मुलाखतींमध्ये प्रश्नांची उत्तरे देण्याकरिता त्या विषयातील तज्ज्ञ, अधिकारी व्यक्तीला बोलावण्याचा प्रयत्न केला जातो. त्या व्यक्तीचे त्या क्षेत्रातील कार्य, त्यातील अभ्यास, विषयाशी असलेला संबंध, इत्यादी निकष लावून मुलाखतदात्याची निवड केली जाते.

**आ) कामगिरीची दखल घेण्यासाठी घेतलेली मुलाखत :** फारशा प्रसिद्ध नसलेल्या, चारचौघासारख्या, पण आव्हानात्मक परिस्थितीत मोठी कामगिरी करुन दाखविणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेण्यासाठी अशा मुलाखतींचे आयोजन केले जाते. उदा. अपंग व्यक्तीने हिमालयातील एखादे शिखर सर केले तर त्याची थोडक्यात बातमी दिली जाते. परंतु पुरेसा वेळ असेल, तर त्या व्यक्तीची सविस्तर मुलाखतही आवर्जून घेतली जाते किंवा एखाद्या शास्त्रज्ञाने लावलेल्या शोधाची माहिती लोकांना कळावी यासाठी अशा मुलाखती घेतल्या जातात.

सामान्यांच्या असामान्य कर्तृत्वावर प्रकाश टाकणे हे या मुलाखतीचे उद्दिष्ट असते. मुलाखत मुलाखतदात्याच्या परिसरात चित्रीत केली तर अधिक परिणामकारक होते.

**इ) प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती :** विविध कारणांसाठी प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या जातात. परंतु बातम्याशी संबंधित कार्यक्रमात मुलाखत घेण्यासाठी कोणता तरी ताजा संदर्भ असणे आवश्यक आहे. उदा. चित्रपटातील दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाल्याबद्दल बी.आर.चोप्रा यांची मुलाखत घेऊन त्यांच्या कारकिर्दीचा आढावा मुलाखतकार घेऊ शकतो. क्रीडा स्पर्धा पुरस्कार मिळविणारे खेळाडू, नुकतीच सत्ता हातात घेतलेले मुख्यमंत्री, भारताच्या भेटीवर आलेले परदेशी पाहुणे, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक, इत्यादींच्या मुलाखती या प्रकारात मोडतात.

अशा मुलाखतीत पूर्व संमती घेतलेली असतेच; पण पूर्वसूचनाही दिलेल्या असतात. प्रत्यक्ष चर्चेसाठी किमान दहा मिनीटे तर जास्तीत जास्त ३० ते ४० मिनीटेही दिली जातात.

**२) काही संक्षिप्त व आयत्यावेळी घेतलेल्या मुलाखती :**

एखाद्या घटनेचे वार्तांकन करताना अशा मुलाखती घेतल्या जातात. त्याचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**अ) प्रत्यक्षदर्शी मुलाखत :** एखादी घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्या किंवा घडामोडीत सहभागी असलेल्या व्यक्तीची मुलाखत ही प्रत्यक्षदर्शी मुलाखत ठरते. ही मुलाखत आधी नियोजित करता येत नाही. तसेच मुलाखत

देणाराही ठरवता येत नाही. प्रश्न निश्चित करता येत नाहीत. मुलाखतदात्याला मुलाखत द्यावी लागणार आहे, याचीच कल्पना नसते. अशा व्यक्तीकडून नेमकी माहिती मिळविण्याचे कसब मुलाखतकाराकडे असणे आवश्यक असते.

**आ) धावती मुलाखत :** अनेकदा महत्त्वाच्या व्यक्ती ज्या ठिकाणी येणार असतील तेथे दूरचित्रवाणीचे वार्ताहर, छायाचित्रकार चित्रण करण्यासाठी तयार असतात. त्या महत्त्वाच्या व्यक्ती येता क्षणीच वार्ताहर एक-दोन प्रश्न विचारतात, त्यांची उत्तरे ती व्यक्ती थोडक्यात देते.

बातम्यामध्ये अशा प्रकारच्या धावत्या मुलाखती अनेकदा पहावयास मिळतात. उदाहरणार्थ सर्वोच्च न्यायालयाने एखाद्या प्रकरणात निर्णय दिल्यावर, आरोपी अथवा त्याचा वकील न्यायालयातून बाहेर येऊन त्याच्या खोलीकडे अथवा गाडीकडे जाताना त्यांना प्रश्न विचारण्याचा प्रयत्न दूरचित्रवाणीचे वार्ताहर करतात, असे चित्र आपण वारंवार पाहात असतो.

**इ) जनमत चाचणी :** एखाद्या महत्त्वाच्या घटनेविषयी सामान्य माणसांची मते जाणून घेण्यासाठी अशा प्रकारची मुलाखत घेतली जाते. उदाहरणार्थ पेट्रोलच्या किंमती अचानकपणे पाच रुपयांनी वाढल्या तेंव्हा सामान्य माणसाच्या प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी वार्ताहर, छायाचित्रकार शहरात विविध ठिकाणी जाऊन 'पेट्रोल दर वाढीबाबत आपली काय प्रतिक्रिया आहे?' हा एकच प्रश्न अनेक जणांना विचारतात. बातमीमध्ये प्रत्येकाच्या प्रतिक्रियेमधील नेमकी, समर्पक अशी एक-दोन वाक्येच दाखवून जनमताचा कौल साधारणपणे स्पष्ट केला जातो.

जनमत चाचणी करण्यासाठी घेतलेल्या मुलाखतीमध्ये समाजाच्या विविध थरातील, विविध वयोगटातील व्यक्तींचा समावेश करण्याकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते. उदा. पेट्रोल दरवाढीविषयी महाविद्यालयीन युवक, नोकरदार महिला, पुरुष, रिक्षाचालक, दुचाकी/चारचाकी बाळगणारे, पेट्रोल पंप चालक इत्यादींची मते विचारणे आवश्यक असते.

या मुलाखतीमध्ये काहींना समान प्रश्न विचारणे व काहींना नेमका प्रश्न विचारणे आवश्यक असते. 'पेट्रोलचे भाव वाढले हे बरे झाले का?' असा प्रश्न विचारल्यावर 'होय बरे झाले', किंवा 'नाही बरे नाही झाले.' एवढेच उत्तर मिळण्याची शक्यता असते. परंतु 'पेट्रोलचे दर वाढल्यामुळे तुमच्यावर काय परिणाम झाला?' किंवा 'पेट्रोलच्या भाववाढीविषयी तुमची प्रतिक्रिया काय? असे प्रश्न विचारले की मुलाखत देणारा पटकन आपली मते सांगू लागतो.

- **दूरचित्रवाणीवरील मुलाखतीचे तंत्र :**

मुलाखतीचे यश मुलाखत घेणारा कशी घेतो यावर अवलंबून असते. यामुळे मुलाखत द्यावी कशी यापेक्षा मुलाखात घ्यावी कशी हे पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी शिकणे आवश्यक आहे. दूरचित्रवाणीसाठी काम करणाऱ्या वार्ताहराला ऐन वेळी मुलाखत घ्यावी लागते, त्यामुळे मुलाखतीचे तंत्र वार्ताहराला माहीत असणे आवश्यक असते.

**अ) मुलाखतीची पूर्वतयारी :** मुलाखत पूर्वनियोजित असेल तर ती घेण्यापूर्वी मुलाखतकाराला पूर्वतयारी करावी लागते. लक्ष्यगट, कालावधी उद्दिष्ट यांची माहिती करुन घेणे आवश्यक ठरते. अनेकदा मुलाखतीचा निर्माता आणि मुलाखतकार या दोन वेगळ्या व्यक्ती असतात. निर्माता/दिग्दर्शकाच्या मनातील कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचे काम मुलाखतकारावर सोपविलेले असते. त्यामुळे मुलाखकाराने माहिती मिळविणे आवश्यक असते. कारण लक्ष्यगटानुसार प्रश्न व ते विचारण्याची पद्धत बदलू शकते. उदा. एखाद्या प्रसिद्ध लेखिकेची मुलाखत शालेय विद्यार्थ्यांसाठी घ्यायची असेल, तर पाठ्यपुस्तकात नेमलेल्या त्या लेखिकेच्या कलाकृतीनुसार प्रश्न विचारावे लागतात. फार सैद्धांतिक चर्चा चालत नाही. जर त्याच लेखिकेची मुलाखत महिलांच्या कार्यक्रमात प्रक्षेपित होणार असेल, तर एक स्त्री म्हणून तिला आलेल्या अनुभवावर भर देता येईल. त्याचप्रमाणे मुलाखतीला मिळणाऱ्या कालावधीवरही प्रश्नांची संख्या आणि त्याचे स्वरुप अवलंबून असते. त्यामुळे मुलाखतीचे उद्दिष्ट मुलाखतकाराने नीट समजून घेतले पाहिजे.

**आ) मुलाखतदात्याची/विषयाची संपूर्ण माहिती मिळविणे :** मुलाखत एखाद्या व्यक्तीविषयी असो अथवा संस्था, घटना, प्रश्न यासंबंधी असो, मुलाखतीविषयी समग्र माहिती मुलाखतकाराला असली पाहिजे. मुलाखतीद्वारे प्रेक्षकांना माहिती मिळावी असा उद्देश असतो. एखाद्या लेखकाची मुलाखत घ्यायची असेल त्या लेखकाला 'आतापर्यंत किती पुस्तके लिहिलीत?' 'त्यापैकी कथा किती? कादंबऱ्या किती?' 'कोणत्या पुस्तकाच्या अनेक आवृत्या निघाल्या?' 'कोण कोणते पुरस्कार कोणत्या वर्षी मिळाले? असे अनेक प्राथमिक प्रश्न विचारुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला तर उपलब्ध मर्यादित प्रसारण वेळेतील बहुमोल वेळ वाया जाईल. ही सर्व माहिती मुलाखतकाराने मुलाखतीपूर्वीच जमविणे आवश्यक असते.

त्याकरिता त्या विषयासंबंधी उपलब्ध साहित्य वाचणे, शक्य असेल तर पूर्वी प्रसारित झालेल्या मुलाखती ऐकणे, पहाणेही आवश्यक असते. गरज पडल्यास मुलाखतदात्याशी आधी चर्चा करुन विषय समजावून घ्यावा लागतो.

**इ) तंत्राची माहिती :** दूरचित्रवाणीवरील मुलाखतकाराला दूरचित्रवाणीच्या तंत्राची माहिती असणे आवश्यक आहे. मुलाखतीचे चित्रीकरण कलागारात म्हणजे स्टुडिओत असेल तर तेथील प्रकाशव्यवस्था, ध्वनी-मुद्रणासाठी लावलेले धनिप्रक्षेपक, कॅमेऱ्याचे कार्य या सर्वांची किमान माहिती असणे चांगले असते.

**ई) मुलाखत घेणे :** मुलाखत हा कार्यक्रम अन्य कार्यक्रमांपेक्षा भिन्न आहे. या कार्यक्रमाची तपशीलवार माहिती लिहिणे शक्य नसते. मुलाखतीची तालीम करुन ती सादर करणे शक्य नसते. तसे करण्याचा प्रयत्नही करु नये. कारण तसे केले तर त्यात जिवंतपणा येत नाही. जिवंतपणा हेच मुलाखतीचे हुकुमी अस्त्र आहे. जिवंत, प्रवाही, माहितीपूर्ण आणि रसाळ मुलाखत घेण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत.

मुलाखतीला प्रारंभ कसा करायचा ते आधी ठरवून ठेवले पाहिजे. लिहून काढले तरी हरकत नाही.

पण मुलाखतीला सुरूवात करताना लिखित संहिता वाचून दाखविणे योग्य नाही. मुलाखतकार जितक्या सहजपणे, उत्स्फूर्तपणे, मनापासून बोलल्याप्रमाणे मुलाखतीची सुरूवात करेल, तितके ते चांगले वाटते. एखाद्या ज्वलंत प्रश्नाविषयी चर्चा असेल, तर मुलाखतीच्या दिवसापर्यंतच्या घडामोडीवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते. विषयासंबंधीच्या सर्वात ताज्या घडामोडीचा संदर्भ देऊन मुलाखतीला सुरूवात करता आली तर ती केंव्हाही प्रभावी ठरू शकते.

मुलाखतीच्या आरंभी मुलाखतदात्याची थोडक्यात ओळख करुन देणे समर्पक ठरते. त्याचप्रमाणे विषयाचे निवेदन, त्याविषयी चर्चा करण्याची गरज हेही स्पष्ट करणे आवश्यक असते.

मुलाखतदात्याला कोणते प्रश्न विचारायचे हे ठरविण्याऐवजी कोणत्या मुद्यासंबंधी प्रश्न विचारणे आवश्यक आहे याचे एक टिपण मुलाखतकाराने तयार केले पाहिजे. नेमके प्रश्न, त्यांचा क्रम, त्यांची शब्द, वाक्यरचना हे सर्व आधीच ठरवून मुलाखत घेतली जावी. अन्यथा ती कृत्रिम तर ठरण्याचा धोका असतोच, पण त्यातून प्रेक्षकांचा गोंधळ उडण्याची दाट शक्याता असते. मुलाखतदात्याने दिलेल्या उत्तरातून पुढचा प्रश्न सहजपणे आला पाहिजे. मुलाखतकाराने आधीच आपल्या मनाप्रमाणे प्रश्न लिहून काढले तर मुलाखतदात्याची भाषा, शैली, शब्दप्रयोग यात जाणवण्याइतकी तफावत पडू शकते. त्यासाठी मुलाखतीपूर्वी नाहीतर मुलाखतीला सुरूवात झाल्यावर लगेचच पाहुण्यांच्या भाषाशैलीचा अंदाज घेऊन त्याप्रमाणे आपल्या प्रश्नांची शैली बदलणे आवश्यक असते.

मुलाखतकाराने जमविलेली व तो मुलाखतीत वापरणार असलेली माहिती अचूक असली पाहिजे. पाहुण्याचे नाव हुद्दा सांगताना चूक होणे अक्षम्य आहे. विषयाशी संबंधित जमविलेली सर्व माहिती बरोबर असल्याची खात्री करुन घेतली पाहिजे. उदा. मुलाखतकाराने 'नाशिकमध्ये कृषी आयुक्त म्हणून काम करताना आलेला अनुभव सांगा' असा प्रश्न विचारला आणि मुलाखतदात्याने त्याला 'मी कृषी आयुक्त म्हणून कधीच काम केले नाही' असे उत्तर दिले तर मुलाखतकाराची विश्वासार्हता आणि त्याच्याविषयीचा आदर एका क्षणात नाहीसा होईल.

एकदम दोन तीन प्रश्न विचारुन पाहुण्याला गोंधळात टाकू नये. उदा. 'पदाचा कार्यभार हाती घेतल्यावर सर्वात प्रथम तुम्ही कोणते निर्णय घेतले? ते निर्णय घेताना काही अडचणी आल्या का? त्या अडचणी कशा दूर केल्या? अशी एकदम प्रश्नांची सरबत्ती करण्याऐवजी एका वेळी एकच प्रश्न विचारावा.

'हो' किंवा 'नाही' असे एका शब्दात उत्तर येईल असे प्रश्न टाळावेत. 'सरकारचे नवे शैक्षणिक धोरण तुम्हाला पसंत आहे का?' असा प्रश्न विचारला तर 'हो' किंवा 'नाही' असेच उत्तर येईल. त्याऐवजी 'सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाविषयी तुमचे मत काय आहे?' असे विचारले तर धोरण पसंत आहे की नाही ते श्रोत्यांना कळेलच, पण त्यामागील कारणमीमांसाही लक्षात येईल.

ज्या घटनेशी आपल्या पाहुण्यांचा संबंध नाही त्या घटनेविषयीची माहिती विचारु नये. असे करणे संयुक्तिक ठरणार नाही. उदा. एखाद्या समाजसेवकाची आपण मुलाखत घेत असताना त्या समाजसेवकाला

‘देशात प्रादेशिक पक्षांचे वाढते महत्त्व यावर आपले मत काय?’ असा प्रश्न विचारला तर ते काय उत्तर देणार? आणि समजा त्यांनी उत्तर दिले तर ते श्रोते ग्राह्य धरतील का? म्हणून पाहुण्यांचा ज्या विषयाशी संबंध नाही त्याबाबत प्रश्न विचारु नये.

कार्यक्रम मुलाखतीचा आहे म्हटल्यावर त्यात प्रश्न विचारणे हे आलेच, त्यामुळे मुलाखतीदरम्यान ‘माझा पहिला प्रश्न असा आहे’, ‘मी आपणास विचारु इच्छितो की’, ‘आपण सांगू शकाल का?’ ‘हे जरा आमच्या प्रेक्षकांना सांगा’ असे वाक्यप्रचार कटाक्षाने टाळावयास हवेत. त्याऐवजी थेट प्रश्न विचारण्यावर भर द्यावा.

- **मुलाखतकार–मुलाखतदाता संबंध :**

दूरचित्रवाणीवरील मुलाखतीसाठी दूरचित्रवाणी वाहिनीने मुलाखतदात्याला निमंत्रित केलेले असते. त्यामुळे एखाद्या पाहुण्याला आपण जसे अगत्याने वागवितो तशीच वागणूक मुलाखतदात्यालाही दिली पाहिजे. पण त्याखेरीज मुलाखतकाराला इतरही अनेक गोष्टी लक्षात घ्याव्या लागतात.

मुलाखतदात्याला दूरचित्रवाणी या माध्यमाचा, त्यातील तांत्रिक बाबींचा फारसा परिचय नसेल तर तो करुन देण्याची जबाबदारी मुलाखतकाराने घेतली पाहिजे. या माध्यमाच्या गरजा काय, मुलाखतदात्याने कसे बसले पाहिजे, कुठे बघून बोलले पाहिजे, हे सर्व सहजपणे पाहुण्याला समजावून सांगितले पाहिजे. कलागारातील यंत्रसामग्रीचा, वातावरणाचा त्याच्यावर ताण येऊ नये यासाठी मुलाखतीपूर्वी त्याच्याशी बोलून, मुलाखतीसाठी त्यांची मानसिक तयारी करुन घेणे आवश्यक आहे.

एखाद्या वादग्रस्त मुद्द्याविषयी, खाजगी जीवनाविषयी प्रश्न विचारायचे असतील, तर मात्र त्याविषयी कल्पना देऊन परवानगी घेतलेली चांगली; अन्यथा अशा प्रश्नामुळे पाहुणे नाराज होण्याची व मुलाखतकाराच्या प्रश्नांना योग्य उत्तरे न देण्याची शक्यता असते.

मुलाखतकार आणि मुलाखतदाता यांच्यात समान पातळीवर संवाद व्हायला हवा. मुलाखतकाराने स्वतःला पाहुण्यांपेक्षा कनिष्ठ अथवा श्रेष्ठ मानू नये. मुलाखतदात्याचे म्हणणे ऐकण्यात प्रेक्षकांना अधिक रस असणार हे लक्षात घेऊन मुलाखतीतील स्वतःची भूमिका मुलाखतकाराने कमीत कमी ठेवायला हवी.

स्वतःचे ज्ञान, वक्तृत्व कौशल्य, हजरजबाबीपणा, इत्यादी दाखविण्याच्या फंदात मुलाखतकार पडला तर ती मुलाखत यशस्वी होणार नाही. आपल्या पाहुण्याला बोलते कसे करता येईल, त्याच्याकडे सांगण्यासारखे जेवढे आहे, तेवढे कसे काढून घेता येईल याकडे मुलाखतकाराने आपले लक्ष पुरविले पाहिजे. ते करत असताना पाहुणा एखाद्या मुद्द्यावर रेंगाळायला लागला तर त्याला अलगद दुसऱ्या मुद्याकडे वळविण्याची तारेवरची कसरत मुलाखतकाराला करावी लागते.

- **मुलाखतीचे नमुने :**

मुलाखतींचे तीन नमुने पुढे देत आहोत.

१) आकाशवाणीवरील मुलाखत, २) वृत्तपत्रासाठी मुलाखत, ३) दूरदर्शनवरील मुलाखत.

**१) आकाशवाणीवरील मुलाखत :**

११ मे १९९८ रोजी राजस्थानात पोखरण येथे भारताने अणुस्फोट घडवून आणला, या संबंधी आकाशवाणी पुणे केंद्रावरुन दुसऱ्याच दिवशी म्हणजे १२ मे १९९८ रोजी सकाळी ७.४५ वाजता निवृत्त लष्करी अधिकारी आणि संरक्षण विषयातील तज्ज्ञ कर्नल डॉ. अनिल आठल्ये यांची मुलाखत प्रसारित करण्यात आली. ही मुलाखत भालचंद्र जोशी यांनी घेतली होती. एखाद्या महत्त्वाच्या घटनेसंबंधी प्रासंगिक मुलाखत कशी असावी त्याचा नमुना म्हणून या मुलाखतीचा अभ्यास करता येईल. यामध्ये मुलाखतकाराने प्रतिसादासाठी काढलेले उद्गार दिलेले नाहीत.

**भालचंद्र जोशी** : श्रोते हो, काल आपल्या देशात एक फार महत्त्वाची ऐतिहासिक घटना घडली. राजस्थानमध्ये पोखरण येथे आपल्या सरकारनं तीन अणुस्फोट केले. स्फोटाचे पडसाद अक्षरशः आणि लाक्षणिक अर्थाने सर्व जगभर उमटणे स्वाभाविक आहे. आपल्या शत्रुंना भारतीय लष्करी सामर्थ्याचा खणखणीत इशारा देणारी आणि सर्व भारतीयांच्या मनात अभिमानाचा हुंकार उमठवणारी ही विलक्षण घटना आहे. या अणुस्फोटासंबंधी आज आपण कर्नल आठल्ये यांचे विचार जाणून घेणार आहोत. या विषयावर बोलण्याचा कर्नल साहेबांचा दुहेरी अधिकार आहे. एक म्हणजे ते स्वतः अनुभवी लष्करी अधिकारी आहेत. १९६८ साली त्यांनी लष्करी ऑफिसर म्हणून प्रवेश केला आणि वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. १९९० साली कर्नल म्हणून त्यांनी लष्करी सेवेतून स्वेच्छानिवृत्ती घेतली. १९७१ च्या बांगलादेश युद्धात त्यांनी पश्चिम आघाडीवर भाग घेतला होता. याशिवाय कर्नल आठल्ये हे युद्धशास्त्राच्या अभ्यासाकरिता प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'प्रादेशिक सुरक्षितता' या विषयात पीएच.डी. ही पदवी मिळविली आहे. भारत-चीन युद्ध, अरब-इस्त्रायल युद्ध, काश्मिरचा प्रश्न, अण्वस्त्रांचा प्रश्न, इत्यादीविषयी त्यांनी ग्रंथ लिहिले आहेत. लोकसत्ता, संडे ऑब्झर्व्ह यासारख्या दैनिकांतून त्यांनी स्तंभलेखन केले आहे. १९९३ साली ब्रिटन सरकारच्या निमंत्रणावरुन आर्यलंडच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी तिकडे गेले. १९९५ साली आपल्याच केंद्र सरकारने त्यांना श्रीलंकेतल्या वांशिक समस्येचा अभ्यास करण्यासाठी श्रीलंकेला पाठवलं होतं.

अशा रितीनं सेनापती आणि वाचस्पती अशा दुहेरी अधिकारातून ते अणुस्फोटांविषयी बोलायला अगदी समर्थ आहेत.

नमस्कार, कर्नल साहेब!

**डॉ. कर्नल आठल्ये** : नमस्कार!

**भालचंद्र जोशी** : काल पोखरणमधल्या अणुस्फोटांची बातमी ऐकल्यावर तुमची अगदी पहिली, उत्स्फूर्त प्रतिक्रिया काय झाली?

**डॉ. कर्नल आठल्ये :** मला अर्थातच अत्यंत आनंद आणि अभिमान वाटला. हे शक्तिशाली अणुस्फोट आपल्या देशानं केले त्यामुळे मी भारतीय आहे याचा मला अभिमान वाटला आणि एवढी महत्त्वपूर्ण घटना पहायला मी जिवंत आहे याच अभिमान वाटला. भारताच्या आणि संपूर्ण जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारी ही घटना आहे. आपल्या देशाचा आजवरचा इतिहास पाहिला तर युद्‌ध तंत्रज्ञानात आपण मागासलेलो राहिलो आणि त्याची जबरदस्त किंमत आपल्याला वर्षानुवर्षे गुलामगिरीच्या रुपानं द्यावी लागली. अगदी १५२६ साली बाबरानं भारतावर हल्ला करुन तोफांचा वापर केला, तेंव्हा आपल्याकडे तोफा नव्हत्या त्यामुळे आपण हरलो. अगदी अलीकडे १९६२ साली चिनी आक्रमणावेळी चिनी सैन्याकडे स्वयंचलित बंदुका होत्या, तर आपल्याकडे पहिल्या महायुद्‌धाच्या काळातल्या ३०३ जातीच्या बंदुका! याही वेळी आपण मार खाल्ला. कालच्या अण्वस्त्र चाचण्यामुळे मात्र भारताच्या पाच हजार वर्षाच्या इतिहासात प्रथमच आपण शक्तीशाली झालो आहे की, आता आपल्याकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत कोणाचीही होणार नाही.

**भालचंद्र जोशी :** खरं आहे. बरं कर्नल साहेब काल करण्यात आलेल्या अणुस्फोटाविषयी थोडी शास्त्रीय माहिती देऊ शकाल का?

**डॉ. कर्नल आठल्ये :** कालच्या अणुस्फोटाचं वैशिष्ट्य म्हणजे ते हायड्रोजन बॉम्बचे स्फोट होते. हायड्रोजन बॉम्ब हा संहारक अस्त्रांमधला अगदी निर्णायक प्रकार समजला जातो. ते जणू काही ब्रह्मास्त्रच आहे म्हणा ना! या बॉम्बच्या क्षमतेला कोणतीही मर्यादा नाही. अणुबॉम्ब आपण जास्तीत जास्त एक कोटी टन क्षमतेचा बनवू शकतो; पण हायड्रोजन बॉम्ब कितीही क्षमतेचा बनवता येतो. १९६१ साली रशियाने सैबेरियात ६ कोटी टन क्षमतेच्या हायड्रोजन बॉम्बची चाचणी केली होती. यावेळी जगात अनेक ठिकाणी भूकंपासारखे हादरे जाणवले होते.

**भालचंद्र जोशी :** १९७४ साली इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या तेंव्हा आपण प्रथम अणुस्फोटाची यशस्वी चाचणी केली होती. त्या स्फोटात आणि कालच्या स्फोटात काय फरक आहे?

**डॉ. कर्नल आठल्ये :** १९७४ साली आपण साध्या अणुस्फोटाची चाचणी केली होती. हिरोशिमा आणि नागासाकी या शहरावर अमेरिकेने टाकलेले अणुबॉम्ब त्या क्षमतेचे होते पण कालचे स्फोट हे हायड्रोजन बॉम्बचे स्फोट आहेत, त्यांच सामर्थ्य आणि आवाका अणुबॉम्बच्या तुलनेत शेकडो-हजारो पटींनी जास्त आहे.

**भालचंद्र जोशी :** कालच्या अणुचाचण्यांच आणखी काही वैशिष्ट्य सांगता येईल का?

**डॉ. कर्नल आठल्ये :** हो, हे वैशिष्ट्य असं की भारताकडे अणुचाचण्याची क्षमता आहे हे सर्व जगाला ठाऊक

होतं, अगदी हायड्रोजन बॉम्बची चाचणी आपण घेऊ शकतो हे ही सर्वांना माहिती होतं. त्यामुळेच अमेरिकेचा उपग्रह भारताच्या टेहळणीवर ठेवण्यात आला होता, त्यांची या सर्व प्रकारची कडक पाळत असूनही त्याला गुंगारा देऊन आपण अणुस्फोट केले हे आपले मोठं यश आहे. अणुस्फोटाची चाचणी ही काही साधी बाब नाही. त्यात शेकडो-हजारो लोकांचा संबंध येतो; पण एवढा व्यापक खटाटोप करूनही कोणत्याही देशाला, त्यांच्या गुप्तहेरांना किंवा उपग्रहांना त्याचा पत्ता लागला नाही. ही आपल्या लष्कराच्या दृष्टीनं आणि शास्त्रज्ञांच्या दृष्टीनंही फार अभिमान वाटावा अशी बाब आहे.

**भालचंद्र जोशी** : अणुचाचण्याबाबत दोन आक्षेप घेतले जातात. एक तर भारतासारख्या देशानं-जिथं महात्मा गांधीसारखा महापुरूष झाला तिथं अणुस्फोट व्हावा ही बाब उचित नाही. दुसरा आक्षेप म्हणजे भारतासारख्या गरीब देशानं अणुचाचण्यावर खर्च करावा का?

**डॉ. कर्नल आठल्ये** : गांधींच्या बाबतीत म्हणायचं तर त्यांची अहिंसा ही शूराची अहिंसा होती, भेकड माणसाची अहिंसा नव्हती. गांधींजी हे विलक्षण धैर्यवान, निर्भय महापुरूष होते. दुसरं असं की, जगात बळी तो कान पीळी हा जुना कायदा आहे. तुमची बाजू कितीही न्यायाची, सत्याची आणि नैतिकतेची असली तरी त्याला शक्तीची जोड नसेल, सामर्थ्याची जोड नसेल तर तुम्हाला कोण विचारत नाही. आर्थिक स्थिती ढासळल्यानं आपण इंग्रजांचे गुलाम झालो असं काही तथाकथित बुद्धिवादी म्हणतात; पण अगदी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातही सोन्याचा ओघ भारताकडे वाहात होता. इंग्लंडमधल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या दप्तरातल्या नोंदी मी स्वतः पाहिल्या आहेत. तेंव्हा राजकीय गुलामी झाल्यामुळे आपली दुर्दशा झाली, हे समजून घेतले पाहिजे.

आता राहिला मुद्दा गरीब देशानं अणुचाचण्यावर खर्च करायचा. खरं तर असं आहे की, कितीही गरीब देश असला तरी त्याला स्वतःच्या रक्षणासाठी जो काही खर्च लागेल तो करावाच लागेल. त्यात तडजोड करता येणार नाही. दुसरं म्हणजे अगदी परकीय तज्ज्ञांनी मुद्दाम फुगवून सांगितलेले आकडे खरे धरले तरी आपल्या अणुचाचण्यावर केवळ आठ कोटी रुपये खर्च झाले आहेत. आपल्या देशाची एकूण अर्थव्यवस्था पाहता ही रक्कम म्हणजे दर्यामे खसखस असच म्हणावं लागेल.

**भालचंद्र जोशी** : आपला मुद्दा अगदी सर्वांना पटावा असा आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या रक्षणाचा, देशाच्या सार्वभौमत्वाचा जेंव्हा प्रश्न येतो तेंव्हा त्यासाठी कितीही किंमत मोजावी लागली तरी सर्व भारतीय जनता त्यासाठी तयार होईल. भारत शक्तिवान झाला आहे. याचा स्वातंत्र्यवीरांना अत्यंत आनंद झाला असता. कर्नलसाहेब, आपण अणुस्फोटाबद्दल फार उत्तम माहिती सांगितली त्याबद्दल धन्यवाद! या अणुस्फोटामुळे फार मोठ्या प्रमाणावर भौतिक उर्जा

निर्माण झाली हे जसं खरं त्याचप्रमाणे सर्व देशभर राष्ट्रीय अभिमान आणि गौरवाची प्रचंड उर्जा निर्माण झाली आहे. या उर्जेच्या जोरावर आपला देश समर्थ देश आणि संपन्न देश म्हणून उभा राहील यात काहीच शंका नाही. पुन्हा एकदा आपले आभार.

**२) वृत्तपत्रासाठी मुलाखत :**

२५/१२/२०१३ रोजी घेतलेली मराठीतील नवनैतिकतावादी लेखक अनंत कदम यांची मुलाखत पुढे देत आहे.

**प्रश्न** : नमस्कार सर !

**अनंत कदम :** नमस्कार !

**प्रश्न** : सर आपणांशी संवाद साधावा व आपले काही विचार समजून घ्यावेत म्हणून मी आपणाकडे आलो आहे.

**अनंत कदम :** फार चांगली गोष्ट आहे. अलिकडे माणसांतला संवाद कमी होऊन माणूस एकाकी बनत चालला आहे. अशावेळी आपण माझ्यासारख्या वय झालेल्या माणसाचं मन जाणून घेणार आहात ही एक चांगलीच गोष्ट आहे ! त्याबद्दल मी तुमचे स्वागतच करतो !

**प्रश्न** : सर आपली तब्बेत कशी काय आहे?

**अनंत कदम :** तब्बेतीचं काय? आता वय झालं तरीही बरीच म्हणायची! अधूनमधून होतो त्रास पूर्वीसारखी साथ आता मिळत नाही! परंतु स्मरणशक्ती अजूनही बऱ्यापैकी काम करते आहे! अजूनही खूप काही करायचं राहून गेल्याचं सारखं जाणवतं! पण त्याला उपाय नाही! आपले प्रारब्ध आहे तेवढेच आपण करू शकतो!

**प्रश्न** : सर आपला जन्म कधी आणि कोठे झाला याविषयी काही सांगू शकाल का?

**अनंत कदम :** माझी जन्म तारीख प्राथमिक शाळेच्या रजिस्टरनुसार १५ जुलै १९३५ आहे. माझा जन्म रत्नागिरीतील दापोली तालुक्यात असलेल्या 'शिरखल' (वाडी दगडवणे) या गावात झाला. म्हणजेच आजोळी झाला. 'दगडवणे' ही शिरखल गावाची वाडी होती. तिथं माझा जन्म झाला.

**प्रश्न** : बालपणीच्या काही महत्त्वाच्या आठवणी सांगा.

**अनंत कदम :** बालपणातल्या बऱ्याच आठवणी मनावर ओढंगतात. त्यातल्या काही मनातून जाता जात नाहीत. मी त्या प्रसंगातून वाचलो. ती आठवण अजूनही माझ्या मनात घर करुन राहीली आहे. ... माझा जन्म अशा गावात झाला की, तेथे दवाखाना, डॉक्टर, औषधं यांपैकी काहीच नव्हतं. त्याकाळी कॉलरासारख्या साथीच्या आजारानं माणसं पटापट मरत, लहान लहान बालकं मरत. काही आजारपण आलं तर माणसं घरगुती औषधं करीत व देवावर भार ठेवून जगत, अशा

परिस्थितीत मला कसलंही आजारपण आलं नाही.... जन्मानंतर दोन अडीच वर्षांनी मला, आई आणि माझी छोटी बहीण यांना वडिलांनी मुंबईला नेलं. वडिलांना मुंबईत जी.टी. हॉस्पिटलमध्ये वॉर्डबॉयची नोकरी मिळाली होती. शिवाय चाळीतली एक खोलीही! ...... चौथीची परीक्षा संपलेली होती. एप्रिलचा शेवटचा आठवडा असावा. मला एक पिकलेला आंबा झाडावर दिसला. मी चपटे दगड जमविले आणि आंब्याच्या दिशेने फेकू लागलो. सात आठ दगड फेकले. ते सर्व फांदीवर आपटत होते. असाच आणखी एक दगड फेकला आणि एकाकी माझ्या डाव्या डोळ्याच्या भुवईखाली तीव्र वेदना जाणवली. गालावर रक्त सांडत होतं. मी फेकलेला दगड जोरात परतून माझ्या भुवईवर आदळला होता. लागलीच मला हॉस्पिटमध्ये नेलं. उपचार झाले डोळा वाचला होता. तो दगड डोळ्याला बुबळाला लागला असता तर मी एक डोळ्याचा झालो असतो. आणि आज जो काही आहे तो मुळीच झालो नसतो.

मी पाचवी सहावीत असेन खेळता खेळता अचानक माझ्या पोटात तीव्र वेदना होऊ लागल्या. वेळ संध्याकळची होती मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केल. डॉक्टरांनी निर्णय घेतला. – ''आत्ताच्या आत्ता ऑपरेशन करायला पाहिजे. नाहीतर उद्यापर्यंत पेशंट गेलेला असेल.'' वडिलांना काय करावे असा प्रश्न पडला. इतक्यात एक म्हातारा वॉर्डबॉय तिथे आला. तो वडिलांच्या कानात कुजबुजला, 'ऑपरेशनच्या कागदावर सही करू नका. सकाळपर्यंत थांबा!' असं म्हणून झरझर निघून गेला. डॉक्टरही निघून गेले. माझ्या पोटातल्या वेदना वाढतच होत्या. तो म्हातारा एक तासाने परत आला. त्याने कागदाची एक पुडी आणली होती. त्यातली पावडर कपात टाकली आणि पाण्यातून मला पाजली. सकाळी थाळीभर जंत माझ्या पोटातून संडासावाटे पडले. पोट साफ झाले. ऑपरेशन टळले...... ते झाले असते तर बहुतेक मी मेलो असतो..... एका वॉर्डबॉयने मला वाचवलं! असे आणखी काही प्रसंग आहेत की, ते मी विसरू शकत नाही.

**प्रश्न** : आपले प्राथमिक, माध्यमिक शिक्षण तसेच महाविद्यालयीन शिक्षण कोठे झाले?

**अनंत कदम :** माझं प्राथमिक शिक्षण मुंबईत 'लॉर्ड हॅरिस' या 'कॅरनॉक रोड' आजचा लोकमान्य टिळक रोड वर असलेल्या म्युनिसिपल शाळेत झालं. माध्यमिकसाठी एलफिन्स्टन टेक्निकल हायस्कूल मध्ये प्रवेश घेतला. पण ही शाळा मी दहावीत असतानाच सोडली. पुढे पहिली टर्म संपलेली असताना सिद्धार्थ नाईट हायस्कूलमध्ये प्रवेश घेतला. मॅट्रिकला ४४ टक्क्यांनी उत्तीर्ण झालो. सिद्धार्थ कॉलेजमध्ये माझे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. तेथे पाली हा विषय घेऊन एम.ए. पूर्ण केलं. पण एम.ए.ला आमच्या कॉलेजमधील तिघांनाही पास क्लासमध्ये ठेवले. आणि सेंट झेवियर्स कॉलेज मध्ये एक विद्यार्थी होता. त्याला सेकंडक्लास मिळाला होता. आमच्या कॉलेजमध्ये पाली विषयासाठी प्राध्यापक पदाची भरती होणार होती त्यामुळे सेकंडक्लास

मिळावा ही अपेक्षा होती. पण तसे झाले नाही. सेंट झेवियर्सच्या विद्यार्थ्याची नेमणूक झाली. दरम्यान मला कस्टम मध्ये नोकरी मिळाली होती. पण प्राध्यापक होण्याची इच्छाही होती. त्यासाठी मी ती नोकरी सोडली आणि एम.ए. साठी प्रवेश करत इंग्रजी आणि मराठी असे दोन विषय घेतले आणि नंतर या दोन विषयांनाच वाहून घेतले.

**प्रश्न** : तुमच्यावर कोणाचे संस्कार झाले आहेत असे वाटते?

**अनंत कदम :** माणूस हा जन्मतःच समाजाचा एक घटक असतो. मातापित्यापासून समाजाची सुरूवात होत असते. प्रथम मातापित्यांचे संस्कार माणसावर होत असतात. पहिले गुरू आईवडील, नंतर आपल्या भोवतालचा समाज, नंतर गुरुजन, थोर विचारवंत, लेखक, त्यांचे ग्रंथ, या सर्वांचे संस्कार माझ्यावर झाले आणि त्यातून मी आज जसा आहे तसा घडलो. जगातली असंख्य माणसे माझ्या जीवनात आली. त्यांनी मला काहीतरी शिकवलं, अनुभव दिले. ग्रंथांनीदेखील माझ्या मनावर परिणाम केला आहे. 'धम्मपद' मी जेंव्हा वाचलं तेंव्हापासून मी बदलूनच गेलो, माझे विचार बदलले. 'धम्मपद' माझ्या हृदयात रुतून बसले. 'माणूस जन्माने शूद्र किंवा ब्राह्मण होत नाही तर तो आपल्या कर्माने शूद्र वा ब्राह्मण होत असतो.' असल्या विचारांनी माझे मनाचे डोळे उघडले. सर्व धर्मातील चांगल्या विचारांनी मला माणूस बनवण्यात मदत केली. त्याचप्रमाणे ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, चोखामेळा इ. संत आणि डॉस्टोव्हस्की, कामू, सार्त्र, कार्ल मार्क्स, टॉलस्टॉय, साने गुरुजी, शेक्सपियर, मिल्टन, म.गांधी, म. फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आगरकर, लो.टिळक, व्हिक्टर फ्रँकले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन अशा अनेकांनी माझ्या मनावर, दृष्टीवर काही ना काही परिणाम केला आहे असे मला वाटते.

**प्रश्न** : सर आपण कादंबरी, कविता, कथा, नाटक, ललित लेख आदी वाङ्मय प्रकारात लेखन केले आहे. यातील कोणता प्रकार आपणास आवडतो?

**अनंत कदम :** कुठलाही वाङ्मयप्रकार माझा नावडता नाही. कुठल्याही प्रकाराला मी कमी लेखत नाही. पण मी कादंबरी लेखनाकडेच जास्त वळतो, त्याचं कारण माझ्यावर अगदी बालपणापासून असंख्य अनुभव कोसळले आहेत व कोसळत आहेत. हे अनुभव माझ्या नकळत मनाच्या कोठारात लपून राहत. आजही राहतात. ते संख्येने खूप असतात. ते युनियन करतात. ते मोठा आकार घेतात. माझ्या मनाची दारे ठोठावू लागतात. त्यांचं ठोठावणं मला असह्य होतं. मग मी एकेक दार उघडतो आणि त्यांना बाहेरची वाट दाखवतो. त्यांच्या आकारामुळे कादंबरी लेखन माझं जास्त झालं.

**प्रश्न** : आपल्या दृष्टीने नवनैतिकता म्हणजे काय?

**अनंत कदम :** तिसरं महायुद्ध झालं तर पृथ्वीची राख होईल. एक माणूसही राहणार नाही. तथाकथित धर्म राहणार नाही. धर्म, राष्ट्र वाचावयाचे असेल तर पृथ्वी वाचायला हवी. पृथ्वीची राख होऊ नये

म्हणून सर्व मानवांनी एकत्र येऊन एक नवीन वैचारिकता मानवी समाजात रुजवली पाहिजे. या वैचारिकतेस माझ्या मते नवनैतिकता म्हणावे. कन्फुशियस या तत्वज्ञाने म्हटले आहे, "What you don't like, when done to you, do not do it to other" तुमच्या बाबतीत केलेली जी गोष्ट तुम्हाला आवडत नाही ती गोष्ट तुम्ही इतरांबाबतीत करु नये. ही नैतिकतेची व्याख्या मला पटते.

**प्रश्न** : आपला आशावाद प्रखर आहे, याविषयी काय सांगाल?

**अनंत कदम :** जगात दुष्ट, क्रूर, अधम माणसे झाली आहेत. त्याप्रमाणे अफाट प्रेमाने, दयेने भरलेल्या ह्रदयांची माणसेही होऊन गेली, अद्याप आहेत. संताबरोबर सैतानही जन्मले आहेत. मानवी जीवन सुरू झाल्यापासून असंख्य युद्धे झाली, हत्या झाल्या, कित्येक शतकं रक्ताच्या नद्या वाहिल्या. तरी अद्याप मानवी जीवनाचा स्त्रोत वाहात आहे. हा स्त्रोत अफाट ह्रदयाच्या संतांमुळे, अद्याप तसाच वाहात आहे. त्यामुळे मानवतेचा, पृथ्वीचा विध्वंस होऊच शकणार नाही. अशी मला ठाम आशा आहे.

धन्यवाद सर! आपण आपला बहुमूल्य वेळ देऊन आपले विचार ऐकवलेत, आपल्या मनातला मानवतेचा जागर अखंड तेवत राहील. आपल्या पुढील आयुष्यासाठी आपणांस हार्दिक शुभेच्छा!

**३) दूरदर्शनवरील मुलाखत :**

'जिंदा शहीद' मनिंदरजीत सिंह बिट्टा यांची स्वातंत्र्य दिनानिमित्त नितीन नायगांवकर यांनी दैनिक लोकमतसाठी विशेष मुलाखत घेतली होती. यामध्ये 'मृत्यू माझा मित्र आहे मी मृत्यूला मी घाबरत नाही, मला भय आहे ते राजकीय दहशतवादाचे. उद्या दहशतवाद्यांच्या बॉम्ब गोळ्यांनी माझे प्राण गेले तर कुटुंबाला, मित्रांना माझा अभिमान वाटेल, पण राजकीय दहशतवादाने मृत्यू झाला, तर जीवन व्यर्थ ठरेल. पंधरावेळा दहशतवाद्यांचे वार झेलूनही 'जिंदा शहीद' ठरलेले मनिंदरजीत सिंह बिट्टा यांचे हे बोल आहेत. बिट्टांच्या आयुष्यातील प्रत्येक घटना अंगावर काटा उभा करणारी आहे. वयाच्या बाराव्या वर्षापासून निधड्या छातीने आयुष्य जगणारे बिट्टा यांचा प्रत्येक शब्द आजही तिरंग्यात लपेटलेला आहे की काय, असाच भास होतो. त्यांच्या संघर्षाची कहाणी सांगणारा 'जिंदा शहीद' हा चित्रपटही पुढील वर्षी येऊ घातलेला आहे. तिरंग्याचे रक्षण, स्वातंत्र्याचे रक्षण हे बिट्टा यांच्या जगण्याचे एकमेव उद्दिष्ट राहिले आहे. ७२ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, घटना, राजकीय अनुभव आदीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न या मुलाखतीच्या माध्यमातून केला आहे.

**प्रश्न** : दहशतवादी हल्ल्यांना तोंड देण्याची प्रेरणा कुठून मिळाली?

**बिट्टा** : सात वर्षाचा असताना जालियनवाला बागेमध्ये मी माझ्या आजोबासोबत फिरायला जायचो. एकीकडे हरमिंदर साहिब व दुसरीकडे जालियनवाला बाग. मी एकदा आजोबांना विचारले, जालियनवाला बागेमध्ये भिंतीवर निशाण कशाचे आहेत? आजोबांनी जनरल डायरच्या निर्दयतेचा

इतिहास सांगितला त्यानंतर मी सुभाषचंद्र बोस व भगतसिंगांची पुस्तके वाचली आणि जिथे बंदुकीच्या गोळ्यांचे निशाण आहेत, तिथल्या मातीवर हात ठेवून 'स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी मी देखील आपलं जीवन मातृभूमीला अर्पण करेन' अशी शपथ घेतली. पुढे मी मोठा झाल्यावर वस्तीतील मित्रासोबत १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीच्या कार्यक्रमांचे आयोजन सुरू केले. खलिस्तान्यांनी पंजाबला भारतापासून तोडण्याचे ठरविले होते. रोज गोळ्या झाडायचे, पण आम्ही स्वातंत्र्य दिनाला 'भारत माँ के चार सिपाही हिंदू, मुस्लीम, सिख, इसाई' असे नारे देत गावागावामध्ये फिरायचो. त्या गावातील कुणी आमच्या रॅलीत सहभागी होईल, त्याला खलिस्तानी मारुन टाकायचे. रक्ताने माखलेली इतिहासाची पाने आम्हाला सतत अस्वस्थ करायची. दहशतवाद्यांचे वार झोलताना हीच अस्वस्थता मला प्रेरणा द्यायची.

**प्रश्न** : दहशतवाद्याशी पहिला सामना कधी झाला?

**बिट्टा** : मी नवव्या वर्गात असताना अमृतसरमध्ये एका ठिकाणी १५ ऑगस्टचा कार्यकम आयोजित केला. १९८३ चा प्रसंग आहे. भिद्रानवाले सुवर्ण मंदिरात येऊन बसला होता. राष्ट्रध्वजाला धोका निर्माण झाला होता. अशात हा कार्यक्रम होऊ नये, असाच दहशतवाद्यांचा प्रयत्न होता. चमनलाल नावाचा पोलीस अधिकारी मला म्हणाला की, राष्ट्रध्वज फडकवू नका, पण माझ्यासाठी तो परीक्षेचा दिवस होता. मी त्यांचे ऐकले नाही आणि पहाटे पाच वाजता तयारी सुरू केली. आम्ही तोरणे बांधत असतानाच कार्यक्रम स्थळाजवळ बॉम्ब फुटल्याचा आवाज झाला. माझ्याजवळ बंदुक होते. मी लगेच हवेत गोळीबार केला. दहशतवादी पळून गेले. त्यानंतरही कार्यक्रमाचेवेळी ते आले आणि 'खलिस्तान जिंदाबाद' चे नारे देऊ लागले. त्यांना तिरंगा जाळायचा होता. आम्ही सारे एकत्र आलो आणि त्यांना पकडून पालिसांच्या हवाली केले. पुन्हा काही वेळाने त्यांचे साथीदार तलवारी घेऊन आले. आम्हीही सज्ज होतो, पण बीएसएफचे जवान आले. आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यानंतरही सायंकाळपर्यंत तिरंग्याचे रक्षण केले व रात्री तिरंगा अंगावर लपेटून घरी गेलो. हा माझ्या आयुष्यातील पहिला प्रसंग होता.

**प्रश्न** : तुम्ही मंत्री झाल्यावर पहिला हल्ला कधी झाला?

**बिट्टा** : मला निवडणूक लढायची नव्हती, पण देशाचे पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी आग्रह धरला. दक्षिण अमृतसर हा दहशतवाद्यांचा गड मानला जायचा. मी तोच मतदारसंघ निवडला. मंत्री झाल्यावर एकदा स्वातंत्र्यदिनाला सरकारी कार्यक्रमासाठी जात होतो. त्यापूर्वी आदल्या दिवशी रात्रीच मित्रांनी सांगितले होते की, उद्या बॉम्बस्फोट होणार आहे. सर्वांना आश्चर्य वाटले, पण कार्यक्रम रद्द होऊ दिला नाही. प्रत्येक हल्ल्यावेळी मला आधीच अंदाज यायचा. दुसऱ्या दिवशी सकाळी कुर्ता चढवला आणि तयार झालो. एक बुलेटफ्रुफ गाडी आणि एक सरकारी गाडी सोबत होती. मी सरकारी गाडीत बसलो. अमृतसरच्या हाइड मार्केटमधून जात असताना, मृत्यू पुढे उभा

असल्याचे मला माहिती होते. दहशतवाद्यांनी एका गाडीत ४५ किलो आरडीएक्स लावून ठेवले होते. अचानक स्फोट झाला आणि माझ्यापुढे असलेली गाडी चक्काचूर झाली. सोबत असलेले जखमी झाले, पण माझा चालक मोठा हिंम्मतवाला होता. त्या रस्त्याने जाणाऱ्या शाळकरी मुलांनाही यात प्राण गमवावे लागले. काही वेळाने मला लक्षात आले की, माझा एक पाय पूर्णपणे तुटलेला होता. मला माझे सहकारी घेऊन जायला लागले, एवढ्यात पुन्हा बॉम्ब फेकले. मला दवाखान्यात नेले, तेंव्हा मी पूर्ण शुद्धीवर होतो. डॉक्टरांशी बोलत होतो. जोपर्यंत बेशुद्धीचे इंजेक्शन दिले नाही, तोपर्यंत 'वंदे मातरम्, 'भारत माता की जय' म्हणत होतो. स्वातंत्र्यासाठी रक्त सांडविणाऱ्यांची कदर करीत असाल, तर बॉम्ब, बंदुकीच्या गोळ्या तुमचे काहीही बिघडवू शकत नाहीत, हे मी अनुभवले आहे.

**प्रश्न** : दिल्लीतील हल्ल्याची माहिती होती का?

**बिट्टा** : पी. व्ही. नरसिंहराव यांनी १९९३ मध्ये मला युवक काँग्रेसचा अध्यक्ष केल्यावर मी दिल्लीत आलो. त्यावेळी नागपूरचे अविनाश पांडे यांना मी युवक कॉग्रेसचा महासचिव केले. आठ महिन्यांनी रेकी करुन जनपथच्या एका हॉटेलमध्ये दहशतवाद्यांनी मुक्काम ठोकला. माझ्या जीवाला धोका आहे, हे नरसिंहराव यांना माहीत होते. मला सुरक्षा मिळाली आणि पंधरा दिवसात काढून घेतली. त्याचा जाब विचारायला मी गृहमंत्र्याकडे गेलो. मी मंत्रालयात गेलो तेंव्हा रायसिना रोडवर एका कारमध्ये बॉम्ब लावला होता. मला शंका आली होती. त्यावेळी युवक काँग्रेसचे कार्यकर्ते मला भेटण्यासाठी बाहेर उभे होते. तिथेच दहशतवाद्यांची कार होती. मी बाहेर आलो असतो तर कार्यकर्त्यांनाही प्राण गमवावे लागले असते. मी अर्धा तास आतच थांबलो. सगळे निघून गेल्यावर मी कारमध्ये बसून बाहेर निघालो आणि थोड्याच वेळात स्फोट झाला. आमच्या पुढची गाडी स्फोटाने उडाली. माझ्या चालकाचे डोळे गेले. मलाही मार लागला. मी फायरिंगचे आदेश दिले. मला राममनोहर लोहिया हॉस्पिटलमध्ये नेणार होते, पण तिथेही कारमध्ये बॉम्ब लावून ठेवलेला आहे, हे मला माहिती होते. त्यामुळे मी एम्समध्ये घेऊन चला म्हणालो. एवढे हल्ले झाले, तरीही मला काहीही झाले नाही, ही भारतमातेची कृपा आहे. त्यानंतर नरसिंहराव यांनीच मला 'जिंदा शहिद' अशी उपाधी दिली.

**प्रश्न** : राष्ट्रध्वजाचे महत्त्व कुणामुळे कमी झाले असे वाटते?

**बिट्टा** : आज देशात वंदेमातरम्, राष्ट्रप्रेम यावर लोक दुकानदारी चालवतात. माझ्या शरीराच्या अर्ध्या भागावर बंदुकीच्या गोळ्या आणि बॉम्बच्या स्फोटांच्या खुणा आहेत, पण देशावर मनापासून प्रेम करतो. तिरंग्याचे महत्त्व कधीही कमी होऊ दिले नाही. दुर्दैवाने मधल्या काळात राष्ट्रध्वजाला महत्त्व देण्यात आले नाही, पण विद्यमान सरकारच्या काही धोरणांमुळे तिरंग्याचे महत्त्व राखले जात आहे. तिरंग्याला कागदाचा किंवा कापडाचा तुकडा समजू नका. स्वातंत्र्यदिनाचा उत्सव 'प्रोफेशनल'

करण्यापूर्वी जालियनवाला बागच्या शहिदांचे स्मरण करा. स्वातंत्र्य कसे मिळाले, याचा विचार करायला हवा.

**प्रश्न** : आपण सतत राजकीय दहशतवादाचा उल्लेख करता, नेमके काय म्हणायचे आहे?

**बिट्टा** : मी लाल बहादूर शास्त्री व सरदार पटेल यांच्या विचारांचा काँग्रेसी आहे. या दोघानंतर आपण राजकीय गुलामीत जगतोय. हळूहळू राजकीय दहशतवादही फोफावत गेला. माझी सुरक्षा काढून घेण्यात आली, तो राजकीय दहशतवादच होता. मृत्यू माझा मित्र आहे, पण राजकीय दहशतवादाला मी घाबरतो. त्यामुळे मी ईश्वराकडे कायम प्रार्थना करतो, मला तिरंग्याचे रक्षण करताना मृत्यू येईल, तर माझी मुले, परिवार म्हणेल, देशासाठी प्राण गमावले. मी 'शहीद होणे' आणि 'कुर्बानी देणे' हे शब्द वापरत नाही. कारण त्याने देशावर उपकार केल्यासारखे होईल.

**प्रश्न** : नक्षलवाद, दहशतवाद कमी होईल, असे आपल्याला वाटते का?

**बिट्टा** : नक्षलवादी असो, खलिस्तानवादी असो किंवा काश्मिरचा दहशतवाद असो. आता संवादाची वेळ त्यांच्या हातून निघून गेली आहे. राज्यकर्त्यांची नजर ज्या दिवशी यांच्यावर पडेल, त्या दिवशी यांचे अस्तित्व पूर्णपणे संपुष्टात येईल. त्यामुळे आता शरण येण्याशिवाय यांच्याकडे पर्याय नाही. भविष्यात भारतातून दहशतवादाचा समूळ नायनाट होईल, याचा मला विश्वास आहे.

## ४.३ स्वाध्याय :

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) मुलाखत म्हणजे काय ते सांगून मुलाखत लेखन प्रकाराचे स्वरुप स्पष्ट करा.

२) मुलाखत लेखन प्रकाराची वाटचाल कशाप्रकारे झाली ते सांगून मुलाखत तंत्राची चर्चा करा.

३) मुलाखत लेखनपूर्व कोणती दक्षता घ्यावी ते सांगा.

४) वर्तमानपत्रातील मुलाखत लेखनाचे स्वरुप सविस्तर मांडा.

५) वर्तमानपत्रासाठी मुलाखत घेताना कोणती दक्षता पत्रकाराला घ्यावी लागते?

६) आकाशवाणीवरील मुलाखतीचे स्वरुप विवेचन करा.

७) आकाशवाणीसाठी अथवा नभोवाणीसाठी मुलाखत घेताना पाळावयाची पथ्ये कोणती आहेत?

८) आकाशवाणी अथवा नभोवाणीवरील मुलाखतींच्या प्रकारांची सविस्तर माहिती द्या.

९) दूरचित्रवाणीवरील मुलाखत तंत्र विषद करा.

१०) दूरचित्रवाणीवरील मुलाखत घेताना कोणती काळजी घेणे आवश्यक आहे?

११) दूरचित्रवाणीवरील मुलाखतींचे प्रकार सांगा व त्याची सविस्तर चर्चा करा.

## ४.४ संदर्भ ग्रंथ सूची :


१) जोशी डॉ. आशुतोष, मराठी निबंध लेखन, पत्रलेखन, आकलन, दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे.

२) वाळिंबे मो. रा. 'सुगम मराठी व्याकरण लेखन', नितीन प्रकाशन पुणे.

३) नसिराबादकर ल. रा. 'व्यवहार उपयोजित मराठी लेखन व व्याकरण'.

४) 'प्रसारमाध्यमांसाठी लेखन कौशल्ये', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

५) 'दूरचिवाहिला' जनसंज्ञापन व आधुनिक प्रसारमाध्यमे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

६) 'मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्य' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक.


❖❖❖